म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय चरित्र
दा क्र ३

IRBK-0100003

IRBK-0100003
IRBK-0100003

ग्रं. सं. ठाणे. ग्रन्थालय शाखा.
नों. द्र. ... ३ ...
पारेग

एक महत्वाचा
पणीं इटली
तथापि त्या
सुदैवांत हे
न धरित

# प्रस्तावना.

ग्यारिबाल्डी

...वाचनापासून जे अनेक फायदे आहेत त्यांमध्यें राष्ट्राच्या ...मोडींच्या स्थूल अवलोकनानें मनुष्यमात्रास जो एक प्रकारचा ... मिळतो तो माझ्यामतें सर्वांत अत्यंत मौल्यवान् असा फायदा ... अशा तऱ्हेचें स्थूल अवलोकन करणारास हें तेव्हांच दिसून ... कीं, जगांतील राष्ट्रांची घडामोड नित्य चालू आहे, व ह्या ...मोडीपासून उत्कर्षाचे स्थितींत असलेल्या राष्ट्रांनीं ज्याप्रमाणें ...गें आपल्यास अपकर्ष येण्याचा संभव आहे हें जरूर ध्यानांत ...ळगिलें पाहिजे, त्याचप्रमाणें अपकर्षाचे स्थितींत असणाऱ्या राष्ट्रांनींही पुढें मागें आपला उत्कर्ष खचित होईल अशी सदाशा निरंतर हृदयांत बाळगण्यास हरकत नाहीं. भरभराटींत असणाऱ्या ... ...नां आपल्या शाहाणपणाची घमेंड असेल त्यांनीं मागील इतिहा- ...डे वळून ग्रीसची स्थिति पाहावी; ज्याला पराक्रमाचा अभिमान असेल त्यानें रोमचा इतिहास ध्यानांत आणावा; आंगच्या शौर्यावर वाटेल तें करूं असा ज्यांचा बाणा असेल त्यांनीं स्पार्टाकडे पाहावें; धर्माभिमान अंगीं असला ह्मणजे अशक्य असें कांहींच नाहीं असें ज्यास वाटत असेल त्यांनीं मुसलमानी राष्ट्राकडे नजर द्यावी; ह्मणजे सर्व प्रकारच्या उद्दामवृत्ती जागच्याजागींच जिरतील. दुसरे पक्षीं जीं राष्ट्रें नष्ट दशेला येऊन पोंचलीं असतील व ज्यांच्यांतील विचारी देशभक्तांचीं मनें वेळोवेळीं निराशेनें व्यापून जात असतील त्यांनींही मागील इतिहासाकडे पाहिलें ह्मणजे आपत्तीच्या आं... ...नंतर ऐश्वर्यसूर्य खचितच केव्हांना केव्हां ... ...तील ...य कळून येईल. आ... ...वरील ...आहेत व त्यां... ...पाण्यांत ...चे म...

केतूसुद्धां नियमबद्धच आहेत. पुरीं हजार वर्षें दुःखा
काढल्यावर पूर्वीचें रोम ह्मणजे हल्लींचें इटली या राष्ट्र
झाला. ग्रीसला हजाराचे ठिकाणीं दीड हजार वर्षें घालव
परंतु शेवटीं त्यांचें पारतंत्र्य जाऊन त्यांनां सुस्थिति प्रा
वठलेल्या झाडांससुद्धां पाणी घालीत राहिलें असतां क
फुटतात. मग राष्ट्रें हीं तर काय मनुष्य प्राण्यांचींच बनलेलीं

स्वराष्ट्र कितीही जीर्णदशेस आलें असलें तरी त्याचा
पुढें मागें होणारच आहे हें ध्यानांत वागविणें हें प्रत्येक मनु
कर्तव्य आहे. मात्र एक गोष्ट विशेष महत्वाची असून अ
ध्यानांत धरली पाहिजे, ती ही कीं, हें कर्तव्य येथेंच सं
नाहीं. राष्ट्रांच्या उदयाचे नियम काय आहेत व स्वराष्ट्राचा उद
होण्यास त्यांतील कोणते उपाय विशेषतः योजिले पाहिजे
या गोष्टीचा विचार करणें हें त्या कर्तव्यांत प्रमुखत्वानें येतें. ह्मणजे
" नीचैर्गच्छत्युपरिच दशा चक्रनेमिक्रमेण " या नियमाप्रमाणें
उतार आपोआप ईश्वरी संकेताप्रमाणें होत असतोच मग आपणाकडे
त्याचें काय आहे, अशा तऱ्हेचा केवळ दैववादाचा अनुवाद न
करितां ज्यानें त्यानें असें मनांत बाळगिलें पाहिजे कीं, नियति–चक्र
फिरविण्यास झालें तरी थोडीबहुत शक्ति लागतेच व ती शक्ति प्रचलित
करणें हें अंशतः कोणासही शक्य आहे. ही शक्ति **आपण** अंशमानानें
तरी व्हावें अशी आकांक्षा प्रत्येक मनुष्याच्या हृदयांत असली पाहिजे.
राष्ट्रोत्कर्षाच्या निरनिराळ्या पायऱ्या ह्मणजे निरनिराळ्या काळीं त्या
राष्ट्रांत उत्पन्न होणाऱ्या असामान्य व्यक्ति याच होत, व अशा पाय-
...ंपैकीं आपण एक व्हावें ही महत्वाकांक्षा ज्या देशांतील लोकां...
...होईल त्याच देशाला निर...
दशा पुढें मागें
...रिब

एक महत्वाचा भाग आहे यांत शंका नाहीं. ग्यारिबाल्डीचे तरुणपणीं इटली स्वतंत्र होण्याची बिलकुल आशा दिसत नव्हती; तथापि त्याचे मरणापूर्वी तोच इटली स्वतंत्र झालेला पाहण्याचे त्याचे सुदैवांत होतें. परंतु ग्यारिबाल्डीनें स्वार्थत्याग करून जिवाची आशा न धरितां केवळ स्वदेशभक्तीचे प्रेरणेनें जीं महत्कृत्यें केलीं तीं जर तो न करता तर स्वदेश स्वतंत्र झालेला पाहण्याचे त्याचे नशिबीं खचित येतेंना. अवघ्या राष्ट्राच्या घडामोडींत ही एकटी व्यक्ति काय करूं शकते याचें ग्यारिबाल्डीचें चरित्र हें एक उत्कृष्ट उदाहरण आहे अशी माझी खात्री आहे व माझ्या देशबांधवांस हें चरित्र वाचल्यापासून बराच बोध होईल असा मला भरंवसा वाटल्यावरून हें लहानसें पुस्तक मी लोकांस सादर केलें आहे.

पुणें,
ता. २० आक्टोबर १९०१.

न. चिं. केळकर.

IRBK-0100003
IRBK-0100003

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
ना. क............ नों दि ............

सुप्रसिद्ध इटालियन राष्ट्रभक्त व पराक्रमी वीर

# ग्यारीबाल्डी.

## भाग १.

### जन्मवृत्तांत.

“ क्रियासिद्धिः सत्वे भवति महतां नोपकरणे ” भोजप्रबंध.

“ दैवायत्तं कुलेजन्म, मदायत्तं च पौरुषं ” वेणीसंहार.

१ **जन्मस्थान**—फ्रान्स व इटलि या दोन देशांच्या सरहद्दीवर व भूमध्य समुद्राला लागून असलेल्या आल्प्स पर्वताच्या एका भागाचे पायथ्याशीं नाईस या नांवाचें एक शहर हल्लीं वसलेलें आहे. चालू शतकाचे प्रारंभीं नाईस हें निवळ खेडें होतें; तथापि त्याची रचना फारच रमणीय होती. एका बाजूस लांबच लांब डोंगर लागून गेलेले असून दुरून आल्प्स पर्वताचीं बर्फानें आच्छादिलेलीं पांढरीं—शुभ्र शिखरें स्वच्छ दिसत. त्याच्या अलीकडे माऊंट ओबॅनो नांवाचा बळकट तटबंदीचा व शेदीडशें वर्षें लढायांमध्यें झुंझलेला असा भव्य डोंगरी किल्ला एका उंच व तुटलेल्या कड्यावर उभा होता, व त्याच्या भयाण छायेंत हें लहानसें खेडें गडप होऊन जात असे. दुसरे बाजूस पाहिलें तर भूमध्य समुद्राच्या सुंदर निळ्या लाटा या खेड्यांतील घरांच्या पायऱ्यावर आपटत, व निवांत वेळीं किनाऱ्यावरील अवघ्या इमारतींच्या ओळींचें प्रतिबिंब समुद्राच्या स्वच्छ पाण्यांत

पडत असे. तिसऱ्या बाजूस पहावें तर आल्प्स पर्वतामधून निघालेला एक मोठा ओढा या गांवाचे कडेनें खळखळ वहात जाऊन समुद्राला मिळालेला होता. या खेड्यांत चालू शतकाचे आरंभीं कोळी लोकांची बरीच वस्ती असे. त्यांनीं होड्या बाळगाव्या, समुद्रांत जाऊन मासे धरून आणावे, व त्यावर आपली उपजीविका करावी. इतर कोणी याहून बऱ्या स्थितींत होते त्यांचीही पण उपजीविका समुद्रावरच चाले; ह्मणजे कोणी परक्यांच्या जहाजावर नोकरी पतकरून खलाशाचें किंवा तांडेलाचें काम करीत, व कोणी स्वतःचे मालकीचीं जहाजें ठेवून व्यापार करीत.

गृहस्थिति –अशा या खेडेगांवांत या शतकाचे प्रारंभीं डोमेनिको ग्यारिबाल्डी व त्याची बायको रोझा असें एक सुखी जोडपें राहत असे. डोमेनिको हा घरचें जहाज ठेवून व्यापार करी, व रोझा गृहप्रपंच मोठ्या नीटनेटकेपणानें करून नवऱ्याला सुख देई. डोमेनिको व रोझा दोघेंही स्वभावानें सज्जन व प्रेमळ अशीं होतीं. ग्यारीबाल्डी हें नांव फार जुनाट आहे; तें इतकें कीं, सुमारें दोन हजार वर्षांपूर्वींच्या रोम येथील प्रजासत्ताक राज्याचे वेळच्या वरिष्ठ प्रतीच्या कित्येक कुळींतून ग्यारिबाल्डी हें (उप) नांव प्रचलित असलेलें आढळतें. परंतु खुद्द डोमेनिको ग्यारिबाल्डीचे घराण्यांत जुन्या नांवापेक्षां दुसरें कोणचेंही ऐश्वर्य उरलेलें नव्हतें. डोमेनिकोचा आजा पुरा दरिद्री होता, व त्याच्या बापानें जे काय दोन पैसे मिळविले होते, ते त्याचे त्यानेंच मूर्खपणानें सट्टयाचे व्यापारधंदे व चैनबाजी करून उडवूनही टाकिले होते. पुढें डोमेनिको वयांत आला, तेव्हां घरची अगदीं गरिबी असल्यामुळें प्रथम प्रथम त्याला निवळ कोळ्याचा ह्मणजे मासे

मान्याचा धंदा करावा लागला. परंतु कोणताही धंदा नेकीनें व मेहनतीनें केला असतां, तो बहुधा सफळ होतो, त्याप्रमाणें डोमेनिकोला असल्या हलक्या धंद्यांतही चार पैसे मिळाले; व त्यानें आपल्या मालकीचें एक जहाज घेऊन व्यापार चालविला. तथापि एकंदरीनें पाहतां डोमेनिकोची घरची स्थिति गरीबी-चीच होती म्हटलें तरी चालेल.

**जन्म**—अशा या सुशील, सात्विक, धर्मभोळ्या व गरीबशा जोडप्यास इ. स. १८०७ सालचे जुलई महिन्याचे २२ वे तारखेस एक मुलगा झाला. याचें नांव जोसेफ. रोझा इची आपल्या मुलांवर फारच ममता असे. जोसेफला तर ती अगदीं जीव कीं प्राण करी. आपला जोसेफ पुढें अचाट पराक्रमानें जगाला थक्क करून सोडील, व इटालीचा उद्धार करून पृथ्वीवरील स्वदेशभक्त मालिकेंतील शिरोमणि, किंबहुना अवतारी पुरुष, अशी कीर्ति मिळवील, हें त्या बिचारीच्या स्वप्नांतही कधीं आलें नसेल. पण असें जरी आलें असतें तरी काय? मुलगा ह्मणून जोसेफवर तिचें जें प्रेम होतें, तें वाढण्याला त्या तिच्या हृदयांत वावच नव्हता.

**बाळपणचे खेळ**—जोसेफचा बाळपणीं विद्याभ्यास फारसा झाला नाहीं. घरचें वळण तिकडे नव्हतेंच. व मुलालाही जातीनें विद्याभ्यासाची फारशीं गोडी नव्हती. तथापि इतर मुलांप्रमाणें आपल्या बाळपणीं त्यानें फारशी उगाच उनाडकी केली नाहीं. सृष्टिसौंदर्याच्या अभिरुचीचें मात्र त्याला बाळकडूच होतें ह्मटलें तरी चालेल. केव्हांही फुरसद सांपडली कीं, त्यानें उठून उंच डोंगरावर जावें व तेथें एकांतवासांत सृष्टिसौंदर्य पाहत तासाचेतास घालवावे. त्याला प्रवासाची गोडी केव्हां व कशी लागली असेल ती असो; प्रवास ह्मटला, कीं याचा

पाय नेहमीं पुढें असावयाचा. त्यांतून समुद्रावरचा प्रवास ह्मटला ह्मणजे तर त्याला अगदीं दुधांत साखर पडल्यासारखें वाटे. जोसेफ हा बाळपणापासून किंचित् हूड, धीट व साहसप्रिय असा होता. पाण्याचें भय ह्मणून कसें तें त्याला ठाऊकच नव्हतें. आपल्या इकडे मुलाला कित्त्यावर घालतात, तसा डोमेनिकोनें जोसेफला लहानपणींच होडीवर घातला होता. परोपकारीपणाचाही त्याचा अंकुर जन्मसिद्धच होता. यामुळें अगदीं बाळपणापासून त्याचे हातून परोपकारप्रीत्यर्थ साहसाचीं कृत्यें घडलीं. जोसेफ हा केवळ आठ वर्षांचा असतां त्यानें पाण्यांत पडलेली एक परटीण वर काढली अशी गोष्ट सांगतात. ही गोष्ट कित्येकांस खरी वाटत नाहीं; परंतु पुढें १२व्याच वर्षीं तो एकदां होडींत बसून समुद्रावर मौजेनें चालला असतां, अकस्मात् वारा सुटून दुसऱ्या एका होडींतील माणसें, होडी उलटून पाण्यांत पडलीं; व हें पाहतांच जोसेफनें उडी टाकून त्यांपैकीं कांहींचे प्राण वांचविले, ही गोष्ट मात्र महशूर असून तिजबद्दल कोणाचाही वाद नाहीं. जॉसेफ ग्यारिबाल्डी, आपल्यास 'जळमाणूस' असें ह्मणवून घेई; व खरोखर त्याची सर्व तालीम व कसरत जहाजावर ह्मणजे डोलकाठ्यांचे खांबावर व अवजारांच्या दोरांवरच तयार झाली होती. समुद्रपर्यटणासंबंधानें एक गोष्ट त्याच्या चरित्रांत व खुद्द त्यानें लिहिलेल्या आत्मवृत्तांतांतही नमूद केलेली आढळते, ती अशी.—लहानपणीं शाळेंत शिकत असतां जोसेफला समुद्रावर सफर करावयाची एक दिवस हुक्की आली. लागलेंच त्यानें आपले दोन सोबती बरोबर घेतले, व प्रवासाची सामुग्री एका लहानशा फडक्यांत बांधून घेऊन, हे तिघे प्रवासी, बंदरांत जाऊन एका कोळ्याच्या होडीवर चढले. होडी बंदरांतून

काढून ह्या खाऱ्या बाहेर समुद्रावर तर गेल्याच; मग पुढें शें पन्नास कोसांची सफर करावयाचा त्यांचा बेत होता कीं काय नकळे! पण कर्मधर्मसंयोगानें एका गृहस्थानें ह्या सफरीची वर्दी जोसफच्या बापाला दिली, तेव्हां लागलीच त्यानें त्यांच्या मागोमाग एक होडी पाठवून त्यांना पकडून परत आणिलें!

**शिक्षण**—असो. ग्यारिबाल्डी हा घोड्यावर बसायला व तरवार खेळायला फार चांगलें शिकला होता. व बहुधा त्याचा करमणुकीचा सर्व वेळ मर्दुमकीचे खेळ खेळण्यांत जाई. आईबाप शाळेला जा ह्मणत, व त्यांची आज्ञा मोडावयाची नाहीं येवढ्याकरितांच तो शाळेला जाई व थोडा बहुत अभ्यासही करी. परंतु आईबापांचे मनांत तरी त्यानें पुष्कळ अभ्यास करून विद्वान् व्हावें असें कोठें होतें? त्या वेळची परिस्थितीच अशी चमत्कांरिक होती कीं, विद्वत्तेला सरकार दरबारांत फारसा मान नव्हता. शिवाय धर्मोपदेशक लोक साऱ्या देशभर पसरलेले असत; चांगलासा शिकला सवरलेला मुलगा पाहिला कीं, "संसारांत पडून काय करायचें? राजकीय कारभारांत कशाला मन घालतोस? मठवास पत्करून धर्माचें अध्ययन व पोपाच्या धर्माचा प्रसार करायला चल आमच्या बरोबर" असा ते बुद्धिवाद करीत असत. यामुळें, मुलानें शिकून सवरून चार पैसे मिळवावे व राज्यकारभारांत मान्यता संपादावी, अशी महत्वाकांक्षा असलेल्या आईबापांना, मुलांस शिक्षण देऊन त्यांस मोकळें सोडणें, फारच धोक्याचें वाटूं लागलें होतें. इकडे सरकाराकडून शिक्षणाला उत्तेजन ह्मणावें तर तेंही यथायथाच. त्या काळच्या जुलमी राजांच्या मनानें, शिक्षणाचे योगानें तरुण लोक स्वातंत्र्यप्रिय व बंडखोर होतात अशी दहशत घेतलेली होती; व

अनुभवावरून पाहतां त्यांची ती भीति अगदींच निरर्थक होती असेंही ह्मणतां येत नाहीं. कांहींही असलें तरी, त्या काळीं सरकारानें शिक्षणावर कडक अंमल व दाब ठेवला होता एवढें खरें. या सर्व कारणांमुळें शिक्षणासंबंधानें सर्वत्र अनास्था झाली होती. या बाह्य कारणांची स्वाभाविक मनःप्रवृत्तीला भर पडून जोसेफच्या दप्तराला लवकरच गांठ लागली. तरी पण त्याचें वाचन तेथेंच संपलें असें झालें नाहीं. फावल्यावेळीं आपल्या आवडीचीं पुस्तकें मिळवून तो वाची. कांहीं कांहीं शिक्षकांशीं त्याचा स्नेह जमला होता; त्यांजपासून तो स्वदेशाचे जुने इतिहास घेऊन त्याचीं पारायणें करी. देशभक्तांचीं मनें प्रायः बाळपणींच स्वदेशाच्या जुन्या इतिहासाकडे आपोआप वेधतात, व त्या इतिहासवाचनाचे योगानें त्यांचे मनांतील स्वातंत्र्यप्रियतेच्या अंकुराला पुष्टी मिळते, हा नियम जगाचे इतिहासांत पुष्कळच ठिकाणीं पाहण्यांत आलेला आहे. जोसेफ ग्यारीबाल्डीचीही गोष्ट अशीच होती. आधींच शिक्षण थोडें व कनिष्ट प्रतीचें; शिक्षकवर्गांत स्वदेशभक्तांचा अभाव; व स्वातंत्र्यप्रियतेचें बीज करपवून टाकण्यासारखी जुलमी अधिकाराची प्रखरताः– अशा परिस्थितींत असूनसुद्धां ग्यारिबाल्डीचें मन स्वभावतःच, कोणी न शिकवितां न सवरतां, स्वदेशाच्या जुन्या इतिहासाकडे वेधलें ही गोष्ट ध्यानांत धरण्यासारखी आहे. असो; इटलीचा जुना इतिहास वाचावा, त्याचेंच मनन करावें, स्वदेशाचें गतवैभव आठवून वाईट वाटून डोळ्यांतून पाणी काढावें, व त्या डोळ्यांतील पाण्यानेंच मनांतील स्वदेशप्रीतिरूपी वल्लीला पुष्टी मिळावी, हा क्रम जोसेफ ग्यारिबाल्डीच्या बाळपणापासून चाललेला होता. जुन्या इतिहासांत नांवाजलेलीं व आपल्या पूर्वजांनीं पराक्रम करून चिरस्म-

रणीय करून ठेविलेलीं स्थळें तो प्रसंगाप्रसंगानें पाहून येत असे. इतिहासांत प्रसिद्ध असलेलें, सर्व जगाची एकवेळ राजधानी होऊन बसलेलें, व विद्या व कला यांचे योगानें नेहमींच जगद्वंद्य असें रोम शहर, जुलमी पोपाच्या व फ्रेंच राजाच्या ताब्यांत गेलेलें पाहून त्या वेळीं जोसेफ ग्यारिबाल्डीचे मनांत कालवाकालव होऊन जात असे. असो. तात्पर्य, ग्यारिबाल्डी-च्या मनाची व शिक्षणाची स्थिति अशी होती, हें ध्यानांत आणलें ह्मणजे त्याचा आयुष्यांतील पुढील वर्तनक्रम सर्व समजतो.

**प्रथमच्या सफरीः**—वयांत येऊन कांहीं तरी स्वतंत्र धंदा करण्याएवढा झाल्याबरोबर जोसफनें दर्यावर सफरी करण्यास प्रारंभ केला. तारुण्यांत जो धंदा करावा त्यावर प्रेम बसतें. ग्यारिबाल्डीला तर या सफरी ह्मणजे जसें कांहीं आनंदाचें निधानच वाटत असे. त्या वेळीं त्याचे दृष्टीनें सर्व जगांत शूर माणूस ह्मणजे जहाजाचा तांडेल. जहाज ह्मणजे जशी काय त्याची आवडती बायकोच, प्राणाहून प्यारी. सगळ्या संगीतांत नावाड्यांचें गाणें ह्मणजे अगदीं गोड. फार काय पण खलाशी ह्मणजे आकाशांतला देव-निदान देव-दूत असें त्याला वाटत होतें. मुलगा लहान पडला आणि सफ-रींचें काम फार धोक्याचें; यास्तव ग्यारिबाल्डीचा बाप त्याच्या-बरोबर प्रथम प्रथम जात असे, परंतु लवकरच तो स्वतंत्रपणें समुद्रावर जाऊं लागला. ग्यारिबाल्डी हा सुमारें २२ वर्षांचा झाला त्या वेळीं त्यानें कॉरटेसी नांवाच्या एका जहाजावर दुय्यम कप्तानाची नोकरी धरली. ही नोकरी करीत असतां पहिल्या पहिल्या सफरींत तर त्याजवर पुष्कळच संकटें आलीं. भूमध्यसमुद्रांत तो एकवेळ प्रवास करीत असतां फार

जोराचें वादळ झालें, व त्याच्याबरोबरचें दुसरें एक जहाज खडकावर आपटून फुटलेंही. खुद्द त्याचें जहाज मात्र मोठ्या शर्थीनें वांचलें. ग्यारिबाल्डीच्या बऱ्याच सफरी भूमध्यसमुद्रांत, काळ्या समुद्रांत, व विशेषतः ग्रीसदेशाच्या किनाऱ्याकडे झाल्या. त्या काळीं या समुद्रांवर चांचे लोकांचा फारच सुळसुळाट असे. त्यांच्या तावडींत ग्यारिबाल्डी हा तीन वेळां सांपडला होता. पहिल्या खेपेस तर त्याची फारच दुर्दशा झाली. एके दिवशीं माटापानचे भूशिरापाशीं असतांना, चांचे लोकांची अकस्मात् गांठ पडून त्यांनीं ग्यारिबाल्डीचें जहाजच्या जहाज सफई लुटलें. पोटांत भूक पेटली आहे, पायांत बूटसुद्धां राहिला नाहीं, अशा स्थितींत तो एकदांचा कसा तरी जमिनीला लागला. नंतर सुदैवानें एका इंग्लिश सद्गृहस्थाची व त्याची गांठ पडली, व त्याचे सहायानें ग्यारिबाल्डी फिरून नाईस गांवीं परत आला. असे प्रसंग एक का दोन ह्मणून सांगावे? टक्के टोणपे खाऊनच माणसास शहाणपण येतें ह्मणतात, त्याप्रमाणें ग्यारिबाल्डीनें लहानपणच्या सफरींत अनेक संकटें सोशिलीं खरीं; परंतु त्यामुळें त्याच्या अंगीं साहस, धैर्य, व शहाणपण हे गुण चांगलेच आले. व त्याहूनही विशेष फायदा असा झाला कीं, त्याचे अंगीं स्वातंत्र्यप्रियतेचें एक प्रकारचें वारेंही खेळूं लागलें. अशा रीतीनें आपल्या वयाचीं पहिलीं २५।२६ वर्षे ग्यारिबाल्डीनें बाळपणच्या लीला व तरुणपणचे स्वेच्छाचार करण्यांत घालविलीं. या संथ व निर्मळ आयुःक्रमणप्रवाहांत, पुढें त्याचेच हातून घडून येणाऱ्या प्रचंड देशकार्याची छाया पूर्वीं कधींही पडली नव्हती. उन्हाळ्यांतील एखादे दिवशीं सायंकाळीं प्रचंड वादळ व्हावयाचें असून त्याची सामुग्री हळू हळू दिवसभर जमत असते; तथापि प्रातःकाळच्या

स्वच्छ आभाळांत त्याचा मागमूस तरी दिसतो काय ? किंवा आपल्या मुखाजवळ प्रतिसमुद्राचें स्वरूप धारण करून व शें-कडों प्रवाह-बाहूंनीं समुद्राला कंवटाळून, आपल्या ओघाचे जोरानें खारें पाणी कित्येक कोसपर्यंत मागें हटविणाऱ्या सिंधु-नदाचें किंवा गंगानदीचें पात्र जर उगमाजवळच पाहिलें, तर त्यांच्या मुखाजवळच्या पराक्रमाची कोणास कधीं तरी कल्पना येईल काय ? कधींही येणार नाहीं. ग्यारिबाल्डीच्या बाळपण-चीही गोष्ट अशीच होती.

## भाग २.

## स्वदेशाभिमानाचा संचार.

एकेनापि सुपुत्रेण सिंही स्वपिति निर्भयं ॥
सहैव दशभिः पुत्रैर्भारं वहति रासभी ॥ १ ॥ सुभाषित.

**शिक्षण व स्वदेशाभिमान**-स्वदेशभक्ति अंगीं येण्याला शिक्षण मिळावें लागतें असें कित्येकांचें मत आहे; परंतु हें अगदीं चुकीचें ह्मणावें लागतें. स्वातंत्र्यप्रियता किंवा स्वदेशभक्ति हे गुण अंगीं उपजतच असावे लागतात. हे गुण जातीचेच असतील तर शिक्षणाचे योगानें त्यांना उज्वलता किंवा दीप्ति येईल; परंतु ते नसतील तर कितीही शिक्षण दिलें तरी तें अळवावरच्या पाण्यासारखें व्यर्थ होय. एवढेंच नव्हे, तर स्वार्थपरायण व स्वदेशप्रीतिशून्य माणसाचें शिक्षण हें, माकडाचे हातांतील कोलतीप्रमाणें केवळ देशाच्या नाशास व अनर्थास कारणीभूत होतें. दुसरे पक्षीं पाहतां शिक्षणाचा गंधही नसतां कित्येक महात्मे केवळ आपल्या देशभक्तीचे जोरावरच नांवारूपास येऊन, विद्वत्तेनें कधींही साध्य न होणारीं अशीं कृत्यें त्यांनीं केल्याचीं उदाहरणें जगाचे इतिहासांत किती तरी सांपडतील! ग्यारिबाल्डीचें चरित्रही अशाच उदाहरणांपैकीं एक प्रमुख उदाहरण ह्मणून मनन करण्यासारखें आहे.

**देशस्थिति**-आपल्या वयाचे २६।२७ वे वर्षापर्यंत ग्यारिबाल्डीला स्वदेश खरोखर कोणत्या स्थितींत आहे, व ती स्थिति सुधारण्याला काय उपाय योजिले पाहिजेत, याची कल्पनाही नव्हती. तथापि एका गोष्टीबद्दल त्याची पुरी खात्री होऊन राहिली होती.

ती ही कीं, आपला देश परकीयांचे ह्मणजे ऑस्ट्रियनलोकांचे ताब्यांत गेलेला असून, त्याचें पूर्वीचें सर्व वैभव नष्ट झालेलें आहे. जिकडे पहावें तिकडे बेबंदशाई माजलेली. राज्याबाहेर समुद्रावर जावें तर दुष्ट जुलमी चांचे लोक प्रवाशांना खुशाल लुबाडून घेऊन अनन्वित कृत्यें करीत, व प्रजेच्या संरक्षणाचा पत्कर घेतलेल्या राज्यकर्त्यांचे हातून त्यांचा मुळींच प्रतिकार होत नसे. राज्यांत पहावें तर रयतेच्या तोंडावर तेज नाहीं. झाडावर रोग पडावा तसा प्रकार पारतंत्र्यानें प्रजेचा झालेला. राजाधिकाऱ्यांच्या करड्या अंमलामुळें शहरांना व खेड्यांना तुरुंगांचें स्वरूप आलें होतें. अज्ञानाचा अंधःकार चहूंकडे दाट पसरला होता. अभिमानाचा तर मागमूसही नाहीं. व स्वदेश प्रीतीची एखादी ठिणगी कोठें कधीं लकाकलीच, तर आसमंतांत दाही दिशेला माजलेल्या औदासिन्यरूपी अंधकाराचे योगानें निराशा ही मात्र एखाद्या भुयाराप्रमाणें भयाण दिसे. जुलमी राजांचे कडक अमलामुळें वर्तमानपत्रें सरास चालत नसत, व विचारस्वातंत्र्य तर अगदींच नव्हतें. यामुळें जिकडे पहावें तिकडे अज्ञान व भ्रम माजलेला. लोकमत बनण्यास चांगलीं साधनें मुळींच नव्हतीं. तथापि आगीवर माती लोटली असतां फार तर ज्वाळा दबतात, पण धूर येतच असतो; व अंतर्यामीं निखारे पिचत असतात, हें मात्र तो दर्शवितो. त्याचप्रमाणें मुद्रणस्वातंत्र्य नष्ट झालें होतें तरी त्या स्थिती-मध्येंही किंचित् विचार करणाऱ्या माणसाला असें तेव्हांच कळून येत असे कीं, प्रजा व राज्यकर्ते यांजमध्यें पराकाष्ठेचा बेबनाव झालेला असून तो क्षणोक्षणीं कमी न होतां उलटा वाढतच जात आहे. राजांनीं मनस्वितेनें व अधिकारमदानें धुंद होऊन कडक कायदे करावे, व त्यांचा अंमल सक्तीनें

चालवावा. आणि इकडे प्रजेच्या मनांत असंतोष अधिकाधिक धुमसत जाऊन नाइलाजास्तव बेफामपणें बंडें करण्यास त्यांनीं प्रवृत्त व्हावें, अशा तऱ्हेची लोकस्थिति लोकांपासूनच लपवून कशी लपणार ? इटली देशाच्या या काळच्या स्थितीचें वर्णन निरनिराळ्या ग्रंथकर्त्यांनीं निरनिराळ्या रीतीनें केलेलें आहे. पैकीं येथें फक्त एक दोनच उतारे देतों. लॉर्ड बायरन हा प्रख्यात इंग्लिश कवि, स्वतंत्रतादेवीचा पुरा भक्त होता. त्यानें इटलिसंबंधानें खालील उद्गार काढले होते:—"हर हर! कोण हे नीच राजे! त्यांचा एकदा नाश होऊं द्या कीं, पहा इटली देश फिरून पूर्वीप्रमाणें तरतरीत व टवटवीत होईल! अजूनही जग सुधारेल अशी आशा आहे. ज्या या हतभागी देशानें आजपर्यंत दुःखाचे व निराशेचे सुसकारे टाकीत कैक शतकें घालविलीं, त्याचा उद्धार करायाला आज जी काय किंमत पडेल ती थोडी आहे! या देशाच्या दुर्दैवी प्रजेनें एक हजार वर्षेंपर्यंत आशातंतूवर जीव धरून ठेवला नाहीं काय? मग आह्मांलाही तशीच सदाशा कां वाटूं नये? इटली देशाचें नष्ट स्वातंत्र्य व वैभव फिरून मिळवून देणें हा केवढा बरें उदात्त व स्तुत्य हेतु आहे! अवघ्या इतिहासाच्या नीरस कथानकांत गोड काव्य असें काय तें एवढेंच आहे असें मी समजतों. अहाहा! इटालियन लोक स्वतंत्र करण्यांत काय मौज आहे याची नुसती एकवार कल्पना तरी करून पहा! मीं त्यांच्यामध्यें पुष्कळ दिवस वास केलेला आहे; जगांत त्यांच्याइतकी प्रीति माझी दुसऱ्या कोणत्याच राष्ट्रावर नाहीं. पण अरेरे, काय करूं? त्यांच्यामध्यें एकी नाहीं. त्यांना धोरण नाहीं. ह्मणूनच त्यांना यश येण्याबद्दल जरा शंका वाटते. त्यांच्यांत कर्तृत्व नाहीं असें नाहीं. व कित्येक तर फारच

उदार मनाचे महात्मे आहेत. पण नीट करतील तर सर्व होईल. त्यांना चांगलासा पुढारी नाहीं! कोण बरें त्यांचा पुढाकार घेईल? पण असो. अशा शंका कां घ्याव्या? अशा बिकट आणीबाणीच्या प्रसंगांतूनच लोकनायक व वीर आपोआप उत्पन्न होतात. देवानें जग निर्माण केलें तें तरी पंचमहाभूतांच्या गुंतागुंतींतूनच ना? मग पंचमहाभूतांप्रमाणेंच प्रबळ अशा मनोविकारांतूनच राष्ट्राचाही उदय कां होऊं नये?"

लार्ड बायरननेंच दुसऱ्या एका प्रसंगीं खालील उद्गार काढले आहेत:– "काय सांगावें? या हतभागी देशावर हल्लीं जो जुलूम चाललेला आहे त्याचें नुसतें वर्णन करण्यास तरी कोण समर्थ आहे? आज हजारो लोक या जुलमी राजांनीं पकडून तुरुंगांत टाकले आहेत, हजारो देशोधडीला लाविले आहेत, व हजारो, त्यांच्यावर कोणच्याही तऱ्हेचा आरोप न ठेवितां किंवा कोणत्याही रीतीनें त्यांचा इनसाफ न करितां, बंदींत टाकले आहेत! मोठमोठीं कुळें व घराणीं सफई उध्वस्त झालेलीं आहेत. हा अनर्थ कोणास तरी पाहवेल काय?"

**गुरूपदेश**—देशाची ही अशी स्थिति ग्यारीबाल्डीला हळू हळू समजूं लागली होती; तिजबद्दल त्याच्या मनांत अत्यंत क्रोधही येऊं लागला होता; परंतु त्या क्रोधाला बाहेर पडण्यास कोठेंही वाव मिळेना. व स्वदेशाच्या स्थितीबद्दल खरी माहिती मिळविण्याचें काम त्याजकडून अहोरात्र चाललेलें असल्यामुळें त्याच्या मनांतील क्रोधाग्नीला दिवसेंदिवस अधिकाधिक पुष्टीच मिळत चालली होती. यासंबंधानें खुद्द ग्यारीबाल्डीनें खालील उद्गार आपल्या 'आत्मचरित्रा'त लिहून ठेविले आहेत. "अगदीं बाळपणापासूनच स्वदेशप्रीति माझे हृदयांत बेफाम वाढली होती, व देशांत येऊन जुलूम करणारे जे परकीय राजे

त्यांच्याविषयीं पराकाष्ठेचा क्रोधाग्नि माझे हृदयांत अगदीं जळजळत असे. अशा स्थितींत माझ्या देशाची मुक्तता करण्याकरितां कांहीं गुप्त कट चाललेले होते, त्यांजमध्यें शिरावें अशी माझ्या मनांत नेहमीं उत्कंठा लागलेली होती. तो हेतु सिद्धीस नेण्यास, प्रथम इटलीच्या भावी स्वातंत्र्याविषयीं जें जें काय कोठें लिहिलेलें असेल तें सर्व हुडकून काढून वाचण्याचा, व त्याचप्रमाणें ज्या स्वदेशबांधवांनीं या महत्कृत्यास आपलें जीवित अर्पण केलें होतें, अशांची ओळख व मैत्री संपादण्याचा, दीर्घ उद्योग मी चालविला. या मार्गांत असतां, एके प्रसंगीं मी टॅगन् रॉककडे जहाजांतून सफरीस गेलों होतों. तिकडे जिनोआ येथील एका स्वदेशाभिमानी पुरुषाची व माझी अवचित् गांठ पडली. त्यानें स्वदेशमुक्ततेविषयीं कांहीं लोकांचे गुप्त प्रयत्न कोठपर्यंत आले होते तें मला सांगितलें. तें ऐकतांच मला झालेला आनंद माझ्या हृदयांत मावेना. आपल्या देशाची सोडवणूक करण्याकरितां कंबर बांधून तयार झालेला असा एक माझा देशबांधव मला आज मिळाला, या विचारानें मला जो हर्ष झाला त्याच्यापुढें एक सबंद नवीन जगच्या जग हुडकून काढलेल्या कोलंबसाचा हर्ष तुछ आहे असें मला वाटलें !" पुढें लवकरच दुसरे एके प्रसंगीं बॅरॉल्ट या नांवाच्या एका बाणेदार व शूर देशभक्ताची व ग्यारीबाल्डीची कान्स्टॅन्टीनोपलला जातांना वाटेंत जहाजावर अवचित् गांठ पडली. दोघांचेही मनांत स्वदेशाविषयीं सारखीच प्रेरणा झाली असल्यामुळें त्यांची तेव्हांच परस्पर मैत्री जमली. आजपर्यंत ग्यारीबाल्डीचे मनांत फक्त इटली पुरत्याच कल्पना होत्या, परंतु बॅरॉल्ड यानें निरनिराळे इतिहास सांगितल्यामुळें त्याचे मनांत इटलीमधीलचशा काय, परंतु जगाचे

पाठीवर सर्व ठिकाणीं असणाऱ्या जुलुमाबद्दल अत्यंत तिट्कारा व द्वेष उत्पन्न झाला. आपल्या देशापुरतें लढण्याचें काम एखादा य:कश्चित पगारी शिपाईही करितो. परंतु जो खरा वीर म्हणून असेल त्यानें पृथ्वीवर कोठेंही अन्याय अगर जुलूम चालला असेल त्याविरुद्ध लढण्यास तेथें धांव घेतली पाहिजे, असें त्याला वाटूं लागलें. आजपर्यंत जहाज म्हणजे निवळ व्यापाराचें किंवा सफरीचें साधन इतकीच त्याची कल्पना होती. ती विस्तृत होऊन त्याला तेंच जहाज म्हणजे, मनुष्यकृत अन्यायाविरुद्ध खुद्द ईश्वराची हुकमतच अवतरली आहे कीं काय, असें वाटूं लागलें. न्यायाची संस्थापना करणारी ईश्वराची तरवार हातांत धरून पृथ्वीवर अवतरणारा असा एक देवदूतच मीं आहे, असेंही त्याला भासूं लागलें. आजपर्यंत केवळ व्यापाराच्या दृष्टीनें पृथ्वीचें तो निरीक्षण करीत असे, तेव्हां त्याची नजर अगदीं कोती होती. परंतु जुलूम व अन्याय यांजवर मोहीम करण्याचा निश्चय मनांत झाल्याबरोबर त्याची तीच दृष्टि जणूं काय एकदम फांकली; व आजपर्यंत कधींही न पाहिलेलीं दूरदूरचीं क्षितिजें, एवढेंच काय, परंतु भविष्यकाळीं स्वदेशांत घडून येणारे जे अनेक चमत्कारिक युद्ध प्रसंग, तेही धुक्यांतून पाहिल्याप्रमाणें आपणास अधंक अंधक दिसूं लागले कीं काय, असेंही त्याला वाटूं लागलें. कर्मधर्मसंयोगानें त्याच्यासारख्या मन:प्रवृत्तीचे सोबतीही त्याला लवकरच भेटले. पंढरीच्या वारीला जाण्याचा मनांत निश्चय करून वारकरी अगदीं एकटा जरी दूरच्या प्रवासाला निघाला, तरी थोड्याच वेळानें वाटेंत त्याला पुष्कळ सोबती भेटूं लागतात, व माळेनें माळ पाहिली कीं मैत्री जमलीच ! तोच प्रकार देशभक्तांचा आहे. स्वदेशप्रीतीची खूण जरी सत-

पाताळा इतक्या खोल हृदयांत गुप्त राहिलेली असली, तरी दूर दूर निराळ्या असणाऱ्या देशभक्तांचीं हृदयें लोहचुंबकाप्रमाणें ओढ घेऊन एकमेकांस ओळखून काढतात. ग्यारीबाल्डीची देखील अशीच स्थिति झाली. जगाचे इतिहास सांगणाऱ्या बॉरॉल्टनें ग्यारीबाल्डीला, खुद्द इटली देशांतच एक मॅझिनी नांवाचा देशभक्त वास्तव्य करीत आहे असें सांगितलें होतें, व त्याचें मन या अदृष्टपूर्व मॅझिनीकडे एकदम इतकें ओढवलें होतें कीं, त्यास केव्हां एकदांचा पाहीन असें त्याला झालें होतें. यास्तव तो लवकरच त्याच्या शोधाकरितां मारसेलिसला निघून गेला. दोघांचीही गाठ पडली व त्यांच्या पहिल्याच भेटींत त्यांनीं एकमेकांची मैत्री संपादिली. येवढेंच नव्हे, तर पुढें देशोद्धाराचे कामीं दोघांनीं मिळून काय काय करावयाचें याबद्दलचे बेतही त्यांनीं ठरवून टाकले. पुढें ग्यारीबाल्डी हा मॅझिनीचे लेख मनःपूर्वक वाचूं लागला, तेव्हां त्याला त्यांत अस्सल स्वदेशाभिमान व स्वदेशप्रीति थबथबून भरलेली असल्याचें दिसून आलें !! मॅझिनीची भाषा अत्यंत आवेशयुक्त व जोरदार असे, यामुळें ते लेख ह्मणजे प्रत्यक्ष ईश्वरानें पृथ्वीवर अवतरून सांगितलेलें शुभवर्तमानच कीं काय, असें त्याला वाटूं लागलें. असो, ग्यारीबाल्डीच्या पुढील सर्व आयुष्याच्या क्रमाचा पाया तारुण्याच्या या थोड्या दिवसांतच रचला गेला. आपल्या हतभागी देशाकरितां लढाई करण्यास प्रवृत्त झालेला असा इटलींत मीं एकटा एकच नसून, माझ्याप्रमाणें इतरही कांहीं लोक तयार आहेत, असें पहातांच ग्यारीबाल्डीचे हृदयांतील प्रेरणेस अधिकच दीप्ति आली. सर्व राष्ट्राची एकवटलेली मनोवृत्ति व जोर हीं आपल्या मनगटांत आलीं कीं काय, असें त्याला वाटूं लागलें. मॅझिनी-

सारख्या लेखकाचे लेख वाचून त्याची अंतरदृष्टि विशाळ व सतेज झाली, व स्वदेशाची मुक्तता करण्याकरितां अवतार घेतल्याप्रमाणें त्याचे अंगांत संचार झाला. असो. मॅझिनी हा कोण होता, व मॅझिनी व ग्यारीबाल्डी त्यांच्यासारख्या मनःप्रवृत्तीचे लोक त्यावेळीं इटलींत आणखी कोण कोण होतें, व त्यांनीं परकीय राज्याचे बळकट किल्याचे तटबंदीखालीं गुप्तपणें सुरूंग कसे लाविले, व पुढें सुमारें पन्नास वर्षेपर्यंत इटली देश संयुक्त व स्वतंत्र करण्याकारितां तिच्या सुपुत्रांनीं जें निकराचें व तुंबळ रण लवकरच माजविलें, त्याची सरबत्ती कशी उडाली, याचा वृत्तांत पुढील एक दोन भागांत संक्षिप्तपणें सांगण्याचा विचार आहे.

# भाग ३.

## गुप्त मंडळ्या, बंडाळी व छळ.

प्रजापीडनसंतापान्समुद्भूतो हुताशनः ।
राज्ञःकुलं श्रियंप्राणान् न दग्ध्वा विनिवर्तते ॥

**थोडासा पूर्ववृत्तांत**—वॉटरलूचे लढाईत नेपोलियन बोनापार्टीचा पराभव करून युरोपांतील सर्व राष्ट्रांनीं युद्धांतील लूट वाटून घेऊन पुढें युरोपांत शांतता राखण्यास काय उपाय करावा याचा विचार करण्याकारितां व्हिएनास एक सभा भरविली. त्या सभेंत झालेल्या तहाच्या योगानें इटली देश कायमचा ऑस्ट्रियाचे ताब्यांत गेला. यावेळीं इटली या नांवाखालीं मोडणाऱ्या प्रदेशाचें क्षेत्रफळ पुरें एक लक्ष चौरसमैल सुद्धां नव्हतें. ह्मणजे या वेळचा इटली देश, हिंदुस्थानांतील हल्लींचा मध्यप्रांत, किंवा हैद्राबादच्या निझामचें राज्य, यापेक्षां फारतर किंचित् मोठा होता; व यावेळीं त्याची लोकसंख्या पुरी दोन कोटी ह्मणजे हल्लींच्या पंजाबच्या लोकसंख्येइतकीही नव्हती. असें असतां इटलीदेशाचे त्यावेळीं १० भाग झालेले असून त्यांवर तितकीं निरनिराळीं स्वतंत्र राज्यें होतीं. परंतु बहुतेक राजे ऑस्ट्रिया किंवा फ्रान्स यांच्या मदतीच्या जोरावर व त्यांच्या हुकमतीनें कळसूत्री बाहुल्याप्रमाणें नाचून प्रजेवर जुलूम करीत होते. कांहीं आपल्याच तंत्रानें राज्य चालवीत असत; परंतु ते कमी जुलुमी होते असें मात्र नाहीं. अवघा इटली देश इतक्या नीच स्थितीला आला होता कीं, त्यामध्यें अज्ञानाचा अंधःकार अमावास्येप्र-

माणें जिकडे तिकडे पडला होता. आळस, भ्याडपणा, लांच लुचपत, धर्म भोळेपणा, कलह, हेवादेवा व असत्यप्रियता इत्यादि अनेक दुर्गुण, केवळ परकीयांच्या कडक अमलाखालीं कांहीं वर्षें गेल्यामुळें, सर्व देशभर भरून राहिले होते. दोन तीन शतकें पर्यंत इटली देशावर निरनिराळे परकी राजे होऊन गेल्यामुळें लोकांच्या अंगीं आधींच असलेल्या दुर्गुणांस या राजांच्या अंगीं असलेल्या विशेष दुर्गुणांची भर पडली होती. प्रजेला राज्यकारभारामध्यें बिलकुल अधिकार नसल्यामुळें तिचें सर्व लक्ष दुर्गुणांचें परिपोषण करण्याकडे लागलें होतें. वास्तविक इटलीमध्यें या सुमारास कांहीं वर्षेंपर्यंत जितकी शांतता होती, तितकी शांतता त्या पूर्वीं कित्येक शतकेंपर्यंतही नव्हती हें खरें; परंतु ती शांतता हितकारक नसून केवळ परकीय व स्वदेशी जुलुमी राजे यांचे कडक अंमलामुळें व लोकांचे अंगीं आलेल्या क्षीणतेमुळें उत्पन्न झालेली होती. ह्मणून ज्याप्रमाणें अष्टौप्रहर दाट सावली पडत असलेल्या दलदलीचे जागीं केवळ कर्दमच माजतो, व विषारी वनस्पती व कृमीच उत्पन्न होतात,—चांगल्या जातीचें झाड पोसत नाहीं,— त्याचप्रमाणें इटली देशामध्यें या काळच्या अशा प्रकारच्या शांततेमुळें दुर्गुणांची वाढ मात्र पराकाष्ठेची होऊन लोक हीन, दीन, निस्तेज व निंद्य होऊन राहिले होते. परंतु अशी स्थिति असतांही इटलीमध्यें पुढें कांहीं वीर, कांहीं मुत्सदी व कांहीं देशभक्त असे निपजले कीं, त्यांनीं आपल्या उद्योगानें व उदाहरणानें सर्व इटली देशाचें स्वरूपचें स्वरूप बदलून टाकलें. व जेथें स्वतंत्रतेला कोठेंही थारा मिळत नव्हता, दुर्गुणांचें दाट जंगल माजून राहिलें होतें, व

स्वदेशप्रेमाचा झरा पार आटून गेला होता, अशा शुष्क व रुक्ष वनाचा त्यांनीं थोडक्याच काळांत असा सुंदर बगीच्या बनवून दिला कीं, त्या ठिकाणीं नीति, शक्ति, संपत्ति, विद्वता, रसिकता, वगैरे आपल्या सर्व सख्यांसह स्वतंत्रता देवी परत येऊन तिनें काळांतरानें तें आपलें क्रीडास्थान केलें, व ह्मणूनच 'इटलीचें पुनरुज्जीवन' हा युरोपखंडाचे इतिहासांतील भाग एखाद्या कादंबरींतील अद्भुत व रमणीय कथानकाप्रमाणें मनोवेधक झाला आहे. हा कथाभाग कसा घडून आला, याचें मूळ बीज कोठें आहे, असें हुडकीत गेलों असतां आपणांस असें दिसून येईल कीं, ज्या गोष्टींमुळें इटली देशाची दुर्दशा झाली होती, त्याच गोष्टींमधून इटलीचें पुनरुज्जीवन होण्याचेंही कारण निघालें होतें. इटली देशास परकीयांच्या जुलुमानें दुर्दशा प्राप्त झाली होती; व त्याच जुलुमावर पुष्ट झालेला जो इटलीच्या कांहीं सुपुत्रांचा द्वेषाग्नि, त्यानेंच पुढें त्या परकीयांचा बळी घेतला. ऑस्ट्रिया व फ्रान्स यांचे साहाय्यावर इटलींतील स्वदेशी राजांच्या जुलुमाची पहिलीं कांहीं वर्षें कोठें कांहीं गडबड न होतां निर्वात-पणें गेलीं खरीं; परंतु पुढें लवकरच लोकांचे मनांत असंतोष व अस्वस्थता हीं उत्पन्न झालीं. दहा लोकांचे मनांत एकच विचार आल्यावर ते ते एकमेकापाशीं व्यक्त करणारच. मग त्यांच्या तोंडांस कुलपें घातलीं किंवा त्यांस भक्कम तुरुंगांत निरनिराळ्या खोलीमध्यें बिड्या घालून ठेविलें तरी ते विचार एकमेकांस कळल्याशिवाय कधींही रहात नाहींत. ज्या वेळीं विचार व्यक्त करण्याची इतर सर्व बाह्यद्वारें बंद होतात, त्या वेळीं मानवी प्राण्यांच्या मनांमध्यें परस्पर गुप्त भाषण करण्याची जी एक शक्ति आहे ती प्रगट होते. समाजांत किंचित

अस्वस्थता उत्पन्न होतांच जुलमी राजांनीं इटालियन लोकांच्या पारतंत्र्याच्या दोऱ्या अधिकच आवळण्यास सुरवात केली. या शतकाचे प्रारंभीं इटली देशांत मुद्रणस्वातंत्र्य फारच थोडें होतें. व जें काय थोडें होतें तें सुद्धां लोकांत असंतोषाचीं चिन्हें दिसूं लागतांच राजांनीं एकदम हिरावून घेतलें. परंतु याचा परिणाम राजांच्या इच्छेप्रमाणें न होतां, त्याचे योगानें असंतोष मात्र उलट अधिकच फैलावूं लागला. जिकडे तिकडे गुप्त पत्रव्यवहार, वर्तमानपत्रांचा गुप्त प्रसार व गुप्त मंडळ्या सुरू झाल्या. पुढें लहान मोठीं बंडें होऊं लागलीं, व प्रत्येक बंडागणीक राजांचा जुलूम दसपट वाढूं लागला. होतां होतां दोन दिवस बंडवाल्यांचे, तर दोन दिवस राजांचे, व पुन्हां दोन दिवस बंडवाल्यांचे, अशा क्रमानें सर्व इटली देशचे लोक बंडखोर बनले; व शेवटीं लोकसत्तेला किंचित अनुकूळ असलेल्या एका राजानें पुढें सरसावून व त्यांचें पुढारपण घेऊन इटली देश परकीयांचे जुलुमापासून सोडविला, व स्वराज्य स्थापित केलें.

**गुप्त मंडळ्या**—वर ज्या गुप्त मंडळ्या ह्मणून सांगितल्या, त्यांपैकीं प्रमुख ह्मटली ह्मणजे कारबोनेरी या नांवाची गुप्त मंडळी ही होय. नेपोलियन बोनापार्टनें ज्या वेळीं इटली देश जिंकून आपल्या सरदारांच्या स्वाधीन केला, त्यावेळेपासूनच ही मंडळी अस्तित्वांत आलेली होती. या मंडळीचा उत्पादक, निदान मुख्य पुरस्कर्ता, मालघेला या नांवाचा एक इटॅलियन देशभक्त होता. इ. स. १८१९ सालीं व्हिएनाच्या तहानें इटली, ऑस्ट्रियाचे ताब्यांत गेल्याबरोर ऑस्ट्रियन अधिकाऱ्यांनीं मालघेलास पकडून सार्डीनीयन सरकारच्या स्वाधीन केलें; व त्यांनीं त्यास तुरुंगांत टाकिलें. तथापि कारबोनेरीमंडळीचा पंथ इतका वाढला कीं, इटलींतील सर्व

भागांत हजारो कारबोनेरी कटवाले थोडक्याच काळांत उत्पन्न झाले. या मंडळीचा नाश करण्याकरितां प्रिन्स ऑफ् क्यानोझा या नांवाच्या पोलिसखात्याच्या मुख्य अधिकाऱ्यानें दुसरी एक मंडळी उलट स्थापन केली. व तिजमध्यें सर्व तऱ्हेचे बदमाष, उडाणटप्पु, दरवडेखोर व तुरुंगवास भोगून बाहेर पडलेले अपराधी असे सामील केले, व सरकाराकडून त्यांस बंदुका वगैरे सामानही पुरविण्यांत आलें. अर्थात् अशा लोकांचे हातीं काम गेल्यामुळें कारबोनेरी पक्ष नाहींसा करण्याच्या मिषानें, या बदमाषांच्या सैन्यानें नाहीं नाहीं ते भयंकर अत्याचार केले. परंतु त्यांचे योगानें कारबोनेरी मंडळीचा नाश न होतां उलट तिचे अनुयायी लोकांत जास्तच एकी झाली, व आपल्या संबंधानें ते अधिक गुप्तपणा राखूं लागले. हळू हळू या मंडळीचा प्रसार वाढत चालला. प्रथम पिडमांट, नंतर नेपल्स व पुढें पोपच्या राज्यांत सर्वत्र त्यांचा शिरकाव होऊन, तेथून सर्व इटलीभर त्यांचा फैलाव झाला. या मंडळीच्या निशाणाची खूण जंबिया ही होती, व तिचा सभासद होण्यास एक प्रकारचा विचित्र विधि करावा लागत असे. कारबोनेरी पंथाची लोकप्रियता लवकरच इतकी वाढली कीं, सरकारी लष्करांतील कित्येक पलटणीच्या पलटणींनीं तो पंथ पत्करला असून, वाटेल तेव्हां उघड बंड करण्यास त्यांच्या मनाची तयारी झालेली होती.

**पहिलीं बंडें व छळ.**—कारबोनेरी पक्षाचें पहिलें बंड नेपल्समध्यें झालें. या बंडवाल्यांविरुद्ध नेपल्सच्या राजानें दोन सरदारांच्या हाताखालीं सैन्य देऊन पाठविलें. हें सैन्य व कारबोनेरी लोक समोरासमोर आले मात्र; पण सैन्यानें कारबोनेरी पक्षाच्या निशाणावरची

खूण पाहतांच त्यांचे विरुद्ध लढण्याचें नाकारिलें. इतकेंच नव्हे, तर उलट त्यांनांच जाऊन मिळण्याची त्यांची उत्कट इच्छा दिसूं लागली. तेव्हां त्या सरदारांस मुकाट्यानें सैन्य परतवून नेपल्सला नेणें भाग पडलें, व शेवटीं फर्डीनंड राजास कारबोनेरी मंडळीचें ह्मणणें कबूल करावें लागलें. १८२० सालच्या जुलई महिन्याचे १३वे तारखेस फर्डीनंड राजानें देवाच्या मंदिरांत जाऊन शपथ घेऊन कारबोनेरी मंडळीचें ह्मणण्याप्रमाणें प्रजेच्या तर्फे एक पार्लमेंट नेमून तिचा अधिकार कबूल केला. फार काय, पण फर्डीनंड व त्याची प्रजा यांमध्यें असाही तह झाला कीं, राजानें प्रजेची परवानगी घेतल्याशिवाय संस्थानच्या बाहेरही जाऊं नये. येथून इटलींतील धामधूमीस खरी सुरवात झाली. यानंतरचें बंड ह्मटलें ह्मणजे सिसिलीमध्यें झालें. या बंडास प्रेरणा करण्यासही कारबोनेरी मंडळीच अप्रत्यक्ष रीतीनें कारणीभूत झाली. अशीं हीं दोन बंडें एकामागून एक होतांच युरोपांतील प्रमुख राष्ट्रें बरींच घाबरलीं. ही बंडाची लाट आतां युरोपभर पसरून सर्व ठिकाणीं राजसत्ता बुडवून टाकते कीं काय, अशी त्यांस भीति पडून लेब्यांक येथें त्यांनीं आपली एक सभा भरविली. या सभेस आलेल्या प्रतिनिधींपैकीं ऑस्ट्रियाचा राजा प्रमुख असून, प्रशिया, रशिया, वगैरे राष्ट्रांचेही प्रतिनिधी आले होते. सभेकडून नेपल्सचा राजा फर्डीनंड यासही आमंत्रण गेलें होतें; परंतु वर सांगितल्याप्रमाणें प्रजेची परवानगी घेतल्याशिवाय राज्याची सीमा सोडून राजानें जावयाची नाहीं, असा करार झाला असल्यामुळें त्याला जातां येईना. तेव्हां आपण सभेस गेलों असतां प्रजेला पूर्वी दिलेले अधिकार कायमच करूं, असें वचन लोकांस देऊन, त्यानें सभेस जाण्याची एकदाची परवा-

नगी मिळविली. परंतु सभेस गेल्यावर फर्डीनंडची बुद्धि फिरली, व त्यानें इतर राष्ट्रांचें ह्मणणें निमूटपणें कबूल केलें. सभेमध्यें असें ठरलें कीं, आस्ट्रियन सैन्य मदतीला घेऊन फर्डीनंड राजानें नेपल्स व सिसिली येथील बंडें मोडावीं व नंतर कांहीं दिवस शांतता राखण्याकरितां तें सैन्य आपल्या राज्यांत ठेवून घ्यावें. या ठरावाप्रमाणें फर्डीनंड हा ९०,००० ऑस्ट्रियन सैन्य घेऊन आपल्या प्रजेवर चालून आला. इकडे नेपल्समध्यें कारबोनेरी मंडळीच्या खटपटीमुळें पार्लमेंटनें, लढाईशिवाय शरण जावयाचें नाहीं, असा ठराव करून, पूर्वीच्या बंडांत पुढारी असलेला सरदार पेपी यास, ८००० सैन्यानिशीं फर्डीनंडचे तोंडावर पाठविलें. दोन्ही सैन्यांची लढाई झाली व त्यांत पेपीचा पराभव होऊन त्याचें सैन्य वाट फुटेल तिकडे पळालें. फर्डीनंड पुन्हा एकवार सत्ताधीश झाला, व त्यानें बंडवाल्यांवर व विशेषत: कारबोनेरी मंडळीवर फारच भयंकर सूड घेतला. पहिली गोष्ट ह्मणजे लष्करी कायदा त्यानें एकदम सुरू केला; व बंडवाल्यांचा इनसाफ करण्यास एक स्वतंत्र कोर्ट नेमलें. या कोर्टानें १८२० सालचें बंडचसें काय, परंतु १७९३ सालापासून प्रजेनें जास्त अधिकार मिळविण्याकरितां जी जी ह्मणून बंडाळी केली होती, त्या सर्वांत सामील असलेले व नसलेलेही लोक संशयावरून धरून आणले; व त्यांना भराभर शिक्षा ठोठावल्या. येथून पुढें अन्याय, छळवाद, व क्रूरकर्मे यांच्या साम्राज्यास सुरवात झाली. त्या प्रसंगाचें वर्णन करणें कठीणच आहे. कोणी फाशीं गेले, कोणी तुरुंगांत पडले, कोणी हद्दपार झाले, अशा रीतीनें सुमारें एक हजार लोक य कोर्टानें खपविले. शेंकडो अधिकाऱ्यांना त्यांचे अधिकार काढू

घेऊन हांकून दिले. या इतक्या लोकांपैकीं फारच थोडे लोक खरोखर बंडांत सामील होते. बाकीच्यांचा अपराध ह्मटला ह्मणजे त्यांचा लोकसत्तेकडे साधारण कल होता एवढाच काय तो. इतरांपेक्षां कारबोनेरी मंडळीवर राग विशेष, ह्मणून राजानें त्यांचा छळ करण्यास विशेष उपाय योजिले होते. कित्येक कारबोनेरी लोकांना गाढवावर बसवून धिंडका काढल्या, तर कित्येकांस खिळे लावलेल्या चाबकांनीं फोडून काढलें ! त्या क्रूर छळवादाचे प्रकार एकका दोन ह्मणून वर्णावे ! परंतु या अशा भयंकर दिवसांतच निःसीम देशभक्तीचीं व स्वार्थत्यागाचीं कांहीं उदात्त उदाहरणें दिसून आलीं. या शिक्षांचे योगानें समाजांत कांहींवेळ जी भीति व निराशा उत्पन्न झाली होती, ती नाहींशी होऊन उलट तिचे ठिकाणीं स्वदेशाकरितां हाल अपेष्टा सोसण्यांत जी एक प्रकारची मौज असते तिचीच गोडी लोकांना लागून राहिली. याचा परिणाम असा झाला कीं, निरनिराळ्या ठिकाणीं पुन्हां भराभर बंडें उपस्थित झालीं.

**पिडमॉड येथील बंड**—नेपल्स येथील बंडाच्या पाठोपाठ पिडमांड येथें एक बंड झालें. त्यावेळीं पिडमांट येथें पहिला व्हिक्टर-इ-मॅन्युएल राजा राज्य करीत होता. या वेळच्या इटलींतील सर्व संस्थानांमध्यें पिडमांट येथील राज्य सर्वांत कमी जुलमी होतें. या राज्यांत दोन फळ्या होत्या; एकीमध्यें उदार तत्वांवर राज्य चालावें असें ह्मणणारी स्वातंत्र्यप्रिय मंडळी होती; व दुसऱ्या फळीमध्यें लष्करी कामगार, थोर घराण्यांतील उमराव, वगैरे अधिकारप्रिय लोक होते. परंतु दोन्हीही फळ्यांना, ऑस्ट्रियाच्या तंत्रानें पिडमांडच्या राजानें चालावें ही गोष्ट नापसंत होती. त्यांनीं राज्यपद्धतीच्या नवीन तत्वांचा एक मसूदा तयार केला. त्याचें धोरण

राजपद नाहींसें करावें असें नसून फक्त कनिष्ठ व श्रेष्ठ वर्गाच्या प्रजाजनांस कांहीं अधिक सत्ता असावी इतकेंच होतें. व्हिक्टर-इ-मॅन्युएल यास तें मुळींच संमत नव्हतें. तथापि त्यानें प्रजेवर एकदम शस्त्र धरलें नाहीं. लोक कांहीं केल्या ऐकेनात तेव्हां मुकाट्यानें राज्य सोडून तो चालता झाला. त्याचे मागून त्याचा वारस चार्लस फेलिक्स हा गादीवर बसावयाचा; परंतु तो पिडमांट येथें हजर नसल्यामुळें त्याचे गैरहजेरींत त्याचा जवळचा नातलग चार्लस आलबर्ट हा रीजंट या नात्यानें काम पाहत होता, त्यानें ऑलेक्झांडेरिया व ट्यूरीन येथें बंडें होतांच लोकांच्या मागण्या एकदम कबूल करून त्याप्रमाणें द्वाही फिरविली. परंतु चार्लस फेलिक्स यास तें करणें मुळींच आवडलें नाहीं. शिवाय लोकसत्तेची बंडाळी मोडण्याकारितां ऑस्ट्रिया हवी ती मदत त्यास करण्यास तयार होताच, व तसेंच इटलीमध्यें शांतता राखण्याकरितां रशियानेंही एक लाख सैन्य सज्ज केलें असून तें इटलीकडे यावयास निघालें अशी ही बातमी पसरली होती. यामुळें पिडमांट येथील बंडवाल्यांची बरीच निराशा झाली. तथापि कारबोनेरी पंथाचीं तत्वें वरिष्ठ प्रतीचे लोक व तरुण कामदार यांजमध्यें फारच पसरलेलीं होतीं. पिडमांट येथील मोठमोठ्या कुलीन स्त्रियाही कारबोनेरी मंडळीस सामील झाल्या असून काळीं, निळीं, तांबडीं, अशीं निरनिराळ्या प्रकारचीं निशाणें, कारबोनेरी पक्षाचें वतीनें त्यांनीं उभारलीं. बंडामुळें लोकांचे अंगांत संचारलेला अभिमान अद्याप जागृत होता, यामुळें बंडवाल्यांनीं आपलें सैन्य तर ऑस्ट्रियाचे तोंडावर पाठविलेंच; परंतु राजाचें लष्कर आपल्यास सामील होईल अशी जी त्यांस आशा होती, ती मात्र अगदीं आयत्या

वेळीं खोटी ठरल्यामुळें, त्यांचा लढाईत पुरा मोड झाला. अशी दुर्दशा होतांच बंडवाल्यांचे पुढारी समुद्रावरून वाट सांपडेल तिकडे पळून गेले. यामुळें चार्लस फेलिक्स यास त्यांजवर सूड घेण्याची आपली तृषा प्रत्यक्ष शमवितां आली नाहीं, तथापि सर्व बंडवाल्यांना त्यांचे गैरहजेरींत फांशीची शिक्षा देऊन आपल्या हुकुमाचीं भेंडोळीच्या भेंडोळीं त्यानें चोहोंकडे पाठविलीं.

**इतर ठिकाणचीं बंडें**—यानंतर कांहीं दिवसांनीं पोपच्या संस्थानांत एक बंड झालें. त्याचाही लवकर मोड झाला. पार्मा येथेंही एक बंड झालें, परंतु त्यासंबंधानें कांहीं विशेष लिहिण्यासारखें नाहीं. यानंतरचें बंड मॉडिना या संस्थानांत झालें, तें मात्र थोडेंसें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. यावेळीं ह्मणजे १८३० ते ३१ चे सुमारास मॉडिना येथें फ्रान्सिस या नांवाचा ड्यूक राज्य करीत होता. त्यानें वेळोंवेळीं आपल्या भाषणांनीं नवीन उदार तत्वांवर राज्य करण्याची पद्धति आपणास पसंत आहे असें लोकांस दर्शविलें होतें. त्यावर भरंवसा ठेवून सीरोमेनॉट्टी या नांवाच्या एका देशभक्तानें, फ्रान्सिसच्या मदतीनें बंड करून सर्व इटली काबीज करण्याचा व मॉडिनाच्या छत्राखालीं स्वदेशी साम्राज्य करण्याचा धाडसी बेत केला. परंतु फ्रान्सिसचें बोलणें निवळ दिखाऊ असल्यामुळें मेनॅट्टीचे बंडाचा बेत राजाला कळला. हें बंड कांहीं अवधीनें व्हावयाचें होतें, परंतु फ्रान्सिसनें आपल्या गुप्त हेरांकडून बातमी काढून बंडाची पुरी तयारी होण्याचे आधींच एके दिवशीं संध्याकाळीं मेनॉट्टीच्या घरास वेढा देऊन त्यास एकदम पकडलें. परंतु लोक बिथरलेले होते, यामुळें फ्रान्सिस हा स्वतः भयानें पळून गेला. मात्र त्यानें सिरोमेनॉट्टीस आपले बरोबर कैद करून

नेऊन ऑस्ट्रियाचे स्वाधीन केलें. इकडे सहा हजार ऑस्ट्रियन फौज मॉडिनावर चालून आली, त्यामुळें बंडवाले जिकडे तिकडे पळून गेले. जे सांपडले त्यांस धरून शिपायांनीं तुरुंगांत टाकलें. इतकें झाल्यावर फ्रान्सीस हा मॉडीनास परत आला. परत आल्यावर सीरोमेनॉट्टीस त्यानें फांशी दिलें. मेनॉट्टी हा त्याकाळीं कट्टा देशभक्त ह्मणून नांवाजलेला होता व त्याचे वधामुळें लोकांना फार हळहळ वाटली. मेनॉट्टीनें फ्रान्सिसचा पूर्वी एक वेळ प्राण वांचविलेला होता, असें असतांही फ्रान्सीसनें त्याचा फार अपमान व हाल केले. येवढेंच काय, परंतु मरणाचे दिवशीं सकाळीं मेनॉट्टीनें आपल्या बायकोस शेवटल्या निरोपाचें एक पत्र लिहिलें होतें, तेंही त्या नीचानें वाटेंत पकडून भडकवून ठेविलें. त्या पत्रांत हे शब्द होते. " प्रिये, मी तर चाललोंच ; परंतु माझ्या पश्चात् माझीं मुलें मोठीं झाल्यावर मी आपल्या देशावर किती प्रीति करीत होतों हें त्यांना तूं सांग " असो; अशारीतीनें कारबोनेरी मंडळीच्या प्रसारामुळें व शिकवणीमुळें इटलींत जीं लहान मोठीं बंडें झालीं त्या सर्वांचा ऑस्ट्रियानें आपल्या सैन्याचे जोरावर मोड केला. या बंडांच्या संबंधानें एक गोष्ट दिसून येते ती ही कीं, कनिष्ट प्रतीची प्रजा ह्मणजे शेतकरी, उदमी व साधारणतः सर्व अशिक्षित लोक, या बंडांपासून अलिप्त असत. बंडवाले ह्मटले ह्मणजे बहुतेक सुशिक्षित लोक असत. निदान पुढारी तरी सुशिक्षितांशिवाय दुसरे कोणी नव्हते. वास्तविक ही गोष्ट यूरोपच्या इतिहासांतील सामान्य नियमास अनुसरूनच होती. कोणत्याही देशांत ज्या कांहीं राजकीय चळवळी घडून येतात, त्यांस मध्यमप्रतीच्या व शिक्षण पावलेल्या अशा लोकांचा जो एक वर्ग असतो तोच प्रायः कारणीभूत होतो. श्रीमंत लोक मात्र नेहमींच राज्यकर्त्यां-

तीच्या विरुद्ध असतात. याचें कारण असें आहे कीं, तिजमुळें होणाऱ्या स्थित्यंतरानें त्यांस आपलें नुकसान होण्याची फार भीति वाटते. दुसरे पक्षीं अगदीं गरीब व कनिष्ट वर्गाचे प्रजाजनही राज्यक्रांतीस फारसे अनुकूळ असत नाहींत. याचें कारण असें आहे कीं, राज्यक्रांतीचें खरें स्वरूप काय व ती झाली असतां आपली स्थिति कशी सुधारेल, याची त्यांस चांगलीशी कल्पना नसते. अशा रीतीनें अति श्रीमान् व अति गरीब लोक, जे अनुक्रमें प्रायः सुशिक्षित असून उन्मत्त व आप्पलपोटे, आणि शिक्षणाभावामुळें मूढ व अदूरदृष्टि असतात, त्यांचे कडून राज्यक्रांतीची प्रथम चळवळ कधींही होत नाहीं. सर्व राजक्रांत्या मध्यम स्थितींतील सुशिक्षित लोकांकडूनच होतात, निदान त्यांच्या मूळ कल्पना तरी वरील प्रकारच्या लोकांच्याच डोक्यांतून निघतात, व त्या कल्पना सिद्ध होण्यास जी एक शक्ति, जो एक जोम किंवा त्वेष राष्ट्राच्या अंगीं यावा लागतो, तो सर्व तेच उत्पन्न करतात. असो. वरील बंडांसंबंधानें दुसरी एक गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे, ती ही कीं, त्या बंडांत प्रत्यक्ष यश आलें नसल्यामुळें तीं करणाऱ्या लोकांस तत्कालिनांनीं वेडें ह्मटलें; व केवळ या बंडांमुळेंच ऑस्ट्रियाचा पाय इटलीमध्यें एकवेळ घुसला होता तो कायमचाच घुसणार असें प्रथम प्रथम कांहीं वेळ लोकांस वाटलें. आपली शक्ति ती काय, आपण मुठभर माणसें, आपणांत एकी नाहीं, परक्यांचें साहाय्य नाहीं व शत्रु अति प्रबळ, असें असतां अकालीं लहानसान बंड करण्यास प्रवृत्त होणें ह्मणजे आपण होऊनच आपला विनाकारण घात करणें, व आपल्या गळ्यांशीं आधींच बसलेला दास्यत्वाचा फांस

अधिक घट्ट करून घेणें होय, असें पुष्कळांचें त्यावेळीं ह्मणणें होतें. तथापि आधीं सर्वांची एकी करून व सर्व राष्ट्र सुशिक्षित करून मग कोणतीही गोष्ट करूं असें ह्मणणाऱ्यास ती गोष्ट करण्याची वेळ कधींच येत नाहीं. लहानसान बंडें करण्यानें इटलींतील बंडवाल्यांचें व त्यांच्या अनुषंगानें इतर कांहीं लोकांचें जन्माचें नुकसान झालें, हें खरें; परंतु इटली स्वतंत्र करण्यासारखें महत्कार्य अशा रीतीनें कांहीं थोड्या लोकांनीं स्वार्थत्याग केल्याशिवाय कधींहीं साधलें नसतें. एकादी भव्य इमारत बांधावयाची असतां तिचें काम चारही अंगांनीं एकदम सुरूं करूं, ह्मणजे पाया, भिंती, गच्च्या, शिखरें हीं सर्व एकदमच बांधावयास लागूं, असें ह्मणणें हा निव्वळ वेडेपणाच होय. एकाद्या इमारतीच्या भव्यतेस किंवा सौंदर्यास घुमट किंवा शिखरें जितकीं अवश्य आहेत तितक्या पायऱ्या नसतात, परंतु त्या पायऱ्याच शिखरांच्या आधीं घडवाव्या लागतात. राष्ट्रोत्कर्षाचे वेळीं पहिल्या पिढींत जे लोक जन्मतात त्यांनां आपलीं शिरकमलें स्वदेशकार्यास वाहून त्यांच्याच योगानें या पायऱ्या रचाव्या लागतात. राष्ट्रोदयाचे कामीं या पायऱ्य घडविणारांनीं जरी तत्कालीन लोकांच्या दृष्टीनें फारसा बहुमानाचा भाग उचललेला नसतो तरी जो उचललेला असतो तोच खरोखर अतिशय महत्वाचा असतो; व अशा प्रकारच्या विचारांनीं त्या वेळचे इटलींतील देशभक्त प्रवृत्त झाले होते असें दिसतें. १८२० पासून १८४० पर्यंत इटलीमध्यें लहान सान बंडें झालीं तीं बहुधा निष्फळच झालीं,

तथापि त्यांचे योगानें राष्ट्रामध्यें जो एक तऱ्हेचा त्वेष उत्पन्न झाला, त्याचेंच फळ इटली देशाचें स्वातंत्र्य हें होय.

**तरुण इटलि**–असो, येथवर ज्या बंडखोर चळवळींचा निर्देश केला त्या सर्वांचें आदिकारण कारबोनरी नांवाची गुप्त मंडळी व तिनें दिलेलें लोकशिक्षण हें होय. या गुप्त मंडळीस जरी प्रत्यक्ष यश आलें नाहीं, तथापि तिनें आपलें बीज जें एकदां राष्ट्रामध्यें पेरलें, त्याचे निरनिराळ्या स्वरूपाचे वृक्ष उत्पन्न होऊन शेवटीं सर्वांस संयुक्त व स्वतंत्र इटली हेंच गोड फळ आलें. कारबोनेरी मंडळीचें काम दहावीस वर्षे झाल्यानंतर '**तरुण इटली**' या नांवाची दुसरी एक गुप्त मंडळी तिच्या जागीं प्रतिष्ठित झाली. ही मंडळी पहिल्या मंडळीहून अधिक तेजस्वी व कर्तृत्ववती असून तिला पहिलीपेक्षां यशही अधिक आलें. या मंडळीचा मूळ उत्पादक मॅझिनी या नांवाचा इटॅलियन होता. त्याचा वृत्तांत थोडक्यांत पुढील भागांत दिला आहे.

## भाग ४ था.

### मॅझिनीचा वृत्तांत.

न तच्छस्त्रैर्न नागेंद्रैः न हयै र्नच पत्तिभि: ।
कार्यं संसिद्धि मभ्येति यथा बुध्या प्रसाधितं ॥ **पंचतंत्रम्.**

**जन्म व बाळपण**—जोसेफ मॅझिनी हा जिनोआ प्रांतांत इ. स. १८०९ या वर्षी जूनचे २२ वे तारखेस जन्मास आला. त्याचा बाप गिआकोमो मॅझिनी हा एक प्रसिद्ध वैद्य व शरीरशास्त्राचा अध्यापक होता. त्याची आई मेराया मॅझिनी ही अत्यंत रूपवती, अप्रतिम बुद्धिमती व अतिशय प्रेमळ स्त्री होती. मॅझिनी बाळपणीं फार नाजूक व अशक्त असे. तो इतका कीं, एकदोन वर्षांचा होईपर्यंत त्याला उभें सुद्धां राहतां येत नसे. सुमारें सहा वर्षांचा तो झाला तेव्हां कोठें त्यास कोणाचा हात न धरतां ताठपणें चालतां येऊं लागलें. मॅझिनी हा शरीरानें जितका अशक्त तितकाच बुद्धीनें प्रबळ होता. बाळपणापासून अन्यायाचा त्याला संताप असे व त्याचें कोंवळें मन कोणाचीही गरिबी पाहिली कीं अतिशय द्रवत असे. जन्मतःच तो मानवी जातीचा मित्र व जुलुमाचा शत्रु होता ह्मटलें तरी चालेल. वास्तविक घराबाहेर तो फारसा पडत नसल्यामुळें आपत्ति व दारिद्र्य यांचें दुःख कसें असतें याची कल्पना त्यास येण्यासारखी नव्हती. परंतु ममता हा त्याचा उपजतगुणच होता. कोणीही अनाथ, दुबळा, निराश्रित, पंगु किंवा रोगग्रस्त मनुष्य त्यानें पाहिला ह्मणजे त्यानें त्याचे गळ्यास जाऊन मिठीच मारावी, त्याला



जोसेफ मॅझिनी.

कुरवाळावें व " कांहीं तरी त्याला दे, कांहीं तरी दे, तो किती तरी गरीब आहे पाहाग ! " असें ह्मणून आपल्या आईच्या मागें हट्ट घेऊन लागावें, आणि तिनें त्याच्या ह्मणण्या-प्रमाणें त्यास कांहीं दिलें ह्मणजे मग आनंदाश्रूनें त्याचें मुख न्हावें व आपल्या आईचे दोन्ही हात घट्ट धरून मोठ्या आनंदानें हंसत हंसत त्यांचे त्यानें मुके घ्यावे. लहानपणापासून त्याचा स्वभाव गंभीर व विचारी असे. पोरांचे खेळ त्याला मुळींच आवडत नसत. केव्हांही कोणी, तुला काय हवें, ह्मणून विचारिलें असतां, नेहमीं ' पुस्तक द्या ' असें त्यानें ह्मणावें. तो अवघा पांच वर्षांचा असतां त्याचे बिछान्यावर जिकडे तिकडे पुस्तकें पंडलेलीं असत, व कधीं पुस्तकें वाचीत तर कधीं नकाशावर आडवा पडून भूगोल शिकत असलेला तो दिसे. ही त्याची वृत्ति पाहून पुढें तो कोणी मोठा पुरुष निपजणार, अशी पुष्कळ जणांनीं त्याच्या आईची खातरजमा केली होती.

**शिक्षण**–मॅझिनी सुमारें तेरा वर्षांचा झाल्यावर त्याला त्याच्या बापानें जिनोआ येथील विद्यालयांत शिकावयास पाठविलें. विद्यालयांत शिकत असतां त्याचें वाचन मनस्वी झालें, व आपल्या नीतिमत्तेनें व दानतीनें त्यानें शिक्षकवर्गाचे मनावर मोठा दाब ठेविला होता. शिकत असल्यापासूनच त्याचे मनांत स्वदेशाविषयींचे विचार नेहमीं घोळत असत. सभोंवतीं समवयस्क विद्यार्थी निष्काळजीपणानें हंसून खेळून आयुष्याचा काळ सुखानें घालवीत असतां मॅझिनी हा मात्र उदास, विचारनिमग्न व एकांतवासप्रिय असा असे. स्वदेश परकीयांचे ताब्यांत असल्यामुळें तो मृतप्राय आहे व त्याचें आपल्यास सुतक आहे अशी उग्र कल्पना नेहमीं मनांत बाळगून तो

एकाद्या सुतकी मनुष्याप्रमाणें अंगावर नेहमी काळा पोषाख घाली. अशी ही त्याची वृत्ति पाहून त्याच्या आईस वाईट वाटे, व एखादे दिवशीं हा कदाचित् आत्महत्या करील कीं काय अशीही तिला भीति पडे. सर्व विषयांत मॅझिनीला इतिहास व तत्वज्ञान हे विषय फार आवडत. विद्यालयांत पांच वर्षे घालविल्यावर मॅझिनीनें वकिलीची परिक्षा दिली. परंतु वकिली करून संपत्ति मिळविण्याचा विचार त्याचे मनांत कधींही आला नाहीं. त्या काळीं इटलीमध्यें असा नियम असे कीं, प्रत्येक नवीन वकिलानें दोन वर्षेपर्यंत गरीब लोकांचीं कामें फुकट चालविलींच पाहिजेत. मॅझिनीला तर स्वभावतःच गरीब लोकांच्या उपयोगीं पडणें हें अत्यंत प्रिय होतें, त्यामुळें सर्व जिनोआमध्यें जो ह्मणून कोणी गरीब पक्षकार असे तो एकदम मॅझिनीकडे धांव घेई.

**प्रथमचे उद्योग व बंदीवास**—मागें कारबोनेरी ह्मणून जी एक गुप्त मंडळी सांगण्यांत आलेली आहे, तिजमध्यें मॅझिनी लवकरच सामील झाला. कारबोनेरी मंडळीचे जुन्या पद्धतीचे व कांहीं अंशीं धर्मभोळेपणाचे असे कांहीं विधि, नवीन मनुष्यास मंडळींत प्रथम सामील होतांना आचरावे लागत. मॅझिनी यास ते मुळींच आवडत नसत. तथापि आपल्यास त्यांच्या विधीशीं काय करावयाचें आहे, स्वदेश मुक्त करण्याचा त्यांचा व आपला हेतु एकच आहे एवढें बस्स आहे, असें ह्मणून तो आपल्या मनाचें समाधान करून घेई. परंतु पुढें पुढें कारबोनेरी मंडळींचीं मतें, निदान त्यांची काम करण्याची रीति, त्यास पसंत पडेनाशी झाली. अशा रीतीनें कांहीं दिवस गेल्यानंतर १८३० सालीं फ्रान्स देशामध्यें जी राज्यक्रांति झाली, त्यावेळीं कारबोनेरी मंडळीच्या तर्फे त्याज-

कडे कांहीं महत्वाचें काम सोंपाविण्यांत आलें होतें. परंतु त्या सुमारास एका गुप्त हेरानें त्यास फसवून सरकारच्या स्वाधीन केलें. मॅझिनीस कैद केलें त्यावेळेस त्याचा व इतर कांहीं लोकांचा बंडांशीं संबंध दाखविण्यासारखे त्याचे पाशीं कांहीं कागदपत्र होते, ते त्यानें शिताफीनें एकदम नाहींसे करून टाकले व तो पोलिसच्या स्वाधीन झाला. पुढें कांहींएक चौकशी वगैरे न करितां सरकारानें मॅझिनीला सॅव्होना येथील किल्यांत बंदींत टाकिलें. ही बातमी कळतांच मॅझिनीचा बाप जिनोआ येथील गव्हरनराकडे गेला, व तुरुंगांत टाकण्याइतका आपल्या मुलाचा काय अपराध झाला हें कळविण्यांत यावें, असा त्यानें अर्ज केला. त्याचा त्याला जबाब असा मिळाला कीं, "तुमचा मुलगा तरुण व बुद्धिमान् आहे. त्याला रात्रीं बेरात्रीं एकट्यानें सहल करणें फार आवडतें. त्याच्या मनांत काय विचार घोळत असतात याजबद्दल त्याला कोणी विचारिलें असतां तो त्याचा कांहीं जबाब देत नाहीं. **जे तरुण बुद्धिवान लोक आपल्या मनांत काय चाललें आहे हें बाहेर कळूं देत नाहींत ते सरकारास मुळींच आवडत नाहींत, व या कारणास्तव तुमच्या मुलास बंदींत टाकण्यांत आलें आहे.**" असो. तुरुंगवासांत असतांनाही त्यानें आपले स्नेह्यांशीं गुप्त रीतीनें पत्रव्यवहार चालविला होता. त्यावरून त्याला असें कळून आलें कीं, आपल्यास कैदेंत टाकल्यामुळें कारबोनेरी मंडळीला फार दहशत बसलेली आहे. हें पाहतांच त्या मंडळीच्या भित्रेपणाचा त्याला तिरस्कार आला व मेलेल्या मढ्याचे अंगांत कितीही विद्युत्शक्ति घातली तरी तें कसचें जीवंत होणार? तर आतां ज्यांमध्यें अद्याप थोडासा जीव उरला आहे अशा

लोकांस हातीं धरलें पाहिजे, व याकरितां एक नवीन मंडळी स्थापन केली पाहिजे असा त्याचा निश्चय ठरला. अशा रीतीनें **'तरुणइटली'** या नांवाच्या प्रसिद्ध गुप्त मंडळीचा जन्म तुरुंगांत झाला. ज्या गुप्त मंडळीचीं पाळेंमुळें पुढें इटली देशाच्या पायाचे कोना कोपऱ्यांत सुद्धां जाऊन घुसलीं. ज्या शिकवणीमुळें परकीयांच्या पायाखालीं तुडविले गेलेले व किड्यांप्रमाणें नीच स्थितीला आलेले लोक, जुलुमाविरुद्ध लढण्यास हातांत शिरकमळें घेऊन तयार झाले, जिच्या मूळ तत्वांचा विजय लोकांस राजकीय परदास्यापासून व स्वदेशांतील पोपाच्या धार्मिक जुलुमापासून सोडविल्यानें झाला, त्या तरुणइटली नांवाच्या मंडळीचा जन्म अंधाऱ्या तुरुंगाच्या एका भयाण खोलींत व्हावा हें काळाच्या पोटांतील अनंत महदाश्चर्यांपैकीं एक आश्चर्य नव्हे काय? मॅझिनीला आपल्या हेतुसिद्धीच्या मार्गांत किती प्रचंड अडचणी होत्या हें माहीत नव्हतें असें नाहीं. तसेंच जें कार्य आपण आरंभणार त्या कार्याची सिद्धि आपल्या जीवंमानांत होणें शक्य नाहीं, हेंही त्याला दिसत नव्हतें असें नाहीं. परंतु ज्या फळावर त्याची नजर होती त्याची गोडी आपणास चाखावयास मिळावी, हा अप्पलपोटेपणाचा विचार त्याचे मनाला कधींही शिवला नाहीं. त्याच्या विचारांत स्वार्थपरायणतेचा लवलेशही नव्हता; व याचमुळें त्याचे अंगीं आरंभिलेलें कर्तव्य सिद्धीस नेण्याची उमेद आली, व त्याचे मार्गांत निराशेची छाया कधींही पडली नाहीं असें म्हटलें पाहिजे. नवीन मंडळीची रचना कशी असावी, ती उभारण्यास कोणच्या प्रकारचें साहाय्य घ्यावें, क्रांतिप्रवर्तक इतर संस्था व लोक युरोपांतील निरनिराळ्या देशांत जे आगाऊच उत्पन्न झाले

होते त्यांच्याशीं या नव्या मंडळीचा संबंध कोणच्या रीतीनें जुळवावा, वगैरे सर्व गोष्टींचा पुरा विचार तुरुंगाच्या एकांतवासांतच मॅझिनीनें केला. विचारांतीं त्यानें असें ठरविलें कीं, गुप्तपणा राखल्याशिवाय आपल्या मंडळीचा निभाव लागणार नाहीं; तरी पण कोणत्याही मनुष्यास मंडळीचा सभासद करण्यापूर्वी व त्याजकडून गुप्तता राखण्याची शपथ घेण्यापूर्वी, मंडळीचें खरे हेतु त्याला कळविलेच पाहिजेत, व ज्यास मंडळींत यावयाचें असेल त्यानें उघड्या डोळ्यांनीं व आपल्या पायांनीं चालत यावें असें त्यानें ठरविलें. तसेंच जो कोणी मंडळींत येणार त्याजकडून स्वदेश स्वतंत्र करण्याचा प्रयत्न करीन व सर्व इटलींमध्यें एकी करून प्रजासत्ताक राज्याचें छत्र उभारण्याचा प्रयत्न करीन, अशी शपथ घेववायाची, असेंही त्यानें ठरविलें. वरिष्ठ प्रतीच्या लोकांवर मॅझिनीचा बिलकुल विश्वास नव्हता. कांहीं कधीं झालें तर तें मध्यम व कनिष्ट लोकांचे हातूनच होईल, व आज ते जरी मुग्ध आहेत तथापि त्यांच्या हृदयांत स्वातंत्र्यप्रियतेचें बीज खास रुजलें आहे, व 'तरुण इटली' मंडळीच्या सभासदांकडून त्याजवर उपदेशामृताचें सिंचन केलें असतां त्याला हटकून अंकूर फुटेल, असा त्याच्या मनाचा दृढग्रह झाला होता. मॅझिनीच्या वेळची इटलीची स्थिति ह्मटली ह्मणजे निवळ प्रेतावस्था असें सर्व युरोपभर मत होतें; परंतु तें मत खोटें आहे. इटलीदेश मृत नसून केवळ निद्रित आहे असें मॅझिनीचें मन त्यास सांगत होतें. मोठमोठ्या राज्यक्रांत्या किंवा उलाढाली होतात त्या समाजांतल्या व समाजावर प्रीति करणाऱ्या लोकांकडूनच होतात, त्यांना प्रथमतः आपला निश्चय व आपला दृढविश्वास यांच्या जोरावरच कामास सुरवात करावी लागते, व श्रीमान्, संपन्न व

वजनदार लोक नंतर येऊन त्यांस मिळतात, या करितां प्रथम दिसणाऱ्या अडचणीकडे न पाहतां एकदम कामास सुरवात केली पाहिजे असें माझिनीनें ठरविलें.

**तरुण इटलि**—तुरुंगवासांत सहा महिने काढल्यावर मॅझिनीची सुटका झाली. परंतु त्यानें देशांत राहू नये या शर्तीवर त्यास मोकळें करण्यांत आलें होतें. अशा रीतीनें प्रिय स्वदेशांत राहण्याची मनाई झाल्यामुळें मॅझिनी फ्रान्समध्यें निघून गेला. त्यावेळीं फ्रान्समध्यें लुई फिलिप बादशहा राज्य करीत होता. त्यानें यावेळीं इटलींतून हद्दपार झालेले कोणीही लोक आपल्या देशांत राहूं द्यावयाचे नाहींत असा हुकूम फर्माविला होता. त्यामुळें मॅझिनीस गुप्तपणें मार्सेलिस येथें जावें लागलें; व तेथें जातांच त्यानें "**तरुण इटली**" नांवाची गुप्त मंडळी जमविण्याचा उद्योग आरंभिला. क्रमाक्रमानें त्यास बरीच मंडळीही येऊन मिळूं लागली. या मंडळीचें कार्य झपाट्यानें व्हावें व लोकसत्तेच्या उदार मूळ तत्वांचा समाजांत जलद प्रसार व्हावा, याकरितां **तरुणइटली** नांवाचें त्यानें एक वर्तमानपत्र काढलें. या मंडळीची निशाणी म्हटली म्हणजे "सायप्रेस" नांवाच्या झाडाची डाहाळी असे. हीच निशाणी असण्याचें कारण असें कीं, सायप्रेस हें झाड दुःखभाव सूचक मानलेलें असे व तिच्या डाहाळीच्या खुणेनें स्वदेश स्वतंत्र करण्याकरितां ज्यांनीं आजपर्यंत आपले प्राण खर्ची घातले, त्यांची आठवण ती निशाणी पाहून आपोआप व्हावी. या मंडळीच्या शपथेचा मायना खालीं लिहिल्याप्रमाणें होता.—" मी अमूक अमूक इसम ईश्वर व स्वदेश यांना स्मरून, स्वदेशाच्या पवित्र कार्यामध्यें ज्या देशभक्तांनीं परकीय जुलुमास आपले प्राण बळी दिले त्यांचें स्मरण करून, ईश्वरानें ज्या भूमींत मला

निर्माण केलें आहे तिच्याशीं ज्या कर्तव्यानें मी बांधला गेलों आहे, व ईश्वरानें जे देशबांधव मला दिले आहेत त्यांना स्मरून, ज्या देशामध्यें मला जन्म देणारी माझी आई जन्मास आली व जिच्यामध्यें माझीं मुलेंबाळें घरांतल्याप्रमाणें पुढें सुखानें नांदतील, त्या देशावर जन्मसिद्ध अशी जी प्रीति माझ्या हृदयांत आहे तिला स्मरून, अन्याय जुलूम वगैरे सर्व वाईट गोष्टींविषयीं माझ्या मनामध्यें जो द्वेषभाव आहे त्याला स्मरून, परदेशांतील स्वतंत्र प्रजाजनांपुढें उभा राहिलों असतां मला स्वतःला स्वतंत्र प्रजेचे हक्क नाहींत, मला नांव घ्यावयाला स्वदेश नाहीं व मी जें माझें ह्मणूं शकेन असें राष्ट्रीय निशाण नाहीं, हें पाहून व त्यामुळें शरम वाटून माझ्या मुखावर जी फिकट झांक उत्पन्न होते ती ध्यानांत आणून, तसेंच माझा आत्मा ईश्वरानें स्वातंत्र्याचा उपभोग घेण्याकरितां निर्माण केला असून स्वातंत्र्य व जनपदहित साधण्याविषयीं, परदास्य व असाहायता यामुळें आपण दुबळे आहोंत, असें मनास भासत असतांही ती स्वतंत्रता व तें जनपदहित साधण्यास सदाशेच्या प्रेरणेमुळें मनांत जी उल्हासाची ऊर्मि येते व मन थरारून जातें ती ध्यानांत आणून, स्वदेशाचें पूर्वीचें वैभव व हल्लींची स्थिति मनांत आणून, व तसेंच फांशीं जाऊन तुरुंगवासाच्या यातनेनें किंवा हद्दपारीचें शिक्षेनें होणाऱ्या दुःखामुळें आजपर्यंत जे इटलीचे सुपुत्र मरण पावले, त्यांच्या प्रेमळ आयांनीं जे दुःखाश्रु ढाळले ते दृष्टिसमोर वागवून, आणि आज मितीस लाखो लोक जी यातना भोगीत आहेत तिचें स्मरण करून, मी शपथ घेतों, ती अशी—इटली देशाकडे ईश्वरानें एक महत् कार्य सोंपविलें आहे तें साध्य करणें, प्रत्येक

इटालियन मनुष्याचें कर्तव्यकर्म आहे असा माझा दृढ विश्वास आहे. ईश्वरानें माझें राष्ट्र पुन्हा अस्तित्वांत येईल असा ज्या अर्थी हुकूम दिला आहे त्याअर्थी तें राष्ट्र उत्पन्न करण्यास अवश्य अशी जी शक्ति तीही त्यानें आह्मा लोकांस दिली आहे. त्या शक्तीचा समाजाकरितां योग्य उपयोग करणें हीच आमच्या कार्यसिद्धीची गुरुकिल्ली आहे, मनःपूत कृत्य करणें व तें करण्यास लागणारा स्वार्थत्यागही करणें हाच काय तो श्रेष्ठ सद्गुण, व एकी व दृढ निश्चय यांमध्येंच सर्व शक्तीचें मूळ बीज आहे—इत्यादि गोष्टींबद्दल माझ्या मनाची पक्की खातरी झाल्यामुळें, माझ्या प्रमाणेंच विश्वास असणाऱ्या या 'तरुण इटली' नांवाच्या मंडळी-मध्यें मी आपलें नांव दाखल करीत आहें. व मी आजपासून अशी शपथ घेतों कीं, त्यांचे सहायानें इटली देशाचें स्वतंत्र व लोकसत्ताक राष्ट्र करण्याकरितां मी जिवा-भावानें अक्षय खटपट करीन. या मंडळीचे हेतु लोकांस समज-ण्याकरितां मी कायावाचामनेंकरून त्यांना शिक्षण देईन. सद्गुणाशिवाय कोणतीही वस्तु मिळाली तरी टिकत नाहीं, याकरितां मी नेहमीं सद्गुणानेंच वागेन. यापुढें मी दुसऱ्या कोणत्याही मंडळीचा सभासद होणार नाहीं. यामंडळीचे सर्व हुकूम मी शब्दशः पाळीन, व प्राण गेला तरी ते बाहेर फोडणार नाहीं. यामंडळींतील इतर बांधवांना सल्ला मसलत व साहाय्य देऊन मदत करीन. ही सर्व शपथ किंवा त्यांतील अंशही जर मी मोडला तर ईश्वराचा पुरा क्षोभ मजवर होईल व मनुष्यमात्र मला निंद्य मानूं लागेल, आणि मी असत्यवादी ह्मणून माझ्या तोंडाला काळोखी लागेल."

**मॅझिनीचें वर्तमानपत्र**–' तरुण मंडळी ' या नांवाचें मॅझिनीनें जें वर्तमानपत्र काढलें होतें त्यामध्यें इटलीनें परकीयांचा अंमल झुगारून द्यावा व संयुक्त व स्वतंत्र लोकसत्ताक राज्य स्थापावें हे विचार व इतर धर्मनीति व राजकीय तत्वज्ञान यांचीं तत्वें शिकविलीं जात. अर्थात् हें वर्तमानपत्र इटली देशांत वाटूं देऊं नये असा अधिकाऱ्यांचा हुकूम होता. परंतु जितका त्याच्या प्रसारावर प्रतिबंध अधिक तितका त्याचा प्रसार अधिक होऊं लागला. मार्सेलिस शहरांतून प्रथम जवळच्या अशा दोन तीन किनाऱ्यांवरील शहरांत या वर्तमानपत्राचे अंक लोक गुप्तपणें नेत व तेथून गुप्त छापखान्यांचे द्वारें त्याचा फैलाव इटलीच्या या कोंपऱ्यापासून तों त्या कोंपऱ्यापर्यंत होई. हें वर्तमानपत्र वाचण्याची गोडी लोकांस इतकी लागून राहिली होती कीं, तें वाचण्याकरितां लोक हाल सोसण्यास व क्वचित् प्राण देण्यालाही तयार होत. क्रमाक्रमानें इटलींतील लोक मॅझिनीच्या गुप्तमंडळीस येऊन मिळूं लागले. व ज्या द्वारानें त्याच्या वर्तमानपत्राच्या हजारों प्रती गुप्तपणें पसरल्या जात त्याच द्वारानें, तयार झालेल्या देशभक्तांचीं नवीं नवीं हजारों नांवें, तरुण इटलीच्या मंडळीचे सभासद होण्यास हातीं येऊं लागलीं, हें पाहून मॅझिनीस आनंद झाला. परंतु त्याचें त्याला बिलकुल आश्चर्य वाटलें नाहीं. कारण आपले लेख व लोकांचीं मनें यांजवर त्याचा असाच कांहीं विलक्षण विश्वास होता; व त्याची खटपटही अशीच कांहीं विलक्षण चालू होती. वर्तमानपत्राला हपीस नाहीं, लिहिण्यास मदतनीस नाहीं, पत्र छापून काढण्यास हाताखालीं चाकर नाहींत, अशा स्थितीमुळें मॅझिनीला अहोरात्र काम करावें लागे. वर्तमानपत्रांतील लेख लिहिणें व इतर पत्रव्यवहार करणें, पत्र

छापून निघालें ह्मणजे त्याच्या घड्या घालून त्याचे गठ्ठे बांधणें, कोणी प्रवासी आला असतां त्याला भेटून हकीकत विचारून घेणें, वगैरे बहुतेक कामें त्याचीं त्यालाच करावीं लागत. शिवाय तो अगदीं दरिद्रावस्थेला आला होता. तथापि पुढें आपल्या राष्ट्राचा भाग्योदय होणार या विचारानें तो नेहमीं हंसत मुख व आनंदी असे. कृतघ्न व शंकेखोर माणसें, निंदक लोक, आपल्याच तटांतील कलहप्रिय लोक व तसेंच पूर्वीचा मित्रभाव सोडून बनलेले, शत्रू इत्यादि शेंकडों प्रकारच्या माणसांकडून त्याला त्रास होत असे. तथापि केवळ कर्तव्यावर लक्ष देऊन त्यानें आपला क्रम चालू ठेविला होता. यामुळें "तरुण इटली मंडळी" स्थापून एक वर्ष होतें न होतें तोंच तिचें महत्व सर्व इटलीमध्यें अतिशय वाढलें. ही मंडळी स्थापन करणारे लोक अप्रसिद्ध, गरीब व तरुण असतां, इतक्या थोड्याच काळांत तिचें इतकें महत्व वाढलें कीं, इटलींतील सातही संस्थानांतील राजे तिला भिऊन तिच्या सभासदांचा छळ करूं लागले; व येवढ्याच गोष्टीवरून तिचा पाया भक्कम व उदात्त तत्वांवर रचिला होता, हें तेव्हांच सिद्ध होतें. असो. मॅझिनीचें वर्तमानपत्र लोकांना जितकें प्रिय तितकेंच अधिकाऱ्यांना अप्रिय झालें होतें. त्यांनीं त्या वर्तमानपत्राचा प्रसार बंद करण्याकरितां अनेक खटपटी केल्या. जो कोणी त्या वर्तमानपत्राचे अंक धरून देईल त्यास बक्षिसें दिलीं जात व ज्या कोणावर त्यांचा प्रसार केल्याचा आरोप शाबीत होई, त्यास जबर शिक्षा देत. येवढेंचसें काय, पण त्या वर्तमानपत्राची नालस्ती किंवा त्यास प्रतिबंध करण्याचा प्रयत्न न करणें हें एक गुन्ह्याचें नवीन सदरच काढलेलें असून

मॅझिनी जरी जाग्यावर नव्हता, तथापि त्याच्या शिकवणीनें इटलींतील तरुण मंडळीच्या मनांत जें एक स्वदेशप्रीतीचें बीज रुजलें, तें एक सारखें वाढतच गेलें. इकडे स्वित्स-लँडमध्यें गेल्याबरोबर मॅझिनीच्या भोंवती जर्मनी, फ्रान्स, इटली व पोलंड इत्यादि देशांतून हद्दपार केलेली मंडळी बरीच येऊन मिळाली, व 'तरुण इटली' मंडळीच्या नमुन्यावर '**तरुण युरोप**' या नांवाची एक नवीन मंडळी त्यांनीं काढली. ही मंडळी काढण्यांत मॅझिनीचा मुख्य हेतु असा होता कीं, राजकीय जुलमाविरुद्ध सर्व युरोपखंडांत लोकमत जागृत करावें, व जसजशी ही मंडळी हद्दपार होऊन एका देशाहून दुसऱ्या देशांत व दुसऱ्याहून तिसऱ्या देशांत आसरा घेण्यास जातील, तसतसा लोकसत्तेच्या उदार तत्वांचा प्रसार सर्व यूरोपखंडभर व्हावा. मॅझिनीचा हा प्रचंड हेतु अखेरीस शेवटास गेला, हें यानंतर घडून आलेल्या इतिहासावरून सिद्ध होतें. असो. येथवर सांगितलेल्या हकिकतीवरून इटलीमध्यें लोकमताची जागृति कशी झाली व तें होण्यास मॅझिनी सारखे लोकशि क्षक व त्यांनीं स्थापिलेल्या मंडळ्या कशा उपयोगी पडल्या हें कळून येईल. वरील हकीकत इतक्या पाल्हाळानें सांगण्याचें कारण असें कीं, प्रस्तुत चरित्राचा नायक जो गॅरिबाल्डी, यानें प्रारंभीं जो आपला गुरू केला होता तो मॅझिनी हा कोण होता, व त्याचप्रमाणें गॅरिबाल्डी तारुण्यांत येऊन कट्टा स्वदेशभक्त व परकीय द्वेष्टा बनून त्यानें स्वदेश मुक्ततेचे कामास सर्व परित्याग करून

सुरुवात केली त्या वेळची देशस्थिति कशी होती, व त्याचे मनांत झालेल्या प्रेरणेस कोणच्या गोष्टीनें विशेष उत्तेजन मिळालें हें वरील सविस्तर हकिकतीवरून ध्यानांत येण्यासारखें आहे. मॅझिनीचें वर्तमानपत्र वाचून त्यानें स्थापन केलेल्या मंडळ्यांतील प्रमुख देशभक्तांशीं संभाषणें केल्यानें गॅरिबाल्डी-चे मनाची पक्की तयारी होऊन राहिली होती. परंतु त्याच्या हृदयांत जो त्वेष व जो उत्साह उसळलेला होता, तो कृतीचे रूपानें बाहेर पडण्याचें प्रथम कारण कोणचें झालें, याची हकीकत पुढील भागीं येईल.

खडबडीत असल्यामुळें प्रवासास फार अडचण होऊं लागली. बंडवाल्यांच्या टोळींत बहुतेक अननुभाविक परंतु केंव्हां एकदां लढाई करूं असे ह्मणणारे उल्लू तरणेबांड भरलेले होते. त्यांना उशीराचा कंटाळा येऊन ते अगदीं उतावीळ झाले. आपण बंड करण्यास निघालों हें वास्तविक सर्व देशाचेंच कार्य, तेव्हां आपणास पाहतांच ठिकठिकाणचे लोक आपलें अभिनंदन व आदर करून आपणास मिळतील, अशी या तरुण बंडवाल्यांची अपेक्षा होती. पण प्रत्यक्ष पाहावें तर प्रकार अगदीं वेगळाच झाला. कोणीही सामोरें येईना, किंवा तुह्मी कोठले कोण, कोठें जातां, असेंही एका शब्दानें विचारीना. तेव्हां त्यांची बरीच निराशा झाली. मॅझिनी व रॅमॅरीनो यांचें आपसांत भांडणही जुंपलें. इतक्यांत एकाए‍ एक बंदुकीचा आवाज चुकून झाला. तो होतांच मॅझिनी बेशुद्धच पडला. इकडे रॅमॅरीनोलाही काय करावें हें सुचेना, व तो आपल्या टोळीनिशीं मागें फिरला. अशा रीतीनें तें बंड जेथल्या तेथेंच विझलें.

**ग्यारीबाल्डीची पहिली कामगिरी व फांशीची शिक्षा**—ग्यारीबाल्डीची नेमणूक या बंडाचे कामीं युरीडाईस नांवाच्या जहाजावर झालेली होती, व त्यानें जहाजावरील लोकांचें मन बंडास अनुकूल करण्याचीं खटपट खूप जोरानें चालविली होती. इतक्यांत जिनोआ येथेंही बंड होणार आहे असें कळतांच, तो आपले कांहीं स्नेही जहाजावर ठेऊन जिनोआ‍ गेला. पण तेथें पाहतों तों कोठेंच कांहीं नाहीं. बंडाची बातमी आधींच फुटून कांहीं लोकांस कैदही करण्यांत आलें होतें. बरें परत निघून यावें तर भोंवतीं सैन्याचा गराडा पडत चालला होता. तेव्हां जलदी करून तो एका बाग-

वानिणीच्या घरीं गेला व तिला त्यानें आपली स्थिति उघड करून सांगितली. तेव्हां तिनें त्यास तिकडील शेतकऱ्याचा एक पेहराव दिला, तो अंगावर घालून त्यानें जिनोआ शहर सोडलें. जातांना वाटेंत बागांतून लपत छपत, कोठें भिंतीवर चढून व नंतर डोंगराचे कडेकडेनें चालून तो एकदाचा हमरस्त्यास येऊन मिळाला आणि कांहीं दिवस उपास काढून तर कांहीं दिवस नुसती रानांतलीं फळें खाऊन, हाल काढीत काढीत दहा दिवसांनीं नाईस शहरीं जाऊन पोहोंचला. त्यावेळीं त्याची इतकी दुर्दशा झाली होती कीं, त्याच्या मावशीनें त्याला प्रथम न ओळखतां कोणी भिकारी आला आहे असें समजून दारांतूनच त्यास हुसकून दिलें. परंतु नाईस येथें तो फार दिवस थांबला नाहीं. आपल्या आईची एक वेळ भेट घेऊन तो इटली सोडून मार्सेलीसला निघून गेला. अशा रीतीनें वास्तविक हातून कांहीं एक घडून न येतां ग्यारीबाल्डी बंडवाला मात्र ठरला. बंड मोडतांच राजाचे कडक हुकूम अर्थातच सुटले. जे जे ह्मणून त्यांत सामील होते असा संशय आला, त्यांनां फांशीची शिक्षा ठरवून त्यांचीं नांवें प्रसिद्ध करण्यांत आलीं. त्यांपैकीं ग्यारीबाल्डीचें एक नांव होतें.

**प्रवासांतील संकटें**—नाईस सोडल्यावर वाटेंत एक नदी लागली. तिला पावसानें मोठा पूर आला होता, तरी ग्यारीबाल्डी नदींत उडी टाकून पोहून पार गेला. त्याच्या बरोबरच्या दोघा स्नेह्यांस मात्र पोहून जाण्याचें धाडस होईना. तेव्हां पैल तीरावरूनच ग्यारीबाल्डीनें त्यांस रामराम ठोकला, व फ्रान्सच्या अधिकाऱ्यांची एक छावणी होती तेथें गेला; व आपण कोठले कोण, व जिनोआहून कां आलों, हें त्यानें त्यांस मोकळ्या मनानें सांगितलें. त्यांनीं

## भाग ५.

## देशकार्याचा ओनामा.

विघ्नैः पुनःपुनरपि प्रतिहन्यमाना ।
प्रारभ्य चोत्तम जनानपरित्यजंति ॥

**मॅझिनीचें पहिलें बंड**-ग्यारीबाल्डीच्या खऱ्या चरित्रास इसवी सन १८३४ या सालीं सुरवात झाली. त्यावेळीं तो अवघा २७ वर्षांचे वयाचा होता. दोन दिवस बंडवाल्यांचे व दोन दिवस राजांचे असा क्रम या शतकाचे प्रारंभापासून इटलीमध्यें सुरू झाला होता असें मागें एके ठिकाणीं सांगण्यांत आलें आहे तें वाचकांस स्मरत असेलच्च. १८३४ सालचे आधीं कांहीं थोडे दिवस, वरील क्रमाप्रमाणें बंडवाल्यांचे दोन दिवस संपून राजांचे दोन दिवस आले होते. पिडमांट येथें एक लहानसें बंड होऊन त्याचा चार्लस आलबर्ट राजानें मोड करून त्यांत सामील असलेल्या व नसलेल्याही लोकांस जबर शिक्षा देण्याचें काम यावेळीं चाललें होतें. या धामधुमींत पुष्कळ लोकांचा छळ झाला व पुष्कळ लोक सैरावैरा देशांतून पळत सुटले. हें पाहून ग्यारीबाल्डीचें मनास अत्यंत चेव येऊन त्याचे हात देशसेवा करण्यास फुरफुरूं लागले होते, इतक्यांत त्याला एक संधि मिळाली, ती अशी. मॅझिनी इटलींतून फ्रान्स-मध्यें व फ्रान्समधून स्वित्सर्लंडमध्यें जाऊन राहिला, हें मागें सांगितलेंच आहे. मॅझिनी इटली सोडून गेला तथापि लो-कांचे मनांत जी प्रेरणा त्यानें केली होती ती विझली नव्हती. येवढेंच नव्हे, तर दिवसेंदिवस ती अधिकच प्रज्वलित होत होती. वर्तमानपत्रांतील लेख, गप्त मंडळ्यांच्या सभा व

स्वदेशमुक्त करण्याची बडबड, आजपर्यंत पुष्कळ झाली, आतां हातून प्रत्यक्ष कांहीं तरी झालेंच पाहिजे, असे विचार मनांत सारखे घोळत राहून लोकांस चैन पडेनासें झालें होतें. "कांहीं तरी करूं या, मग काय होईल तें होवो" असें जो तो ह्मणूं लागला, व आतां यापुढें लोकांस धीर निघत नाहीं असें झालें तेव्हां, १८३३ सालचे सप्टंबर महिन्यामध्यें मॅझिनीच्या सल्लयानें इटालियन लोकांनीं एक बंडाचा कट केला. रॅमॅरीनो ह्मणून, पोलंड देशामध्यें स्वतंत्रता मिळविण्याबद्दल ज्या खटपटी झाल्या त्यांमध्यें प्रमुखपणानें काम केलेला असा एक वीर हद्दपार होऊन इटलीमध्यें आलेला होता. त्याला या बंडामध्यें पुढारी करण्याचें ठरविलें होतें. याच बंडांत ग्यारीबाल्डीकडे मॅझिनीनें कांहीं कार्यभाग सोंपविलेला होता व तो त्यानें मोठ्या आनंदानें पत्करला होता. परंतु रॅमॅरीनोचे हातून व्हावी तितकी झटपट न झाल्यामुळें उघडपणें बंड करण्याचें काम पुढील सालापर्यंत भिजत पडलें. पण त्याचे पूर्वीच अधिकाऱ्यांनां बंडाची गुप्त बातमी लागली, व ते आपली तयारी करून सावधपणें वाट पाहत बसले. इकडे पिडमांटवर स्वारी करण्याचा बंडवाल्यांचा निश्चय होऊन, प्रथमतः 'सॅन ज्युलियानो' नांवाचें एक लहानसें खेडें होतें तें हस्तगत करून घेण्याचें ठरलें होतें. बंडवाल्यांच्या दोन टोळ्या करून दोन दिशांकडून दोन्ही टोळ्यांनीं एकदम हल्ला करावा असाही बेत ठरला होता, परंतु जलमार्गानें येणाऱ्या टोळीस किंचित् उशीर झाल्यामुळें रॅमॅरीनो यानें दुसराच एक रस्ता धरला. पण आपण कोठें जात आहों, हें त्याचें त्यासच पुरतें ठाऊक नव्हतें. त्यावेळीं थंडी ह्मणजे मी ह्मणत होती, व रस्ते

खडबडीत असल्यामुळें प्रवासास फार अडचण होऊं लागली. बंडवाल्यांच्या टोळींत बहुतेक अननुभाविक परंतु केव्हां एकदां लढाई करूं असे ह्मणणारे उल्लू तरणेबांड भरलेले होते. त्यांना उशीराचा कंटाळा येऊन ते अगदीं उतावीळ झाले. आपण बंड करण्यास निघालों हें वास्तविक सर्व देशाचेंच कार्य, तेव्हां आपणास पाहतांच ठिकठिकाणचे लोक आपलें अभिनंदन व आदर करून आपणास मिळतील, अशी या तरुण बंडवाल्यांची अपेक्षा होती. पण प्रत्यक्ष पाहावें तर प्रकार अगदीं वेगळाच झाला. कोणीही सामोरें येईना, किंवा तुह्मी कोठले कोण, कोठें जातां, असेंही एका शब्दानें विचारीना. तेव्हां त्यांची बरीच निराशा झाली. मॅझिनी व रॅमॅरीनो यांचें आपसांत भांडणही जुंपलें. इतक्यांत एकाए‍ एक बंदुकीचा आवाज चुकून झाला. तो होतांच मॅझिनी बेशुद्धच पडला. इकडे रॅमॅरीनोलाही काय करावें हें सुचेना, व तो आपल्या टोळीनिशीं मागें फिरला. अशा रीतीनें तें बंड जेथल्या तेथेंच विझलें.

**ग्यारीबाल्डीची पहिली कामगिरी व फांशीची शिक्षा**—ग्यारीबाल्डीची नेमणूक या बंडाचे कामीं युरीडाईस नांवाच्या जहाजावर झालेली होती, व त्यानें जहाजावरील लोकांचें मन बंडास अनुकूल करण्याचीं खटपट खूप जोरानें चालविली होती. इतक्यांत जिनोआ येथेंही बंड होणार आहे असें कळतांच, तो आपले कांहीं स्नेही जहाजावर ठेऊन जिनोआस गेला. पण तेथें पाहतों तों कोठेंच कांहीं नाहीं. बंडाची बातमी आधींच फुटून कांहीं लोकांस कैदही करण्यांत आलें होतें. बरें परत निघून यावें तर भोंवतीं सैन्याचा गराडा पडत चालला होता. तेव्हां जलदी करून तो एका बाग-

वानिणीच्या घरीं गेला व तिला त्यानें आपली स्थिति उघड करून सांगितली. तेव्हां तिनें त्यास तिकडील शेतकऱ्याचा एक पेहराव दिला, तो अंगावर घालून त्यानें जिनोआ शहर सोडलें. जातांना वाटेंत बागांतून लपत छपत, कोठें भिंतीवर चढून व नंतर डोंगराचे कडेकडेनें चालून तो एकदाचा हमरस्त्यास येऊन मिळाला आणि कांहीं दिवस उपास काढून तर कांहीं दिवस नुसती रानांतलीं फळें खाऊन, हाल काढीत काढीत दहा दिवसांनीं नाईस शहरीं जाऊन पोहोंचला. त्यावेळीं त्याची इतकी दुर्दशा झाली होती कीं, त्याच्या मावशीनें त्याला प्रथम न ओळखतां कोणी भिकारी आला आहे असें समजून दारांतूनच त्यास हसकून दिलें. परंतु नाईस येथें तो फार दिवस थांबला नाहीं. आपल्या आईची एक वेळ भेट घेऊन तो इटली सोडून मार्सेलीसला निघून गेला. अशा रीतीनें वास्तविक हातून कांहीं एक घडून न येतां ग्यारीबाल्डी बंडवाला मात्र ठरला. बंड मोडतांच राजाचे कडक हुकूम अर्थातच सुटले. जे जे ह्मणून त्यांत सामील होते असा संशय आला, त्यांनां फांशीची शिक्षा ठरवून त्यांचीं नांवें प्रसिद्ध करण्यांत आलीं. त्यांपैकीं ग्यारीबाल्डीचें एक नांव होतें.

**प्रवासांतील संकटें**—नाईस सोडल्यावर वाटेंत एक नदी लागली. तिला पावसानें मोठा पूर आला होता, तरी ग्यारीबाल्डी नदींत उडी टाकून पोहून पार गेला. त्याच्या बरोबरच्या दोघा स्नेह्यांस मात्र पोहून जाण्याचें धाडस होईना. तेव्हां पैल तीरावरूनच ग्यारीबाल्डीनें त्यांस रामराम ठोकला, व फ्रान्सच्या अधिकाऱ्यांची एक छावणी होती तेथें गेला; व आपण कोठले कोण, व जिनोआहून कां आलों, हें त्यानें त्यांस मोकळ्या मनानें सांगितलें. त्यांनीं

असा हा अपरिचित माणूस हातीं सांपडतांच त्यास कैद केलें, व तुरुंगांत टाकलें. या तुरुंगाच्या खोलींत एक खिडकी जमिनीपासून सुमारें १९ फूटांवर होती; ती पाहतांच ग्यारीबाल्डीस मोठा आनंद झाला. तेथपर्यंत चढून त्यानें खिडकींतून खालीं उडी टाकली आणि रखवालदार लोक पाहत असतां पार निघून गेला, व लवकरच ओसाड व डोंगराळ अशा मुलखांत घुसून, तेथून त्यानें मार्सेली-सची वाट धरिली. दुसरें दिवशीं वाटेंत एक खेडें लागलें. तेथल्या खाणावळीची विचारपूस करीत करीत ग्यारीबाल्डी गेला. खाणावळींत एक तरुण पुरुष व स्त्री विस्तवाजवळ शेकत बसलीं होतीं, त्यांचे पाशीं ग्यारीबाल्डीही जाऊन बसला. नंतर खाणावळवाल्यानें जेवण तयार केलें व ग्यारीबाल्डी त्या दिवशीं इतकें जेवला कीं, त्याचें खाणावळवाल्यास आश्चर्य वाटूं लागलें. जेवण झाल्यावर रीतीप्रमाणें मेजावर मद्यही आलें, व स्वस्थचित्तानें इकडच्या तिकडच्या गोष्टी निघाल्या. ग्यारीबाल्डीनें आपला सर्व वृत्तांत मागचा पुढचा विचार न करितां त्या खाणावळवाल्यास खुशाल सांगितला. तो ऐकतांच खाणावळवाल्याचा चेहरा पालटला, व तो ग्यारीबाल्डीस एकदम ह्मणाला; ‘ भल्या गृहस्था, तूं आतां इतका वेळ दिलेला कबुली जबाब ऐकून तुला कैद करणें हें माझें कर्तव्य आहे असें मला वाटतें.’ हे शब्द ऐकून ग्यारी-बाल्डीस बिलकुल आश्चर्य किंवा भीति वाटली नाहीं. तो खद खदां हंसून थट्टेच्या स्वरानें ह्मणाला, ‘ठीक आहे. माझी त्याला मुळींच हरकत नाहीं. पण मला आधीं जेवण, खाणें पिणें सर्व संपवूं दे व मग तुला माझें काय डोकेंबिकें मारावयाचें असेल तें मारून घे.’ हें चाललें आहे इतक्यांत त्या खेड्यांतली कांहीं

तरुण मंडळी तेथें आली. मग अर्थातच त्यांच्या गप्पा गोष्टी, दारू पिणें, खेळ तमाशे व गाणें बजावणें चालू झालें. त्यांत ग्यारीबाल्डी हाही खुशाल मिसळला, व त्या मौजेच्या भरांत तो खाणावळवालाही ग्यारीबाल्डीस कैद करण्याची गोष्ट अगदीं विसरून गेला. येवढेंच नव्हे तर त्यांनीं एकमेकांस स्नेह्याप्रमाणें आलिंगनेंही दिलीं. अशी ही रात्र ख्याली खुशाली व चैनबाजींत काढून सकाळ होतांच ग्यारीबाल्डी पुढें जावयास निघाला. तेव्हां त्याचे रात्रीचे सोबतीही त्याला पोहोंचवायाला गेले. व तेथून पुढें कांहीं एक दगाफटका न होतां ग्यारीबाल्डी मार्सेलीसला जाऊन पोहोंचला. तेथें जातांच त्याच्या हातीं सहज एक वर्तमानपत्र पडलें, त्यांत पाहतो तों आपणास फांशीची शिक्षा फर्मावलेली आहे असें त्याला दिसलें. आपलें नांव आज प्रथमच पण अशा रीतीनें छापलेलें पाहून त्याला मोठें नवल वाटलें, व यापुढें आपलें नांव कायम ठेवणें सुरक्षित नाहीं, असा विचार करून एम्. पेन असें नवें नांव त्यानें धारण केलें. नंतर कांहीं दिवस एका स्नेह्याच्या येथें काढून पुढें यूनियन नांवाच्या गलबतावर त्यानें चाकरी धरली.

**ग्यारीबाल्डीची भूतदया**—या गलबतावर काम करीत असतां एके दिवशीं सायंकाळीं बंदरांत एक कॉलेजचा तरुण विद्यार्थि या होडीवरून त्या होडीवर उडी मारून खेळत होता. इतक्यांत त्याचा पाय चुकून किंकाळी फोडीत तो पाण्यांत पडला. ग्यारीबाल्डी जवळपासच होता. त्याचे पायांत बूट असून अंगावर सर्व पोषाख होता. असें असतां त्यानें एकदम पाण्यांत उडी घेतली व त्या तरुण विद्यार्थ्यास जीवंत बाहेर काढलें. यामुळें त्याची लोकांनीं

फार वाहवा केली, व त्या विद्यार्थ्याच्या आईबापांनीं त्यास मोठें बक्षिस दिलें. असो, पुढें मार्सेलिस येथें माहामारीचा उपद्रव सुरू झाला व तो इतका भयंकर होता कीं, त्या वाल्यानें हजारों लोक मेले, व हजारों लोक गांव सोडून गेले. कोणाही वैद्याचें औषध चालेना. रोग्यांना औषधपाणी करण्यास कोणी माणूस मिळेना. जे लोक गांवांत राहिले होते ते घरांतील माड्यांवर राहिलेले असून जेवणखाणास-सुद्धां खालीं न येतां अन्नपाणी दोऱ्यांनीं वर उचलून घेत. अशा ह्या वेळीं ग्यारीबाल्डी इस्पितळांत राहून वाखा झालेल्या रोग्यांची शुश्रूषा करीत असे. स्वतःच्या प्राणाची त्याला कधींही पर्वा नसे. परोपकार करण्यामध्यें मृत्यु आला तरी बेहेत्तर आहे; परंतु हातून होईल तितका परोपकारच करावयाचा, असा त्याचा निश्चय झाला होता.

**देशत्याग**---मार्सेलिसहून ग्यारीबाल्डीनें निरनिराळ्या जहाजांवर बरीच जलपर्यटणें केलीं. परंतु त्याच्या चित्तास समाधान नव्हतें. आपण इटली सोडण्यापूर्वी कोणचे विचार करीत होतों, व कांहीं एक हातून न घडून येतां पहिल्याच घासाला माशी लागावी, त्या प्रमाणें आपला हातीं घेतलेला पहिलाच उद्योग निष्फळ होऊन आपल्यास फांशीची शिक्षा झाली, व ती चुकविण्याकरितां आपण परदेशांत येऊन पडलों, व इतउत्तर देशकार्य करण्याची पुन्हा संधि येण्याचा संभव दिसत नाहीं, अशा विचारानें तो नेहमीं उदास असे. शेवटीं कांहींसें वैतागानें व कांहींसें दूर जलपर्यटन करण्याच्या आवडीनें त्यानें दक्षिण अमेरिकेस जाणाऱ्या एका गलबतावर नौकरी धरिली; व बरेच दिवस प्रवास करून तो रीयोजानिरीओ येथें जाऊन पोहोंचला.

## भाग ६ वा.

# दक्षिण आफ्रिकेंतील पराक्रम व विवाह.

समानयन् तुल्यगुणं वधूवरं । चिरस्यवाच्यं न गतः प्रजापतिः ॥

ग्यारीबाल्डी दक्षिण अमेरिकेस गेला त्यावेळीं तेथें राजसत्ता व लोकसत्ता यांचा झगडा चालू होता. दक्षिण अमेरिके मध्यें जीं निरनिराळीं संस्थानें होतीं, त्यांपैकीं ब्युनॉसआयर्स या नांवाचें एक मोठें व प्रबळ संस्थान होतें. तेथील लोकांनीं या शतकाचे प्रारंभींच स्पेनची राजसत्ता झुगारून देऊन [illegible] लोकसत्ताक राज्य स्थापिलें होतें. परंतु १८२९ सालीं जनरल रोझेस या नांवाच्या अर्धवट रानटी टोळ्यांच्या एका सरदारानें ब्युनॉसआयर्स येथील राज्य काबीज केलें, व आस-पासच्या संस्थानांवर स्वाऱ्या करून तेथेंही आपली जुलमी सत्ता स्थापण्याचा उद्योग आरंभिला. या इतर संस्थानांपैकीं युरुग्वे या नांवाच्या संस्थानाचें मुख्य शहर मॉन्टीव्हीडो येथें, लोकांनीं जनरल रोझेस याचे विरुद्ध लढाई चालविली होती. परंतु मॉंटीव्हीडीयन लोकांना सुमार्गदर्शी असा कोणी योद्धा त्यांच्या कार्याचा पुरस्कार करण्यास नव्हता; यामुळें जनरल रोझेस याचे हातांत मॉंटीव्हीडीयो पडतें कीं काय अशी भीति उत्पन्न झाली होती. सुदैवानें अशा आणीबाणीच्या प्रसंगींच ग्यारीबाल्डी हा दक्षिण अमेरिकेस येऊन पोंहोचला. तेथें पोंहोचल्यावर ग्यारीबाल्डी व त्याचा स्नेही रॉझेटी हे रिओ येथें कांहीं महिने राहिले. त्या ठिकाणीं रीओग्रॅन्डे या नांवाच्या लोकसत्ताक सं-स्थानाच्या मुख्य अधिकाऱ्याची व त्याची सहज गांठ पडली.

त्या वेळीं रीओग्रॅन्डे संस्थान ब्रॅझिल देशाशीं लढत होतें. ग्यारीबाल्डीनें रीओग्रॅन्डे संस्थानाचा पक्ष उचलला. नंतर त्याला त्या संस्थानाकडून एक जहाज मिळालें व आपल्या मदतीला लोक घेऊन त्यानें या जहाजाचे साहाय्यानें ब्रॅझिल देशाशीं लढाई करावी, असा त्यास परवाना मिळाला.

**ब्राझील देशाशीं लढाई**—जहाज हातीं येतांच ग्यारीबाल्डीनें सुमारें सोळा साथीदार मिळविले, व हें चिमुकलें सैन्य मिळतांच ब्रॅझिल देशासारख्या प्रचंड देशाच्या राजाबरोबर लढण्यास सुरवात करण्याचा ग्यारीबाल्डीनें निश्चय केला. या वेळीं त्याचे मनांत राष्ट्रीयत्वाची अत्युच्च कल्पना चांगली बिंबली होती. स्वदेश व इष्टमित्र, यांनां सोडून जो अमेरिकेंत आला होता, परंतु तेथेंही आपल्या देशाप्रमाणेंच राजे लोकांचा जुलूम गरीब प्रजेवर फार होत आहे असें पाहतांच, त्या गरीब प्रजेबद्दल त्याचे मनांत इटली देशांतील लोकांप्रमाणेंच प्रीति उत्पन्न झाली. अवघें जग हाच आपला देश, व अवघी मानवजाती हेच आपले देशबांधव. जगाचे पाठीवर मानवजातीपैकीं कोणीही कोठेंही जुलमाचे तडाख्यांत सांपडला असतां त्यास सोडविणें, हाच आपला देशाभिमान, असें त्यास वाटूं लागलें होतें. असो. जहाज ताब्यांत येतांच त्यास त्यानें आपल्या मित्राच्या स्मरणार्थ मॅझिनी हें नांव दिलें, व लढाईस आपल्याकडून एकदम सुरवात केली. प्रथमतः त्यानें ऑस्ट्रियाचें [illegible] मोठें जहाज बुंद वगैरे भरून नेत असलेलें पकडलें. ऑस्ट्रिया हा इटलीचा शत्रु, यामुळें ऑस्ट्रियन जहाज हातीं येतांच आपल्या शत्रूला थोडा तरी तडाखा देण्यास सांपडला, या गोड विचारानें ग्यारीबाल्डीस मोठा हर्ष झाला. या जहाजावर

त्यास कांहीं हिरे मिळाले. नंतर या हस्तगत केलेल्या जहाजास स्कॉनोपीला हें नांव देऊन हीं दोन्हीं जहाजें घेऊन गॅरीबाल्डी हा मॉडोनेटो या नांवाच्या समुद्र किनाऱ्यावरील एका गांवीं गेला. हें गांव मॉंटीव्हीडोचे ताब्यांत होतें. परंतु मॉंटीव्हीडो व युरुग्वे हीं दोन्हीही लोकसत्ताक संस्थानें असून उभयतांचें परस्पर सख्य नव्हतें, यामुळें त्यास तेथून लवकरच परत फिरावें लागलें.

**ग्यारीबाल्डीचें प्रसंगावधान**—परत फिरण्याचे पूर्वीं एक लहानशी गोष्ट घडून आली ती अशी. मोलडोनॅटो येथील एका व्यापाऱ्यानें ग्यारीबाल्डीचे कांहीं हिरे व कांहीं बंद वगैरे जिन्नस खरेदी घेतले होते; परंतु त्याचे तो लवकर पैसे देईना. पुढें त्यास असें कळून आलें कीं, स्कॉनोपिला या जहाजास बंदर सोडून एकदम जाण्याचा हुकूम झाला आहे, त्यामुळें तर पैसे पचविण्याच्या बेतानें तो अधिकच टाळाटाळी करूं लागला संध्याकाळ होत चालली व हुकमाप्रमाणें जहाज हांकण्याचीही वेळ झाली तरी अजून पैसे येईनात, असें पाहून त्यानें मुकाट्यानें आपलें जोडगोळीचें पिस्तुल खिशांत घातलें व जहाजावरून उतरून तो व्यापाऱ्याचे घरीं गेला. त्याला पाहतांच तो व्यापारी उडवाउडवीचीं उत्तरें देऊं लागला. तेव्हां ग्यारीबाल्डी आपलें पिस्तुल त्याचे छातीस लावून ह्मणाला ‘पैसे टाक. दुसरी गोष्ट नाहीं.’ असें हें उग्रस्वरूप पाहतांच तो व्यापारी भिऊन गेला व त्यानें मुकाट्यानें पैशाची थैली आणून दिली. ती हातीं येतांच कांहीं एक चकार शब्द न बोलतां ती थैली खांद्यावर टाकून तो मुकाट्यानें जहाजावर परत गेला, व मध्यरात्रीं त्यानें आपलें जहाज बंदरांतून हाकारिलें. पुढें वाटेंत शिधा सामुग्री लवकरच

संपली; समुद्र खवळलेला असल्यामुळें व किनाऱ्याजवळचा प्रदेश खडकाळ असल्यामुळें लाटाही फार उसळत होत्या; व जहाजाचे आसपास सुसरींचे कळपचे कळप हिंडत होते. अशा रीतीनें संकटांत पुष्कळ दिवस घालविल्यावर शेवटीं एकदाची जमीन, व त्या जमिनीवर एक लहानसें घर असावेंसें दिसलें. परंतु जहाजावरून उतरून किनाऱ्याकडे जाण्यास होडी नव्हती; तेव्हां आतां काय करावें, अशी पंचाईत येऊन पडली. परंतु ग्यारीबाल्डीला मृत्यूची कधींही भीति वाटत नसल्यामुळें संकटांतून पार पडण्याच्या युक्त्या त्याला नेहमीं सुचत व त्या सिद्ध होत. या प्रसंगीं ग्यारीबाल्डीनें जवळ होडी नाहीं असें पाहातांच जहाजावरील एक मेज घेऊन त्याचे चार पायास चार पिंपें बांधलीं, व मेजावर एक काठी रोवून त्याला त्यानें आपले कपडे निशाणादाखल बांधले, मग तो व त्याचा एक सोबती असे दोघेजण ही नवीन बनवलेली होडी समुद्रांत लोटून तिच्यावर बसले, व वल्ह्याच्याऐवजीं ती पायानें वल्हवीत वल्हवीत किनाऱ्यास येऊन पोहोंचले. किनाऱ्यापासून दिसलेलें घर समुद्रांतून चार मैल लांब होतें, तेथें येऊन पाहतात तों घरामध्यें एक सुंदर स्त्री गृहकृत्यांत गुंतली होती. तिचा नवरा कामाकरितां बाहेर गेला होता, परंतु तो येण्याची वाट न पहातां तिनें ग्यारीबाल्डीचें चांगलें आदरातिथ्य केलें. शिवाय ती स्त्री स्वतः विद्वान कवयित्री होती व तिच्या समागमांत घालविलेला ग्यारीबाल्डीचा काळ फार आनंदाचा गेला. नवरा घरीं येतांच त्यानेंही त्यांचें आदरातिथ्य केलें, व जहाजावरील लोकांस अन्न पाहिजे होतें त्याकरितां त्यानें एक मोठा थोरला बैल मारून ग्यारीबाल्डीस दिला. तो त्या मेजाच्या होडीवर घालून

व त्या गृहस्थाचे आभार मानून ग्यारीबाल्डी जहाजावर परत आला. नंतर तें जहाज तेथून निघालें.

**एक बिकट प्रसंग**–दुसरे दिवशीं सकाळीं कांहीं अंतरावर त्यास दोन जहाजें आपणाकडे येताहेतसें दिसलें, व लवकरच त्यांची व ग्यारीबाल्डीचे जहाजाची लढाई सुरू झाली. दोन्हीकडील लोक फार निकरानें लढले व गोळीबाराची शिकस्त झाली. या झटपटींत सुकाणूवाला गोळी लागून पडला व सुकाणू फिरेना तेव्हां तें स्वतः चालविण्याकरितां ग्यारीबाल्डी त्या जागीं गेला, तों इतक्यांत एक गोळी त्याचेही गळ्यांत शिरली व तो बेशुद्ध होऊन जहाजावर पडला. ग्यारीबाल्डी पडला तरी त्याचे लोक धैर्यानें लढत होते. अशी सुमारें एक तास लढाई झाल्यावर शत्रु आपणच होऊन दमून निघून गेले. यानंतर वाराही चांगला सुटला व ग्यारीबाल्डीचें जहाज लापलाटा नदीमधून सुरक्षितपणें वर चढलें. ग्यारीबाल्डी शुद्धीवर आला, तेव्हां त्यास अतिशय ताप भरला होता; तोंडांतून शब्द निघेना व डोळे अर्धवट पांढरे झाले. जहाजावर कोणी वैद्यही नव्हता. अशा स्थितींत ग्यारीबाल्डीस साधारण बरा होण्यास १९ दिवस लागले. ग्युलाग्वे येथें पोहोंचल्यावर त्याचे मानेंतून एका शस्त्रवैद्यानें गोळी काढली, व तो घोड्यावर बसून बाहेर हवेंत थोडथोडा व्यायाम घेण्यासही जाऊं लागला. अंगांत शक्तीही थोडी आली. गांवांतील कांहीं लोकांच्या ओळखीही झाल्या. अशा रीतीनें सहा महिने बरे गेले. परंतु अखेरीस त्यास असें कळून आलें कीं, ग्युलाग्वे येथील अधिकाऱ्यांनीं त्यानें शहर सोडून जाऊं नये असा गुप्त हुकूम फर्माविला होता. आपण वास्तविक बंदिवान आहों असें ग्यारीबाल्डीस कळल्या-

पासून तेथून जाण्याची त्याची इच्छा फार वाढली. इतक्यांत "तुह्मीं मुकाट्यानें निघून जा, ह्मणजे गर्व्हनर केवळ मुद्दाम होऊन तुह्मांस अडवीलच अशांतला प्रकार कांहीं नाहीं" असें लोकांनीं त्यास सांगितलें. तेव्हां ग्यारीबाल्डीनें गुप्तपणें पळून जाण्याची तयारी केली. एके दिवशीं संध्याकाळीं वादळ सुटलें आहे व मनुष्येंही फारशीं घरांतून बाहेर पडलेलीं नाहींत अशा वेळीं ग्यारीबाल्डी हा घोड्यावर बसून बरोबर एक वाटाड्या घेऊन निघाला. दोघांनींही त्या रात्रींत जवळजवळ ६४ मैलांची मजल मारली. सकाळचे प्रहरीं इबीक्यू नांवाचे गांवाजवळ रानांत त्यांनीं आपले घोडे एका झाडाला बांधले, व वाटाड्या कांहीं कामाकारितां निघून गेला. ग्यारीबाल्डी हाही थकला असल्यामुळें तो गवतावर हातपाय ताणून खुशाल पडला. परंतु बराच वेळ झाला तरी वाटाड्या येईना तेव्हां हा प्रकार काय आहे, हें पाहण्याकरितां ग्यारीबाल्डी उठून कांहींसा दूर गेला. इतक्यांत खाडखाड टापा वाजवीत कांहीं घोडेस्वारांची टोळी हातांत नागव्या तरवारी घेऊन त्याचेपाशीं येऊन थडकली. ग्यारीबाल्डीचा घोडा लांब होता, यामुळें त्यास पळून जातां आलें नाहीं. इकडे त्या घोडेस्वारांनीं त्यास कैद करून एका तट्टावर जखडून बांधलें व ग्युलाग्वे येथें घेऊन परत आले. परत येतांच तेथील अधिकारी मिलन हा तुरुंगाचे दाराजवळ तयार होताच. त्यानें ग्यारीबाल्डी येतांच "तूं कां पळून गेलास? तुला कोणी मदत केली?" वगैरे प्रश्न विचारिले. परंतु ग्यारीबाल्डी मनासारखें उत्तर देईना. तेव्हां त्यानें त्यास आपल्या हातांतील चाबकानें बेदम फोडून काढिलें. इतकें झालें तरी ग्यारीबाल्डी नांवें सांगण्यास कबूल होईना. तेव्हां त्याचे हातास

दोरी बांधून तिनें त्यास एका तुळईस टांगून ठेविलें. या ठिकाणीं ग्यारीबाल्डी दोन तास लोंबकळत राहिला होता. मणगटावरच्या करकोच्यांतून रक्त वाहत होतें, शरीर तापानें भाजत होतें, पोट क्षुधेमुळें करपून गेलें होतें, व जवळ उभा असलेला एक शिपाई घशांत मधून मधून पाणी ओतीत होता. ग्यारीबाल्डीच्या त्या यातनेचें वर्णन कोण करील! दोन तासांनंतर अधिकाऱ्यांनीं त्यास मोकळें केलें. परंतु लागलेच त्याचे पायांत त्यांनीं बिड्या ठोकल्या. ग्यारीबाल्डीस तें कांहींच ठाऊक नव्हतें. कारण तो बराच वेळ बेशुद्ध होता व जागा होऊन पहातो तों खुनी, खिसेकापू वगैरे दुष्ट लोकांच्या सोबतीला आपणास तुरुंगांत टाकलें आहे, असें त्याला आढळून आलें. असो, तुरुंगांत मात्र यापुढें त्याचे हाल झाले नाहींत. सीनोरा आलेमन नांवाच्या एका मायाळू स्त्रीनें त्याची शुश्रुषा केली, व दोन महिन्यांनीं तो बरा झाल्यावर गव्हरनरानें आतां वाटेल तिकडे जा, ह्मणून त्यास सोडून दिलें. तेथून निघाल्यावर ग्यारीबाल्डी मॉंटीव्हीडो येथें आला, परंतु या संस्थानाच्या दोन जहाजांशीं ग्यारीबाल्डीनें पूर्वीं लढाई केली असल्यामुळें तेथें त्यास गुप्तपणें कांहीं दिवस काढावे लागले. एक महिन्यानंतर ग्यारीबाल्डी व रोझेटी हे रीओग्रँडेकडे निघून गेले. वाटेंत त्यास सुमारें दोनशें मैलपर्यंत घोड्यावरून प्रवास करावा लागला. परंतु पीरॅटियम् या नांवाच्या गांवास आल्यावर त्याचे हाल बहुतेक संपले. कारण या ठिकाणीं लोकसत्ताक राज्याचे लहानशा सैन्याचा तळ पडलेला होता, व तेथें जातांच त्याच्या विनंतीवरून ब्रेझिल् राजाविरुद्ध लढण्यास जाणाऱ्या एका टोळीबरोबर जाण्याची त्यास परवा-

नगी मिळाली. अशा रीतीनें कसे तरी एकादाचे पाय फिरून भुईस लागतांच लोकसत्तेच्यावतीनें निकराचें युद्ध करण्याचा त्याचा जो संकल्प होता तो सिद्धीस नेण्याचे उद्योगास ग्यारीबाल्डी हा एकदम लागला.

**स्वदेशाची स्मृति**- थोड्याच काळापूर्वी ग्यारिबॉल्डीनें आपल्या एका मित्रास असें लिहिलें होतें. " मित्रा, अद्यापि सुदैव माझ्या कार्याला हात देऊं लागलें नाहीं; व मला एवढेंच वाईट वाटतें कीं, देशकार्यास उपयोगी असें माझ्या हातून अद्यापि कांहीं एक झालें नाहीं. खरोखर, देवाची शपथ मी सांगतों कीं, या अशा निरुपयोगी जीविताचा मला पुरा कंटाळा आलेला आहे. तथापि आमच्या हातून पुढें महत्कार्य घडावयाचें आहे, असें माझें मन मला सांगत आहे." असो. लढाईवर जाण्याचा हुकूम होतांच ग्यारीबॉल्डीनें आपल्या सभोंवतीं सुमारें तीस लोक जमविले; व दोन लहान लहान जहाजें पुन्हां त्यानें तयार केलीं. सुमारें चाळीस नीग्रो लोक जहाजांवर खलाशांचें काम करावयास ठेविले व लहानशा दोन पंचरशी तोफाही त्यानें मिळविल्या. यांपैकीं एका जहाजाचें नांव रिओपार्डो होतें. हें ग्यारीबाल्डीनें स्वतः आपल्या हातीं घेतलें. दुसऱ्याचें नांव रिपब्लिकन असें होतें. त्यावर जॉन ग्रिग्ज या नांवाच्या आपल्या एका अमेरिकन स्नेह्यास त्यानें मुख्य नेमिलें. हीं जहाजें लहान असल्यामुळें त्यांस किनाऱ्याजवळूनच जावें लागे. आणि किनाऱ्याजवळ तर मोठमोठे खडक व भाग पडलेल्या. त्यांतून जहाज चालविणें फार धोक्याचें असे. असें असतांही त्यांनीं लवकरच शत्रूचीं बरींचशीं लहान सहान जहाजें काबीज केलीं. शत्रूचें आरमार मोठें होतें, तरी त्यांनीं ग्यारीबाल्डीकडे दुर्लक्ष केलें. यामुळें त्याचें फावलें. पुढें एके

ठिकाणीं किनाऱ्यावर उतरून त्यानें आपल्या खलाशांचे दोन तासांत घोडेस्वार बनविले. व कमाक्युअम् या नांवाचा एक समुद्रकिनाऱ्यावरील लहानसा किल्ला त्यांनीं हस्तगत केला.

**ग्यारीबाल्डीचें लग्न**—अशा रीतीनें लढाईमध्यें ग्यारीबाल्डी गुंतला असतां, एके दिवशीं त्याचे मनांत आपण लग्न करावें अशी एकाएकी अत्युत्कट इच्छा उत्पन्न झाली. या संबंधानें त्यानें आपल्या आत्मचरित्रांत असें लिहिलें आहे:—" या पूर्वी लग्न करण्याचा विचार माझे मनांत कधींही आला नव्हता. मला स्वतंत्रपणा नेहमीं फार आवडे; व अचाट साहसें मी वारंवार करीत असे. यामुळें माझ्यासारख्या मनुष्यानें लग्न करणें ह्मणजे अगदीं गैरसोईचें. लग्न केलें ह्मणजे त्याबरोबर मुलेंबाळें व सर्व संसार गळयांत पडलाच. संसार सुखाचा करण्यास कोठें तरी कायमचा निवास व स्वस्थता हवी. पण मी तर आपलें सर्व आयुष्य एका विवक्षित कार्यास वाहिलें होतें, व माझ्या आंगांत जो कांहीं जोम होता तो त्या कार्याचे पायीं लढण्यांत खर्च करणें आवश्य होतें, यामुळें माझ्या सारख्यानें तर लग्न करणें ह्मणजे मुळींच उपयोगीं नाहीं. परंतु देवाची इच्छाच कांहीं वेगळी होती. हा वेळपर्यंत केलेल्या लढायांत मजबरोबर असलेले माझे बहुतेक स्नेही व देशबांधव मला सोडून परलोकीं गेले होते. व मी जगांत अगदीं एकलकोंडा आहें असें मला वाटूं लागलें होतें. तेव्हां आपल्यास जन्माचा कोणी तरी सोबती पाहिजे अशी फार फार उत्कट इच्छा होऊं लागली. जें आपल्या संनिध नेहमीं राहील, व ज्याच्या समागमानें समाधान होईल, असें कोणी तरी मायेचें माणूस जवळ असावें, व तें न मिळेल तर जीवित अगदीं दुःसह होणार. पण असें मायेचें माणूस परदेशांत मिळणें अवघड!

असो. असे विचार मनांत घोळत असतांना एके दिवशीं बॅरा नांवाच्या एका टेंकडीवर कांहीं सुंदर घरें दिसत होतीं. तिकडे बोटींतून मी सहज गेलों, व जवळच्या दुर्बिणीनें पाहतों तों एका घराबाहेरच्या आंगणांत एक तरुण स्त्री उभी आहे असें मला दिसलें. तेव्हां अर्थात् तिकडे बोट वल्हवून व किनाऱ्यावर उतरून मी त्या घराकडे गेलों. परंतु इतक्या लांबून पाहिलेली स्त्री तीच हटकून आपणांस कशी भेटते अशा विचारानें मी किंचित् निराश झालों. इतक्यांत माझा एक स्नेही तेथें मला भेटला, व त्यानें मला कॉफी घेण्यास चला ह्मणून बोलाविलें. आह्मी दोघे त्याचे घरांत जातों तोंच दुर्बिणींतून पाहिलेली तरुण कुमारिका तेथेंच समोर उभी होती. आमची परस्पर दृष्टादृष्ट होतांच उभयतां आश्चर्यभरित व तटस्थ झालों. जणूंकाय आमची ही प्रथमचीच भेट नसून एकमेकांच्या चेहऱ्याकडे पाहून कांहीं वेळ विसरून गेलेल्या गत गोष्टींची आह्मी फिरून आठवणच करीत आहों. शेवटीं मी तिजपुढें किंचित् नम्र होऊन ह्मणालों, " कुमारिके, तूं माझी पत्नी होशील काय ?" वास्तविक तिची पोर्तुगीज भाषा मला चांगलीशी येत नव्हती. यामुळें मी वरील शब्द इटॅलियन भाषेमध्यें बोललों. पण मी ज्या धिटाईनें व मोकळे मनानें ते शब्द उच्चारले त्यांमध्यें एक प्रकारचा चित्ताकर्षकपणा होता खास. कारण, त्यांचा अर्थ तिला चांगला उमजला; येवढेंच नव्हे, तर त्यांच्या योगानें परस्परांच्या मनास मृत्यूशिवाय दुसऱ्या कोणास कधींही सोडवितां यावयाची नाहीं अशी बळकट गांठ लवकरच पडली. अशा चमत्कारिक रीतीनें आमचें चिरंतन प्रेम जुळलें."

**गांधर्वविवाह**—या स्त्रीचें नांव ॲनिटा असें होतें. ॲनिटा ही स्त्री लोकोत्तर होती. ग्यारीबाल्डीसारख्या वीराचे

पदरीं तिनें पडावें हें अत्यंत उचित होतें, व तें तसेंच घडून आलें. दोघांचेही आंगीं सारखेच गुण होते, व दोघांनींही जगांत सारखेंच धन्य ह्मणवून घेतलें. ॲनिटा ही वास्तविक दुसऱ्या एकास देण्याचें तिच्या बापानें आगाऊ ठरविलें होतें, व तिचा एक प्रकारें वाग्निश्चय झाला होता. परंतु विवाह असा अजून व्हावयाचा होता. तोंच मध्यंतरीं ग्यारीबाल्डीची व तिची गांठ पडली, व तिनें स्वतःस त्याला अर्पण केलें. यामुळें ज्याच्याशीं तिचा वाग्निश्चय झाला होता, त्याच्या सर्व सौख्यावर ग्यारीबाल्डीनें घाला घातल्यासारखें झालें. परंतु आपल्या हातून एका दृष्टीनें हें असत्कार्य होत आहे असें अनिटा किंवा ग्यारीबाल्डी यांचे मनांत त्या प्रेमभरांत कोठून सगार? तथापि हें शल्य ग्यारीबाल्डीचे मनांत घुसून राहिलें होतें. पुढें ज्यावेळीं ॲनिटा ही मरण पावली, त्यावेळीं तिजबद्दल विलाप करितांना तो आपल्या हातून घडलेल्या असत्कृत्याची आठवण काढकाढून रडे. तो ह्मणे, " अरेरे! ॲनिटा मेली यामुळें मी अभागी झालों, परंतु त्या गृहस्थाचा मात्र सूड उगविला गेला खरा. ज्या दिवशीं ती मरण पावली व तिला फिरून जीवंत करण्याचा मूर्ख प्रयत्न प्रेमातिरेकानें करीत असतां मी त्या प्रेताचा हात घट्ट धरिला व निराशेचे दुःखानें माझ्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले, त्या वेळीं मात्र मी पूर्वी केलेल्या पापाची बरोबर कल्पना माझे मनांत आली." असो. ग्यारीबाल्डीच्या इच्छेप्रमाणें ॲनिटा ही खरोखरच त्याच्या चित्ताच्या समाधानाचें स्थान लवकरच होऊन बसली. साहसाच्या व दगदगीच्या अशा त्याच्या जीविताचा ॲनिटा हाच काय तो एक निवाऱ्याचा आश्रय होता. व ज्याप्रमाणें वादळ मधून मधून होत असतांही आकाशांतील एखाद्या

तान्याकडे डोळे लावून मनुष्य मार्ग आक्रमण करितो, त्याप्रमाणें लढाया व साहसें करीत असतां ग्यारीबाल्डीचें लक्ष ॲनिटाच्या प्रसन्न वदनाकडे लागलेलें असे.

**शूर ॲनिटा**—लग्न झाल्यामुळें ग्यारीबाल्डीच्या उद्योगास मुळींच व्यत्यय आला नाहीं. कारण कोणच्याही उद्योगाचे कामीं, मग तो उद्योग नुसत्या सफरीचा किंवा लढाईचा कां असेना, ॲनिटा ही त्याचा उजवा हात होऊन राहिली होती. लग्नानंतर स्पॅनिअर्ड लोकांबरोबर लढाईचें काम पुनः लवकरच सुरू झालें. थोडक्याच दिवसांत ग्यारीबाल्डीचे जहाजाची व स्पॅनिश लोकांचे एका जहाजाची गांठ पडली. प्रथम एकमेकाच्या तोफा सोडून झाल्यावर जहाजें जवळ येतांच बंदुकी सुरू झाल्या. सुमारें पांच तास लढाई झाल्यावर शत्रूकडील सरदार, गोळी लागून तो मेला. तेव्हां त्याचे लोक जहाज घेऊन पळून गेले. या लढाईमध्यें ॲनिटा ही स्वतः लढत होती. ती जहाजाचे फळ्यांवर हातांत तरवार घेऊन उभी राहून खलाशांस व लढणाऱ्या लोकांस उत्तेजन देत असे. या संबंधानें ग्यारीबाल्डीनें खालील हकिकत लिहून ठेविली आहे. "लढाई चालत असतां तोफेच्या एका गोळ्याचे धक्यानें ॲनिटा व तिच्या जवळ असलेले दोघे इसम खालीं पडले. तें पाहतांच ती मेली असें वाटून तिच्याजवळ मी एकदम उडी मारून गेलों; व पाहतों तों ते इसम मात्र मेलेले असून ॲनिटा ही कांहीं इजा न होतां उठून उभी राहिली. न[illegible] तिनें खालीं जावें ह्मणून तिची मी पुष्कळ विनवणी केली. तेव्हां शेवटीं ती कबूल झाली, व "ठीक आहे, मी जातें व त्या मेल्या भित्र्याभागूबाईनां वर पाठवून देतें" असें ह्मणून खालीं गेली, व खरोखरच ती गेल्याबरोबर जहाजांत दडून

बसलेले कांहीं खलाशी निर्भत्सना केल्यामुळें शरम पावून वर आले. येथून पुढें ग्यारीबाल्डी हा आपलीं जहाजें घेऊन लॅग्यूना येथें गेला. परंतु तेथें पाहतो तों तें शहर लोकसत्तेविरुद्ध उठलें होतें. तेव्हां त्या शहरावर हल्ला करून त्यानें तें घेतलें. तेथून पुढें गेल्यावर पुनः एकवार शत्रूचे एका जहाजाची व त्याची गांठ पडली. ग्यारीबाल्डीपाशीं ह्यावेळीं तीन जहाजें होतीं. परंतु त्यांचें फारसें चालेना. याप्रसंगीं ग्यारीबाल्डी व त्याचे बाजूस ॲनिटा हीं दोघेजण लढाईला तोंड देऊन उभीं होतीं. तिनें तर आपले ताब्यांत एक तोफ स्वतंत्रपणें घेऊन ती रोखून म्हं याचा धडाका चालविला होता. लवकरच ग्यारीबा-ल्डीचे बहुतेक कामदार मरून पडले. तेव्हां त्यानें ॲनिटास एका होडींत उतरविलें व तिजबरोबर, सैन्याचा मुख्य सरदार किनाऱ्यावर होता त्यास असा निरोप पाठविला कीं आणखी कांहीं कुमक पाठविली असतां आपण लढाई चालवितों, पण कुमक न मिळेल तर शेवटीं आपल्या जहाजास आगलावून देतों. ॲनिटाला पाठवि-ण्यांत ग्यारीबाल्डीच्या मनांतील हेतु असा होता कीं, तिनें किनाऱ्यावर उतरल्यानंतर तेथेंच राहावें, परत येऊं नये. परंतु ती शूर स्त्री, सरदारास निरोप कळवून, आणखी कुमक मिळत नाहीं असें कळतांच तशीच परत फिरली. इकडे शत्रूकडून मारा होत होताच. ॲनिटा परत आल्यावर तिनें जहाजांतील होतीं नव्हतीं तीं हत्यारेंपात्यारें एका होडींत घातलीं व इकडे ग्यारीबाल्डीनें जहाजामध्यें जिकडे तिकडे आगीनें एकदम भडकणारे पदार्थ पसरून ठेवले. दोघेंही एका होडींत उतरून किनाऱ्याकडे आलीं, व त्यांच्यामागें

थोडक्याच वेळांत त्या जहाजामध्यें एकदम आगीचा भडका उसळला. इकडे लोकपक्षाचें सैन्य हळू हळू रिओग्रँडेकडे वळलें. त्याबरोबर ग्यारीबाल्डी व ॲनिटा आपले उरलेले थोडेसे लोक घेऊन घोड्यावर स्वार होऊन त्या सैन्याबरोबर निघालीं. वाटेंत त्यांचे बरेच लोक त्याला सोडून गेले. यानंतर लढाई कांहीं दिवसपर्यंत थांबली. तेव्हां ग्यारीबाल्डी हा उरलेले लोक घेऊन निवांत अशा एका खेड्यांत जाऊन राहिला.

**पुत्रजन्म**—लग्न झाल्यापासून या लढाऊ जोडप्यास स्वस्थता ह्मणून कशी ती माहिती नव्हती. ती या खेड्यांत आल्यावर त्यांना कांहीं दिवस मिळाली. नंतर थोड्याच दिवसांत ग्यारीबा-ल्डीस एक मुलगा झाला. त्याचें नांव त्यांनीं मिनॅट्टी असें ठेविलें. हा मुलगा पोटांत असतां ॲनिटा नें कित्येक लढाया केल्या व तिजवर इतकीं संकटें आलीं होतीं कीं, त्यांमध्यें साधारण नशीबाची किंवा साधारण पराक्रमाची स्त्री क्वचितच वांचली असती. असें असतां नऊ महिने पूर्ण होऊन ती बाळंतीण झाली व मुलगा झाला. हें पाहून उभयतांस फार आनंद झाला. तथापि तिच्या गर्भारपणांतील संकटांची एक खूण या मुलाचे आंगावर कायमची राहिली होती. मेनॉट्टी हा जन्मला तेव्हांच त्याचे कपाळावर एक जखम पडलेली होती. गर्भारपणीं घोड्यावरून भरधांव जातांना ॲनिटा एक वेळ घोड्यावरून पडली होती, त्या योगानें ती जखम झालेली असावी.

**दुःखांत सुख व सुखांत दुःख**—अशा रीतीनें ग्यारीबाल्डीनें संसार तर थाटलाच; परंतु तो संसार वास्त-विक वनवासाहून अधिक कष्टमय होता. ॲनिटा आपला मुलगा घेऊन घरीं राही, व ग्यारीबाल्डी हा खांद्यावर बंदुक

टाकून शिकार मारून आणी. अन्नाची अशा रीतीनें व्यवस्था लागली खरी, तरी वस्त्र कसें मिळावें? व वस्त्राविणें तर त्या लहान मुलास थंडी होऊं लागली. तेव्हां एके दिवशीं ग्यारीबाल्डी घोड्यावर बसून कांहीं कपडे मिळवून आणण्याकरितां निघाला. त्या वेळीं संध्याकाळ झालेली; पाऊस सारखा ओतत होता, व रानांतून घोड्याच्या गुढघ्यापर्यंत पाणी झालें होतें. कांहींसें लांब गेल्यावर एका स्नेह्याचे घरीं ती रात्र त्यानें काढिली, व दुसरे दिवशीं सकाळीं उठून तो चालूं लागला. इतक्यांत दूर अंतरावर गोळीबार झाल्याचा आवाज ऐकूं येऊं लागला. तथापि कपडे मिळविण्याच्या तातडीनें तो ... च सेटिंब्रिना नांवाचे गांवास जाऊन परत आला. सदाप येऊन पाहतो तों घरांत कोणीही नव्हतें. तेव्हां आदले दिवशीं गोळीबार ऐकला त्या वेळींच कांहीं तरी दगा झाला असावा असें त्यास वाटलें. त्या वेळीं खरोखर कांहीं दगा झाला नव्हता. परंतु मॉरिंग्यू या नांवाचा एक ब्राझिलियन शत्रू हा ग्यारीबाल्डीचे पश्चात् आल्यामुळें आपला प्राण वांचविण्याकरितां ॲनिटा हिनें भर पावसांत घोडा काढला व आपल्या उघड्या नागड्या मुलास घेऊन ती घर सोडून कांहीं अंतरावर रानांतच परंतु एका निवाऱ्याच्या जागीं जाऊन बसली होती. शोध करितां अखेरीस ती ग्यारीबॉल्डीला ...क्षित सांपडली. हें संकट पार पडल्यावर ग्यारीबाल्डीस ... त्याचे कुटुंबास पुनः कांहीं दिवस स्वस्थता मिळाली. परंतु सुखा मागून दुःख लागलेंच येतें. ज्या सैन्याबरोबर परत जात असतां ग्यारीबाल्डी हा वाटेंत मुक्काम करून राहिला होता, त्या सैन्यास पुढें हिंवाळा आला होता तरी तेथून लवकरच छावणी मोडणें भाग पडलें. दक्षिण

अमेरिकेंतील हिंवाळा ह्मणजे अतिशय भयप्रद असतो. पर्वतावर चोवीस तास पर्जन्य मुसळधारेनें ओतत असल्यामुळें आसपासचे प्रदेशांतील नद्यानाले दुथडी भरून वाहत असतात, व खालाटींचे उथळ प्रदेश सरोवराप्रमाणें डबडबून जातात. ग्यारीबाल्डीचें सैन्य निघालें त्यावेळीं रस्ते मुळींच नव्हते, व ज्या पाऊलवाटा होत्या त्या बुजून गेल्या होत्या. बरोबर खावयास कांहीं एक नव्हतें. मात्र त्यांनीं कांहीं थोडे गाईचे कळप बरोबर घेतले होते. अशा संकटांत तीन महिने प्रवास चालला होता. त्यामध्यें सैन्यांतील बाया बापड्या, लहान मुलें व बाजार बुणगे बरेच नाश पावले. ग्यारीबाल्डीलाही फार हाल सोसावे लागले. बरोबर बायको व लहान मूल. [illegible] पूर आलेल्या नद्या लागत त्यांतून तरून जावयाचें रत[illegible] मोठेंच संकट. अशा प्रसंगीं ग्यारीबाल्डी आपल्या मुलग्यास हात रुमालानें गळ्याशीं ऊब येण्याकरितां बांधून नदी पोहून जात असे. वाटेंत अन्न अगदीं मिळेनासें झालें, त्यावेळीं ग्यारीबाल्डीनें ॲनिटास घोड्यावर घालून पुढें लावून दिलें. तेथें तिजला कांहीं शिपाई भेटले त्यांनीं तिला अन्न दिलें व मुलाला कांहीं जुने लोंकरीचे कपडेही दिले. अशा रीतीनें त्यांनीं २५०-३०० मैलांचा प्रवास केला. मकाणास पोहोंचल्यावर प्रवासाचे सर्व श्रम ग्यारीबाल्डीस आठवले, इटलीकडून देशस्थितीची किंवा आईची बातमी सहा वर्षांत कळली नव्हती, व आपण अरण्यांतून प्रवास व जहाजांवरून शत्रूंशीं लढाया करीत राहिलों तर हालअपेष्टांनीं बायको व मुलगा खास मरतील, या करितां कांहीं दिवस कोठें तरी सोईची जागा पाहून स्वस्थ राहावें, अशा विचारानें ग्यारीबाल्डीनें रजा घेतली व मॉंटीव्हिडो येथें

जाण्यास तो निघाला. ग्युलाग्वे येथील लोकसत्ताक राज्यास ग्यारीबाल्डीनें इतकी मदत केली व त्या कामीं शेंकडों साहसें केलीं तोच आतां जावयास निघाला तर त्याचे जवळ कांहीं एक उरलें नव्हतें. नाहीं ह्मणावयाला अधिकाऱ्यांच्या मदतीनें त्यानें सुमारें नऊशें गुरांचा एक कळप मात्र जमविला. हीं गुरें मॉंटीव्हिडोस नीट पोहोचतीं तर त्यांस कांहीं किंमत तरी येती. परंतु तीं जनावरें आधींच रानटी, त्यांना वळावयाचें काम कठिण, त्यांतून वाटेंत नद्या, अशामुळें निम्मीशिम्मीं गुरें मेलीं; बाकी उरलीं त्यांची कातडी विकलीं, त्याचे मात्र त्यास शंभरएक पौंड मिळाले.

**शिपाईगिरी**—मॉंटीव्हिडो येथें गेल्यावर प्रथमतः त्यानें सव्यापाराचें दुकान घातलें, व त्यांतल्या त्यांत एका गृहस्थाचे घरीं गणिताची शिकवणी पतकरली. अशा रीतीनें चरितार्थाला सरासरीनें पुरेसे पैसे तो मिळवूं लागला. तेव्हां पोटाच्या धंद्या-शिवाय हातून दुसरें कांहीं होण्यास वावच नव्हता. परंतु पुढें १८४३ सालीं युरुग्वेचे प्रजासत्ताक राज्यास ब्युनॉसआयर्स येथील रोझॅस नांवाच्या जुलमी सरदाराविरुद्ध लढाई करण्याचा प्रसंग उपस्थित झाला. मॉंटीव्हिडो येथील प्रमुख लोकांस ग्यारीबाल्डीची कीर्ति माहीत होती. त्यानें सैन्यांत सरदारी पतकरावी असें त्याच्याशीं त्यांनीं बोलणें लाविलें. ग्यारीबा-ल्डीनेंही तें काम आनंदानें पतकरलें. कारण राजकीय जुलमा-विरुद्ध लढण्याचें व्रत त्यानें अंगिकारलें होतें व तें पाळण्यास हा एक नवीन प्रसंग आला. लागलीच अठरा तोफांचें एक जहाज व त्याच्या जोडीस लहानसें दुसरें एक जहाज, अशीं दोन जहाजें त्याच्या ताब्यांत देण्यांत आलीं, व कोरियें-टीस नांवाचा सरदार, रोझॅसच्या विरुद्ध अगाऊच लढत

होता त्याला मदत करण्याचें काम ग्यारीबाल्डीकडे सोंपविण्यांत आलें. मॉंटीव्हिडो येथें व्यापारासंबंधानें कित्येक इटॅलियन लोक येऊन राहिले होते. त्यांस लढाईचे कामीं मदत देण्यास तयार होण्याविषयीं ग्यारीबाल्डीनें विनंति केली. त्याबरोबर प्रथम पांचशें लोक एकदम तयार झाले व थोड्याच दिवसांत आणखी तीनशें मिळाले. त्याचप्रमाणें त्यानें कांहीं हजार नीग्रो लोकही त्यांना स्वातंत्र्य देऊन लढण्यास तयार केले. इटॅलियन सैन्य आपल्या हाताखालीं आहे, या विचारानें त्याला अतिशय अभिमान व उल्हास वाटे. पहिल्याच लढाईत इटॅलियन लोकांनीं पुष्कळ शौर्य दाखविलें व त्याबद्दल त्यांस स्वतंत्र निशाण देण्यांत आलें. त्यावर व्हेसुव्हीयुस पर्वताचें चित्र ग्यारीबाल्डीनें काढविलें. त्याचें कारण असें [illegible] त्या चित्र पाहून इटॅलियन लोकांना लढतांना स्वदेशाची आठवण व्हावी. मॉंटीव्हीडोचा बचाव करतांना व त्यानंतर ग्यारीबाल्डीचे हाताखालीं इटॅलियन लोकांनीं फारच मर्दुमकी केली. त्या सर्व प्रसंगांचें वर्णन येथें देण्याचें कारण नाहीं. इतकेंच सांगितलें असतां बस्स होईल कीं, या लढायांमध्यें पुष्कळ तऱ्हेचा विचित्र अनुभव ग्यारीबाल्डी व त्याच्या सोबत्यांस येऊन ते इटलींत पुढें लवकरच जें महत् कार्य करावयाचें होतें त्याला अगदीं लायक झाले. येवढेंच नव्हे, तर या लढायांमध्यें त्यांनीं दाखविलेल्या शौर्यामुळें व केलेल्या अचाट पराक्रमामुळें त्यांची सर्व युरोपखंडांत किंबहुना सर्व जगांत कीर्ति पसरली, [illegible] ग्यारीबाल्डीच्या विचाराचेच जे लोक इटलींत होते, त्यांस ग्यारीबाल्डीचे पराक्रम ऐकून त्याची स्वदेशकार्याला फार मदत होईल अशी आशा येऊन फार उमेद चढली. इटॅलियन लोकांची टोळी जमविण्यांतही ग्यारीबाल्डीचा अशाच प्रकारचा

हेतु होता. स्वदेशांत लढण्यास वाव नाहीं तर परदेशांत तरी स्वतंत्रतेच्या कामीं लढून अनुभव व शौर्य संपादन करावें, व या कमाईचा पुढें मागें केव्हां तरी खास उपयोग होईल, अशी त्याची मनोदेवता त्यास सांगे. १८४४ सालीं मॉंटी-व्हीडो शहरास जनरल रोझॅस यानें वेढा दिला. या वेढ्यामध्यें तर इटॅलियन टोळीनें शौर्याची शर्थच केली. ती इतकी कीं, मॉंटीव्हीडोच्या सैन्यानें सुद्धां त्यांची प्रांजलपणें फार वाहवा केली. त्या योगानें ग्यारीबाल्डीस आपल्या कर्तृत्वाची धन्यता वाटली. मॉंटीव्हीडो येथील वेढा उठल्यानंतर ग्यारीबाल्डीनें मॅट्रेरो नांवाच्या स्वतंत्रताप्रिय व शूर अशा पहाडी जातीची मदत घेऊन शत्रूच्या मुलखावर हल्ले करण्यास प्रारंभ केला. हे हल्ले पुढे तीन चार वर्षेंपर्यंत चालले होते. त्यांतील निरनिराळ्या प्रसंगीं ग्यारीबाल्डीनें असे कांहीं अचाट पराक्रम केले कीं, त्यांचें वर्णन केलें असतां तें एकाद्या कादंबरीप्रमाणें अद्भुत वाटेल.

**ग्यारीबाल्डीचा बहुमान**–१८४७ चे अखेर ग्यारी-बाल्डी मॉंटीव्हीडो येथें परत आला. येवढ्या अवकाशांत त्यानें व त्याच्या बरोबरीच्या इटॅलियन टोळीनें सर्वोत्कृष्ट कीर्ति संपादन केली होती. ग्यारीबाल्डी तर मानानें सर्व सैन्यांतील मुख्य सरदार असा मानला गेला होता; परंतु त्याची मूळची स्थिति मुळींच बदलली नव्हती. ह्मणजे तो जशाचा तसा गरीब [illegible] होता. मॉंटीव्हीडो येथील अधिकाऱ्यांनीं त्याचे उतराई होण्याकरितां पुष्कळ खटपट केली. त्यांनीं त्या निशाणावर सन्मानदायक अक्षरें सोनेरी शाईनें लिहिलीं. 'रीओडीलापलाटा' येथील फ्रेंच आरमारावरील सरदारानें तर ग्यारीबाल्डीस असें लिहिलें कीं, "तुह्मी केलेल्या पराक्रमांनीं नेपोलियनच्या प्रख्यात

सैन्याला सुद्धां अधिक भूषण आलें असतें " मॉंटीव्हीडो येथील लोकांनीं त्यास सरदार ही बहुमानार्थ पदवी दिली व त्यावरून पुढें अमेरिका व युरोपखंडामध्यें (जनरल) सरदार ग्यारीबाल्डी असें त्याचें नांव पडलें. परंतु ज्या वेळीं ते लोक त्याला जमिनी बक्षीस देऊं लागले, त्यावेळीं ' केवळ स्वतंत्रतेकरतांच आह्मी लढलों, कोणच्याही रीतीनें पैसा किंवा इतर नफा मिळविण्याकरितां लढलों नाहीं ' असें सांगून त्यानें तें बक्षीस नाकारिलें. येवढेंच काय, परंतु स्वतःकरितां किंवा आपल्या लोकांकरितां लष्करी बहुमानाची बढतीही त्यानें पत्करिली नाहीं. त्यानें आपल्या एका पत्रांत यासंबंधानें लिहिलें आहे कीं " जें कार्य संपादन करण्यांत माझ्या इतक्या इटालीयन देशबांधवांचे बळी पडले, त्याबद्दलचा बहुमान त्यांच्या मागें जिवंत राहून स्वीकारला तर त्या पापाच्या ओझ्यानें मीं मरण पावेन. अमेरिकेंतील लोक दुर्दैवानें जुलमी राजांच्या तावडींत सांपडले होते. त्यांची सुटका झाली तर करावी एवढ्याचकरितां केवळ त्यावेळीं अमेरिकेंत असलेल्या माझ्या इटालीयन बांधवांच्या हृदयांत मीं लढाई करण्याचें स्फुरण आणिलें होतें. त्यांत कोणताही स्वार्थ साधण्याचा हेतू नव्हता." व असें ह्मणून आपणास व आपल्या सोबत्यांस बढती देण्याविषयीं झालेला ठराव त्यानें रद्द करविला. अशी कांहीं त्याची लोकोत्तर निस्पृहता होती.

**निर्धनता**--या वेळची त्याची गरीबी व साधेपणा इतका होता कीं, त्याच्या अंगांत कधीं धड सदरा देखील असावयाचा नाहीं. त्याचें राहण्याचें ठिकाण ह्मणजे एक अगदीं साधी झोंपडी होती. तिच्या कवाडास कडी बिलकूल नसून तें रात्रंदिवस अगदीं उघडें असे. एके

दिवशीं फ्रेंच आरमारावरचा अधिकारी त्यास भेटावयास आला तों संध्याकाळ होऊन अंधेर पडला होता. त्या अधिकाऱ्यानें कसें तरी एकदां दार उघडून आंत प्रवेश केला तों वाटेंत असलेल्या एका खुर्चीची त्याला थडक बसली. तेव्हां ग्यारीबाल्डीस हाक मारून तो विनोदानें ह्मणाला, ‘ काय हो, तुह्मांस भेटावयास यावयाचें ह्मणजे आधीं प्राण दिला पाहिजे. ’ तें ऐकतांच ग्यारीबाल्डीनें आपले बायकोस हाक मारून तिला दिवा आणावयास सांगितलें. तेव्हां तिनें आंतून उत्तर केलें ‘ दिवा कोठचा आणूं ? घरांत मेणबत्त्या विकत घ्यावयास पैसे असतील तर ना ? ’ व शेवटीं त्या उभयतांचें बोलणें अंधेरांत बसूनच झालें. दुसरे दिवशीं त्या सरदारानें ग्यारीबाल्डीला वीस पौंड पाठवून दिले. ते तसेच परत करणें वाईट दिसलें असतें ह्मणून त्यानें ठेवून घेतले. परंतु दुसेर दिवशीं गांवांतील गरीब विधवा व भिकार जमवून ती रक्कम त्यानें वांटून टाकिली. मात्र तो सरदार पुन्हां रात्रीं भेटण्यास कदाचित् येईल ह्मणून मेणबत्या विकत घेण्या पुरते पैसे त्यानें त्यांतून ठेऊन घेतले. तात्पर्य, अमेरिकेंत असतां ग्यारीबाल्डीचे गरिबीस सीमाच नव्हती. परंतु त्याचें लक्ष पैशावर किंवा मानावर केव्हांच नव्हतें. तुह्मीं मला बक्षीस देणारच तर अमक्या एका कैद्यास बंधमुक्त करा किंवा अमक्या दारिद्री प्राणसास इतकें द्रव्य द्या, असलें बक्षीस तो मागून घेई. या अशा निरपेक्ष बुद्धीनें तर ग्यारीबाल्डीच्या कामगिरीबद्दल मॉंटीव्हीडो येथील लोकांस अधिकच उपकार वाटूं लागले. व ही निरपेक्षता त्याची कीर्ति पसरण्यास विशेष कारणीभूत झाली. केवळ ग्यारीबाल्डीचे हाताखालीं नोकरी करून नांव मिळवावें अशा हेतूनें युरोपांतील निरनिराळे देशचे तरुण होत-

करू शिपाईगडी अमेरिकेस येऊं लागले. परंतु ग्यारीबाल्डीस अमेरिका लवकरच सोडून जाण्याचें कारण पडलें. त्याची हकीकत पुढील भागांत दिली आहे.

# भाग ७ वा.

## इ. सन १८४८–४९ चें मोठें बंड.

भर्तृःपिंडानृणकरो यशःक्रयमहापणः ।
सुरांगना स्वयंग्राहो रम्यः कालोयमागतः ॥

**देशस्थिति**–ग्यारीबाल्डी व मॅझिनी यांचें १८३४ तील छोटेखानी बंड फुकट जाऊन उभयतांसही फांशीची शिक्षा फर्मावि- ण्यांत आली व ग्यारीबाल्डी अमेरिकेस व मॅझिनी स्वित्सर्लंडास निराशेनें निघून गेला त्या गोष्टीला सुमारें १४ वर्षें झालीं होतीं. दरम्यानचा काळ ग्यारीबाल्डीनें कसा घालविला हें मागील भागावरून कळून येईलच. इकडे मॅझिनीनेंही आपला लोक- शिक्षणाचा उद्योग अविश्रांत चालविला होता, व १४ वर्षांनंतर उभयतांचेही निरपेक्ष देशकार्याचे खटपटीस यश येण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं होतीं. वास्तविक ग्यारीबाल्डी व मॅझिनी हे दोघेही इटलींत नसतां त्यांच्या पश्चात् त्यांच्या हेतूप्रमाणें गोष्टी घडून येत चालल्या होत्या. या १४ वर्षांत इटली देशांतील लोकस्थिति बरीच पालटून गेली होती. येवढ्याशा इटलीचे निरनिराळे दहा तुकडे झालेले असून त्यांवर स्वतंत्र व निरनिराळ्या प्रकारचीं राज्यें होतीं. परंतु त्यांपैकीं प्रत्येक राज्यांतील लोकांचे मनांत अप्रत्यक्ष रीतीनें असलेल्या परकीयांचे अंमलापासून व प्रत्यक्ष असलेल्या देशी राजांचे जुलमापासून मुक्त होण्याची इच्छा प्रादुर्भूत होऊन ती दिवसेंदिवस प्रबळ होत चालली होती. लॉंबर्डे व व्हेनिस मिळून झालेल्या संयुक्त राज्यांत मॅझिनीच्या शिक्ष-

णाचा प्रसार विशेष झाला असल्यामुळें तेथील लोक राजकीय हक्क मिळविण्याविषयीं उतावळे झाले होते, व त्यांच्या मनांतील त्वेष मधून मधून लहानसान बंडांच्याद्वारें बाहेर पडत असे. नेपल्स व सिसिली मिळून बनलेल्या राज्यांत फर्डिनंद राजाचा जुलूम व त्याची क्रूरता शिखरास पोंचली असल्यामुळें लोक अतिशय गांजून जाऊन जिवावर उदार होण्याच्या बेतांत आले होते. रोम म्हणजे पोपचें राज्य, यामध्यें उपाध्याय वर्ग अगदीं बहकून गेला होता व लाचलुचपत व इतर हरएक प्रकारची अनीति यांनीं सर्व राज्य खंती येण्या इतकें बुजबुजून गेलें होतें. यामुळें लोकांचीं मनें पोपविषयीं पुष्कळ दिवसांपासून विटून गेलीं होतीं. कोणचीही सुधारणेची गोष्ट काढली कीं, त्या वेळच्या पोपनें ती हाणू पाडावी. वर्तमानपत्रवाल्यांस व राजकीय आणि धार्मिक गुन्हेगारांस अत्यंत कडक अशा शिक्षा होत; फार काय, पण दरवडेखोरांनीं लोकांस लुटण्याकरितां जणूंकाय पोपकडून सनदाच मिळविल्या होत्या! स्वतः पैसे खाऊन पोपनें सर्व प्रकारचे मक्ते देऊन टाकल्यामुळें व्यापार जवळजवळ बसला होता! पोष्टांतून खाजगी पत्रें पोपच्या हुकमानें अधिकारी नेहमीं फोडीत. यामुळें लोकांचे मनांत त्याजविषयीं पुरा बेभरंवसा उत्पन्न झाला होता. धार्मिकपणानें कोणी पोपकडे जाऊन आपलीं पापें गुप्तपणें कबूल केलेलीं असलीं तरी त्याचा उघड फायदा घेऊन तो लोकांवर जुलूम करी. खऱ्या धार्मिकपणाचा पुरा नायनाट झाला असून जिकडे तिकडे उपाध्याय वर्गानीं थोतांड माजविलें होतें. या सर्व गोष्टींमुळें सत्यप्रिय, नीतिमान व स्वदेशाभिमानी असे जे कोणी लोक पोपच्या राज्यांत होते ते तें राज्य एकदां केव्हांचें नाहींसें होईल अशी

परमेश्वराजवळ प्रार्थना करीत बसले होते. टस्कनी या संस्थानांत दुसरा लियोपोल्ड या नांवाचा राजा होता त्यानें आपल्या आजानें घालून दिलेल्या सर्व शिस्तींचा उच्छेद करून इटलींतील इतर संस्थानांच्या जुलमी राजांचें अनुकरण करण्यास प्रारंभ केला होता. पार्मा येथें तर मूर्तिमंत ऑस्ट्रियाचा जुलमी अंमल चालू होताच. मॉडिनाची झाली तरी तीच गोष्ट, व त्या दोन्हीही संस्थानांमध्यें लोक अगदीं चेपून गेले होते. अशा स्थितीमुळें जरी इटलीमध्यें निरानिराळीं दहा संस्थानें होतीं तथापि त्या लोकांचे मनांत सर्व साधारण असा एकच हेतु उद्भवून प्रबळ झाला होता. तो हेतु ह्मटला ह्मणजे परकीय राजे जे ऑस्ट्रियन त्यांजविषयींचा द्वेषभाव हा होय. स्वदेशी राज्यें असून देखील इतका जुलूम होतो याचें सर्व कारण ऑस्ट्रिया असें लोकांच्या मनानें पक्कें घेतलें होतें. इ. स. १८१९ सालीं व्हीयना येथील तहाचे योगानें इटलीमध्यें सर्व प्रकारचे बखेडे मोडून लोकांना करड्या अंमलाखालीं ठेवावयाचे, व नेपोलियन बोनापार्टाच्या थोड्याच दिवसांच्या परंतु उदार राज्यामुळें इटॅलियन लोकांचे मनांत स्वतंत्रता, निदान सुराज्य, याचें जें बीज पेरलें गेलें होतें, तें कडक अंमलानें सफाई करपवून टाकावयाचें, हीं दोन कामें युरोपियन राष्ट्रांचे बहुमतानें ऑस्ट्रियाकडे सोंपविण्यांत आलीं होतीं, व तेव्हांपासून ऑस्ट्रियाचा उन्मत्तपणा बेसुमार वाढला होता. थोड्याच काळांत ऑस्ट्रियानें इतकी अप्रीति मिळविली कीं, सर्व इटॅलियन लोकांचे मतानें ऑस्ट्रियन लोकांचा द्वेष करणें हा एक मोठा गूण असें वाटूं लागलें होतें. इ. स. १८३० मध्यें फ्रान्स देशांत राज्यक्रांति घडून आली व ती सफळ झाली. तिचें योगानें व्हियेन्ना येथील तह निदान आस्ट्रिया पुरता

तरी रद्द झाल्यासारखा झाला होता; व फार पुरातन काळा-पासून फ्रान्सचा इटलीशीं जो कांहींसा वरिष्ठपणाचा संबंध चालत आला होता तो पुन्हां स्थापित झाला. यामुळें ऑस्ट्रि-याचे पाश आपोआपच किंचित् ढिले पडूं लागले होते. इटली स्वतंत्र होण्याचे कामीं फ्रान्सकडून मदत झाली असतीच असें नाहीं. उलट एक दोन प्रसंगीं त्या कार्यास फ्रान्सकडून थोडाबहुत अडथळाच झाला होता. परंतु फ्रान्स देशाचा इटली-मध्यें फिरून शिरकाव झाल्यामुळें ऑस्ट्रियास एका प्रकारचा प्रतिस्पर्धी किंवा शत्रु उत्पन्न झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. व आपमतलबी लुई नेपोलियन बादशहानें तर ऑस्ट्रिया व जर्मनी यांच्या द्वेषानें इटलींतील संस्थानिकांस मदत कर-ण्याची लालूचही पुढें एक दोन वेळ दाखविली. अशा रीतीनें १८४८ चे पूर्वीं व त्यानंतरही फ्रान्सचा इटलीमध्यें हात शिरकल्यामुळें एका बाजूनें नुकसान झालें; परंतु दुसऱ्या बाजूनें नफा झाला. दुसरी एक गोष्ट अशी घडून आली कीं, कर्मधर्म-संयोगानें इटलीच्या स्वतंत्रतेचा मुख्य शत्रु जी पोपची गादी तेथूनच या सुमारास इटली स्वतंत्र करण्याविषयीं ज्या लोकांचे प्रयत्न चालले होते त्यांस आशा उत्पन्न झाली. तो प्रकार असा झाला कीं, ग्रेगरी पोप १८४६ च्या जून महिन्यांत निवर्तला. हा पोप इतर पुष्कळ पोपांप्रमाणें जुलमी असून रोम संस्थानां-तील प्रजेस अधिक हक्क देण्याचे विरुद्ध होता. परंतु त्याचे मागून नववा पायस नांवाचा पोप लोकांनीं निवडला. त्याची लोकांस हक्क देण्याची प्रवृत्ति तो गादीवर येतांच दिसून आली. पायस हा चांगल्या बुद्धीचा परंतु भित्रा व कमकुवत असा पोप होता. गादीवर बसल्यानंतर त्यानें पहिलें काम हें केलें कीं, जे राजकीय कैदी तुरुंगांत पडले होते त्यांस सोडून दिलें,

व तसेंच हद्दपार केलेल्या लोकांस परत येण्याची परवानगी दिली. राज्यकाभाराचे बाबतींतही कांहीं सुधारणा त्यानें केल्या व इटली-देश संयुक्त व स्वतंत्र करण्याचे कामीं त्यानें आपल्या भाषणांत अनुकूल मतें प्रदर्शित केलीं. खुद्द पोप, कधीं नव्हे तो आपले बाजूस वळला या विचारानें लोकांचे मनांत सदाशेचा पूर आला, व पायस पोप एकदम अतिशय लोकप्रिय झाला. लोकांनीं त्याचें अभिनंदन करण्याकरितां जिकडे तिकडे दीपोत्साह केले व त्याच्या नांवाचे पोवाडे करून लोक रस्तोरस्तीं गाऊं लागले. ही बातमी ऑस्ट्रियन बादशाहास लागतांच त्यास फार भय उत्पन्न झालें, व त्यानें आपलें सैन्य १८४७ चे उन्हाळ्यांत जनरल रॅडेट्स्की नांवाच्या सरदाराच्या हाताखालीं देऊन पोपच्या राज्यांत छावणी देऊन राहण्यास पाठविलें. या कृत्यानें पोपच्या पवित्र अधिकाराचा उघडपणें उपमर्द केल्यासारखें झालें, व त्याबद्दल पोपासच काय पण सर्व इटॅलियन लोक व निरनिराळ्या संस्थानांचे राजे यांनांही फार राग आला. व त्यांनीं एक कौन्सिल भरवून ऑस्ट्रियन बादशहानें जर आपलें सैन्य परत घेतलें नाहीं तर एकदम लढाई सुरू करावी असें ठरविलें. या ठरावाप्रमाणें लढाईची तयारी होतांच ऑस्ट्रियानें आपलें सैन्य परत घेतलें.

**ग्यारीबाल्डी अमेरिका सोडतो.**—वरील पैकीं बऱ्याच गोष्टी ग्यारीबाल्डी हा मॉंटीव्हीडो येथें असतांच त्यास कळल्या. त्या ऐकतांच इटलीचा ऊर्जित काळ आला या सुखदायक विचारानें त्याचें मन हर्षभरीत झालें. पोप पायस, हा इटली स्वतंत्र करण्याचे कामीं अनुकूळ झाला आहे असें ऐकतांच त्याचे मनांत तोंपर्यंत पोप, उपाध्यायवर्ग व त्यांचे राज्य याबद्दल अत्यंत द्वेष व

तिट्कारा होता, तरी तो सर्व विसरून जाऊन त्यानें पोपास आवेशयुक्त असें एक पत्र लिहिलें. त्यांमध्यें पायसची पुष्कळ स्तुति केलेली असून आपण इटली स्वतंत्र करण्याचे कामीं मदत करण्यास एका पायावर तयार आहों व पोप महाराजांनीं या अल्प स्वल्प मदतीचा अंगिकार केला असतां आपणावर मोठा अनुग्रह केल्यासारखें होईल, असें मोठ्या आदरानें व गौरवानें त्यानें लिहिलें होतें. परंतु या पत्राचा त्यास पोपकडून मुळींच जबाब मिळाला नाहीं. पुष्कळ दिवस वाट पाहिली तथापि कांहींच उत्तर येत नाहीं, याचें ग्यारीबाल्डीस फार वाईट वाटलें, परंतु तो बिलकुल निराश झाला नाहीं. कारण प्रत्यही इटलींत निरानिराळ्या अनुकूल गोष्टी घडून येत होत्या, त्यांची माहिती ग्यारीबाल्डीस टपालांतून मिळूं लागली. हिकडे मॉंटीव्हीडो संबंधीचें कामही फारसें उरलें नव्हतें. यामुळें आपण इटलीस परत जावें अशी ग्यारीबाल्डीस उत्सुकता उत्पन्न झाली. त्यानें अमेरिकेंतील सर्व इटलीयन लोकांस एक विनंतिपत्र काढलें, व इटलीच्या प्रवासास लागणारा खर्च भागविण्याकरितां वर्गणी मिळविण्यास सुरवात केली. हिकडे मॅझिनीकडून त्यास सविस्तर पत्रही आलें. त्यांत आनंददायक अशी खबर लिहिलेली असून मॅझिनीनें ग्यारीबाल्डीस इटलींत परत बोलाविलें होतें. यामुळें प्रवासाची तयारी जारीनें करण्यास त्यास दुप्पट उमेद आली. परंतु पुरेशी वर्गणी जमेना, व ग्यारीबाल्डी आणि त्यांचे स्नेही हे स्वतः जवळ जवळ कफल्लक! मॉंटीव्हीडोवर ग्यारीबाल्डीचे पुष्कळ उपकार झालेले असल्यामुळें येथील लोकांनीं तरी त्यास मदत करावयाची; परंतु तो जाणार व त्याच्या नांवामुळें व पराक्रमामुळें आपणांस आज-

पर्यंत मिळत असलेला फायदा या पुढें बंद होणार या विचारानें, त्यांनीं ग्यारीबाल्डीस कृतज्ञपणानें मदत करावयाची तें एकाच बाजूस राहून परत जाण्यास जितके ह्मणून अडथळे त्यांस आणितां आले तितके त्यांनीं आणिले. परंतु ग्यारीबाल्डीचा उद्योग त्याचे उत्साहाइतकाच प्रबळ असल्यामुळें त्यांचे हेतु सिद्धीस गेले नाहींत. ज्या जहाजावरून ग्यारीबाल्डी व त्याचे सोबती इटलीस परत जाणार होते, त्याचा मालक त्यांचेपासून अगदीं आयत्या वेळीं आव्वाचेंसव्वा भाडें मागूं लागला. यामुळें त्यांस आपले अंगांतील कपड्याखेरीज बाकी सर्व चीजवस्त, वस्त्रप्रावर्ण विकून पैसे करावे लागले. परंतु त्यांनीं तितकेंही केलें. इतका त्यांचा निर्धार पाहिल्यावर सरतेशेवटीं एका जिनोई व्यापाऱ्यानें त्यांस एक मोठी रकम बक्षीस दिली, व मॉंटिव्हीडो येथील लोकांनीं त्यांस दोन तोफा व कांहीं बंदुका बक्षीस दिल्या. व ग्यारीबाल्डी शेवटीं एकदाचा आपल्या सोबत्यांसह १८४८ चे मार्चचे २७ वे तारखेस अमेरिका सोडून निघाला.

**स्वदेशाची आठवण**—ग्यारीबाल्डीनें अमेरिकेंत जीं १४ वर्षें घालविलीं, व तेवढ्या अवधींत जीं निरनिराळीं साहसाचीं, पराक्रमाचीं व परोपकाराचीं कृत्यें केलीं, त्यांवरून त्याच्या अंतःकरणाचें चांगलें परीक्षण होतें. स्वदेश सोडून चवदा वर्षें झालीं व मध्यंतरी त्याच्या जीवितक्रमांत पुष्कळच फरक पडला; त्याचप्रमाणें अगदीं स्वदेशकार्याप्रमाणें मन लावून व जीवावर उदार होऊन दक्षिण अमेरिकेंतील लोकसत्ताक राज्यांस त्यानें मदत केली. तथापि इतक्या अवधींत त्याचा एकही दिवस असा गेला नाहीं, कीं ज्या दिवशीं त्याला आपल्या प्रिय इटली देशाची आठवण झाली नाहीं! किंवा त्यानें असें एकही

महत्वाचें काम केलें नाहीं, कीं ज्यापासून स्वदेशकार्यास पुढें मागें केव्हां तरी त्याचा अप्रत्यक्ष फायदा होण्यासारखा नव्हता. आकाशांत उडणाऱ्या पक्ष्यांची ज्याप्रमाणें आपल्या घरट्यावर सदोदित दृष्टि असते, त्याप्रमाणें हद्दपारीच्या ह्या चवदा वर्षांत त्याची अंतरदृष्टि आपल्या जन्मभूमीवर एकसारखी लागून राहिलेली होती. अमेरिकेवर त्याचें कमी प्रेम होतें असें नाहीं. एवढेंच नव्हे, तर अमेरिका सोडतांना त्याचे मनास अतिशय वाईट वाटलें. यासंबंधानें त्यानें आपल्या आत्मचरित्रांत खालीलप्रमाणें उल्लेख केलेला आहे. " आम्ही स्वदेशीं जाण्यास निघणार खरे, परंतु ज्या लोकांच्या सुखदु:खाचे आह्मीं इतके दिवस सहभागी झालों होतों व ज्यांनीं आमचा उत्तम तऱ्हेचा पाहुणचार केला होता, अशा लोकांस त्यांची कामगिरी पुरी होण्याचे पूर्वीच सोडून जावें लागतें हा विचार दु:सह आहे." परंतु किती झालें तरी स्वदेश तो स्वदेश! चवदा वर्षांचे वनवासांत ग्यारीबाल्डीनें आपणांकडून होईल तितका परोपकार केला होता. परंतु ज्या कार्यामुळें हा वनवास त्याला प्राप्त झाला होता त्याचे सफलतेस पुन्हां एकवार अनुकूल स्थिति प्राप्त झाल्यावर स्वदेशाकडे परत धांव मारल्यावांचून ग्यारीबाल्डीस कसें राहवलें असतें बरें?

**ग्यारीबाल्डी व मॅझिनी**–परस्परांचा १४ वर्षें वियोग झाला होता तरी ग्यारिबाल्डी व मॅझिनी यांच्या ए[illegible] जडलेल्या कोंवळ्या मैत्रीस भंग पडला नाहीं. ते मधूनमधून एकमेकांस पत्रें पाठवून कुशल वृत्त व देशवृत्तांत कळवीत असत. ग्यारिबाल्डीचे पराक्रम ऐकून मॅझिनीस फार हर्ष वाटे. त्यांचें सुंदर व चटकदार वर्णन करून

तो तें लंडन येथें प्रसिद्ध होणाऱ्या वर्तमानपत्राचे द्वारें इटलींतील आपल्या देशबांधवांस वाचावयास पाठवी. यामुळें ग्यारिबाल्डी हा जो इटली सोडून जातांना अप्रसिद्ध होता, तो १८४८ त परत येण्याचे वेळीं इतका लोकप्रिय व प्रसिद्ध झाला होता कीं, त्याचे वाटेकडे इटलींतील देशभक्तांचे डोळे लागून राहिले होते. इकडे ग्यारिबाल्डीनें युरुग्वे व मॉंटीव्हीडोस मदत करण्याचें कामीं आपलेंही एक काम साधून घेतलें होतें. तें असें कीं, अमेरिकेंत गेलेल्या इटालीयन लोकांस त्यानें युद्धकला शिकवून तरबेज व शूर केलें होतें, व पुढें इटलीमध्यें स्वयंसेवक शिपाई आयत्या वेळीं जमवून लढाया करण्याची जी अपूर्व पद्धत ती त्यानें अमलांत आणिली. त्याचें मूळबीज अमेरिकेंतच प्रथम पेरलें गेलें होतें. अमेरिकेमध्यें शेंकडों इटालीयन स्वयंसेवक स्वतंत्रेचे कार्यांत मरण पावले होते. व अशा उदार सोबत्यांनीं ज्या भूमीमध्यें समाधि घेतल्या होत्या, ती मागें सोडून जातांना ग्यारिबाल्डीस अर्थात्च रडूं आलें.

**आनंदाची भेट**–तीन महिने प्रवास केल्यावर ग्यारीबाल्डीचें जहाज नाईसचे किनाऱ्याजवळ आलें. आपली जन्मभूमी १४ वर्षांनंतर फिरून दृष्टीस पडल्यामुळें त्याचा हर्ष हृदयांत मावेना. परंतु अद्याप पूर्वींची फांशीची शिक्षा, सुदर्शन चक्राप्रमाणें त्याचे डोक्यावर फिरत होतीच! यामुळें ग्यारिबाल्डीनें एकदम किनाऱ्यावर उतरूं नये अशाबद्दल त्याच्या सोबत्यांनीं त्याला फार आग्रहानें व विनंतीपूर्वक सांगून पाहिलें, परंतु तो तें मुळींच मनास आणीना. दूर समुद्रावर असतांच त्यानें आपल्या जहाजावरील मॉंटीव्हीडोचें निशाण काढून टाकून इटलीचें तीनरंगी निशाण फडफडत लाविलें होतें.

आणि आतां नाईस शहरही डोळ्यापुढें मूर्तिमंत आलें, मग ग्यारीबाल्डीस दम कसचा निघतो? त्यानें सगळ्यांचें ह्मणणें बाजूस ठेवून किनाऱ्यावर एकदम उतरण्याचा निश्चय केला. इकडे ग्यारिबाल्डी आला ही बातमी हां हां ह्मणतां सर्व गांवभर पसरली, व थोडक्याच वेळांत निम्मा अधिक गांव किनाऱ्यावर येऊन थडकला. उभयपक्षींही आनंदाचें भरतें आलेलें असल्यामुळें त्यावेळचीं त्यांचीं प्रेमालिंगनें, त्यांचे आनंदाश्रु व किनाऱ्यावरून जहाजावर व जहाजावरून किनाऱ्यावर येण्याजाण्याची गडबड या सर्वांचें वर्णन कोण करूं शकेल? चवदा वर्षें मातृभूमीचा वियोग झाल्यामुळें ग्यारिबाल्डी व त्याचे सोबती यांनां किनाऱ्यावर केव्हां एकदांचा पाय ठेवूं असें झालें होतें. तूं आधीं कां मी आधीं, अ[illegible] जणूं काय त्यांच्यामध्यें शर्यत लागल्यामुळें जहाजावरील लोक भराभर उड्या घेऊं लागले. ग्यारिबाल्डी इटलीकरितां लढण्याचे हेतूनें अमेरिकेहून आला आहे असें कळतांच तेथल्या तेथेंच कित्येक लोक फुकट शिपाईगिरी करण्यास तयार झाले, व त्यांनीं ग्यारिबाल्डीचे सैन्यांत आपलीं नांवें नोंदून घेतलीं. गांवांतील इतर लोकांबरोबर ग्यारिबाल्डीची आई, त्याची बायको ॲनिटा व मुलें व स्नेही हे सर्व अर्थात् किनाऱ्यावर आले होते. (ग्यारिबाल्डीनें ॲनिटास आपण निघण्याच्या पूर्वीं कांहीं दिवस चांगलीशी सोबत पाहून पुढें पाठवून दिलें होतें.) परदेशाहून जहाज अ[illegible] असल्यामुळें क्वारंटाईन वगैरेचे नियमांमुळें जहाजावरील लोक उतरण्यास वेळ लागला असता, परंतु ते सर्व नियम नाईस येथील लोकांचेच हातीं असल्यामुळें तो सर्व त्रास टळला. किनाऱ्यावर उतरतांच ग्यारिबाल्डीनें आपल्या आईस

प्रेमानें कडकडून मिठी मारली व आपल्या मुलांचें चूंबन घेतलें. व परस्पर सुखदु:खाच्या गोष्टी सांगत व मंडळींना भेटी देत देत आपल्या सोबत्यांसह तो घरीं जाऊन पोंचला. परंतु तो घरीं फार दिवस राहिला नाहीं. कारण सर-हद्दीवर लढाई आगाऊच जुंपलेली होती, व ग्यारीबाल्डी लढण्यास परत आला होता; तेव्हां त्यास स्वस्थ कसें बसवेल? इटलीस येतांच ग्यारीबाल्डीनें एकदम जिनोआस निघून जावें असें ठरलें होतें. त्या प्रमाणें तो लागलाच निघून गेला. जिनोआ येथें लोक त्याची वाट पाहत बसलेच होते, व त्यांनीं त्याला नेण्याकरितां मुद्दाम एक जहाजही पाठवून दिलें होतें. ग्यारी-बाल्डी जिनोआ येथें पोंचतांच नाईसप्रमाणें तेथेंही लोकांनीं जिकडे तिकडे आनंदोत्सव केला.

**प्रथमचीं किरकोळ बंडें**—या वेळेस सर्व इटलीमध्यें मोठीच धामधूम माजून राहिली होती. १८४८ हें साल यूरोपच्या इतिहासांत अत्यंत स्मरणीय अशांपैकीं एक होऊन गेलें. यावर्षीं सर्व यूरोपखंडांत किंबहुना सर्व पृथ्वीचे पाठीवर बंडें व राज्यक्रांत्या यांचें वादळ उठलें होतें. त्यांमध्यें विशेषत: फ्रान्स देशांत भयंकर बंड होऊन फ्रेंच लोकांनीं लुईफिलिप बादशहास पदच्युत करून पुन: एकवार लोकसत्ताक राज्य स्थापिलें. इतर देशांतही बंडें झालीं, परंतु त्या सर्वांत फ्रान्स-मधील बंडाचा व इटलीचा सर्वांत अधिक निकट संबंध होता. खुद्द इटलींत या सालीं जितकी बंडाळी झाली तितकी मात्र यूरोपांत इतर कोठेंही माजली नसेल. व एकंदरीनें इट-लीचें त्यापासून जितकें नुकसान झालें तितकें दुसऱ्या एकाद्या राष्ट्राचें क्वचित्च झालें असेल ! इटलींतील बंडांस १८४७ चे अखेरीसच सुरवात झाली होती. कारण त्या वेळीं पार्मा

येथील डचेस मेरी लुई ही मरण पावल्यामुळें तें संस्थान कोणाचे ताब्यांत द्यावयाचें याबद्दल पुष्कळ वाटाघाट चालली होती. व्हीयेन्नाच्या तहाप्रमाणें पाहिलें असतां पार्मा हें संस्थान तेथील ड्यूकचे ताब्यांत जावयाचें होतें; परंतु ही व्यवस्था अमलांत आली असतां पार्मा येथील लोकांचे फार नुकसान होत होतें, यामुळें तेथें बरीच गडबड झाली. मिलर्न, लेगहॉर्न, मेसिना, पालर्मो, वगैरे ठिकाणींही बंडें झालीं. ही बातमी नेपल्स येथें जाऊन पोहोंचतांच फर्डीनंड राजाकडून अधिक हक्क संपादण्याकरितां लोकांनीं फिरून एकवार डोकें वर उचललें. फर्डिनंड हा जात्या भित्रा असल्यामुळें त्यानें लोकांच्या मागण्या एकदम कबूल केल्या; व प्रधान लोक निवडावयाचे ते लोकांस जबाबदार असावे, मुद्रणस्वातंत्र्य पूर्णपणें असावें, अपराध्यांची चौकशी ज्यूरी म्हणजे पंचाईत मार्फत व्हावीं, व कायमचें पार्लमेंट ( लोकसभा ) स्थापून तिजमध्यें लोकनियुक्त प्रतिनिधि असावे, इत्यादि अटींचा तह फर्डीनंड व त्याची प्रजा यांजमध्यें झाला.

**पिड्मांट पुढाकार घेतें**—अशा रीतीनें स्थानिक हेतू करितां स्थानिकच बंडें इटलीभर झाल्यासारखीं प्रथम दिसलीं. परंतु वास्तविक हीं बंडें म्हणजे सर्व इटली संयुक्त व स्वतंत्र होण्याकरितां जें युद्ध पुढें लवकरच व्हावयाचें होतें, त्याचें तोंड लागण्याच्या वेळच्या या चकमकीच होत्या असें ह्मटलें असतां हरकत नाहीं. इटलींतील सर्व संस्थानांत हें पिड्मांट हेंच प्रमुख असून पूर्वीपासून सर्वांपेक्षां अधिक उदार तत्त्वांवर तें आपला राज्यकाभार करीत होतें. त्यानेंही यावेळीं पुढारपण घेऊन या पुढें चार्लस आलबर्ट राजा हा स्वतंत्र (पायास) या नात्यानें राज्य करणार अशी द्वाही फिरविली. त्याचे

पाठोपाठ टस्कनीनेंही तोच कित्ता वळविला. पोप पीओनोनो यानेंही आपल्या धर्माधिकाऱ्यांची सभा भरवून आपल्या राज्यांतील प्रजेस कितपत राजकीय सत्ता देणें प्रशस्त होईल याची वाटाघाट चालविली. प्रत्यही नवीन नवीन बंड होऊं लागलें, व ड्यूक, राजे वगैरे लोक लढाई करण्याचे भानगडींत न पडतां आपले अधिकारांचे भराभर राजिनामेच देऊं लागले. याच सुमारास फ्रान्समधील राज्यक्रांति घडून आली, व नवीन स्थापलेल्या लोकसत्तात्मक राज्याच्या अध्यक्षानें जिकडे तिकडे आपल्या वकीलांमार्फत असें फर्माविलें कीं, व्हीयेना येथील तहानें ठरविलेल्या इटलीच्या स्थलसीमा कायम राखणें जरी प्राप्त आहे, तरी कोणच्याही स्वतंत्र संस्थानावर कोणी परकी राजा स्वारी करील तर फ्रान्सचें लोकसत्तात्मक राज्य त्या संस्थानाचा पक्ष घेऊन लढण्यास उभें राहील. या ग्वाहीमुळें तर इटलींतील लोकांस बंडें करण्यास अधिकच उमेद आली. इतकें झाल्यावर ऑस्ट्रियास लढाई करणें प्राप्त आहे असें वाटूं लागलें. ही संधि साधून पिड्मॉंटचे चार्लस आल्बर्ट राजानें ऑस्ट्रियाविरुद्ध लढाई करण्यास कंबर बांधली. यावेळीं त्यानें कांकूं केलें असतें तर त्याला मुकाट्यानें राज्य सोडून जाणेंच भाग होतें. आस्ट्रिया व इटली ह्यांच्या लढाईचें तोंड उत्तरेकडील लॉंबर्ड व व्हेनीस या प्रांतांत लागलें होतें, व तेथील लोकांस मदत करण्याचा इतरांनीं निश्चय केला. पिड्मॉंट येथील सैन्य घेऊन चार्लस आल्बर्ट हा स्वतः मोहिमेस निघाला, व वाटेंत लोकांनीं ठिकठिकाणीं इटलीचा राजा या नांवानें त्याचा जयजयकार केला. परंतु त्याचे हातून ह्मणण्यासारखा कांहीं कार्यभाग झाला नाहीं. त्याचे सैन्यास प्रथम एक दोन जय मिळाले खरे; परंतु आस्ट्रि-

याचा सरदार मार्शल रॅडेटस्की हा जलदी करून मागें फिरला व ऑस्ट्रियाचे इतर सरदारांस जाऊन मिळाला. अशा रीतीनें चार्लस आलबर्ट राजाचा आळस व कांहींशी इतर संस्थानिकांनीं दाखविलेली मत्सरबुद्धि यांमुळें या मोहिमेंतून फारसें कांहीं निष्पन्न झालें नाहीं. शिवाय अगदीं आयत्या वेळेस पोपनें ऑस्ट्रियाचे विरुद्ध लढण्याचें नाकारिलें. यामुळें इटलीचे कार्यास थोडासा अडथळा आला.

**ग्यारीबाल्डी व चार्लस आलबर्ट यांची भेट**— चार्लस आलबर्ट हा रोव्हरबेला येथें तळ देऊन राहिला असतां ग्यारीबाल्डी हा त्यास भेटण्याकरितां गेला. चवदा वर्षांपूर्वी या चार्लस आलबर्ट राजानेंच ग्यारीबाल्डीस फांशीची शिक्षा ठरविली होती. परंतु आज उभयताही एकाच कार्यां गुंतले असल्यामुळें त्या गोष्टीचें वैषम्य नाहींसें झालें असेल असें निदान ग्यारीबाल्डीस तरी वाटलें; व बाकी कांहीं असलें तरी राजानें त्याची फांशीची शिक्षा अमलांत आणण्याचा हुकूम केला नाहीं हेंही खरें. चार्लस आलबर्टनें ग्यारीबाल्डीस भेटण्याची परवानगी दिली येवढेंच नव्हे, तर त्याचे हातांत हात घालून दक्षिण अमेरिकेंत नांव मिळविल्याबद्दल त्याचें अभिनंदनही केलें. ग्यारीबाल्डीनेंही "त्यांत कांहीं विशेष नाहीं, मीं माझें कर्तव्य केलें आणि हल्लीं मात्र मोठ्या प्रेमानें इटलीकरितां आपल्या सैन्यांतील एक शिपाई होऊन लढावें अशा इच्छेनें आलों आहे" अशी नम्रपूर्वक विनंति केली. परंतु चार्लस आलबर्टनें "मला या बाबतींत प्रधान लोकांस विचारलें पाहिजे, तूर्त तुह्मांस एकदम कांहींच उत्तर देतां येत नाहीं, तुह्मी टयूरीन येथें जा ह्मणजे तुह्मांस कामगिरी सांगतील" असा जबाब दिला. परंतु ग्यारीबाल्डी

हा नुकताच ट्यूरीन येथून आला असून तेथील अधिकाऱ्यांनीं " राजाकडे जा, ह्मणजे कामगिरी मिळेल " असें सांगितलें होतें. तात्पर्य, इकडून तिकडे व तिकडून इकडे असे हेलपाटे घालण्यास लावल्यानें ग्यारीबाल्डीस फार वाईट वाटलें. तो केवळ स्वदेशाकरितां लढावें या हेतूनें इटलीस आला होता असें असून व तिकडे असतां मुख्य सरदाराचीं कामेंही त्यानें केलीं असून, हल्लीं त्यास राजानें आपल्या लष्करांत नुसती शिपाईगिरीची कामगिरीही सांगूं नये याहून अधिक नवल तें कोणतें? परंतु यापुढें ग्यारीबाल्डीचे राजानें व प्रधान मंडळानें जे जे अपराध केले त्यांचे मानानें पाहतां हे कांहींच नव्हते.

**ग्यारीबाल्डी व मॅझिनी**– ग्यारिबाल्डीस मनांतून अतिशय वाईट वाटलें, पण करतो काय? झालेल्या गोष्टीचा विषाद न मानतां तो–मिलन येथील लोकांनीं अद्याप आपणाकडून लढाई चालविली होती–त्यांस मदत करण्यास निघून गेला. त्या ठिकाणीं मॅझिनीचे लोक पूर्वींच येऊन बसले होते व त्यांनीं बंडवाल्यांस उत्तेजन देण्याचें व मदत करण्याचें काम चालविलें होतें. राजानें आपल्या सैन्यांत कामगिरी सांगितली नाहीं, यामुळें ग्यारिबाल्डीचें विशेष नुकसान न होतां राजाचेंच एक प्रकारें नुकसान झालें. कारण, तो राजपक्षास येऊन आयताच मिळत होता तो मॅझिनीसारख्या बंडखोरांचे हातांत अचूक जाऊन पडला. ग्यारिबाल्डी मिलन येथें जातांच त्यास तेथील अधिकाऱ्यांकडून लष्कर उभारण्याची परवानगी मिळाली व थोड्याच काळांत त्यानें ३०,००० स्वयंसेवक जमविले. पुढें लवकरच ऑस्ट्रियन सैन्यानें मिलन शहरास वेढा दिला व ग्यारिबॉल्डीस शहर लढविण्याचे कामीं आपले लोक घेऊन येण्यास पाचारण झालें. परंतु चार्लस आलबर्ट

हाही त्या सुमारास मिलन येथें आला व त्यानें कोणाचा सल्ला न घेतां ऑस्ट्रियन लोकांशीं एकदम तहाचें बोलणें लाविलें, व या तहाचे योगानें मिलन ऑस्ट्रियाचे ताब्यांत गेलें. ही गोष्ट ग्यारिबॉल्डीस अर्थात्च आवडली नाहीं. लढाईचें तोंड लागलें असतां विनाकारण आपल्या अनहिताचा तह करावयाचा व तरवारी म्यानांत फुकट घालून ठेवावयाच्या यापेक्षां अधिक शरमेची गोष्ट कोणतीच नाहीं व आपण तरी होतां होईतोंपर्यंत हार जाणार, नाहीं, मेरपर्यंत लढूं, असा ग्यारिबाल्डी व त्याचे कांहीं सोबती यांनीं निश्चय केला. मॅझिनीलाही चार्लस आलबर्ट राजाचें करणें पसंत नव्हतें. त्यानेंही त्यास कांहीं थोडे लोक व द्रव्य देण्याचें कबूल केलें. परंतु राजानें तह कबूल केलेला असल्यामुळें ग्यारिबाल्डीनें लढाई चालविणें म्हणजे ऑस्ट्रिया व चार्लस ऑलबर्ट या उभयतांच्याही विरुद्ध बंडखोरपणा करण्यासारखें होतें. तथापि ग्यारिबाल्डीनें तें कांहीं एक मनामध्यें न आणतां तो आपल्या बरोबरीचें सैन्य घेऊन ऑस्ट्रिया विरुद्ध लढाई करण्यास निघाला. त्यानें एक विनंतीपत्र प्रसिद्ध करून त्यामध्यें लोकांस असें जाहीर केलें कीं, चार्लस आलबर्ट राजा हा इटली देशाचा पक्का वैरी असल्यामुळें त्यानें असा भित्रेपणाचा तह करून हातचें मिलन घालविलें; व जो कोणी इटलींतील आस्ट्रियन लोक हद्दपार होईपर्यंत लढाई थांबवा असें म्हणेल, तो आपला शत्रु असें समजून आपण त्याचें पारिपत्य करूं.

**ऑस्ट्रियाशीं एकट्या ग्यारीबाल्डीचें युद्ध**--ग्यारीबाल्डी आपलें सैन्य घेऊन आल्पस पर्वताचे पायथ्यास गेला. तेथून त्यानें आस्ट्रियन लोकांबरोबर लढाई चालविली. लॅगोमॅग्युअर नांवाच्या सरोवरावर ऑस्ट्रियाचीं दोन जहाजें असतां त्यानें त्यांवर

आपले १९०० लोक चढऊन तो लुईनो येथें गेला. यानंतर लवकरच ग्यारीबाल्डीची व आस्ट्रियाचे सैन्याचे एका तुकडीची चकमक उडाली. त्यांतही त्यास यश आलें. परंतु सुमारें अर्ध्या तासांत ऑस्ट्रियन लोक फिरून जमाव करून परत आले. या वेळेस ग्यारीबाल्डीस ताप आला होता तरी तो तसाच घोड्यावर स्वार झाला. ऑस्ट्रियन लोक आले ते कांहींएक कळूं न देतां एकदम ग्यारीबाल्डीचे सैन्यांत घुसले. संध्याकाळची वेळ झाली होती व ग्यारीबाल्डीचे लोक रात्रीची विश्रांति घेण्याकरतां व्यवस्था करूं लागले होते. अशा वेळीं शत्रूनें गांठल्यामुळें त्यांची थोडी गांदल झाली, परंतु ग्यारीबाल्डी हातांत तरवार घेऊन सर्वांचे पुढें झाला व त्यानें आपल्या लोकांस उत्तेजन देऊन शत्रूस मागें हटविलें. परंतु पुढें फारसा निभाव लागणार नाहीं असा विचार करून ग्यारीबाल्डी रातोरात ती जागा सोडून परत फिरला. त्यानें आरोना येथें आपले सर्व लोक एकत्र केले व या पुढें लढाई चालविणें शक्य नाहीं असें ठरवून त्यांस घरोघर जाण्यास परवानगी दिली व आपण स्वतः एकटाच स्वित्सर्लंडकडे जावयास निघाला. वाटेंत कदाचित् कोणी ओळखील ह्मणून त्यानें, एक शेतकरी कुणब्याचा पोषाख अंगावर घातला व त्या प्रदेशांतील एक वाटाड्या बरोबर घेतला. अंगांत ताप होताच तरी ग्यारीबाल्डी मजल दर मजल करून स्वित्सर्लंडांत पोंचला. स्वित्सर्लंडांत जाण्याचें कारण असें होतें कीं, ग्यारीबॉल्डीनें तहाचे विरुद्ध वर्तन केल्यामुळें चार्लस आल्बर्ट राजानें त्यास पिड्मॉंट प्रदेशांत परत येण्याची कांहीं दिवस मनाई केली होती. असो; स्वित्सर्लंडांत कांहीं दिवस राहून तापांतून बरा

झाल्यावर ग्यारीबाल्डी नाईस येथें गेला व तेथें आपल्या आईस व बायका मुलांस भेटून तो जिनोआ येथें गेला. जिनोआ येथें तो असतां चार्लस आलबर्ट राजानें ग्यारीबाल्डीस निरोप पाठवून पिड्मॉंट येथें परत बोलाविलें व आपले सैन्या- मध्यें बहुमानाची जागा देण्याचें वचन दिलें. ग्यारीबाल्डीनें अमेरिकेंत व इटलीमध्यें केलेले पराक्रम पाहून व त्याची निस्पृहता जाणून, हा मनुष्य केवळ बंडवाला नसून इटलीचा खरोखर हितकर्ता आहे अशी त्याची आतां खातरी झाली होती. परंतु ग्यारीबाल्डी हा अशा कोरड्या बहुमानाचा थोडाच भुकेला होता ! त्यानें तो बहुमान तर नाकारलाच; परंतु चार्लस आलबर्ट राजास त्यानें उलट असें सांगून पाठविलें कीं व्हेनिस शहर ऑस्ट्रियाशीं मोठ्या शौर्यानें लढत आहे त्या मदत करण्यास मी जाणार. व खरोखरच त्यानें २५० लोक जमविले व जिनोआहून व्हेनिसकडे जाण्यास निघाला; परंतु वाटेंतच त्यास रोमकडील खबर कळली व त्यामुळें त्यानें व्हेनि- सला जाण्याचा आपला बेत बदलला.

**रोममधील बंडाची हकीकत**—आतां इकडे रोममध्यें अशी हकीकत घडून आली होती कीं, पोप पिओनोनो यानें जरी लोकपक्षाकडे आपला कल प्रथम दाखविला होता, तरी ऑस्ट्रियाशीं प्रत्यक्ष लढाई सुरू झाल्यावर त्याच्या कमकुवत व चंचल मनाला धीर धरवेना; व त्यानें इतर संस्थानिकांस मदत करण्याचें आयत्या वेळीं नाकारिलें. पुढें युद्धामध्यें चार्लस आलबर्ट राजाचे सैन्याचा पराभव झाल्यामुळें तर पिओनोनोचा विचार अर्थात्‌च कायम झाला. परंतु रोम येथील लोकांस त्याचें करणें मुळींच पसंत नव्हतें. यामुळें रोमच्या राजसभेत बरेच तंटे बखेडे

झाले. मेमियानीं नांवाचा लोकपक्षास अनुकूळ असा एक मुख्य मंत्री होता, त्यास पोपनें काढून त्याचे जागीं काऊंट रॉसी या नांवाच्या मनुष्याची नेमणूक केली; परंतु तो अत्यंत अप्रिय असल्यामुळें लवकरच कोणी त्याचा खून केला. इतकें घडून आल्याबरोबर शहरांत जिकडे तिकडे एकच बंडाळी माजली. लोक हातांत शस्त्रें घेऊन रस्त्यांतून बेफामपणें फिरूं लागले, व आतां लवकरच बंड होणार अशी भीति वाटून पोप व धर्माध्यक्ष मंत्रीमंडळ किल्ल्यांत दडून राहिले. दुसरे दिवशीं लोकांनीं पोपचे वाड्यास वेढा दिला व राज्यामध्यें एक लोकसभा नेमावी व लोकनियुक्त-मंत्रीमंडळ स्थापावें अशी मागणी केली. त्यास पोप कबूल होईना. मग लोकांनीं वाड्याचे दरवाजास तोफा लाविल्या, तेव्हां निरुपाय होऊन त्यास त्यांच्या बऱ्याच मागण्या कबूल कराव्या लागल्या, तेव्हां त्याची मोकळीक झाली. परंतु पोप लवकरच रोम सोडून निघून गेला व गेटा येथील मुक्कामाहून त्यानें रोमन क्याथालिक मताच्या यूरोपांतील राजांकडून मदत मागितली. ही मागणी फ्रान्स, स्पेन, ऑस्ट्रिया व नेपल्स इतक्या संस्थानचे राजांनीं कबूल केली. प्रथम कांहीं दिवस कोणीच वचनाप्रमाणें लढण्याचें कामीं पुढारपण घेईना. परंतु, चार्लस आलबर्ट राजाचा नोव्हेरा येथें पराभव झालियाबरोबर ऑस्ट्रियास रोमकडे लक्ष देण्यास फावलें. फ्रान्स, आस्ट्रिया व नेपल्स या तिन्ही संस्थानचीं सैन्यें तिन्हींकडून एकदम रोमकडे येण्यास निघालीं. इकडे पोप रोममधून निघून गेल्याबरोबर मागें रोमच्या लोकांनीं एकदम प्रजासत्ताक राज्याची द्वाही फिरविली.

**ग्यारिबाल्डी रोमकडे वळतो.**—रोम येथील बंडाची बातमी ग्यारिबाल्डीस व्हेनिसला जात असतांना वाटेंत कळली, व त्या बरोबर तो व्हेनिसकडे न जातां एकदम रोमकडे वळला. व्हेनिसपेक्षां रोमवर ग्यारिबाल्डी व त्याचप्रमाणें मॅझिनी यांची अत्यंत प्रीति होती. यास मुख्य दोन कारणें होतीं. एक तर असें कीं, पोपांचा सर्व धार्मिकपणा जाऊन ते इतर संस्थानिकांप्रमाणें दुष्ट, नीच, व पापी बनले होते. त्यांनीं धर्मकृत्यें करून लोकांस ईश्वरभक्तीचा मार्ग लावून देण्याचें व त्याचप्रमाणें सर्व ख्रिश्चन लोकांवर धार्मिकपणाचें स्वामित्व चालवून पोप ह्मणजे सर्व ख्रिस्ती लोकांचा गुरु हें नातें सार्थ व सफळ करण्याचें सोडून देऊन दिवसेंदिवस आपले हातीं ऐहिक स हो संपत्ति जमवून इतर लोकांप्रमाणें ते सर्व पापाचरणास प्रवृत्त झाले होते. एवढेंच नव्हे, तर शेवटीं शेवटीं इटली देश स्वतंत्र व संयुक्त होऊन प्रजेस राजकीय अधिकार मिळावे या गोष्टीसही ते इतर सर्व संस्थानिकांहून अधिक अडथळा आणूं लागले होते. पोप व एकंदरीनें उपाध्याय वर्ग अनीतिमान, अज्ञानी व जुलमी बनून गेला होता. याविषयीं ग्यारीबाल्डीचा जन्मवृत्तांत सांगतांना आह्मीं सांगितलेंच आहे. ग्यारीबाल्डीचे मनांत व त्याचप्रमाणें मॅझिनीचेही मनांत पोप व सर्व उपाध्याय वर्ग यांविषयीं अत्यंत तिरस्कार, द्वेष व वैर अगदीं लहानपणापासून उत्पन्न झालें होतें, दुसरी गोष्ट अशी कीं रोमच्या नांवामध्यें इटलीच्या पूर्वींच्या सर्व वैभवाची जादू भरून राहिली होती, आणि रोम स्वतंत्र केल्याशिवाय इटलीचें स्वातंत्र्य कधींही सिद्ध, निदान सार्थ, तरी होणार नाहीं असें प्रत्येक देशभक्ताच्या मनानें घेतलें होतें. लहानपणापासून

रोमच्या नांवाचा किंवा दर्शनाचा कांहीं एक विलक्षण परिणाम ग्यारिबाल्डीच्या मनावर होत असे. तें रोमशहर आज बंड करण्यास उठलें आहे येवढेंच नव्हे, तर लोकांच्या भयानें पोप शहर सोडून पळून गेला आहे, ही बातमी कळतांच ग्यारिबाल्डीनें आपले इतर सर्व बेत जशाचे तसे ठेवून रोमकडे धांव घ्यावी यांत कांहीं विशेष आश्चर्य करण्यासारखें नव्हतें. असो; ग्यारिबाल्डीप्रमाणें मॅझिनीही रोममध्यें आला होता. तो येतांच शहरांतील सर्व लोक लढाई करण्यास सज्ज झाले, व आतां पोप फिरून रोमला परतत नाहीं हें एक, किंवा आलाच तर परकीय सैन्याचे मदतीनें येऊन पूर्वीपेक्षां अधिक जुलुमाचें राज्य करण्यास येणार हें दुसरें; यांपैकीं कोणचेही बाजूनें पाहिलें तरी पोप रोममध्यें राहून लोकांस सत्ता मिळणें हें अशक्य झालें होतें. असें पाहून मॅझिनीच्या सल्ल्यानें रोमच्या नागरिकांनीं लोकसत्तात्मक राज्य स्थापण्याचें ठरविलें, व ठिकठिकाणीं लोक जमवून त्यांनीं नवीन राष्ट्रसभेमध्यें बसण्याकरितां आपल्यातर्फे प्रतिनिधीही निवडून दिले. या निवडणूकीमध्यें मॅझिनी हा रोमच्यातर्फे व ग्यारीबॉल्डी मॉसिरेटा या गांवच्यातर्फे असे सभासद निवडले गेले. अशा रीतीनें कांहीं एक रक्तस्राव न होतां रोम बंडवाल्यांचे ताब्यांत आलें व त्यांनीं तेथें स्वतंत्र लोकसत्ताक राज्यही स्थापिलें. ग्यारीबाल्डी जिनोआहून रोमकडे येत असतांच त्याच्या निवडणुकीची बातमी त्याला समजली; व पुढें लवकरच तो रोममध्यें येऊन दाखल झाला.

**रोमवर युरोपियन राष्ट्राचे सैन्याची स्वारी**—रोममध्यें झालेल्या राज्यक्रांतीची बातमी फ्रान्स व ऑस्ट्रिया या राष्ट्रास कळतांच त्यांनीं आपापलीं सैन्यें रोमकडे रवाना केलीं.

इकडे दक्षिणेकडून सिसीलीचा राजा फर्डिनंड याचेंही सैन्य रोमकडे चालून येत होतें. तेव्हां आतां रोमचा पुढें बचाव कसा करावयाचा याची मॅझिनी, ग्यारिबाल्डी, वगैरे लोकांस पंचाईत येऊन पडली. वास्तविक रोममध्यें लोकसत्ताक राज्य स्थापिलें होतें, व आपल्या काळजावरून पोपाचें मोठें दडपण एकदाचें निघालें या भरवंशानें रोमचे नागरिक लोक, मोठ्या आनंदांत होते. शहरांत कोठें दंगाधोपा किंवा कांहीं एक गडबड न होतां नवीन स्थापिलेलें राज्य शिस्तीच्या मार्गास लागलें होतें. परंतु अद्यापि रोमच्या बाहेरचे लोक, त्यांजमध्यें लोकसत्ताक राज्याचे संस्थेबद्दल व्हावा तितका अभिमान उत्पन्न न झाल्यामुळें, तटस्थ होते. म्हणजे रोमच्या नागरिकांस बाहेरून मदत होईल अशी फारशी आशा न होती. अशा स्थितीमध्यें रोमच्या लोकांनीं आपला आपणच कसा बचाव करावा या विवंचनेंत बंडवाल्यांचे पुढारी पडले. ग्यारिबाल्डी रोम शहरास येतांच त्याचेपुढें हें लढाईचें ताट वाढून ठेविलेंच होतें; आणि तें त्यास हवेंच होतें. शहरची व्यवस्था करण्याकरितां मॅझिनी व इतर दोन गृहस्थ अशा तिघांस राज्यकारभाराची पूर्ण मुखत्यारी मिळालेली होती. त्यांचे परवानगीनें ग्यारिबाल्डी हा रीटी नांवाच्या तट-बंदीचे किल्लयांत परत गेला व तेथें त्यानें तटबंदीची दुरुस्ती करून आगाऊ असलेल्या व प्रत्यहीं नवीन नवीन येऊन मिळणाऱ्या शिपायांना पोषाख वगैरे देऊन लढाई शिकविण्यास प्रारंभ केला. यावेळीं ग्यारिबाल्डी जवळ सुमारें २६०० सैन्य होतें. त्यामध्यें मॉटीव्हीडो येथें त्याच्या लष्करांत असलेले पांचपन्नास शिपाई, तसेंच व्हेनिसहून नोकऱ्या सोडून देऊन आलेले ३०० सरकारी नोकर व ४०० युनिव्हर्सिटींचे

विद्यार्थी असे निरानिराळ्या प्रकारचे लोक होते. खुद्द ग्यारिबाल्डीला रोम येथील सरकारानें कर्नल हा हुद्दा दिलेला होता. ग्यारिबाल्डी तापांतून नुकताच उठलेला असून या नवीन उद्योगांत त्याला स्वस्थता मुळींच मिळत नसे. तथापि आपल्या सुखाकडे बिलकुल लक्ष न देतां त्यानें लष्कर जमविण्याचें व कवाइत शिकविण्याचें काम खूप जारीनें सुरू केलें होतें. त्याचे लोकही त्याचें उदाहरण पाहून परस्परांशीं एक दिल व देशकार्यांत तल्लीन होऊन गेले होते. रोमच्या नवीन अधिकाऱ्यांचा प्रथमचा बेत चार्लस आलबर्ट राजा अद्याप समरांगणांत उभा होता त्यास कुमक करण्याकरितां कांहीं फौज पाठविण्याचा होता. परंतु पुढें लवकरच नोव्हेरा येथें चार्लस आलबर्ट राजाचा ऑस्ट्रियन सरदारानें पराभव केला व इकडे फ्रान्स व ऑस्ट्रिया यांचीं सैन्येंही मजल दर मजल करीत रोमवर येत होतीं, यामुळें रोमचा बचाव करण्याचे कामाकडेच त्यांनीं आपलें सर्व लक्ष दिलें.

**फ्रेंच सैन्याशीं लढाई**--या दोन सैन्यांपैकीं फ्रान्सच्या सैन्यानें आपण रोममधील लोकसत्तात्मक राज्य मोडण्यास आलों नसून पोपच्या राज्यांत शांतता करण्याकरतांच आलों अशी बतावणी केली. या बतावणीस मॅझिनी हा फसला. परंतु ग्यारिबाल्डीला खरें वर्म माहीत असल्यामुळें त्यानें होतां होईल तितकें करून फ्रान्सचे सैन्यास मुळींच रोमचे आसपासही येऊं देऊं नये व त्याजबरोबर एकदम लढाई करावी असा सल्ला देऊन सभेचें मन वळविलें. हें होतांच रोमशहरांत रस्तोरस्तीं तट घालून त्यावर ठिकठिकाणीं तोफांचे मोर्चे लावण्याची सुरवात झाली व लोक शहरचा बचाव करण्याची तयारी करूं लागले. व इकडे

ग्यारीबाल्डी दृष्टीस पडतांच हजारों लोकांच्या झुंडीच्या झुंडी एकदम "ग्यारीबाल्डी, ग्यारीबाल्डी" अशा शब्दांनी आनंदाच्या आरोळ्या ठोकू लागले. फ्रेंच सरदाराचें सैन्य रोमवर चालून येत होतें त्यास वाटेंतच प्रतिबंध झाला, व तेथेंच एक लहानशी लढाई झाली. ही बातमी रोम शहरीं येतांच क्यापिटॉल या प्रचंड इमारतींतील मोठ्या घंटा दणादण वाजूं लागल्या. शहराचे कोटावरून तोफांचाही धडाका सुरू झाला व हजारों लोक आपापलीं कामेंधामें सोडून काय हातास येतील तीं हत्यारें घेऊन धांवत सुटले. कारण या ठिकाणींच रोमन सैन्याची व फ्रेंच सैन्याची प्रथम गांठ पडणार अशी अटकळ न्हेती. रोम शहरांतून लढाऊ नागरिकांचा जो हा लोंढा बा... पडला त्याचेपुढें फ्रेंच लोकांचा टिकाव लागेना. तेव्हां त्यांनीं शहरचे दुसरे बाजूस आपला मोर्चा फिरविला; परंतु त्या ठिकाणीं ग्यारीबाल्डी हा आगाऊच सज्ज होऊन बसलेला असल्यामुळें त्यानें त्यांजवर एकदम हल्ला केला. या ठिकाणीं फ्रेंच सैन्यास मागें हटावें लागलें, व त्यांचे ३०० लोक समरांगणीं पडले व ५०० कैदी झाले. या चकमकींत यश आल्यामुळें रोमन नागरिकांस अधिकच स्फुरण चढलें. दुसरे दिवशीं ग्यारिबाल्डी कुमक घेऊन पुनः हल्ला करणार तों फ्रेंच सरदार ओडिनॉट याने मॉझिनीशीं तहाचें बोलणें लाविलें. माझिनीस फ्रान्स म... प्रजासत्ताप्रिय लोकांकडून पुढें मागें बरीच मदत होईल अशी आशा वाटत होती. यामुळें पुनः एकवार फ्रेंच सैन्याचा पराभव करून ती आशा कायमची गमवावी हें त्यास बरें वाटेना. याकरितां त्यानें ग्यारिबाल्डीस परत फिरण्याचा हुकूम

दिला. ग्यारिबाल्डीस फ्रेंच सरदाराचें कपट माहीत होतें ह्मणून शत्रूचा पुरा मोड करण्याची ही अमोलिक संधि दवडण्याचें त्याच्या मोठें जीवावर आलें. परंतु करितो काय ? तो ताबेदार पडला! मॉझिनी हा नवीन स्थापलेल्या लोकसत्ताक राज्याचा एक मुख्य अधिकारी होता व यावेळीं त्याचे हातीं सर्व लोकसभा आलेली होती. म्हणून त्याचा हुकूम ग्यारिबाल्डीस मानावा लागला.

**नेपल्सच्या सैन्याशीं लढाई**—इकडे तहाचें बोलणें चाललें असतां फ्रेंच सैन्य हळूहळू इटलींत भरत चाललें होतें. लढाई बंद असल्यामुळें त्या विरुद्ध ग्यारिबाल्डीस कांहीं करतां येईना; परंतु त्यास मध्येंच एक दुसरी कामगिरी मिळाली. नेपल्सचा फर्डिनंड राजा रोमवर चालून येत होता हें मागें सांगितलेंच आहे. त्याचे तोंडावर लोकसभेनें ग्यारिबाल्डीस ४००० सैन्य देऊन एकदम गुप्तपणें पाठविलें. परंतु त्याला यावेळीं मुख्य सरदार न करितां रॉझेली या नांवाच्या सरदारास ती बहुमानाची जागा दिली गेली, याबद्दल ग्यारिबाल्डीच्या स्नेह्यांस फार वाईट वाटलें. परंतु खुद्द ग्यारिबाल्डीस त्याचें कांहींच वाटलें नाहीं. व जरी यदाकदाचित् कांहीं थोडें वाटलें असलें तरी, त्याचा त्याचे उद्योगावर कांहींच परिणाम झाला नाहीं. याबद्दल तो स्वतः असें ह्मणे कीं, 'मुख्य सरदार झालों किंवा यःकश्चित् शिपाई झालों, तरी त्यांत काय आहे ? जो कोणी मला स्वदेशाच्या शत्रूवर तरवार चालविण्याची संधि देईल त्याचे माझ्यावर सारखेच उपकार आहेत असें मी समजतों.' असो; आपलें सैन्य घेऊन ग्यारिबाल्डी निघाला तो सोळा तासांची एकदमानें मजल मारून झॅरगारोला येथें फर्डिनंडच्या सैन्याचे वाटेवर जाऊन छावणी देऊन राहिला. पुढें लवक-

रच शत्रूची व ग्यारिबाल्डीच्या सैन्याची गांठ पडली. ही लढाई पुष्कळ वेळपर्यंत चालली व तींत ग्यारिबाल्डीसे एकदोन जखमाही झाल्या. परंतु त्याचे सैन्यानें त्याचे प्रमाणेंच मोठी मर्दुमकी केली, व शेवटीं फर्डिनंडचें सैन्य २०,००० असूनही त्याचा मोड होऊन तें पळत सुटलें, तें पुढें दोन दिवसांत सरहद्दीच्या पार निघून गेलें.

**फ्रेंच सैन्याची फिरून रोमवर स्वारी**—इकडे जनरल ओडीनॉट याला फ्रान्समधून सैन्याची कुमक मिळाल्यामुळें तहाचें बोलणें तसेंच राहून तो फिरून रोम शहरावर आला. तेव्हां फिरून रोमशीं लढण्याची तयारी सुरू झाली. लागलीच ग्यारीबाल्डीस फर्डिनंडच्या सैन्याचे पाठीवरून परत बोलावण्यांत आलें. नेपल्सच्या सैन्याचा पुरा मोड केल्याशिवाय परत फिरणें हेंही ग्यारीबाल्डीच्या जीवावरच आलें होतें, कारण त्याचे नांवाची त्या सैन्यावर इतकी दहशत बसली होती कीं, त्यांना, ग्यारीबाल्डी, हा माणूस नसून केवळ ‘ सैतान ’ आहे असें वाटूं लागलें होतें. खुद्द पोप महाराजांनीं आपल्या हातानें मंत्रून दिलेल्या तरवारीचे त्याचे विरुद्ध लढतांना खटाखट तुकडे पडावे, व त्यांनीं पवित्र करून दिलेल्या रुपेरी गोळ्यांपैकीं एक सुद्धां गोळी त्याचे अंगांत शिरूं नये हें,—तो कोणी खरोखर सैतान असल्याशिवाय-होणें शक्य नाहीं, असेंही त्यांना वाटूं लागलें होतें. परंतु त्या सैन्यापासून आतां भीति राहि-लेली नव्हती, व इकडे फ्रेंच सैन्य रोमच्या जवळ आल्यामुळें शहरास वेढा बसणार अशी भीति उत्पन्न झाली; तेव्हां ग्यारिबाल्डी त्याच्या पाठलागाचें काम एकदम सोडून देऊन मागें फिरला. फ्रान्सचें दुटप्पी वर्तन चालू होतें. प्रथम तहाचें बोलणें

लाविल्यापासून फ्रान्सचा वकील एम् डी.लिसेप्स हा अद्यापि तहाचें बोलणें चालवीत होताच, व तहनाम्यावर सही होण्यास व जनरल ओडीनॉट रोम जवळ येण्यास एकच गांठ पडली. त्यानें 'मीं तहनामा मुळींच जुमानीत नाहीं, कारण तुह्मी आपल्या अधिकाराबाहेरील गोष्ट केली आहे' असें लिसेप्स यास बोलून झालेला तह एका शब्दानें मोडून टाकला, व गुप्तपणानें रोम शहरच्या आसपासचीं ठाणीं एकदम काबीजही केलीं. अद्याप ग्यारिबाल्डी हा रोम येथें येऊन पोंचावयाचा होता. तोंच शहरामध्यें पुन: एकवार पहिल्याप्रमाणें गडबड सुरू झाली. भयसूचनार्थ कॅपिटॉल मधील मोठ्या घंटा पुन्हां घणघण वाजू लागल्या, जिकडे तिकडे नौबदीही झडूं लागल्या, व लोक हातांत शस्त्रें बा[illegible]ऊन सैरावैरा धावूं लागले. ग्यारिबाल्डी येऊन पोंचतांच त्यानें लढाईचें काम एकदम सुरूं केलें; परंतु यावेळीं ओडीनॉट याचें सैन्य पुष्कळच असल्यामुळें ग्यारिबाल्डीच्या शूर शिपायांचेंही कांहीं चालेना! यामुळें वेढ्याचे पहिल्या दिवशीं संध्याकाळपर्यंत शहरच्या आसपासचीं बरींच ठाणीं शत्रूच्या हातीं गेलीं; व शहरांतील लोकांस मोठी चिंता उत्पन्न झाली. नंतर ग्यारिबाल्डीनें शहरचे तटावरून तोफांची मारगिरी करण्यास सुरवात केली व मधून मधून एकदम खालीं उतरून शत्रूवर हल्ले करण्याची युक्तीही योजून पाहिली. तथापि शत्रूस फारसा प्रतिबंध होईना. शिवाय टायबर नदीवरील [illegible]ाखालीं दारूगोळ्याचें एक जहाज घालून पूल उडवून टाकण्याचे कृत्यांतही त्यास यश आलें नाहीं. अशा स्थितीमध्यें जेवढा दिवस रोम शत्रूच्या हातीं न लागतां जाईल तेवढा भाग्याचा, असें आतील लोकांस वाटूं लागलें होतें. अझूनही मॅझिनीस लिसेप्सनें केलेला तहनामा फ्रान्स मंजूर

करील अशी आशा होती. परंतु तिची लवकरच निराशा झाली. कारण फ्रान्स येथील सरकारानेंही जनरल ओडिनॉट प्रमाणें लिसेप्स याचा तहनामा करण्याचे बाबतींत अधिकार नाकबूल केला. वास्तविक असें होण्याचें मुख्य कारण असें होतें कीं, जनरल ओडिनॉट यास हवी तितकी कुमक मिळाली होती व रोम हातीं येणार अशी त्यास बळकट आशा उत्पन्न झाली होती.

**ग्यारीबाल्डीचा सल्ला**—अशी निराशा होतांच रोमन लोक रागानें अगदीं बेफाम होऊन गेले. मॅझिनी व त्याचे बरोबरीचे इतर दोघे अध्यक्ष यांनीं, शहराची राखरांगोळी झाली व लोक त्यांत बुडून गेले तरी चिंता नाहीं, परंतु लढाई ही करावयाचीच असा, निश्चय । परंतु आतां तसें करणें ह्मणजे निव्वळ मूर्खपणाचें आहे असें ग्यारीबाल्डीचें मत पडलें. यामुळें मॅझिनी व ग्यारीबाल्डी यांचेंच भांडण झालें. तें इतकें कीं, यापुढें आजन्मांत त्यांचा बेबनाव समूळ नाहींसा झाला नाहीं ! असो. दिवसेंदिवस रोमच्या भोंवतालचे पाश अधिकाधिकच आखडूं लागले. फ्रेंच सैन्यानें शहरा सभोंवार तोफा लाविल्या व गोळ्यांचा भडिमार चालविला. एकेका रात्रीं दीड दीडशें गोळे शहरांत येऊन आदळत व त्यामुळें शहारांतील व आसपासच्या इमारती व बागबगीचे अगदीं जमीनदोस्त होऊन जात. असें होतां होतां अखेरीस जूनचे ३० व्या तारखेस शेवट निकराचा हल्ला झाला. पहाटे दोन वाजल्यापासून ग्यारीबाल्डी हातांत तरवार घेऊन चटकदार असें गाणें म्हणत आपले शूर व करारी लोक घेऊन लढण्यास निघाला. प्रथम कांहीं वेळपर्यंत फ्रेंच सैन्याचा पाय पुढें पडेना; परंतु

एवढ्या सैन्यापुढें आंतील लोकांचा निभाव कितीसा लागणार! शेवटीं आतां मागें फिरल्याशिवाय दुसरी तोडच नाहीं असें झाल्यावर, त्यानें रोमच्या अधिकाऱ्यांस निरोप पाठवून यापुढें लढणें अशक्य आहे असें कळविलें. लागलीच मॅझिनी प्रभृति अध्यक्षांनीं सभा बोलाविली. रक्तानें माखून गेलेला व बंदुकीच्या गोळ्या आणि तरवारींचे घाव यांनीं आंगावरील कपड्यांच्या चिंध्या झालेल्या अशा स्थितींत ग्यारीबाल्डी सभेपुढें येऊन हजर झाला; व यापुढें लढण्यांत कांहीं अर्थ नाहीं, असें त्यानें त्यांस फिरून सांगितलें, व त्याप्रमाणें लढाई बंद करावी असा हुकूमही सुटला. पुढें दोन ब्ा न दिवस तह जमविण्यांतच गेले. आतां रोम सोडून जावें लागणार या विचारानें ग्यारिबाल्डीस फार दुःख झालें. परंतु या शहरांत राहण्यांत खास धोका आहे असें झालें तेव्हां, त्यानें आपले सर्व शिपाई सेंटपिटर्सच्या देवळांत गोळा केले व त्यांस उद्देशून तो ह्मणालाः-" गड्यांनों, तुह्मांस देण्यास मजजवळ कांहींच उरलें नाहीं. येवढेंच नव्हे, तर मजबरोबर जो येईल त्यास यापुढें निवाऱ्याची झोंपडी सुद्धां मिळणार नाहीं. तहान, भूक, ऊन, वारा हींही सोसावीं लागतील. अन्नावाचून मुठींत जीव घेऊन लांबलांबच्या मजलाही माराव्या लागतील, अशी स्थिति आहे. इतक्यांतूनही कोणास बरोबर यावयाचें असल्यास खुशाल चलावें." हें भाषण संपतांच ४००० लोक त्याचे बरोबर जाण्यास तयार झाले. व पुढें एक क्षणाचाही विलंब न लावतां ही शूर शिपायांची टोळी रोम सोडून टस्कनीच्या पहाडाच्या आश्रयास जावयाचें असा बेत करून टिव्होलीच्या रस्त्यास जाऊन मिळाली

ग्यारीबाल्डी शहरांतून निघून गेला ही बातमी कळतांच, त्याच दिवशीं संध्याकाळीं चार वाजतां पोपचें निशाण [illegible] किल्ल्यावर पुन्हा: फडकूं लागलें, व फ्रेंच जनरल ओडिनॉट आपलें सैन्य घेऊन रोममध्यें शिरला.

# भाग ८ वा.

## दुर्दैवाचा कळस.

संपदसंपदं विपद् विपदमनुबध्नाति.

कादंबरी.

**खरी पतिव्रता**—या सर्व गोष्टी चालल्या असतां ॲनिटा, ग्यारीबाल्डी बरोबरच होती. तिनें आपल्यास सोडून एकाद्या सुरक्षित जागीं जाऊन राहावें ह्मणून तिला त्यानें परोपरीनें सांगून पाहिलें, परंतु ती त्याची पाठ सोडीनाच! ती गरोदर असून या सुमारास बाळंत व्हावयाची होती. तथापि ग्यारीबाल्डीबरोबर रोम सोडून जाण्याचा हट्ट ती कांहीं केल्या सोडीना. पुढें दिवस किती कठीण येणार, रानावनांतून हिंडण्याचे श्रम किती पडणार, व चोहोंकडे पसरलेल्या शत्रूंमधून जावयाचें असल्यामुळें जिवास किती धोका आहे, हें तिला दिसत नव्हतें असें नाहीं. परंतु आपल्या प्रिय पतीवर संकटें येणार आहेत, या विचारानें त्याच्याबरोबर जाण्याचा तिचा निश्चय न डळमळतां उलट दृढच झाला. शेवटीं निरुपायास्तव ग्यारीबाल्डीला तिला आपल्याबरोबर घेणें भाग पडलें. परंतु सर्व लष्करांत ही एकच स्त्री होती, याकरितां तिचें वेषांतर करणें अगत्य होतें, ह्मणून पहिल्याच मुक्कामावर ग्यारीबाल्डीनें एका न्हाव्याकडून ॲनिटाचे सर्व केंस कातरले, तिला पुरुषाचे कपडे अंगांत घालावयास दिले व बसावयास एक घोडा दिला. याप्रमाणें ॲनिटा ही घोडेस्वार बनून आपल्या नवऱ्याबरोबर प्रवास करण्यास सिद्ध झाली.

**रोम सोडल्यावरचा वृत्तांत**-ग्यारीबाल्डीनें रोम सोडल्यापासून पुढें त्याजवर इतके बिकट व चमत्कारिक प्रसंग आले कीं, त्यांची एक चांगली कादंबरीच बनेल. निघतांना ग्यारीबाल्डीनें आपल्या बरोबरीचे सैन्यास अगदीं अवश्य ते पैसे सरकारी खजिन्यांतून घेतले, परंतु त्यांतली आपल्या स्वतःच्या उपयोगाकरितां त्यानें एक पैही खर्चिली नाहीं. स्वतःच्या खर्चाकरितां त्यानें आपलें घड्याळ विकलें! वाट चालूं लागल्यावर त्यास प्रथम अडचण आली ती अशी कीं, त्याचे बरोबरीचे लोक त्यास हळू हळू सोडून जाऊं लागले. शिवाय आपणास ठिकठिकाणचे लोक येऊन मिळतील व आपल्यास गांवोगांवचे लोक आनंदानें मदत करतील अशी जी त्यास आशा होती, तीही व्यर्थ, असें त्यास कळूं येऊं लागलें. चोंहोंकडे ऑस्ट्रियन सैन्य पसरलें असल्यामुळें त्याची गांठ पडण्याची भीतीही उत्पन्न होऊं लागली. रात्रीं उठून मजला माराव्या व दिवसा कोठें तरी सुरक्षित ठिकाण पाहून उतरावें, असा क्रम ग्यारीबाल्डीनें चालविला. अनोळखी मुलखांतून हिंडावयाचें, व वाटाड्या पाहावा तों मुळींच मिळेना! अशा बिकट अडचणींतून ग्यारीबाल्डीनें सॅनमेरिनो येथपर्यंत मजल मारली. येथें मात्र त्यास आशा उत्पन्न होण्यासारखें लोकांकडून आश्वासन मिळालें. ग्यारीबाल्डी आला असें कळतांच तेथील छोटेखानी लोकसत्ताक राज्यानें त्याचें स्वागत करण्याकरितां आपले कांहीं अधिकारी [illegible] पाठविले. परंतु येथेंही ऑस्ट्रियाचें सैन्य त्याच्या मागोमाग येऊन ठेपलेंच! त्याबरोबर ग्यारिबाल्डीचे लोकांची किंचित् धांदल झाली व बरेच लोक शत्रू दिसण्यापूर्वींच पळूं लागले. यावेळीं खुद्द त्यानें आणि स्वतः ॲनिटा हिनें त्या पळपुट्या

शिपायांची निर्भर्त्सना करून त्यांस उत्तेजन आणण्याचा प्रयत्न केला; परंतु त्याचीही त्यांस शरम वाटली नाहीं. सॅन मेरिनो येथील अधिकाऱ्यांनीं आस्ट्रियाचें सैन्य जवळ येऊन ठेपलें असतांही मोठ्या उदारपणानें व धैर्यानें ग्यारिबाल्डीचे उरलेल्या लोकांस कांहीं शिधासामुग्री दिली, आणि पुढील मुक्कामीं पोंचते करण्याचें त्यांस आश्वसन देऊन ग्यारिबाल्डीस व त्याचे बायकोस जवळच्या एका देवळांत राहण्याची सोय करून दिली. परंतु आतां पुढें निभाव लागणें कठीण असें पाहून ग्यारिबाल्डीनें उरलेल्या लोकांस येथूनच रजा द्यावी व आपण कोठें तरी निघून जावें, असा विचार केला. दुसरे दिवशीं देवळाचे पायऱ्यावर उभा राहून त्यानें ॅल्या सैन्यास उद्देशून लहानसें भाषण केलें. तो ह्मणाला:— "मजबरोबर येण्याचें तुम्हीं मला जें वचन दिलें होतें त्यामधून मी आज तुम्हास मुक्त करतों. तुम्ही आतां आपल्या घरीं किंवा वाटेल तिकडे जा. परंतु, येवढें मात्र नेहमीं लक्षांत ठेवा कीं, इटली परकीयांच्या दास्यत्वांत दीन होऊन राहिलेला पाहण्यापेक्षां मरण बरें." हे वीरश्रीचे शब्द बोलून त्यानें त्यांस रजा दिली. इकडे सॅन्मेरीनोचे सरकारामार्फत ग्यारिबाल्डीनें आपल्या स्वाधीन व्हावें अशाविषयीं ऑस्ट्रियन सरदारानें बोलणें चालविलें. प्रथम त्याचें म्हणणें ग्यारिबाल्डीनें हत्यार खालीं ठेवून आपणास शरण यावें असें होतें, परंतु या अटीचा ग्यारिबाल्डीनें अमर्षपूर्वक निषेध केला. तेव्हां ग्यारिबाल्डीनें निदान इटलींत तरी राहूं नये, अमेरिकेस निघून जावें, असें पुन: बोलणें सुरू झालें. परंतु ग्यारिबाल्डीनें, गुप्तपणें निघून जाऊन सॅनमेरीनो येथील सरकारास विनाकारण आपल्याकरितां जी विवंचना प्राप्त झाली आहे तींतून सोडवावें, असा

निश्चय केला. व त्याप्रमाणें मध्यरात्रीचे सुमारास कांहीं निवडक लोक बरोबर घेऊन तो निघाला.

**एक भयंकर प्रसंग**—ॲनिटाही अर्थात त्याचे बरोबर होतीं. तिची प्रसूतीची वेळ जवळ जवळ येऊन ठेपली होती व ती बरीच आजारीही होती. ह्मणून सॅन्मेरिनो येथेंच तूं रहा, येथील लोक चांगले ममताळु आहेत, ते तुला चांगली मदत करतील असें त्यानें तिला सांगून पाहिलें. परंतु त्या शूर, करारी व उदार स्त्रीस या सूचनेचा अतिशय राग आला, व "मजवर तुमची प्रीतीच नाहीं, मी तुह्मांला जवळ नको, मला टाकून द्यावयाचा तुमचा विचार आहे ह्मणून तुह्मी हें सर्व मायाजाळ पसरतां आहां असें वाटतें" असें निष्ठुरतेचें उत्तर तिनें ग्यारिबाल्डीस दिलें. तेव्हां अर्थातच निरुपाय होऊन तिला बरोबर घेणें त्यास भाग पडलें. यापुढें ग्यारिबाल्डीबरोबर सारे २०० लोक उरले. त्यांस घेऊन तो ॲड्रिॲटिक समुद्राचे किनाऱ्यावरील कोणत्या तरी एका बंदरांत जाण्याच्या उद्देशानें निघाला. वाटेंत गॅलोपिनी या नांवाचा एक स्नेही त्यास भेटला व त्याचे बरोबर सेझेंटीको या गांवचे बंदरास ग्यारिबाल्डी शेवटीं एकदाचा जाऊन पोंचला. पण तेथें पुरेशा होड्या मिळेनात. समुद्र याच सुमारास फार खवळला होता, व पाण्यांत होडी घालावयास कोणी खलाशी धजेनात. ग्यारिबाल्डी समुद्रपर्यटणाचे कामांत पुरा निष्णात होता व प्रसंग बिकट असल्यामुळें त्याचे अंगीं दुप्पट जोर आलें. रात्रीची वेळ होती व वारा सुटला होता; परंतु ऑस्ट्रियन लोक येऊन पोंचतील ही भीति क्षणोक्षणीं वाटत असल्यामुळें ग्यारिबाल्डीनें जलदी करून १०।१२ कोळ्यांच्या होड्या पाण्यांत लोटून त्यावर आपले लोक चढविले, व

उजाडतां उजाडतां ते बंदरांतून एकदाचे बाहेर निघण्यास व ऑस्ट्रियन सैन्य गांवांत शिरण्यास एकच गांठ पडली. ग्यारिबाल्डीनें जर जलदी करून आपले लोक होड्यांवर चढविले नसते, तर दुसरे दिवशीं सकाळीं ते आयतेच शत्रूच्या हातीं लागते. व खरोखरीच जे थोडे लोक दुर्दैवानें तुफानास भिऊन मागें राहिले होते ते शत्रूच्या हातीं लागले, व त्यांपैकीं कित्येकांस गोळ्या घालून मारण्यांत आले व बाकीच्यांस फटक्यांची शिक्षा झाली. असो; ग्यारिबाल्डी बंदर सोडून निघण्याचे सुमारास वारा किंचित् अनुकूल झाला होता, व ग्यारिबाल्डीनें त्याचा फायदा घेऊन व्हेनिसकडे आपल्या होड्या चालविल्या. या धामधूमीचे श्रमानें ॲनिटाचा आजार फारच वाढला. होड्यांवर औषध वगैरे कांहीं नव्हतें. फार काय पण गोडें पाणीही पुरेसें घेतलेलें नव्हतें. ॲनिटास तापाच्या आगीमुळें अतिशय तहान लागून ती एकसारखी पाणी पाणी करूं लागली. ग्यारिबाल्डीस होड्या तयार करण्याचे कामीं साऱ्या रात्रीं अतिशय श्रम पडल्यामुळें त्यासही अतिशय तहान लागली होती, परंतु पाणी म्हणून मिळेना. ते दिवशीं पौर्णिमेचें चांदणें पडलें होतें, व रात्र स्वच्छ होती, यामुळें ग्यारिबाल्डीस किंचित् बरें वाटूं लागलें होतें. परंतु हें चांदणेंच यावेळीं ग्यारिबाल्डीस अनहिताचें झालें. कारण या बाजूस समुद्रांत ऑस्ट्रियाचीं लढाऊ गलबतें हिंडत होतीं व त्यांस ग्यारिबाल्डीच्या होड्या चांदण्यानें स्वच्छ दिसूं लागल्या. तेव्हां हीं गलबतें व किनारा यांजमधून सरळ व जलद गेल्याशिवाय गत्यंतर नाहीं असें दिसून आलें. परंतु होड्या लहान व अवजारें थोडीं, यामुळें तें साधेना. शेवटीं दिवस उगवण्याचे

सुमारास कांहीं होड्या शत्रूचे हातीं लागल्या व ज्या कांहीं थोड्या उरल्या त्यांना किनारा गांठणें भाग पडलें. इकडे किनाऱ्यावर उतरावें तर गलबतावरून लोक गोळ्या मारीत होते. अशा बिकट प्रसंगीं ग्यारीबाल्डीची होडी व इतर तीन होड्या एकदाच्या किनाऱ्यास लागल्या.

**ॲनिटाचा मृत्यु**–अशा रीतीनें ग्यारीबाल्डी हा शत्रूचे हातांतून निसटला. परंतु तो आनंद नाहींसा करण्याइतकें दुःख दैवानें त्याजपुढें मांडून ठेविलें होतें. कारण ॲनिटाची प्रकृति आतां अगदीं अत्यवस्थ झाली होती. तिला कशी तरी कवटाळून धरून ग्यारीबाल्डी हा किनाऱ्यावर तर एकदाचा उतरलाच, परंतु तेथें थांबण्याची बिलकुल सोय नव्हती. कारण शत्रूंच्या होड्या मागोमाग येण्याची भीति होती, म्हणून त्यानें बरोबरीचे लोकांस वाट फुटेल तिकडे जाण्यास सांगितलें. किनारा सोडून आंत जावें तर तेथेंही शत्रु हातांत तिळांजली घेऊन उभे होते. त्यांनीं ग्यारील्डीच्या बरोबरीचे कांहीं लोकांस तर गोळ्या घालून ठार मारिलेंच. त्यांमध्यें ग्यारीबाल्डीचे जिवाला जीव देणारे असे कांहीं दोस्त होते. त्यांचें वर्तमान ऐकून त्यास अतिशय शोक झाला. इकडे खुद्द ग्यारीबाल्डी हा मात्र ॲनिटासह मोठ्या शर्थीनें वाचला. किनारा सोडल्यावर जवळच मक्याचें एक दाट शेत होतें, तेथें ग्यारीबाल्डी ॲनिटास घेऊन गेला. परंतु तिचे प्राण यापूर्वींच कंठांत येऊन राहिले होते. या निवाऱ्याचे जागीं येतांच ॲनिटा हिनें प्राण सोडला. मरतांना "मुलांची नीट काळजी घ्या" एवढेच शब्द तिनें ग्यारीबाल्डीस सांगितले. अशा बिकट प्रसंगांत आपण सांपडूं व परक्या ठिकाणीं अगदीं रानांत मदत

करण्यास जवळ कोणी मित्र नाहीं, दवा नाहीं, पाणी नाहीं, अन्न नाहीं, वस्त्र नाहीं, चोहोंकडून शत्रूंचा वेढा पडला आहे, व त्यांचे हातीं आपण सांपडून तोफेचे तोंडीं जातों कीं काय याची क्षणोक्षणीं मनांत धास्ती वाटत आहे, अशा स्थितींत आपली प्रिय पत्नी मरण पावणार, हें ग्यारीबाल्डीच्या स्वप्नांतही कधीं आलें नसेल! परंतु दुर्दैव हात धुवून पाठीस लागलें म्हणजे कधीं कोणास कल्पनाही करतां येणार नाहीं, असे अद्भुत अनुभव, तें जगांत मनुष्यमात्रास दाखवितें. ग्यारीबाल्डीनें आपल्या जन्मांत अनेक दुःखें भोगिलीं, परंतु या पत्नीवियोगदुःखाइतका दुसऱ्या कोणत्याही दुःखापासून त्यास शोक झाला नाहीं. परंतु करतो काय, जो ईश्वर पृथ्वीवर दुःखें पाठवितो, तोच तीं सोसण्यास लागणारें सामर्थ्यही मनुष्यास देतो. आधींच वनवास; तशांत प्रिय पत्नीचा मृत्यु व तिजबरोबरच अकालीं प्रसूत झालेल्या बालकाचा मृत्यु; पाठीस शत्रू लागलेले; कोणी जिव्हाळ्याचा स्नेही जवळ नाहीं; अशा संकटांत ग्यारीबाल्डी सांपडला असतांही त्यांतून निभावून जाण्यास ईश्वरानें त्याचे अंगीं बुद्धि व धैर्य दिलें होतें. परंतु आपण आरंभिलेलें देशकार्य अद्याप आपल्या हातून पूर्ण व्हावयाचें आहे, अशा प्रकारची हुर हुर व तें आपण पुढें मागें खास पूर्ण करणार अशा प्रकारची उमेद त्याचे मनांत नेहमीं वास करीत असल्यामुळें शोकाहूनही प्रभावी असें एक प्रकारचें धैर्य त्याचे अंगीं वसींच होतें. त्यामुळें ग्यारीबाल्डी इतक्याही संकटांतून निभावून जाण्यास समर्थ झाला. असो; मृत पत्नीच्या गळां पडून मन मोकळें करून रडण्यासही त्याला त्यावेळीं अवकाश नव्हता. कारण ऑस्ट्रियन शिपाई शिकारी कुत्र्यांप्रमाणें

त्याचे पाठीवर होतेच. यामुळें त्यानें आपल्या पत्नीचें प्रेत कसें तरी गडबडीनें एकदाचें पुरलें; व पुढें अनुकूल वेळ आल्यास तेथून तिच्या अस्थी काढून नेऊं, असा विचार करून तो पुढें चालता झाला. ग्यारीबाल्डी जातांच आस्ट्रियन शिपाई लोक त्या गांवीं येऊन ठेपले. चौकशीकरितां ग्यारीबाल्डीस तेथें आश्रा मिळाला होता, असें कळतांच त्यांनीं लोकांवर जुलूम चालविला. व ज्या परोपकारी शेतकऱ्यानें त्यास मदत केली होती, त्याला आपल्या सद्गुणाचें प्रायश्चित आपला प्राण खर्चून घ्यावें लागलें. त्या नीच शिपायांनीं घराचे आढ्यास टांगून त्याला प्रथम फांशीं दिलें व नंतर खालीं ओढून त्यांनीं त्याचे तुकडे तुकडे केले. इकडे ग्यारीबाल्डी हा तेथून निघाला तो सार्डिनियास जावें या हेतूं अरण्यांत शिरला; व सुमारें पस्तीस दिवसपर्यंत वेष पालटून पर्वताच्या दऱ्याखोऱ्यांतून व गुहांतून लपत छपत हिंडत होता. मधून मधून त्यास कोणी एखादा दयाळू व देशाभिमानी मनुष्य भेटे; व तो त्यास खाण्यापिण्यास देई. परंतु कित्येक वेळां दिवसाचे दिवस अन्नाविणें त्यास काढावे लागत.

**ग्यारिबाल्डी जिनोआस जातो**–ग्यारीबाल्डीची खुद्द स्वतःची अशी स्थिति होती, तथापि त्याचें नांव मात्र सर्व देशभर कान्या कोपऱ्यांतूनही दुमदुमत होतें. सर्व इटलीभर ऑस्ट्रियाचे शिपाई फिरत होते, व ग्यारिबाल्डीस पकडण्याकरितां बक्षिसें हीं लाविलीं होतीं. परंतु द्रव्यलोभानें त्याला कोणी पकडून देईल अशी मुळींच भीति नव्हती. उलट जेथें जेथें त्याचें नांव कळे, तेथें तेथें लोक त्याला सुरक्षितपणें एकाठिकाणाहून दुसरे ठिकाणीं पोंचवून देत. असो. अशा

प्रकारें बऱ्यावाईट तऱ्हेनें सुमारें महिना दीड महिना प्रवासांत काढून ग्यारीबाल्डी पोर्टो व्हिनेरी या बंदरीं पोंचला. तेव्हां त्याजबरोबर फक्त त्याचा एकच स्नेही होता. तेथून चियाव्हेरी येथें तो गेला. ती सायंकाळची वेळ होती. तथापि त्याला लोकांनीं ओळखिलें, व तो आला अशी बातमी कळतांच त्याला पाहण्याकरितां लोकांची एकच गर्दी जमली. परंतु तेथील आधिकाऱ्यांस तें पसंत नसल्यानें त्यांनीं ग्यारीबाल्डीस विनंति करून असें सांगितलें कीं, तुमच्यामुळें लोकांनीं अशी गडबड करणें हें चांगलें नाहीं. या करितां आह्मीं पिडमाँट येथें तुह्मी आल्याची हकीकत कळवून पुढें काय व्यवस्था करावयाची याबद्दल हुकूम आणवितों, तोंपर्यंत तुह्मांस येथें आमचे नजरेखालीं राहिलें पाहिजे व नंतर हुकूम येईल त्याप्रमाणें वागलें पाहिजे. ग्यारीबाल्डीनें हें तक्रार न करितां ऐकून घेतलें. कारण आपल्यामुळें गडबड व्हावी हें त्यास मुळींच पसंत नव्हतें, पण त्यास तेथें फार दिवस रहावें लागलेंच नाहीं. कारण पिडमाँटहून हुकूम लवकरच येऊन ग्यारीबाल्डीस सरकारी अधिकाऱ्यांचें संरक्षणाखालीं जिनोआ येथें जाण्याची सूचना झाली, व त्याप्रमाणें तो जिनोआ येथें निघून गेला. तेथेंही त्याचे भोंवतीं लोकांची अत्यंत गर्दी झाली, व सगळें गांव त्याजविषयींच्या विचारानें अगदीं हलून गेलें. कोणी त्यास भेटण्यास, तर कोणी त्याचा सन्मान करून आदरबुद्धि व्यक्त करण्यास जात. परंतु मजकरितां गलबल होऊं नये, हल्लींची वेळ वाईट आहे व आपण जरी मला बहुमान देतां तरी त्यापासून या वेळीं माझें हित न होतां अनहित होण्याचा संभव आहे, अशा गोष्टी सांगून युक्तिप्रयुक्तीनें तो लोकांची गर्दी मोडीत असे. जिनोआ येथें कांहीं

दिवस घालविल्यावर त्याला नाईस शहरास जाऊन येण्याची परवानगी मिळाली. पुष्कळ दिवसांत त्याची व त्याच्या आईची व मुलांची भेट झाली नव्हती. यामुळें त्यास त्यांना भेटण्याची फार उत्कंठा लागली होती, यामुळें तो जलदीनें नाईस येथें गेला. परंतु तेथें त्यास फार दिवस राहतां आलें नाहीं. लवकरच परत यावें लागलें. परत आल्यावर त्याला पिडमांटचे राजानें दिलेली हद्दपारीची शिक्षा फर्माविण्यांत आली.

**ग्यारिबाल्डी फिरून देशांतर करितो**--ग्यारीबाल्डीनें ही शिक्षा निमूटपणें मान्य केली व तो इटली सोडून निघाला. परमुलुखांत निर्वाहाचें कांहीं तरी साधन पाहिजे, या करितां त्यानें प्रथम कांहीं दिवस नोकरी धरिली व नंतर निरनिराळ्या बंदरांवर अडत्याचें काम तो करूं लागला. हें पाहू कित्येक सद्गृहस्थांनीं त्यास लहान मोठ्या रकमा देऊं करून त्या पत्करण्याची त्यास विनंतीही केली, परंतु त्यानें त्या सर्व नाकारल्या. इकडे व्यापारास तेजी नसल्यामुळें त्याचा अडतेगिरीचा धंदाही नीट चालेना. तेव्हां पुन्हां एकवार अमेरिकेंत जाऊन आपल्या नशिबाची परीक्षा पाहावी असा ग्यारीबाल्डीनें निश्चय केला. त्याप्रमाणें तो लवकरच उत्तर अमेरिकेंतील न्यूयॉर्क शहरीं गेला. व तेथें त्यानें मेणबत्त्याचा कारखान काढला. शहराच्या कोपऱ्यांतील एका रस्त्यावर एक लहानसें दुकान घालून त्याठिकाणीं मेणानें हात घाण झाले आहेत अशा स्थितींत तो दिवसाचा दिवस घालवीत अ[illegible]

**महात्म्यांचा आपत्काल**--कर्मधर्म संयोगानें ज्यावेळीं ग्यारीबाल्डी हा मेणबत्त्यांचें दुकान घालून बसला होता, त्याच वेळीं त्याच शहरांत त्याच्याच सारखे निरनिराळ्या देशांतून हद्दपार झालेले मोठमोठे लोक हलक्या प्रतीचे

धंदे पोटाकरितां करून राहिलेले होते. ग्यारीबाल्डीच्या दुकानाजवळच जनरल प्रॉवेझाना हा राहत असे. हा पूर्वी स्वदेशी प्रधानमंडळांत असून युद्ध व लष्कर यासंबंधींचा सर्व कारभार त्याजकडे सोंपविलेला होता. परंतु हल्लीं हद्दपार झाल्यानें पोट भरावयास कांहीं तरी साधन पाहिजे म्हणून तो तंबाकूच्या विड्या करून रस्त्यांतून विकीत असे. जर्मनीच्या पार्लमेंटांतील एक सभासद हद्दपार होऊन अमेरिकेस गेला होता; त्यानें आपलें व बायकापोरांचें पोट भरण्याकरितां हजामाचा धंदा पत्करला होता. फ्रान्समधून हद्दपार होऊन आलेला एक पार्लमेंटचा सभासद गल्लोगल्लीं जाऊन भाजी विकीत असे. लेडु रॉलिन यानें बंदरावर हमालीचा धंदा पत्करला होता. लुईब्लॅक हा नृत्य शिकवून पोट भरी. फेलिक्स पायट हा एका नाटकगृहांत पडदे ओढण्याचें काम करी व लामारटाइन हा तर निवळ भीक मागून आपला चरितार्थ चालवीत असे. तात्पर्य पोट हें कोणासही सुटलेलें नाहीं; तरी पण पोट भरण्याकरितां कोणताही धंदा प्रामाणिकपणें केला असतां त्यांत कमीपणा मानण्याचें कारण नाहीं. वरील उदाहरणांतील धंदे हलके होते, तरी त्यांनीं त्या माणसांस कमीपणा आला नाहीं. उलट त्यां महात्म्यांचे समागमामुळें त्या धंद्यांसच महत्व आलें. ज्या मनुष्याचें मन स्वदेशभक्ति सारख्या थोर सद्गुणांनीं किंवा एखाद्या महत्कार्याचे विचारांनीं भरून गेलेलें असतें, त्याला आत्मविस्मृति इतकी पडते कीं, आपला स्वतःचा मानापमान, स्वतःचें हितानहित, फार काय पण स्वतःचें पोट याचेंही भान राहत नाहीं. व कसेही बिकट प्रसंग आले तरी त्यांतूनही आपलें कर्तव्य त्यास नेहमीं दिसत असतें.

## भाग ९ वा.

## वीराचा वानप्रस्थाश्रम.

तरुछाया तोयं । यदपि तपसो योग्यमशनं ॥
फलं वा मूळं वा । तदपि न पराधीन मिहवः ॥

उतरराम चरित्र.

**ग्यारीबाल्डी परत युरोपास जातो**—मेणबत्त्यांचा धंदा आपणास करावा लागला याबद्दल ग्यारीबाल्डीस कधींही वाईट वाटलें नाहीं. हात मेणानें घाण झाले आहेत अशा स्थितींत त्यास कोणी भेटण्यास आलें असतां तसाच तो त्या भेट घेई व उलट आपल्या घाण हाताचें तो आपण होऊनच कौतुक करी. परंतु हा त्याचा धंदा नीट चालेना. शिवाय शहरांतील हलकट लोकांपासून त्याला उपद्रव होऊं लागला, तेव्हां त्यानें न्यूयॉर्क सोडण्याचा निश्चय केला. व त्याप्रमाणें तो दक्षिण अमेरिकेंतील लिमा या शहरीं राहण्यास गेला. या शहरांत त्यावेळीं बरेच इटालियन लोक राहत होते. ग्यारी-बाल्डीचे पूर्वींचे पराक्रमामुळें दक्षिण अमेरिकेभर इटालियन लोकांचा चांगलाच वचक बसला असून त्यांस मान्यताही आली होती. शिवाय लिमा येथें तर बहुतेक व्यापाराचीं सूत्रें यांच्याच हातीं आलीं होतीं. या लोकांस ग्यारीबाल्डी येणा अशी बातमी कळतांच त्यांनीं एक सभा भरून त्यास स्वागत पूर्वक मानपत्र देण्याचें ठरविलें, व त्याप्रमाणें तो येतांच त्यांनीं त्याचा बहुमान केला. लिमा येथें ग्यारीबाल्डीनें दोन वर्षें घालविलीं, परंतु स्वदेशापासून दूर असल्यामुळें त्याच्या मनास

असमाधान वाटे. यास्तव संधि सांपडतांच, १८५४ सालीं तो फिरून युरोपास परत गेला. परंतु त्याची हद्दपारीची शिक्षा अद्यापि संपली नव्हती ह्मणून त्यास इटालीमध्यें प्रवेश करितां येईना. यामुळें नाईस व मार्सेलीस यांचे बंदरांचे दरम्यान तो दर्य्यावर्दीपणाचें काम करूं लागला.

**कॅप्रेरा बेटाचा राजा**—या धंद्यांत ग्यारीबाल्डी जवळ दोन पैसे शिल्लक पडले; व त्याचें एक शेत खरेदी करावें असें आतां त्याच्या मनांत आलें. आजपर्यंतचे दिवस दवदव करण्यांत घालविले तेव्हां आतां निवांतपणें चार दिवस घालवावयाचे मनांत आलें तर सत्तेची टीचभर जमीन असावी या हेतूनें कॅप्रेरा नांवाच्या एका लहान बेटाचा निमा भाग त्यानें खरेदी घेतला. कॅप्रेरा हें बेट सार्डिनिया नामक बेटाजवळ आहे. याची लांबी सारी पांच मैल असून एकंदर विस्तारही लहानच ह्मणजे सुमारें १५ मैल होता. या बेटावर मुळींच वस्ती नव्हती ह्मटलें तरी चालेल. ग्यारीबाल्डीचे पूर्वीं सुमारें १५० वर्षे या बेटांत कॉर्सिका येथील एक पुंड दरोडेखोर रहात असे. त्यानें त्यावेळीं निवाऱ्याचे व गुप्त अशा स्थळीं बांधलेली झोपडी ग्यारीबाल्डीचे वेळींही तशीच उभी होती. या शिवाय दुसरें तिसरें मनुष्याचें वसतिस्थान मुळींच नव्हतें. पोप हा ग्यारीबाल्डीला पुंड दरोडेखोर असेंच ह्मणत असे. तेव्हां दरोडेखोरांचे गुहेंत दरोडेखोरच घर करून राहिला हेंही योग्यच झालें असें तो थट्टेनें ह्मणे. परंतु पूर्वीच्या दरोडेखोरास कॅप्रेरा हें बेट ज्या कारणांनीं प्रिय झालें होतें त्याहून भिन्न कारणांमुळें ग्यारीबाल्डीनें हेंच ठिकाण पसंत केलें होतें. त्याला लपून छपून रहावयाचें नव्हतें; तरी पण एकांतवास हा त्याला फार प्रिय असे व तें एकांतवासाचें सुख या निर्जन अशा बेटापेक्षां इतर ठि-

काणीं अधिक कसें मिळणार? सृष्टिसौंदर्याचे बाजूनें पाहिलें असतां कॅप्रेरा हें बेट फारच मनोवेधक होतें, व लागवडीस जमीनही तेथें मुबलक होती. शिवाय कारण पडलें असतां शत्रूविरुद्ध लढविण्याच्या सोईचेंही हें बेट होतें. चहूंबाजूंनीं समुद्र, व चहूं बाजूंच्या किनाऱ्यावर डोंगरांची निसर्गसिद्ध अशी तटबंदी असल्यामुळें कित्येक दिवसपर्यंत शत्रूंशीं टक्कर देऊन रहाण्यासारखी सोय होती. इंग्लिश आरमारावरील प्रसिद्ध सरदार नेल्सन, त्याचप्रमाणें नेपोलियन बोनापार्ट, यांचा डोळा कॅप्रेरा या लहानशा बेटावर होता असें ह्मणतात. परंतु कर्मधर्म संयोगानें तें फ्रान्स किंवा इंग्लंड यांचे ताब्यांत जावयाचें राहिलें आणि ग्यारीबाल्डीस विकत घेतां आलें. असो.

**ग्यारिबाल्डीचें घर**—निमें बेट ताब्यांत आल्याबरोबर ग्यारीबाल्डीनें तेथें जाऊन वस्ती केली. त्याला जात्याच साधेपणा आवडत असे, व त्यांतूनही त्या ठिकाणीं इतर कोणाचा संपर्क नव्हता. यामुळें ग्यारीबाल्डीची साधेभोळेपणानें रहाण्याची हौस त्याला पूर्ण करितां आली. प्रथमतः त्यानें शेतांतल्या मांगरासारखें एक लहानसें घर बांधिलें. तें एक मजली असून त्यास आंतून बाहेरून सफेती दिलली होती. घराच्या आसपासचें रान तोडून त्यानें कांहीं जागा लागवडीकरितां तयार करण्याचे हेतूनें दूरदूर जाऊन तेथील मऊ माती आणून घातली. कांटेरी कुंपणें घालून त्यांमधून सुवासिक अशा झाडवेलीही त्यानें लाविल्या. चहूंकडे दगडाचे गडगे रचून बांध घातले. ठिकठिकाणीं पाणी सांठविण्याकरितां डबकीं केलीं; व त्यांतील पाण्याचे योगानें निरनिराळ्या प्रकारचा भाजीपाला, फुलझाडें, द्राक्षाच्यावेली, ऊंस वगैरे प्रकारची बागायत थोडक्याच काळांत त्यानें केली. स्वकष्टानें पिक-

विलेला भाजीपाला व फळफळावळ हीं आपल्या हातानें तोडून व त्यांचे हर तऱ्हेचे पदार्थ आपल्या हातानें बनवून सेवन करण्यांत जी एक अप्रतिम गोडी असते तिची रुचि ग्यारिबाल्डीस पूर्णपणें होती. ग्यारिबाल्डीचे तबेल्यांत बसावयाचे कांहीं कांहीं चांगले घोडे होते, व त्याचप्रमाणें कांहीं खेंचरेंही होतीं. या खेंचरांस त्यानें मोठमोठ्या लोकांचीं नांवें ठेविलीं होतीं. पोप, पिओनोनो, लुइ, नेपोलियन वगैरे ज्या लोकांचा तो तिटकारा करी अशांचीं बरींच नांवें त्यांत होतीं. गोठ्यांत गाई व मेंढ्याही बऱ्याच होत्या; व दूधदुभत्याची चंगाळी व रेलचेल होती. असो. अ[illegible] या सुखनिवासांतील गृहकृ-[illegible]चें काम ग्यारिबाल्डीची एक दूरची बहीण व त्याची [illegible]वडती मुलगी थेरेसिटा यांजकडे सोपविलेलें असे. ग्यारिबाल्डीची प्रियपत्नी ॲनिटा ही जर यावेळीं जीवंत असती तर त्याला या जीवितक्रमाचें सुख शतपट अधिक वाटलें असतें; परंतु त्याच्या व तिच्या दुर्दैवानें ती मृत झाली होती. तथापि तिचें उत्तम स्मारक ह्मणजे तिच्या कुरळ्या केसाची एक बट, शिसवी लांकडाच्या एका डबींत घालून ती त्यानें आपल्या निजण्या बसण्याच्या खोलींत समोरच लोंबत ठेविली होती. या शिवाय गृहशोभेचें सामान ह्मटलें ह्मणजे त्याच्या आईची एक तसबीर, इतर द[illegible]पांच चित्रें, व एक मौल्यवान तरवार एवढेंच काय तें [illegible]. तसेंच दुसऱ्या एका खोलींत ग्यारीबाल्डीचीं कांहीं आवडतीं कवितांचीं व युद्धशास्त्रासंबंधाचीं पुस्तकें व त्यानें मिळविलेलीं जयचिन्हें—त्याचीं निशाणें—वगैरे वस्तु होत्या. क्रमाक्रमानें लोक त्याला मूल्यवान् वस्तू नजर करूं लागले. यामुळें निवडक खुर्च्या, मेजें, शेतकीचीं आउतें,

हत्यारें वगैरे सामानाचा हळू हळू संग्रह होत चालला. घरीं कायमचीं माणसें ह्मटलीं ह्मणजे ग्यारीबाल्डी, त्याची मुलगी, त्याची बहीण, व चाकर नोकर इतकींच कायतीं होतीं; परंतु त्याचे दोघे मुलगे इटलींत असत ते त्यास भेटण्यास वरचेवर येत, व आले ह्मणजे बरेच दिवस रहात. शिवाय युरोपांतील सर्व राष्ट्रांमधील लहान मोठे लोकही ग्यारीबाल्डीचे घरचा साधा पाहुणचार घेऊन जात. खुद्द इटलींतील मुत्सद्दी व कामगार लोक तर नेहमीं येत. ग्यारीबाल्डीचें कुटुंब मोठें नियमितपणानें वागे. सूर्योदयाचे पूर्वी उठून सर्वजण आपापल्या कामास लागत. सकाळचा उपहार झाल्यानंतर कोठें रस्ते, शेत किंवा बाग यासंबंधीं काय काम निघेल तें सर्व स्त्रियां[illegible] करीत. दोन प्रहरचें जेवण झाल्यानंतर विश्रांतीचे [illegible] ग्यारीबाल्डी हा निरनिराळ्या युद्ध प्रसंगाच्या गोष्टी सांगे, व थेरेसिटा, ही ज्यांत स्वदेशाभिमान पूर्ण भरलेला आहे अशीं गाणीं किंवा पोवाडे ह्मणे.

**ग्यारीबाल्डीचे उद्योग**--अशा रीतीनें ग्यारीबाल्डी हा एकांतवासांत होता तरी त्याचें जगावरील किंवा जगाचें त्याजवरील लक्ष मुळींच सुटलेलें नव्हतें. दर एक टपालानें त्याला दहा वीस पत्रें हीं यावयाचींच. हीं पत्रें कोणी व कशाबद्दल पाठवावीं याचा सुमारच नव्हता. कोणीं त्यास फिरून लढाई सुरू करून [illegible] व उपाध्याय वर्ग यांना जाळून पोळून किंवा कापून काढोतें[illegible] विनंती करी. कित्येक स्त्रिया त्यास कांहीं तरी हातचा लेख लिहून मागत; कोणीं त्याच्या पिकलेल्या केसांच्या एकाद्या बटेबद्दल प्रार्थना करीत; कोणी त्याच्या पराक्रमाचीं स्तुतिपर काव्यें करून त्याजकडे पाठवीत. फार काय, पण कित्येक

स्त्रियांनीं त्याजवर आपलें प्रेम बसलें आहे, अशा अर्थाचीं पत्रेंही पाठविलेलीं अद्याप जतन करून ठेवण्यांत आलेलीं आहेत. एका फ्रेंच वेड्यापिरानें तर त्याला एक यंत्र देऊं केलें होतें. तें यंत्र आपण स्वतः शोधून काढलेलें असून त्याचे योगानें एका क्षणांत लाख पन्नास हजार लोक मारतां येतील असें त्यानें प्रतिपादन केलें होतें. तात्पर्य, त्यास कोणीं काय लिहावें याचा सुमारच नव्हता. तथापि या सर्व पत्रांस ग्यारीबाल्डी नम्र व सभ्यपणाचीं उत्तरें स्वतः लिहून पाठवी. जवळच सार्डिनिया बेटांतील लोकांमध्यें शिक्षण कमी होतें असें पाहून त्यानें लहान मुलांकरितां तेथें कांहीं शाळा काढिल्या, व ग्यारीबाल्डीच्या सूचनेस मान देऊन युरोपांतील पुष्कळ शहरीं त्या कार्याकरितां एजंट नेमून वर्गणी मिळविण्याचें काम सुरू झालें. अशा रीतीनें ग्यारीबाल्डीचें परोपकाराचें काम बसल्या बसल्या चालू होतें. आळस हा त्याला शत्रूप्रमाणें वाटे; व तो जो जो ह्मणून उद्योग करी त्या सर्वांत परोपकाराचें बीज नव्हतें असें कधींच झालें नाहीं. शिवाय या एकांतवासांतही हातून अर्धेमुर्धें राहिलेलें स्वदेशकार्य त्याच्या डोळ्यापुढें सदासर्वदां उभें असे. इटलींत काय गडबड चालली असेल याविषयींची माहिती तो मोठ्या उत्सुकतेनें मिळवी. या एकांतवासाचे शीतळाईनें त्याच्या मनांतील [illegible]षाग्नि मुळींच निवाला नसून कालगतीनें व शांत विचारानें [illegible] अधिकच वृद्धिंगत होत होता. परंतु त्या महत्कार्यास तोंड लावून देणें ही गोष्ट दुर्दैवानें त्याचे हातीं नव्हती. ग्यारीबाल्डीची तरवार इटलीकरितां नेहमीं सज्ज होती; परंतु ज्यांचे हातीं इटली देशांतील सर्व सैन्यावरील सत्ता व राज्यकारभाराचीं सूत्रें होतीं, त्यांनीं लढाईस प्रारंभ केल्याखेरीज त्या

तरवारीचा काय उपयोग ? यामुळें आपले मनोरथ मनांतच ठेऊन ग्यारीबाल्डीस दैवचक्राच्या अनुकूळ फेऱ्याची वाट पहात स्वस्थ बसणें भाग होतें.

**भविष्यकथन**— असो; कॅप्रेरा येथें रहात असतां मध्येंच ग्यारीबाल्डी थोडासा प्रवास करून आला. १८५४ सालीं तो इंग्लंडास कांहीं कामानिमित्त गेला. त्यावेळीं न्यूकॅसल येथील लोकांनीं त्याचें मोठ्या थाटानें स्वागत केलें, व एक मानपत्र, एक दुर्बीण, एक तरवार, अशीं त्यास नजर केलीं. ग्यारीबाल्डीस इंग्रजी चांगलेंसें बोलतां येत नसे, ह्मणून त्यानें थोड्याच शब्दांनीं त्यांचे अभार मानिले; व ते मानतांना त्यानें असें बोलून दाखविलें कीं, "आज जी तरवार मला माझ्या उदार मित्रांकडून बक्षीस मिळाली आहे, ती माझ्या आवडत्या कार्यांत ह्मणजे स्वदेश-स्वातंत्र्य परत मिळण्याचे कामीं उपसण्याचा दिवस सुदैवानें कधीं येईल हें आजच मला सांगतां येत नाहीं. परंतु इटली हें पुढें मागें एक स्वतंत्र राष्ट्र होणार यांत शंका नाहीं. व माझ्या देशाच्या संकटसमयीं या उदार मनाच्या परदेशीयांनीं तिच्या पुत्रांवर ममता ठेऊन सहाय्य केलें याबद्दल त्यांचे अभार इटलीनें मानण्याचा दिवस लवकरच खास उजाडेल." वरील शब्द त्यावेळीं जितक्या कळकळीचे होते तितकेच ते पुढें खरे ठरले. ग्यारीबाल्डी यास ही बक्षीस मिळालेली तरवार स्वदेशका[र्या]-[र्थ] उपसण्याचा प्रसंग लवकरच कसा आला या विषयींची हकीक[त] पुढील भागांत येईल.



काऊंट कॅव्हूर.

# भाग १० वा.

## मुत्सदीपणाचा विजय.

एका केवलमेव साधनविधौ सेनाशतेभ्योधिका ।
नंदोन्मूलनदृष्टवीर्यमहिमा बुद्धिस्तुमागन्मम ॥ मुद्राराक्षस.

**वीर व मुत्सद्दी**-इ० स० १८४९ सालीं रोममध्यें बंड होऊन साडेतीन देशभक्तांनीं स्थापिलेलें लोकसत्तात्मक राज्य साडेतीन घटका टिकून नाश पावलें, व फ्रेंच सैन्यानें रोम काबीज केल्यामुळें त्या साडेतीन देशभक्तांची वाताहत होऊन त्यांना हद्दपारीची शिक्षा झाली; व तेथून पुढचीं सुमारें ८।९ वर्षें ग्यारीबाल्डीनें अनेक प्रकारचीं संकटें व सुखदुःखाचे चमत्कारिक अनुभव घेण्यांत कशीं घालविलीं हें मागील एक दोन भागांवरून कळून येईलच. मागील भागाचे शेवटीं ग्यारीबाल्डीस स्वदेश-कार्यासाठीं तरवार उपसण्याची पुनः एक वेळ संधी आली असें सांगितलें आहे. ही संधी अर्थात् ग्यारीबाल्डीशिवाय जे कांहीं इतर देशभक्त इटलींत राहून खटपट करीत होते, त्यांच्याच उद्योगामुळें आली हें उघड आहे. जगांतील व्यव-हारांत नेहमीं असा अनुभव येतो कीं, कोणतेंही महत्कृत्य साधण्यास दोन प्रकारचे लोक अवश्यक असतात. एक कार्यसिद्धीची संधी आणून देणारे; व दुसरे ती संधी आली असतां ती साधून आपल्या कर्तृत्वानें कार्य सिद्धीस नेणारे. वास्तविक इटलीस स्वतंत्रता मिळण्याची जी एक महा संधी किंवा महा पर्वणी आली ती आणून देण्या-स ग्यारीबाल्डी व विशेषतः मॅझनी या देशभक्तांचें उदाहरण व उपदेश हींच मूळ कारणीभूत होत असें ह्मटलें पाहिजे.

एकदरीनें पाहतां त्यांजकडे केवळ परोक्ष कर्तृत्व येतें. अपरोक्ष किंवा प्रत्यक्ष कर्तृत्वाच्या यशाचे मालक निराळेच होते. ते इटलीमध्यें राज्याधिकारारूढ जे मुत्सद्दी होते ते होत. ग्यारीबाल्डी किंवा मॅझिनी यांस एखादें साधें बंड करवावयाचें झालें तरी कितीतरी मेहनत पडे; परंतु या सर्व बंडांचा मुख्य हेतु ह्मणजे ऑस्ट्रियाशीं युद्ध, तें सुरू करणें ह्मटलें ह्मणजे या अधिकारसंपन्न मुत्सद्यांच्या एका शब्दाचें काम होतें. अशा प्रकारच्या मुत्सद्यांमध्यें त्या काळीं दोनच प्रमुख होते. एक खुद्द पिड्मॉंडचा राजा 'व्हिक्टर-ए-मॅन्युएल' व त्याचाच मंत्री 'कौन्ट कॅव्हूर.' ग्यारीबाल्डी व मॅझिनी यांशिवाय इटली स्वतंत्र करण्यास ज्या देशभक्तांनीं मदत केली त्यांपैकीं वर सांगितलेले दोघे मुत्सद्दी अग्रगण्य असून ते सत्ताधीश असल्यामुळें त्यांचे हातून देशकार्यास जितकी प्रत्यक्ष व उपयुक्त मदत झाली, तितकी मॅझिनी व ग्यारीबाल्डी यांचे हातूनही झाली नाहीं. ग्यारीबाल्डी हा सुमारें दहा वर्षें हद्दपारींत आपले दिवस घालवीत असतां इकडे इटलीचे स्वातंत्र्याचे धोरणावर नजर ठेऊन आपल्या राजनीतिचातुर्यानें या दोन मुत्सद्यांनींच ग्यारीबाल्डीस स्वदेशकार्यासाठीं पुनः तरवार उपसण्याची संधी आणून दिली.

**पूर्व वृत्तांत**—ही संधी कशी मिळाली हें पाहण्यास इ. स. १८४९ पासून पुढें आठ नऊ वर्षांत इटलीची स्थिति कशी पालटत गेली हें पाहिलें पाहिजे. इ. स. १८४८।४९ सालीं इटलींत बंडें होऊन त्यांचा लगेच मोड झाल्यामुळें पुनः एकवार ऑस्ट्रियाचा जुलमी अम्मल कायमपणें स्थापित झाल्यासारखा झाला. त्यासालीं निरनिराळ्या ठिकाणीं एकदम बंडें झाल्यामुळें स्वातंत्र्यप्रिय लोकांचे मनांत भावी स्थिती-

विषयीं जी अत्यंत उज्वळ आशा प्रदीप्त झाली होती ती त्याच वर्षाचे अखेरीस एकदम प्रतिकूल वारा सुटून समूळ मालवली गेल्यामुळें पुनः एकवार सर्वत्र निराशेचा अंधकार पसरला. व १८१५ सालीं व्हिएन्ना येथील तहानें इटलींत ऑस्ट्रियाचें जुलमी साम्राज्य युरोपियन राष्ट्रांचे बहुमतानें स्थापित झाल्यापासून इटालियन देशभक्त, वीर व मुत्सद्दी यांनीं तीस पस्तीस वर्षें जे अविश्रांत श्रम केले ते सर्व फुकट जाऊन पुनः एकवार १८१५ सालची भयंकर स्थिति येऊन पोंचली असें भासूं लागलें. हजारों लहान सहान देशभक्त मारले गेले; ग्यारीबाल्डी व मॅझिनी यांसारख्या त्यांच्या नायकांस हद्दपारीची शिक्षा झाली; इटलीच्या स्वातंत्र्याचा मुख्य शत्रू जो पोप त्याचे डळमळणारे पाय युरोपियन राष्ट्रांच्या मदतीनें पुनःएकवार रोमच्या गादीवर स्थिर झाले; निरनिराळ्या इटालियन संस्थानांच्या राज्यांतील जुलमास लोकसत्तेच्या प्रभावानें आळा पडला होता तोही निघून गेला; व सर्व इटालियन संस्थानांत लोकप्रिय, शक्तिमान, न्यायी व सुधारलेली अशी जी पिड्मॉंडची गादी तिला हात दाखवून अवलक्षण करून घेतल्याप्रमाणें ऑस्ट्रियाविरुद्ध मांडलेल्या युद्धांत पराजय होऊन, अपमानानें व लज्जेनें मान खालीं घालून बसावें लागलें. या पेक्षां इटलीच्या कार्यास अधिक अनिष्ट अशी दुसरी गोष्ट कोणती? या वेळीं फिरून एकवार इटलीची स्थिति एखाद्या रणांत पडलेल्या मृतप्राय शिपायासारखी होऊन राहिली होती. इकडे पोपानें एखाद्या गिधाडाप्रमाणें इटलीदेशाचे पंचप्राण आपल्या पंज्यांमध्यें दाबून ठेविले होते; व कोठें कांहीं हालचाल होईल तर लागलाच त्याठिकाणीं मारा करण्यास ऑस्ट्रिया हा सशक्त व सज्ज होऊन बसला होता. आणि

इटलीच्या शरीरास जखमा होऊन बहुतेक अवयवांचे तुकडे पडले होते.

**भावी सुचिन्ह**-इटलीची अशी ही भयंकर स्थिति झाली होती खरी. तथापि विचारी मनुष्यास त्यांतल्या त्यांत समाधान मानतां येण्यासारख्याही कांहीं गोष्टी होत्या. १८१९ सालची इटालीची स्थिति व १८४९ सालची स्थिति यांमध्यें मोठें एक अंतर होतें तें हें कीं, पूर्वीं इटलींतील लोकसमाज जो आपल्या गुलामगिरींत सुख मानून राहत होता, तो आतां मनांतून असंतुष्ट व महत्वाकांक्षी झाला होता. एवढेंच नव्हे, तर आपलीं दुःखें व आपल्या इच्छा उघडपणें बोलून दाखविण्या इतके ते धीट झाले होते. अद्यापपर्यंत सर्व इटली एकत्र होऊन मॅझिनीच्या कल्पनेप्रमाणें त्यावर लोकसत्तात्मक साम्राज्य स्थापावें इतक्या मजलेपर्यंत कोणाच्या मनाची धांव गेली नव्हती हें खरें; तथापि आपआपल्या संस्थानास आपापल्या पुरतें कां होईना, परंतु जुलमी राजापासून स्वातंत्र्य मिळावें, व तें मिळण्यास निदान ऑस्ट्रियाशीं युद्ध करण्यापुरती तरी इटलीची एकी व्हावी; असें लोकांस खास वाटूं लागलें होतें. मॅझिनीचें लोकशिक्षण, ग्यारीबाल्डीचें उदाहरण, व १८२१, १८३१ व १८४८ या तीन सालीं लोकांनीं बंडें करून व आपली शक्ती प्रगट करून क्षणभर कां होईना परंतु जें स्वातंत्र्यसुख अनुभविलें होतें त्याच्या गोडीमुळें कायमचें स्वातंत्र्य मिळविण्याविषयीं लोकांचे मनांत उत्पन्न झालेली लालसा, ह्या इतक्या गोष्टी कांहीं खास फुकट गेल्या नव्हत्या. शेंकडों वर्षें ज्यांनीं आपल्या मानेवर परदास्याची जड धुरी निमूटपणें वाहिली, त्यांनीं क्षणभरच कां होईना, परंतु एकदां मान हालवून ती फेंकून दिली, या गोष्टींत

कांहींच अर्थ नसेल काय? असो. १८१५ सालची स्थिति व १८४९ सालची स्थिति यांमधील मुख्य अंतर हेंच होतें कीं, जरी इतर गोष्टी कायम होत्या तरी लोकांचीं मनें देशकार्याचे बाबतींत सुशिक्षित होऊन लोकमत बनलें होतें, व समाजांत स्वार्थत्यागी पुढारी बरेच उत्पन्न होऊं लागले होते; आपलें कर्तव्य काय व आपला मार्ग कोणता हें लोकांस स्वच्छपणें कळून आलें होतें; व काय होईल तें होवो, पण त्या मार्गानें जावयाचें अशी लोकांनीं शपथ घेतल्यासारखी होती.

**राजा व प्रधान**—वास्तविक अशीच स्थिति देशाभिमानी व अधिकारसंपन्न मुत्सद्यांच्या कर्तृत्वाचा प्रभाव सिद्धीस जाण्यास उपयोगी असते. व अशाच स्थितीचा फायदा घेऊन मागें सांगितलेल्या दोघा श्रेष्ठ मुत्सद्यांनीं आपलें कर्तृत्व जगास दाखविलें. जगाचे इतिहासांत बंड व मुत्सद्दीपणा यांची सर्वत्र पसरलेली अशी साखळी दृष्टीस पडते. मुत्सद्दीपणानें बंडाची सामुग्री सिद्ध करून द्यावी व बंडानें मुत्सद्दीपणास अनुकूळ अशी स्थिति पुनः आणून द्यावी, या नियमाचे अनुशासनानेंच जगांतील राष्ट्रांच्या उत्कर्षाचा इतिहास बनला असल्यासारखें दिसतें. सर्व इटली देशामध्यें पिडमॉ-ण्टच्या गादीकडेच सर्व तऱ्हेचा अग्रणीपणा होता. या गादीचा मालक चार्ल्स आल्बर्ट राजा हा मनांतून इटलीच्या स्वातं-त्र्यास अनुकूल होता; तथापि प्रतिकूळ परिस्थितीमुळें त्याचे हातून कांहीं घडून आलें नाहीं. उलट नोव्हारा येथील लढाईमध्यें पराभव झाल्यामुळें ऑस्ट्रिया व इटालियन लोक या दोन्ही पक्षांचा तो उघड शत्रू झाला, व त्यामुळें अत्यंत खेद पावून त्यानें आपल्या गादीचा राजीनामाही दिला. त्या गादीवर त्याचा पुत्र व्हिक्टर एमॅन्युएल हा १८४९ सालीं

बसला. हा राजपुत्र शूर, मनाचा थोर, दिलदार व राजनीतिकुशल होता, व येथून पुढें इटली संयुक्त स्वतंत्र होईपर्यंत जो इतिहास घडून आला त्यांमध्यें त्यानेंच अग्रेसरत्वाचा भाग उचलला होता. राजा या नात्यानें त्याचे हातीं सर्व राज्याधिकाराचीं सूत्रें सहजच आलीं होतीं हें खरें; तथापि त्यानें दाखविली इतकी जर बुद्धीची व्यापकता व मनाचा थोरपणा व स्वदेशप्रीति हीं दाखविलीं नसतीं तर इटली देश स्वतंत्र झाला असता कीं नाहीं, याबद्दल शंका घेण्यास जागा आहे. परंतु एकट्या व्हिक्टर ए-मॅन्युएलचे हातूनही फारसें झालें नसतें. त्याचा मंत्री कौन्ट कॅव्हूर हाही पराकाष्टेचा देशाभिमानी व मुत्सद्दीपणांत तर[illegible] होता; व १८४९ नंतर जीं कांहीं कारस्थानें झालीं [illegible] या दोघांचे विचारानेंच झालीं.

**कौन्ट कॅव्हूर**—कौन्ट कॅव्हूर हा सरदारकुळांत जन्मलेला असून पिड्मॉड येथील रहिवाशी होता. त्याच्या घराण्याचा व नेपोलियनच्या घराण्याचा सोयरिकीनें संबंध जुळलेला होता. कॅव्हूरचे बाळपणचें शिक्षण संपल्यावर त्यानें लष्करी विद्यालयांत बरेच दिवस अभ्यास केला. इ. स. १८३० सालीं फ्रान्समध्यें राज्यक्रांति घडून आली त्यावेळीं तत्संबंधाचे आपले अनुकूल विचार फार उघडपणें बोलून दाखविल्यामुळें त्यास कांहीं दिवस अटकेंतही ठेवण्यांत आलें होतें. इ. स. १८३१ सालीं त्यानें लष्करांतील आपल्या जागेचा राजीनामा दिला, व पुढें बरींच वर्षे प्रवास करण्यांत व निरनिराळ्या देशांतील राज्यकारभाराचें सूक्ष्मपरीक्षण करण्यांत त्यानें घालविलीं. शिवाय शेतकी संबंधानें त्यानें बराच अभ्यास करून शेतकऱ्यांची स्थिति कशी सुधारेल

याविषयीं पुष्कळ विचार केला होता. इ. स. १८४७ सालीं कौन्ट कॅव्हूर यानें 'रीझॉर्झिमेंटो' या नांवाचें एक वर्तमानपत्र सूरू केलें, त्यामधून आपले व आपल्या पक्षांचे विचार इटालियन लोकांपुढें तो मांडीत असे. इटलीच्या स्वतंत्रतेसंबंधानें त्याचें असें मत होतें कीं, ती स्वतंत्रता लोक व संस्थानिक यांची एकी होईल तरच मिळणारी आहे, व ही एकी होण्यास बंडें करणें हा कांहीं खरा उपाय नसून जोरानें कायदेशीर चळवळ करणें, व दाद लावून घेणें हाच होय. ... अशा त्याच्या मतामुळें ग्यारीबाल्डी व मॅझिनी हे त्यास हा देशाचा हितकर्ता नव्हे असें मानीत, व अखेर पर्यंत या दोन पक्षांचें वैमनस्य कायमच होतें. दोघेही एकाच हेतूनें प्रवृत्त झालेले असल्यामुळें व कोणाचेच आंगीं स्वार्थसाधूपणा नसल्यामुळें वेळ पडल्यास त्यांनीं एकमेकास मदत केली हें खरें. परंतु त्यांचीं तत्त्वें स्वभावतः विरुद्ध असल्यामुळें त्यांचें कधींही पटलें नाहीं. कौन्ट कॅव्हूर याचेमध्यें जो मुत्सद्दीपणा भरला होता तो ग्यारीबाल्डी किंवा मॅझिनी यांमध्यें मुळींच नव्हता. व या मुत्सद्दीपणाचे योगानें त्याचेकडून इटलीच्या स्वतंत्रतेच्या कार्यास आणिबाणीचे प्रसंगीं जी मदत झाली ती मॅझिनीच्या लेखांनीं किंवा ग्यारीबाल्डीच्या बंडांनीं क्वचितच झाली असती. व्हिक्टर ए-मॅन्युएल राजा व कॅव्हूर दोघेही तरुण व बऱ्याच अंशीं एक विचाराचे होते. यामुळें त्यांच्या अमलाखालीं फारशी बंडें झालीं नाहींत, तरी राज्याची दिवसेंदिवस जास्त सुधारणाच होत गेली व लोकांस हक्कही आपोआप अधिकाधिक मिळत गेले. इ. स. १८४९–५९ या दहा वर्षांत या मुत्सद्यांच्या जोडीनें बरेंच काम केलें होतें. प्रथमतः कॅव्हूर यानें पिड्मॉंड येथील

पार्लमेंटाची सुधारणा केली. १८५० सालीं कॅव्हूर हा प्रधानमंडळामध्यें शिरला, व लागलीच त्यानें निरानिराळ्या सुधारणा करण्यास प्रारंभ केला. त्यानें जमाबंदीची पद्धति नवीन तत्वावर मांडून राज्याची सांपत्तिक स्थिति सुधारण्यास योग्य असे कायदे केले. राज्यांतल्या राज्यांत दळणवळण उत्तम रीतीनें चालण्यास अवश्य असे रस्ते वगैरे बांधले. व्यापारावरील घातुक बंधनें काढून टाकिलीं व त्या बाबतींत युरोपांतील प्रमुख राष्ट्रांशीं तह केले. शिवाय पोपचा अधिकार व राजाचा अधिकार यांची विलक्षण प्रकारची गुंतागुंत होऊन गेली होती, तीही त्यानें सोडवून आपल्या राजाचे जखडलेले हात मोकळे केले, व इटलीच्या स्वतंत्रतेस मुख्य आडकाठी जी पोपची सत्ता तिला जबरदस्त प्रतिबंध केला. इ. स. १८५२ सालीं कौन्ट कॅव्हूर हा राजाचा मुख्य प्रधान झाला. त्याचें ह्मणणें असें असे कीं, इटली स्वतंत्र करण्याचें काम एकट्या पिड्मॉंडकडे आहे हें खरें, तथापि जगाचे कामांत वाटेल तसा हात घालण्याचा नसता अधिकार बळकावून बसलेल्या युरोपियन राष्ट्रांस आपल्या संस्थानचा अधिकार मंजूर व्हावा, असें असेल तर पिड्मॉंडच्या राज्यानें आपल्या महत्वाकांक्षेस अनुरूप अशी पुढारीपणाची स्थिति प्राप्त करून घेतली पाहिजे. व यापुढें त्यानें केलेल्या सर्व कारस्थानांत खरोखर आपल्या राज्यास महत्व आणणें हेंच त्याचें मुख्य तत्व होऊन बसलें होतें.

**एक उत्तम संधी**—अशा प्रकारचें महत्व मिळण्यास १८५४ सालीं एक उत्कृष्ट संधी पिड्मॉंडला मिळाली; व त्या धूर्त मुत्सद्यांच्या जोडीनें ती तेव्हांच उचलली. या सालीं ज्याला क्रिमियन वॉर असें ह्मणतात तें युद्ध युरोपांत सुरू झालें होतें. काळ्या समुद्रावर कोणाच्या आरमाराचें

वर्चस्व असावें असें भांडण निघून एका बाजूस रशिया, व दुसरे बाजूस इंग्लंड, टर्की व फ्रान्स असे तट होऊन होऊन राहिले होते. इग्लंड, फ्रान्स व टर्की यांस इतर राज्यांकडून जितकी मदत होईल तितकी पाहिजेच होती. परंतु जर्मनी, ऑस्ट्रिया वगैरे राष्ट्रें तटस्थ राहिलीं होतीं. अशा वेळीं मदत करण्याचें कबूल करून आपण मध्येंच घुसलों असतां आपल्यास वरिष्ट प्रतीच्या राष्ट्राचें महत्व येईल, व परिणामीं आपल्या पक्षाचा जय झाल्यास पिड्मॉंडचा फायदा होईल, असा धूर्तपणाचा विचार करून कौन्ट कॅव्हूर यानें पार्लमेंटापुढें तो प्रश्न आणिला. या कामीं अदूरदृष्टि माणसाला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष असा कांहींच फायदा दिसण्यासारखा नव्हता. यामुळें पार्लमेंट कॅव्हूरचे मतास अगदीं विरुद्ध होतें. परंतु व्हिक्टर ए-मॅन्युएल राजानें नेट धरल्यामुळें पार्लमेंटचें कांहीं चाललें नाहीं. व अखेर पिड्मॉंडचें २५००० सैन्य इंग्लंड व फ्रान्स यांस मदत करण्यास गेलें. पुढें स्क्रिमियन युद्ध लवकरच संपलें; व कॅव्हूर यानें अटकळ केल्याप्रमाणें रशियाचा पराभव झाला. व अर्थातच फ्रान्स व इंग्लंड यांजबरोबर पिड्मॉंडचेंही महत्व वाढलें. कॅव्हूर व व्हिक्टर ए-मॅन्यूएल यांनीं एक हा सट्ट्याचा व्यापारच केला होता. तो फसता तर पिड्मॉंडचे व त्याबरोबर सर्व इटलीचे पाय पूर्वींहून अधिकच परदास्यपंकांत रुतले असते. परंतु तोच साधल्यामुळें सर्वांसच एकदम उच्च स्थिति प्राप्त झाली. कस्टोझा व नोव्हॅरा या लढायांमध्यें पिड्मॉंड ऑस्ट्रियाशीं लढाई करितांना पराभव पावल्यामुळें जें अपयश आलें होतें तें धुवून निघून पिड्मॉंडच्या तोंडास एकदम जरासा उजळाही आला. या सर्वांचा परिणाम असा झाला कीं, लवकरच पुढें पॅरिस येथें जी एक

युरोपियन राष्ट्रांची सभा भरली तिजमध्यें पिड्मॉंडला आमंत्रण देऊन त्यास स्वतंत्रपणाच्या नात्यानें व युरोपांतील प्रमुख राष्ट्रीय शक्तीपैकीं एक शक्ति अशा जोरानें आपल्या बाजूचें ह्मणणें सभेपुढें मांडण्यास सांपडलें. वास्तविक पिड्मॉंड हें ऑस्ट्रियाचें मांडलीक संस्थान अशी स्थिति असतां या सभेस पिड्मॉंडला स्वतंत्र सभासद पाठवण्याचा अधिकार युरोपियन राष्ट्रांच्या उघड कबूलीनें मिळाला, यांतच इटलीच्या भावी स्वतंत्रतेचें बीज होतें. अर्थातच ऑस्ट्रियानें या कामीं तक्रार केली. परंतु त्याचें कांहीं चाललें नाहीं. या सभेस पिड्मॉंडचा मुखत्यार ह्मणून कौन्ट कॅव्हूर हा स्वतः हजर होता. व कार्य-क्रमानुरोधानें पिड्मॉंडच्या वतीनें बोलण्याचा जेव्हां प्रसंग आला तेव्हां कॅव्हूर यानें इटलीची सर्व स्थिति युरोपियन राष्ट्रांपुढें उत्कृष्ट तऱ्हेनें मांडली. इटलींतील निरनिराळ्या संस्थानांमधून प्रजेवर कसकसे अनन्वित जुलूम होत होते, हरतऱ्हेच्या सुधारणेस पोप हे विनाकारण कशी आडकाठी घालीत आले, व ऑस्ट्रि-याचे शिरजोर व अनधिकारी वर्तनामुळें इटलीचे पायांत जड शृंखळा कशा पडल्या याचेंही त्यानें हृदयद्रावक वर्णन केलें. ऑस्ट्रियाचा मुख्य प्रधान सभेस हजर असतां त्याचे समक्ष कौन्ट कॅव्हूर यानें असें स्पष्ट बोलून दाखविलें कीं, ऑस्ट्रिया हाच कायतो इटलीच्या स्वातंत्र्यास व सुधारणेस मुख्य शत्रू आहे. हे शब्द ऑस्ट्रियास कानामध्यें कोणी पिस्तुलाचा बार करावा त्याप्रमाणें कडक वाटले. परंतु तो काय करणार! असो; या सभेमध्यें पिड्मॉंडच्या स्वतंत्रतेसंबंधानें मुक्रर असें कांहींच ठरलें नाहीं. परंतु त्या प्रसंगानें इटलीची स्थिति सर्व युरोप-खंडाच्या नजरपुढें उत्तम तऱ्हेनें मांडली गेली; व निरनिरा-ळ्या राष्ट्रांचे मनांत पिड्मॉंडसंबंधानें सहानुभूति उत्पन्न झाली.

सभा विसर्जन झाल्यावरही कौन्ट कॅव्हूर यानें निरनिराळ्या राष्ट्रांच्या प्रतिनिधींच्या खासगी भेटी घेतल्या. त्यावरून त्यास असें कळून आलें कीं, इंग्लंडचे मनांत पिड्मॉंडविषयीं बरीच कळकळ आहे, तरी त्याचे हातून प्रत्यक्ष अशी फारशी मदत होण्याचा संभव नाहीं; परंतु तेंच फ्रान्सचा नवीन बादशाह लुई नेपोलियन याजकडे संधान बांधलें असतां तशी मदत होण्याचा बराच संभव आहे. तेव्हां कॅव्हूर व व्हिक्टर ए-मॅन्यूएल यांचा ऑस्ट्रियाशीं युद्ध करण्याचा विचार ठरून गेला, व तें युद्ध ओढवण्यास अनुकूळ अशीं इतर कारणेंहीं घडून येऊं लागलीं. एकंदर धोरण पाहून ऑस्ट्रियानेंही पिड्मॉंडच्या राज्यांतील प्रजेचीं हत्यारें काढून घेण्याविषयीं व्हिक्टर ए-मॅन्युएल यास आज्ञा केली. परंतु अशा वेळीं आपली प्रजा आपण होऊन निःशस्त्र करण्या इतका तो मूर्ख नव्हता; व त्यानें मीं तें करीत नाहीं, असा साफ जबाब पाठविला. इतकें झाल्यावर युद्धाचें तोंड आपोआपच लागलें.

# भाग ११.

## स्वातंत्र्याकरितां दुसरें युद्ध.

संग्रामाध्वर दीक्षितो नरपतिः...... ।

राजन्योपनिमंत्रणाय रसति स्फीतं यशो दुंदुभिः ॥

**वेणीसंहार.**

**लढाईची तयारी**——अशी राजकारस्थानांची धामधूम इटलींत चालली असतां ग्यारीबाल्डी हा शेतकाम करून व भाजी भाकरी खाऊन कॅप्रेरा बेटामध्यें एकांतवासांत निवांतपणें दिवस काढीत होता. मुत्सद्यांचें काम मुत्सद्दी करीत असतात, तो काळ वीरांना झोंप घेण्याचा असतो. व ग्यारीबाल्डीनें राजकारणाचे बाबतींतील ही झोंप आज जवळ जवळ पांच सात वर्षें घेतली होती. परंतु युद्धास सज्ज होऊन सैन्य बाहेर निघालें व लष्कराच्या नौबदीवर टिपरूं पडलें म्हणजे तेथपासून वीरांच्या जागृतीस प्रारंभ होतो व मुत्सद्यांना विश्रांती मिळते. १८५९ सालच्या एप्रिलच्या २९ व्या तारखेस ऑस्ट्रियाशीं युद्ध करण्याकरितां निघालेल्या सैन्याची पहाणी व्हिक्टर ए-मॅन्यूएल राजानें स्वतः केल्यावर त्याच दिवशीं लष्करानें कूच केलें, व सैन्य गोटांतून बाहेर पडल्याबरोबर कौन्ट कॅव्हूर दीर्घ उश्वास टाकून म्हणाला, "ठीक आहे, इतका वेळ आपण थोडाबहुत म्हणण्यासारखा इतिहास तर केला. आतां खुशाल जेवीत बसण्यास हरकत नाहीं." व्हिक्टर ए-मॅन्यूएल राजानें युद्ध करण्याचा निश्चय केल्याबरोबर आपल्या प्रजेस व सैन्यास प्रोत्साहनपर असा एक जाहीरनामा काढिला होता. त्याच्या शेवटचें वाक्य असें होतें.

"इटलीच्या स्वतंत्रतेचे कार्यांत शिपाई होऊन लढाईच्या आघाडीस जावें या इतकी वैभवाची गोष्ट मला दुसरी कोणतीच वाटत नाहीं. इटलीचा जयजयकार असो.—इटलीचा जयजयकार असो." स्वदेशाभिमानी हृदयांत घुसणाऱ्या या शब्दांनींच ग्यारीबाल्डीची आज इतकीं वर्षें लावलेली सात्विक समाधी मोडली, व तोच जयशब्द घेऊन ग्यारीबाल्डी आपल्या अस्तन्या वर सारून व हातांत नंगी तरवार घेऊन कॅप्रेरा बेटावर चाळविलेल्या समंदाप्रमाणें पुनः एकवार उभा राहिला.

**लढाईस आमंत्रण**—हिंवाळ्यांतील एके दिवशीं सकाळीं एक अभावीत पाहुणा ग्यारीबाल्डीचे दारांत आला; व त्यानें तुम्हास कौन्ट कॅव्हूर यांनीं टयुरिन येथें बोलाविलें आहे, असा निरोप ग्यारीबाल्डीस कळविला. तेव्हां लागलीच ग्यारीबाल्डीनें हातांतील नांगर खालीं ठेवून तरवार घेतली व टयुरिन येथें जाण्याची तयारी केली. तेथें जाऊन पोंचतांच कौन्ट कॅव्हूर व ग्यारीबाल्डी यांची एकांतीं गांठ पडली, [illegible] तिजमध्यें ग्यारीबाल्डीकडे युद्धांत कोणती कामगिरी द्याव[illegible] स्वयं- ठरविण्यांत आलें. यापूर्वीं इतके दिवसांत कौन्ट [illegible] आपल्या ग्यारिबाल्डीची फारशी आठवण झाली नव्हती.[illegible] नांवाचें एक ईचा प्रसंग आला असें पाहून त्या शहाण्या मुत्सद्या[illegible] शिपा- बोलावणें ग्यारिबाल्डीस केलें. ग्यारिबाल्डीची खरी योग्यता, त्याचें शौर्य, त्याचें युद्धचातुर्य व विशेषतः त्याची लोकप्रियता, कॅव्हूर हा पूर्णपणें जाणून होता. ग्यारिबाल्डी हा नुसताच शूर सरदार नाहीं, तर तो सगळ्या लष्कराच्या अघाडीचें निशाण आहे, असें तो ह्मणे.

**प्रधानाशीं मुलाखत**—एके दिवशीं सकाळीं डोक्यावर रुंद टोपी व आंगांत लांबलचक असा तांबडा झगा

घातलेला, व हातांत एक भली मोठी काठी घेतलेला असा एक धिप्पाड पुरुष कौन्ट कॅव्हूरचे दारापाशी आला. तो आंत जाऊं लागतांच शिपायानें त्यास अटकाव केला. ग्यारीबाल्डी हा कांहीं केल्या आपलें नांव सांगेना व शिपाईही त्यास आंत सोडीना. होतां होतां शेवटीं खुद्द कौन्ट कॅव्हूरपर्यंत ती बातमी गेली व हा कोणी तरी एखादा विक्षिप्त माणूस कांहीं तरी मागण्यास आला आहे, असा तर्क करून त्यानें त्यास आंत बोलाविलें, व पाहतो तों ग्यारीबाल्डी. या मुलाखतीपासून कॅव्हूर व ग्यारीबाल्डी या दोघांसही समाधान वाटलें. परस्परांचें मनांत परस्परांबद्दल बहुमान तर होताच, परंतु या प्रसंगीं त्यांची एकमेकास फारच जरूरी होती. यानें आपणास एवढा मान देऊन जवळ केलें व स्वदेशाकरितां लढण्याची परवानगी दिली याबद्दल ग्यारीबाल्डीनें कॅव्हूरचे आभार मानिले, व कॅव्हूरनेंही त्याची [illegible]सा करून स्वयंसेवक शिलेदार व शिपाई जमवून ऑस्ट्रि-[illegible]द्ध तुह्मी लढाई करावी अशी राजाची इच्छा आहे [illegible]लें. एका गोष्टींत मात्र उभयतांचा मतभेद होता. [illegible]ग्यारीबाल्डीचे मनांत लुई नेपोलियन संबंधानें [illegible] तिटकारा व बेभरंसा होता, व लुई नेपोलियनला मदतीला घेऊन तर कॅव्हूर यानें ऑस्ट्रियाशीं युद्ध मांडिलें होतें. परंतु कॅव्हूर हा मुख्य प्रधान असल्यामुळें ग्यारीबाल्डीचे मतास कोण विचारणार? शिवाय ऑस्ट्रियाशीं युद्ध करणें या गोष्टी पुरतें तर दोघांचेंही एक मत होतेंच. यामुळें लुई नेपोलियनबद्दल भांडण वाढविण्याचें कारण नव्हतें.

**शिलेदारांची तयारी**—कॅव्हूरचे घरांतून बाहेर पडतांच ग्यारीबाल्डी हा आपले शिलेदार जमविण्याचे उ-

घोगास लागला. ग्यारीबाल्डी लढाईला निघणार असें कळतांच जिकडून तिकडून स्वयंसेवक शिपाई व शिलेदार जमूं लागले. सर्व इटलीभर या कामाकरितां सभा स्थापन केलेल्या असून त्यांचे गुमास्ते फेरिवाल्यांचे वेषानें गांवोगांव जात; जे व कोणी ग्यारीबाल्डीचे लष्करांत जाण्यास तयार असतील त्यांस कांहीं खुणेचे कागद देत. ते कागद दाखविले असतां सरहद्दीवर त्यांस अटकाव न होतां येतां यावें अशी व्यवस्था गुप्तपणें करून ठेवलेली होती. हे फेरिवाले गुमास्ते, वीस वीस, तीस तीस लोकांच्या टोळ्या तयार झाल्या ह्मणजे त्यांस नेमलेल्या ठिकाणीं व नेमलेल्या वेळीं जमवीत, व त्यांचे बरोबर आपला माणूस देऊन ट्यूरिन अगर जिनोव्हा येथें लष्करचे मुख्य छावणीस पाठवून देत. तेथें आल्यावर मग हवे तेवढे लोक सरकारी लष्करांत सामील करून बाकीचे ग्यारीबाल्डीचे हाताखालीं देण्यांत येत. या स्वयंसेवकांसंबंधानें सर्व प्रकारची मुक्त्यारी ग्यारीबाल्डीकडे सोंपविण्यांत आली होती. त्यानें स्वयंसेवकांच्या तीन मोठ्या पलटणी तयार केल्या, व आपल्या मुख्य लष्कराचा तळ डोंगर कठडीवर बेला या नांवाचें एक गांव होतें तेथें दिला. ग्यारीबाल्डीचे शिलेदारांमध्यें व शिपायांमध्यें अठरा पगड जातींचे व बहुतेक सर्व राष्ट्रांतील लोक होते असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यावेळीं युरोपखंडांत व अमेरिकेंत ज्याला म्हणून युद्ध करण्याची हौस आली असेल किंवा ज्या ज्या म्हणून तरुणांचे कानांत स्वातंत्र्याचें वारें शिरलें असेल त्या सर्वांचें कौतुक करण्यास, व कोड पुरविण्यास ग्यारीबाल्डी हें मायपोट सदा तयार होतेंच. त्याचे हाताखालीं लढणें हा त्या काळीं एक प्रकारचा बहुमान गणला

जात असे; एवढेंच नव्हे, तर गनिमी कावा शिकण्याची एकच शाळा सर्व युरोपांत असून तिचें नांव ग्यारीबाल्डी हें होतें. अ

**स्वतंत्र अधिकाराची प्राप्ती**—ग्यारीबाल्डीनें आपलें लष्कर तर उभारलेंच, परंतु त्यास राजाकडून जी मदत व्हावयास पाहिजे होती ती झाली नाहीं. याचें कारण असें कीं, सरकारी लष्कराचे मुख्य अधिकारी ग्यारीबाल्डीचा हेवा व द्वेष करीत. त्याचे कीर्तीमुळें त्यांस एक प्रकारची स्वाभाविक असूया वाटे व शिवाय अनियंत्रित स्वयंसेवकांचें लष्कर राखणें हें त्यांस मुळींच पसंत नसे. त्यांचें ह्मणणें असें होतें कीं, अशा प्रकारचे स्वयंसेवक उच्छृंखळ होऊं दिल्यानें त्यांचा संपर्क नियमबद्ध लष्करांतील लोकांस लागतो; व त्यापासून सर्व लष्करी शिस्तीस व अमलास धक्का बसतो. या ह्मणण्यांत थोडा बहुत सत्याचा अंश असला तरी एवढें मात्र खरें कीं, राजाच्या हुकमानें ग्यारीबाल्डीस स्वयंसेवकांचें लष्कर उभारून लढण्यास मुखत्यारी मिळाली असल्यामुळें त्यांनीं आपलीं सर्व मतें एका बाजूस ठेवून ग्यारीबाल्डीस योग्य ती मदत करावयास पाहिजे होती; परंतु त्यांनीं तसें न करितां त्यास उलट उपद्रव केला. लष्कर-ची शिधासामुग्री, हत्यारपात्यार व इतर सामानसुमान ग्यारीबाल्डीस वेळचेवेळीं पोंचत नसे, एवढेंच नव्हें; तर मुख्य हुकमत सरकारी सरदारांकडे असल्यामुळें त्यांनीं ग्यारीबाल्डीस व त्याचे लोकांस वरचेवर निरनिराळे हुकूम देऊन इकडून तिकडे व तिकडून इकडे असें हेलपाटे घालावयास लाविलें. यामुळें त्या स्वातंत्र्यप्रिय लोकांस अतिशय त्रास व संताप येऊन गेला. शेवटीं खुद्द राजाचे कानांवर ही गोष्ट ग्यारीबाल्डीनें समक्ष जाऊन घातली; व त्याकडून स्वतंत्रपणें हुकमत चालविण्याची त्यास परवानगी मिळाली. ती देतांना

व्हिक्टर ए-मॅन्युएल किंचित् हंसून ग्यारीबाल्डीस ह्मणाला, "तुह्मीं खुशाल वाटेल तिकडे जा, व वाटेल तसें युद्ध करा. तुह्मांस ह्मीं बिलकुल आडकाठी करणार नाहीं. मात्र मला इतकें च वाईट वाटत आहे कीं, तुमच्या सारख्या सरदाराच्या हाताखालीं लढण्यास मला मोकळीक नाहीं." स्वतंत्रपणें लढण्याची परवानगी मिळाली हें ऐकून स्वयंसेवकांच्या सैन्यास पराकाष्ठेचा आनंद झाला, व पुढें पांच तासांचे आंतच ग्यारीबाल्डीनें आपलें लष्कर घेऊन कूच केलें. गनिमी–काव्याचे लढाईस सुरवात केल्यामुळें पूर्वींच्या नेमस्त हालचाली आतां अर्थातच बंद पडल्या, व यापुढें ग्यारीबाल्डीच्या भरारी मारणाऱ्या मनामध्यें जसजशा प्रचंड व धाडसी कल्पना येत गेल्या त्या प्रमाणें सिद्धीस नेण्याकरितां, क्षणोक्षणीं निरनिराळ्या ठिकाणीं प्रकट होणाऱ्या विद्युत्पाताप्रमाणें, आपले सैन्याकडून तो चपळ हालचाली करूं लागला. मे महिन्याचे ९ वे तारखेस ग्यारीबाल्डी व्हेरूआ नांवाचे गांवीं जाऊन पोंचला. त्या रात्रीं ग्यारीबाल्डीनें तळ देऊन खुशाल झोंप घेतली. आसपास लष्करचा तळ उघड्या मैदानांत पडलेला असून त्याचे शिपाई मोठमोठ्या आगट्या पेटवून त्यांचे भोंवतीं चैनीनें गप्पा मारीत, डुलक्या घेत व चिलीम पीत बसले होते. दक्षिण अमेरिकेंत असतांना अरण्यामध्यें जे बहारीचे दिवस त्यानें घालविले त्याची या प्रसंगीं त्यास पुनः एकवार आठवण झाली. दुसरा दिवस उजाडतांच लढाईच्या उद्योगास तो लागला. असो; या पुढें युद्धासंबंधानें जी हकीकत झाली ती अनुक्रमवार व नांवें गांवें सुद्धां देत बसलों तर फार कंटाळवाणी होईल, याकरितां ग्यारीबाल्डीनें ध्यानांत ठेवण्यासारखे जे जे पराक्रम केले त्यांचेंच मात्र यापुढें थोडक्यांत वर्णन येथें देतों.

**ग्यारीबाल्डीचा पराक्रम**—शत्रूस फसविण्याची कच की ग्यारीबाल्डीस फार उत्तम साधली होती. लॉंबर्डीचे मुलु ाडे जातांना वाटेंत ॲरोना नांवाच्या एका गांवीं त्यानें संध्याका क तळ दिला; व त्यानें इतकें कांहीं सामान सुमान मागविलें व घर वयारांची व्यवस्था केली कीं, तिजवरून त्याचा त्या ठिकाणीं पां रक चार महिने तरी तळ पडणार असें कोणासही वाटलें असतें. पण मध्य रात्र उलटती न उलटती तोंच सगळें लष्कर ानें एकदम हालविलें; व कॅस्टेलेटो या नांवाच्या वर आगाऊ कांहीं होड्या गुप्तपणें जमविण्यांत आ ा होत्या त्या ठिकाणीं तो रातोरात जाऊन पोंचला, व त्या होड्यांतून आपलें सर्व सैन्य शिरला. दुसरे दिवशीं सकाळीं त्यानें सर्व लॉंबर्डीच्या लोकांस एक जाहिरनामा काढिला. तो असा होता:—“ चला उठा; आपापलीं हत्यारें घ्या. देशाची गुलामगिरी आतां संपविलीच पाहिजे. ज्याला हत्यार धरतां येत असेल त्यानें तें उचललेंच पाहिजे. नाहीं तर तो देशद्रोही गणला जाईल. इटलीचे सर्व पुत्र एकत्र होतील तर ईश्वरानें इटलीस जी सुस्थिति प्राप्त होण्याचें लिहून ठेविलें आहे, ती मिळण्यास घटकेचा तरी उशीर लागेल काय? ” हा जाहिरनामा वाचतांच लोकांस आवेश चढला, व आपणावर ऑस्ट्रियन सैन्य येत आहे असें माहीत असूनही झुंडीच्याझुंडी जमून त्यांनीं ग्यारीबाल्डीचें स्वागत केलें. व्हॅरिसिया गांवीं तर घरोघरीं ग्यारीबाल्डीचे शिपायांस बोलावून नेऊन लोकांनीं मेजवान्या चालविल्या. दुसरे दिवशीं ऑस्ट्रियाचें सैन्य येत आहे असें कळतांच लोकांनीं गांवाभोंवतीं लांकडी तट बांधिले, व लढाईच्या प्रसंगीं ग्यारीबाल्डीनें उत्पन्न केलेल्या स्फुरणामुळें ते इतक्या शौर्यानें लढले कीं,

ऑस्ट्रियन सरदार जनरल अर्बन याच्या तोफखान्याचें कांहीं न चालून त्यास परत हटावें लागलें. तेथून पुढें ग्यारीबाल्डी कोमो शहरीं जावयास निघाला. वाटेंत ऑस्ट्रियन सैन्य असेल याची त्यास कल्पना नव्हती. परंतु या सुमारास एका शूर स्त्रीनें ऑस्ट्रियन सरदाराचीं कांहीं पत्रें वाटेंत पकडून तीं ग्यारीबाल्डीस आणून दिलीं. त्यामुळें त्यास सावध राहतां आलें; व कोमो या ठिकाणींही त्यानें ऑस्ट्रियन सैन्याचा पुनः एकवार पराभव केला. यामुळें कोमो येथील लोक आनंदानें वेडे होऊन जाऊन त्यांनीं ग्यारीबाल्डीचा जयजयकार केला. असो; कोमो शहरची तटबंदी करून व्हॅरिसि येथें परत येत असतां ग्यारीबाल्डीचे हातून एक मोठी चूक झाली. व ती सुधारण्यास त्याचे आंगीं प्रसंगावधान नसतें तर त्यास कदाचित् शत्रूचे स्वाधीनही व्हावें लागलें असतें. कोमोहून परत येतांना ऑस्ट्रियन सैन्य कोठें कोठें आहे याचा पुरा तलास न केल्यामुळें एके दिवशीं सकाळीं तो मॉंटिसॅक्रो या नांवाच्या टेंकडीवर येऊन पोंचला; व खालीं पाहतो तों आस्ट्रियाचे सैन्य शिस्तीनें व लढाईच्या तयारीनें उभें राहिलें होतें. ग्यारीबाल्डी टेंकडीवर आला असें कळतांच जनरल अर्बन यानें तिला वेढा दिला, व त्यास पकडण्याची त्याला इतकी खातरी वाटली कीं, त्यानें ग्यारीबाल्डीस उद्याचे दिवसांत जिता किंवा मेलेला धरून आणितों अशी मिलन येथें तार पाठविली; व त्याप्रमाणें पहिल्या हल्ल्यांत ग्यारीबाल्डीचा मोड होऊन त्यास माघारही घ्यावी लागली. मात्र त्या प्रसंगीं त्याचे प्रसंगावधानानें त्यास हात दिला. त्यानें अशी खुबी केली कीं, नेपोलियन व व्हिक्टर एमॅन्युएल यांचे नांवची एक तार केली. त्यांत "माझा मोड होऊन माझी पिच्छेहाट

झाली आहे, "या करितां माझ्या मदतीस घोडेस्वारांची एक तुकडी पाठवून द्या " असें लिहिलें होतें. ही तार त्यानें अशा रीतीनें पाठविली कीं ती ऑस्ट्रियन सरदाराचे हातीं हटकून पडावी. वास्तविक आपल्या मदतीस येण्यासारखे घोडेस्वार जवळपास नव्हते हें त्यास पक्केपणीं माहीत होतें; परंतु त्यानें केवळ शत्रूस फसवण्याकरितांच ही तार लिहिली होती. ग्यारीबाल्डीची ही युक्ती सोळा आणे साधली. जनरल अर्बनचे शिपायांनीं ती तार वाटेंत पकडून त्याजकडे नेली. व तिजवरून ग्यारीबाल्डी आहे तेथेंच मुकाम करून राहणार असें त्यास वाटलें. इकडे रात्र पडतांच ग्यारीबाल्डीनें भल्या मोठ्या आगट्या जिकडे तिकडे पेटविल्या; व त्यांच्या पुढून शत्रूस कळून येईल अशा रीतीनें इकडे तिकडे उगीच फिरण्यास आपल्या लोकांना त्यानें हुकूम दिला. इतक्यांत मोठें वादळ सुरू झालें, विजाही चमकूं लागल्या व मेघ गर्जनेचा गडगडाट पर्वताच्या खोल दऱ्याखोऱ्यांतून होऊं लागला. ही संधी साधून ग्यारीबाल्डीनें आपलें सर्व सैन्य एकत्र केलें, व डोंगराखालीं तो उतरला, आणि ऑस्ट्रियन सैन्याचें अगदीं तळाजवळून गेला तरी त्यांस त्याची दाद मुळींच लागली नाहीं. संकटांतून एकदां पार पडल्यावर मग स्वस्थपणें रात्रभर घांटांतून व दऱ्यांतून वाट चालून, सकाळीं इकडे ऑस्ट्रियन सैन्य त्याजवर हल्ला करण्याचे तयारीस लागणार, त्या सुमारास कित्येक कोसांवर कोमो येथें तो सुखरूप जाऊन पोंचला सुद्धां.

**सोलफेरीनोची लढाई**—अशा रीतीनें गनीमीकावा अंगिकारून ग्यारीबाल्डी हा आश्चर्यानें थक्क करून सोड-

मॉडि[illegible] पार्मा वगैरे लहान लहान संस्थानांचे राजे या युद्धा- [illegible] सैन्यानेंही लढाईचा बराच नेट लाविला आणि त्यांचे सैन्यांपुढें ऑस्ट्रियाचें सैन्यास पीछेहाट करावी लागली असून खुद्द ऑस्ट्रियाचे मुलखांतच आतां लढाया होऊं लागल्या. तेव्हां ऑस्ट्रियाचा तरुण बादशाह जोसेफ हा स्वतः पुढें सरसावला व आपल्या सैन्याचें आधिपत्य त्यानें आपलें हातीं घेतलें. परंतु त्याचा विशेष उपयोग झाला नाहीं. कारण पुढें लवकरच सोलफेरिनो या ठिकाणीं जूनचे २४ वे तारखेस दोन्ही सैन्यांची गांठ पडून तुमुल युद्ध झालें, व त्यांत ऑस्ट्रियाचा पुरा पराभव झाला. या युद्धांत एके बाजूस स्वतः फ्रॉन्सिस जोसेफ व दुसरे बाजूस फ्रान्सचा बादशाह लुई नेपोलियन व पिड्माँडचा राजा व्हिक्टर ए-मॅन्युएल असे तीन मोठे राजे हजर होते. ऑस्ट्रियाचें सैन्य १,७०,००० असून फ्रान्स व इटली यांच्या संयुक्त सैन्याची संख्या १,९०,००० वर होती. अशीं हीं प्रचंड सैन्यें युद्धास सज्ज झालेलीं असल्यामुळें व त्या दिवशींचें युद्धही मोठें निकराचें झाल्यामुळें दोन्ही बाजूस फारच प्राणनाश झाला. सुमारें ४०,००० लोक त्या दिवशीं त्या रणभूमीवर मरून पडले असावे असें ह्मणतात. सोलफेरीनोची लढाई इतिहासांतील मोठ्या लढायांमध्यें गणलेली आहे. या मोहिमेचे प्रारंभापासूनच ऑस्ट्रियाचे मागें अपयश लागलेलें होतें, व या पराभवामुळें तर ऑस्ट्रियाची पुनः कांहीं दिवस डोकें वर निघूं नये अशी दुर्दशा झाली असें ह्मणण्यास हरकत नाहीं. तेव्हां अर्थात या सर्व तंट्याचें मूळ कारण जी इटलीची स्वतंत्रता ती सिद्ध होणार असें सर्वांस वाटूं लागलें, व हें संयुक्त सैन्य जर ऑस्ट्रियाचे सैन्याचा तसाच पाठलाग करून त्याचा

झाली आहे," या करितां माझ्या मदतीस घोडेस्वारांची [illegible] तकडी [illegible] बाणाचे घटकेस नेपोलिय[illegible] [illegible]पला पाय मागें घेतला.

**नेपोलियनचें कपट व तह**—त्याचा या युद्धांत शि[illegible]यांत मुख्य हेतु कोठें तरी युद्धांत जय मिळवून फ्रेंच लोकांवर छाप पाडावी व धाडसानें व एक प्रकारच्या लबाडीनें मिळविलेल्या आपल्या बादशाहीचा पाया भक्कम करावा असा होता, व तो सोलफेरिनोच्या लढाईनें पूर्ण साधला होता. दुसरें असें कीं, आज जरी एवढें मोठें नांव मिळालें आहे तरी तें यापुढें असेंच युद्ध चालविलें असतांही टिकेल असा काय नेम? युद्धांमध्यें जयापजय हीं एकामागून एक येणारीं आहेत व आज जरी ऑस्ट्रियाचे मदतीस कोणतेंही युरेपियन राष्ट्र आलेलें नाहीं, तरी ऑस्ट्रियाची दुर्दशा झालेली पाहून कोणी तरी सकारण किंवा अकारण बंधु त्यास मदत करण्यास उभा राहणार नाहीं कशावरून? तेव्हां थोड्यांत गोडी मानून, साधलें तितकेंच सई, असा त्यानें पोक्त विचार केला. शिवाय सर्व इटली स्वतंत्र करणें ह्मणजे पोपची सत्ता झुगारून देण्यासारखें होय; व पोपच्या अनुकूलतेचें स्वतःस सहाय्य आहे, तें गमावावें लागेल, याकरितां त्या भानगडींत न पडतां येथूनच माघार घ्यावी असें त्यानें ठरविलें, व त्याप्रमाणें व्हिक्टर ए-मॅन्युएल याचे अनुमोदनाची वाट न पाहतां आपल्या जबाबदारीवरच त्यानें ऑस्ट्रियाचे बादशहाशीं तहाचें बोलणें लाविलें. उभयतां बादशाहांची मुलाखत होऊन व्हिलाफ्रँका या ठिकाणीं करारनाम्यावर सह्या पडल्या. या तहांत असें ठरलें कीं, लॉंबर्डी प्रांत व्हिक्टर ए-मॅन्युएलचे राज्यास जोडावा, व तेथून ऑस्ट्रियानें आपलें सर्व सैन्य काढून घ्यावें.

मॉडिना, पार्मा वगैरे लहान लहान संस्थानांचे राजे या युद्धा-
मुळें भिऊन पळून गेले होते, त्यांस परत आणून त्यांचे
गादीवर स्थापावें; व त्यांजकडून अवश्य त्या राजकीय
सुधारणा अमलांत आणण्याचा करार करून घ्यावा. व या
सर्व कामगिरीबद्दल सॅव्हॉय व नाईस हे दोन प्रांत पिड-
मॉंटचे राज्यांत होते ते फ्रान्सला जोडण्यांत यावे. नेपोलियन
हा जबरदस्त असल्यामुळें व्हिक्टर ए-मॅन्युएल यास हा तह
निमूटपणें मान्य करावा लागला, परंतु त्याचा प्रधान कौंट
कॅव्हूर व त्याचप्रमाणें ग्यारीबाल्डी व मॅझिनी व इतर सर्व
राष्ट्रभक्त यांना तो मुळींच आवडला नाहीं. तसेंच टस्कनी,
पार्मा, मॉडिना, रोमॅना वगैरे संस्थानांतील लोकांचे मनांत
स्वतंत्रतेच्या आशेचा जो अंकूर या युद्धामुळें उत्पन्न झाला
होता, तो या तहामुळें करपून जाण्याची भीति उत्पन्न झाली
यामुळें त्यांनाही तो पसंत नव्हता. अशा रीतीनें लढाईचा
शेवट झालेला कोणासच आवडला नाहीं. स्वतः व्हिक्टर
ए-मॅन्युएल यास तरी तो आवडला होता असें नाहीं; कारण एक
तर त्याच्या घराण्याचें मूळ स्थान जें सॅव्हॉय तें आज कायमचें फ्रा-
न्सचे ताब्यांत जाणार होतें; व दुसरें असें कीं, सर्व इटली स्वतंत्र
करण्याच्या हेतूनें त्यानें तरवार उपसलेली असून तिला आतां-
पर्यंत बरेंच यश आलें होतें, व पुढील मार्गही खुला होता,
असें असतां केवळ परेच्छेनें तिला प्रतिबंध होऊन परत
म्यानांत जावें लागत होतें. या सर्व गोष्टी खऱ्या, परंतु
त्याचा कांहीं इलाज चालण्या सारखा नव्हता, यामुळें त्याला

गप्प बसावें लागलें.* ग्यारीबाल्डी तर हा तह ऐकून क्रोधानें बेफाम होऊन गेला. त्या सर्वांत वाईट गोष्ट ही होती की, त्याची आवडती जन्मभूमि जें नाईस शहर तें जन्मापासून शत्रुवत् मानलेल्या फ्रान्सच्या ताब्यांत जात्रयाचें होतें. परंतु व्हिक्टर ए-मॅन्युएलनें तह कबूल केल्यामुळें ग्यारीबाल्डीचें कांहीं चालेना.

**ग्यारीबाल्डीचा बहुमान**—लढाई संपतांच अर्थातच ग्यारीबाल्डीच्या स्वयंसेवक सैन्याचें फारसें कारण उरलें नाहीं. सरकारी लष्करचे प्रमुख सरदारास ग्यारीबाल्डी व त्याचें सैन्य याजबद्दल एक प्रकारचा हेवा व तिरस्कार वाटत असे, असें मागें सांगण्यांत आलेंच आहे. व त्याचे लोकांनीं अमुकच तऱ्हेनें वागावें, अमुक करूं नये, अमुक प्रकारची रोज कवाईत करावी, वगैरे हुकूम सुटूं लागले. वास्तविक पाहतां सर्व युद्धांत या स्वातंत्र्यप्रिय सरदाराचें स्वतंत्र सैन्यानें आपल्या गनीमी काव्याचे जोरावर जसे पराक्रम केले होते तसे आपल्या शिस्तीची व नियमबद्ध कवाईतीची ऐट मारणाऱ्या सरकारी सैन्याचे हातूनही झाले नव्हते. असें

---

*कौंट कॅव्हूर यानें या सर्व लढाईचा घाट घडवून आणलेला असल्यामुळें त्याला हा अर्धवट स्थितींत झालेला तह पाहून आपलें सर्व कारस्थान फुकट गेलें असें वाटून तो चवताळून गेला. व त्या आवेशांत त्यानें राजाची निर्भर्त्सना केली. कित्येकांचें मत असें आहे की, मुद्राराक्षस नाटकांतील कुटिल चाणक्यनीतीच्या भांडणांतलेंच हें भांडण असून कशी तरी वेळ मारून नेण्याकरितां व्हिक्टर ए-मॅन्युएल व कॅव्हूर यांनीं संगनमतानें भांडण केलें. कसेंही असलें तरी राजावर या तहाबद्दल रागावून कॅव्हूर राजीनामा देऊन घरीं बसला, ही गोष्ट निर्विवाद आहे.

असतां कारण संपल्याबरोबर त्यांच्या मागें कांहीं तरी दुष्ट लावून त्यांना नाउमेद व हताश करणें ह्मणजे एक प्रकारचा कृतघ्नपणाच होता. ग्यारीबाल्डीनें केलेल्या कामगिरीची किंमत व्हिक्टर ए-मॅन्युएल यास माहीत नव्हती असें नाहीं. कारण त्यानें त्या कामगिरीबद्दल त्यास आपल्या हातची शिकारीची एक बंदुक नजर केलेली असून, लष्करांतील मानाची एक जागा व कांहीं वार्षिक उत्पन्न असें त्यास करून दिलें होतें. परंतु स्वयंसेवकांचे वागवणुकी संबंधानें लष्करी अंमलदारांचें ह्मणणें ऐकणें त्यास भाग पडे. सोलफेरिनोची लढाई व व्हिला-फ्रँकाचा तह यांचे दर्म्यान ग्यारीबाल्डीनें आणखी बरेच पराक्रम केले होते; व तोच क्रम पुढें चालवून व्हिनेशिया व मध्य इटलींतील कांहीं संस्थानें काबीज करण्याचा त्याचा विचार होता; परंतु मध्यंतरीं तह झाल्यानें त्याची नाउमेद झाली. या तहामुळें उत्पन्न झालेल्या उद्विग्नतेनें व स्वतंत्रपणानें आपल्या जबाबदारीवर यापुढें वागतां यावें, अशा हेतूनें त्यानें आपल्या सरकारी लष्करी जागेचा एकदम राजीनामा पाठवून दिला. परंतु व्हिक्टर ए-मॅन्युएल हा तो राजीनामा स्वीकारीना. त्यानें त्यास लिहिलें कीं, "इटलीस आपली व आपल्या पलटणांची अद्याप गरज आहे. या करितां आपणांस राहिलेंच पाहिजे." ग्यारीबाल्डीचे मनांत व्हिक्टर ए-मॅन्युएलविषयीं पूर्वीपासून बराच आदर असे, व नुकत्याच झालेल्या युद्धांत स्वतः समरांगणामध्यें हजर राहून त्यानें जें शौर्य प्रगट केलें त्यामुळें तो आदर दुणावला होता. यास्तव त्याची अवज्ञा करून आपलेंच ह्मणणें शेवटास नेण्याचें त्याचे हातून होईना; व त्यानें आणखी कांहीं दिवस आपल्या जागेवर राहण्याचें कबूल केलें.

# भाग १२.

## राजकारणाचें नवीन धोरण.

तटस्थः स्वानर्थान् विघटयति मौनंच भजते ॥

**मुद्राराक्षस.**

**नवें धोरण**—यापुढें लवकरच राजकारणास पुनः नवीन धोरण येऊं लागलें. राजा व्हिक्टर ए-मॅन्युएल याचा राजकीय बाबतींतील उदारपणा व स्वदेशाभिमान असें पाहून इटलींतील निरनिराळ्या संस्थानांच्या लोकांचीं मनें त्यांच्या जुलमी व स्वदेशभिमानशून्य राजांवरून उडून व्हिक्टर ए-मॅन्युएल याजकडे वेधूं लागलीं. विशेषतः ग्यारीबाल्डी यानें नुकतेच पराक्रम करून दाखविले होते, व आपल्या कांहीं बांधवांना स्वतंत्रता मिळवून दिली होती, यामुळें तो आपल्या मदतीस येईल तर आपल्यासही स्वतंत्रता मिळवून देईल अशी त्यांची खात्री झाली होती. व्हिलाफ्रँका येथील तह होऊन शांततेचा अंमल बसतो न बसतो, इतक्यांत इटलींतील कित्येक शहरांनीं बंडें करून व्हिक्टर ए-मॅन्युएलचे राज्यास सामील होण्याची इच्छा उघडपणें दर्शविली. याच सुमारास मॅझिनीनें सिसिलीमध्यें लोक पाठवून आपल्या मतांचा प्रसार करण्यास सुरवात केली. जिकडे तिकडे गुप्तपणें सभा भरूं लागल्या, व जो तो चोरून मारून हत्यारें जमविण्याच्या मार्गास लागला. इकडे ग्यारीबाल्डीचे मित्रांनीं ऑस्ट्रियाशीं झालेल्या लढाईचे वेळीं सरकारी लष्करांत जागा पत्करल्या होत्या, त्यांचे भडाभडा राजी-

नामे देऊन टाकले; व आपल्या हाताखालीं स्वतंत्रपणें युद्ध करण्यास ते तयार झाले हें पाहून ग्यारीबाल्डीनें निरनिराळे जाहिरनामे प्रसिद्ध करून लोकांत चळवळ सुरू केली, व फिरून एकवेळ आपल्याच जबाबदारीवर लढाई सुरू करण्याचा आपला इरादा त्यानें जाहीर केला.

**कौन्ट कॅव्हूरची धूर्तता**—अशा रीतीनें चोहोंकडे स्वदेशाभिमानाचा एकच संचार झाल्यामुळें व्हिक्टर ए-मॅन्युएल राजालाही त्या ओघाबरोबर जाणें भाग पडलें. कौंट कॅव्हूर रागावून सहा महिने घरीं बसला होता त्यास त्यानें परत बोलाविलें; कारण नवीन राजकारणाचें धोरण संभाळण्यास दुसरा कोणीच समर्थ नव्हता. कौंट कॅव्हूर यानेंही प्रसंग पाहून प्रधानकीचें काम फिरून हातीं घेतलें. इटलींतील निराळ्या शहरांनीं बंडें करून व्हिक्टर ए-मॅन्युएलचे राज्यास सामील होण्याची इच्छा प्रकट केली होती, हें वर सांगितलेंच आहे. अशा शहरांपैकीं सिसिलीच्या राजधानीचें शहर नेपल्स हें प्रमुख होतें; व ग्यारीबाल्डीनेंही सिसिलीवर स्वारी करून नेपल्स येथील लोकांच्या मदतीनें तें संस्थान काबीज. त्याफरून व्हिक्टर ए-मॅन्युएलचे राज्यास जोडण्याचा बेत केला होता. या वेळीं कॅव्हूर याची स्थिति मोठी चमत्कारिक झाली होती. इकडे ग्यारीबाल्डीस उघड मदत करावयाची ह्मटली तर सिसिलीवरच्या स्वारींत फारसें यश येण्याचा संभव दिसत नव्हता; कारण, ग्यारीबाल्डीजवळ फक्त एक हजार शिलेदार कायते होते. एवढ्यानें सिसिलीच्या सैन्याशीं टक्कर कशी देववणार? शिवाय नेपल्सचे राज्यास युरोपांतील फ्रान्स व ऑस्ट्रिया या राष्ट्रांकडून मदत होण्याचा संभव होता. परंतु दुसरे पक्षीं पहातां ग्यारीबाल्डीस व त्याच्या

बिथरलेल्या शिलेदारांस प्रतिबंध करणें हेंही काम तितकेंच बिकट होतें. ग्यारीबाल्डी हा लोकांस यावेळीं इतका प्रिय झालेला होता कीं, त्याजवर सक्ती करून प्रतिबंध करण्याकरितां हात उचलला असतां कदाचित् लोक बंड करून व्हिक्टर ए—मॅन्युएल राजासच पदच्युत करतील हें त्यांस पूर्णपणें माहीत होतें. अशा वेळीं बेफाम झालेल्या घोड्यास होतां होई तों स्वेच्छेनें धावूं द्यावें व अगदीं प्राणावरच बेतेल तेव्हां निरुपाय ह्मणून त्याजवर हात टाकावा, अशा तऱ्हेचें धोरण पत्करण्याशिवाय कॅव्हूर यास गत्यंतर नव्हतें. व त्या धूर्त मुत्सद्यानेंही त्याच धोरणाचें अवलंबन केलें हें सांगावयास नको.

**दुटप्पी हुकूम**—ज्या वेळीं ग्यारीबाल्डीची फौज स्वारीवर निघाली त्यावेळीं कॅव्हूर यानें सरकारतर्फे ॲडमिरल परसॅनो या नांवाचा आरमारावरील अधिकारी त्याचे मागोमाग पाठविला. त्यास दिखाऊ व गुप्त असे दोन प्रकारचे हुकूम देण्यांत आले होते. दिखाऊ हुकमाप्रमाणें पाहतां त्यास अशी आज्ञा होती कीं, ग्यारीबाल्डी हातीं लागतांच त्यास एकदम कैद करून परत आणावें व अशा रीतीनें ह्मासेली वरील स्वारीस प्रतिबंध करावा. परंतु गुप्त हुकूम असा होता कीं, परसॅनो यानें ग्यारीबाल्डी काय काय करतो यावर फक्त सूक्ष्म नजर ठेवून अगदीं आयत्यावेळीं शक्य असेल ती त्यास मदतही करावी. तात्पर्य, ग्यारीबाल्डीचा विजय किंवा पराभव यांपैकीं कोणतीही गोष्ट होवो तिचा फायदा स्वराज्यास करून घ्यावयाचा असा त्यानें घाट घातला. इकडे अशी बेमालुम व्यवस्था केल्यानंतर परराष्ट्रांचीं तोंडें कशीं बंद करावयाचीं या विचारास तो

लागला. कारण ग्यारीबाल्डीचे स्वारीच्या योगानें व्हिलाफ्रँका येथील तहाचे विरुद्ध, सर्व युरोपाच्या शांततेचा भंग होत आहे, अशी सर्व राष्ट्रांनीं कुरकुर करण्यास सुरवात केली होती, व त्यांपैकीं एखाद्यानें जर कां कंबर बांधली तर त्याचे योगानें ग्यारीबाल्डीची स्वारी फसेल एवढेंच नव्हे, तर इटलीची स्वतंत्रता हें जें मुख्य कार्य त्यासही धोका येईल अशी भीति बाळगण्यास कारण होतें.

**इंग्लंडची मदत**—या विकट प्रसंगीं कॅव्हूर यास इंग्लंडचें मात्र थोडेंसें पाठबळ मिळालें व त्याचा उपयोगही झाला. इंग्लंडनें या ग्यारीबाल्डीचे स्वारीस जी किंचित् अनुकूलता दाखविली तिचें एक कारण असें होतें कीं, या पूर्वीं कांहीं वर्षें ग्लॅडस्टन साहेब फिरत फिरत नेपल्स येथें गेले होते, तेथील जुलमी राजसत्तेचें भयंकर स्वरूप त्यानीं आपल्या डोळ्यांनीं पाहिलें होतें, व इंग्लंडास परत गेल्यावर त्यांनीं या भयंकर स्थितीचें जें वर्णन केलें, त्यामुळें सर्व राष्ट्राचीं मनें नेपल्सच्या राजाविरुद्ध अत्यंत क्षुब्ध होऊन गेलेलीं होतीं. अर्थात् त्या विरुद्ध जो कोणी शस्त्र धरील त्याजबद्दल इंग्लिश लोकांचे मनांत सहानुभूति उत्पन्न होणें हें स्वाभाविकच होतें. यावेळीं इंग्लंडचा मुख्य प्रधान लॉर्ड जॉन रसेल हा होता, व त्यानें सर जेम्स हडसन यास लिहितांना खालील प्रमाणें उद्गार काढले होते. “जेव्हां एखाद्या देशांतील लोक योग्य कारणाकरितां आपल्यावर जुलूम करणाऱ्या राजाविरुद्ध शस्त्र उचलतात त्यावेळीं अशा शूर लोकांस स्वातंत्र्य परत मिळवून देण्याचे कामीं मदत करणें हें न्यायबुद्धीचें व औदार्याचें लक्षण आहे.” इंग्लंडनें नेट धरल्यामुळें लुई नेपोलियन, यानें सिसिलीवरील स्वारीस

प्रतिबंध करण्याचें मनांत आणलें होतें तें सोडून दिलें व आपल्यास त्रास किंवा खर्च न पडतां परस्पर इटलीचें कार्य साधत आहे तर तें साधेना कां, अशा बुद्धीनें तो तटस्थ राहिला असावा. ऑस्ट्रियाचे राजाचा नुकताच पराभव झाला असल्यामुळें त्यास या प्रसंगीं मूग गिळून स्तब्ध बसावें लागलें होतें, व बाकीच्या युरोपियन राष्ट्रांना सिसिली गेली किंवा राहिली तरी त्याबद्दल बरें वाईट वाटण्याचें कारणच नव्हतें.

**स्वारीची तयारी**—इकडे ग्यारीबाल्डीनें आपले लोक जमविले, व गुप्तपणें हत्यारें जमविण्याचेंही काम चालू ठेवलें. यांपैकीं कांहीं हत्यारें सरकारी हुकमावरून जप्त करण्यांत आलीं; तथापि मागें सांगितल्याप्रमाणें कॅव्हूरनें सिसिलीवरील स्वारीचे बाबतींत ‘नरोवा कुंजरोवा’ असें ह्मणण्याचा प्रथम पासूनच घाट घातला असल्यामुळें ग्यारीबाल्डीचे मार्गांत ह्मणण्यासारखें विघ्न आलें नाहीं. तारीख ९ मे १८६० चे सुमारास ग्यारीबाल्डीबरोबर निघण्यास सुमारें एक हजार लोक सज्ज झाले. यांपैकीं सुमारें चार सवा-चारशें लोक घरचे खाऊन पिऊन सुखी, इभ्रतदार व सुशिक्षित असे होत. शिपाईगिरी हा त्यांचा धंदा नव्हता; तथापि त्या वेळीं लोकांत असाच कांहीं आवेश संचरला होता कीं, ज्यानें जन्मांत कधीं शिपाईगिरी केली नव्हती, त्यासही लढाईवर जाऊन झालें तर कांहीं देशकार्य करावें असें स्फुरण चढलें होतें. ग्यारीबाल्डीचे हे हजार लोक इतिहासामध्यें प्रसिद्ध होऊन राहिले आहेत. त्यांनीं कामगिरीच तशी केली. फक्त एक हजार लोकांनीं सिसिलीवर स्वारी करणें ह्मणजे निव्वळ वेडेपणा होय असें कोणीही म्हटलें असतें. परंतु जेव्हां मरणाची भीति मनांतून नाहींशी होते व स्वदेशाभिमा-

त्याची पवित्र ज्योति अंतःकरणांत प्रदीप्त होते, तेव्हां निवळ संख्येवरून कर्तृत्वाची कल्पना करीत बसणें हें चुकीचें ठरतें. असो; ग्यारीबाल्डीनें निघण्यापूर्वी व्हिक्टर ए-मॅन्युएल राजास एक आदरपूर्वक पत्र पाठविलें. त्यांत त्यानें असें लिहिलें होतें:— "महाराज जर सुदैवानें मला या स्वारींत यश आलें, तर सिसिली आपल्या राज्यास जोडून सरकारच्या मुगुटास एक अत्यंत मौल्यवान रत्न माझ्या हातून जडलें गेलें असें मीं भूषण मानीन." तारीख ४ मे रोजीं जिनोआचे आसपासचे किनाऱ्यावर हे हजार शूर शिपाई पसरले होते. कित्येकांनीं अंगांत तांबडे झगे घालून व आपलें तुटपुंजी सामान बरोबर घेऊन किनाऱ्यावरील खडकावरच एकेक दिवस अगाऊ तळ दिला होता.

**जाहीरनामा**—ग्यारीबाल्डीनें जिनोआचे बंदरांतील टिमोंटी आणि लांबर्डो या नांवाच्या दोन आगबोटी वेठीस धरल्या, व त्यांवर लोक व सामान चढवून जलदीनें निघण्याचा हुकूम केला. यावेळीं लोकांत इतका आवेश चढला होता कीं, या हजार शिपायांना पोहोंचविण्याकरितां जे कित्येक लोक किनाऱ्यावर आले होते, ते आयतेवेळीं आह्मी सुद्धां तुह्मांबरोबर येतों, आह्मांस लढाईवर घेऊन चला, असा हट्ट धरून बसले; व त्यांची समजूत काढतां काढतां ग्यारीबाल्डीस पुरें पुरें झालें. या शूर शिपायांच्या आया, बहिणी, बायका, त्यांना निरोप देण्याकरितां आल्या होत्या. त्यांच्या डोळ्यांतून आनंदाचे अश्रु वहात होते, व जरी निरोप देतांना स्वाभाविकपणें यांस थोडेसें वाईट वाटत होतें, तथापि त्या शूर शिपायांस यश संपादून येण्यासाठीं त्या उत्तेजनच देत होत्या. ग्यारीबाल्डी-

ला बंदरांतून पाय काढण्याची फार उत्सुकता झाली होती; व निरुपायास्तव बोटी हाकारण्याचा जेव्हां शेवटीं त्यानें हुकूम दिला, तेव्हां जवळच्या गांवाहून स्वारीस जाण्यास निघालेले, परंतु अद्याप बंदरावर येऊन न पोहोंचलेले असे चाळीस लोक मागें राहिले. व त्यांजबरोबर त्यांचीं हत्यारें व दारूगोळाही मागें राहिला. आगबोटी समुद्रांत बऱ्याच दूर गेल्यानंतर ग्यारीबाल्डीनें या छोटेखानी लष्कराची शिस्त लाविली, व त्यांस उद्देशून एक सणसाणित व आवेशयुक्त असें भाषणही केलें. तारीख ११ मे रोजीं हें सैन्य मार्साला येथें येऊन पोहोंचलें. परंतु त्यांचे मागोमाग नेपल्सचे राजाचीं गलबतेंही येत होतीं. हें वर्तमान कळतांच ग्यारीबाल्डीनें गड-बडीनें तास दोन तासांत आपलें सैन्य व सामानसुमान किनाऱ्यावर उतरविलें, व त्या आगबोटींस आग लावून देऊन आपले लोक घेऊन तो मार्साला शहरांत शिरला. ग्यारी-बाल्डी अकस्मात् आला असें पाहून मार्साला येथील लोकांस अत्यंत आश्चर्य वाटलें. परंतु त्यांनीं त्यास जाऊन मिळण्याची कांहींच चिन्हें दाखविलीं नाहींत. तेव्हां तेथून तो निघून सालेमी या गांवीं गेला. वाटेनें ठिकठिकाणीं त्याचा पुष्कळच गौरव झाला. बायका, मुलें, धर्मगुरु यांनीं सुद्धां त्याचा जयज-यकार केला. सालेमी येथें ग्यारीबाल्डी यानें जाहीरनामा काढून सिसिलींतील राष्ट्रपक्षीय सैन्याचा मुख्य सरदार व दिवाणी, मुलकी, लष्करी या सर्व अधिकारांचा मुख्य अधि-कारी, असा किताब आपणांस घेऊन व्हिक्टर ए-मॅन्युएल राजाचे नांवानें द्वाही फिरविली.

**पालेर्मोची लढाई**–परंतु मुख्य लढाईचें काम तें पुढेंच होतें, व तो प्रसंग ग्यारीबाल्डीच्या इच्छेप्रमाणें लवकरच घडून आला. कॅलटॅफिमी या नांवाचे घांटाचे पायथ्याशीं नेपॉलिटन (नेपल्सचे राजाचे) सैन्याची व ग्यारीबाल्डीची प्रथम चकमक झडली. या चकमकींत ग्यारीबाल्डीचा मुलगा मेनॉटी हा जखमी झाला. व प्रथम कांहीं वेळ ग्यारीबाल्डीचे निशाणाचा पाडाव होतो कीं काय, अशीही भीति वाटत होती. परंतु गनीमीकाव्याची ही लढाई असल्यामुळें शेवटीं ग्यारीबाल्डीसच यश आलें व त्याचा एकदम बस बसला. पराभव पावलेल्या नेपॉलिटन सैन्यानें पालेर्मो या बळकट शहराचा आश्रय धरला. त्याचे पाठोपाठ ग्यारीबाल्डी हाही आपलें सैन्य घेऊन गेला, व पालेर्मो शहरच्या रस्त्यांमधून चार तास लढाई केल्यावर त्यानें शहरचें रक्षण करणाऱ्या बारा हजार नेपॉलिटन लोकांस मागें हटविलें. अद्यापि पालेर्मो येथील किल्ला व राजवाडा हे मात्र ग्यारीबाल्डीचे हातीं लागले नव्हते, व या किल्ल्यावरून व बंदरांतील जहाजांवरून ग्यारीबाल्डीचे लोकांवर शत्रूनीं गोळ्याचा मारा चालू ठेवला होता, त्याचे योगानें शहरांतील कित्येक इमारती पडून बरेंच नुकसान झालें. तथापि ग्यारीबाल्डीचे सैन्यास मिळालेल्या विजयाबद्दल जिकडे तिकडे मोठा उत्सव चालू होता. आजूबाजूच्या डोंगरांतील शेतकरी कुणबी भराभर पालेर्मो शहरांत जमूं लागले व जिकडे तिकडे ढोल, नौबदी व तुताऱ्या यांच्या ध्वनीची एकच

गर्दी उठली. ग्यारीबाल्डीचा आवडता पेहराव तांबडा झगा, हा असल्यामुळें शहरच्या सर्व लोकांनीं जिकडे तिकडे तांबड्या झग्याचाच पोशाख केला. गांवच्या सर्व दुकानांतील तांबड्या कापडाचे तागे संपून गेले, व कपडा शिवावयास शिंपी मिळावयाची मारामार पडूं लागली.

**कॅव्हूरचें कारस्थान**—आपल्या गोळीबाराचा कांहीं उपयोग झाला नाहीं असें पाहून नेपॉलिटन सैन्याचा सरदार जनरल लँझा यानें ग्यारीबाल्डीस मोठ्या गौरवानें पत्र लिहून भेट देण्याची विनंती केली. या भेटीमध्यें प्रथम कांहीं दिवसांचा तह ठरला, व नंतर लवकरच नेपल्स येथून हुकूम आल्यानंतर एकदोन ठिकाणें खेरीज करून बाकी सर्व सिसिली बेटांतून सैन्यानें निघून जाण्याचें कबूल केलें. इकडे ग्यारीबाल्डीचे सांगण्यावरून पालेर्मो येथील लोकांनीं शहरची डागडुजी व तटबंदी केली. यावेळीं शहरवासी लोकांना इतका आनंद-व उत्साह आलेला होता कीं, शहरचे तटबंदीचे कामीं व किल्ला पाडण्याचे कामीं, गोळा झालेल्या सर्व लोकांस एकदम कामावर लावतां देखील येईना. इकडे कॅव्हूर यानें गॅरीबाल्डीस विजय मिळतांच, अॅडमिरल फॅरीना यास पालेर्मो येथें जाऊन तें शहर व्हिक्टर एमॅन्युएलचे राज्यास सामील करण्याचे बाबतींत लोकांकडून उचल करतां येईल तर पहावें, असा त्यास हुकूम होता. परंतु इतक्यांतच ही गोष्ट करण्यास ग्यारीबाल्डी कबूल नव्हता, व त्यानें फॅरीना यास पालेर्मो येथून हुसकून लावलें व पूर्ववत् सर्व

अधिकार आपले हातीं घेतले. यावेळीं ग्यारीबाल्डी हा सर्व सिसिलीचा गव्हर्नर झाला होता. तथापि तो इतक्या साधेपणानें रहात असे कीं, यःकश्चित् लष्करचा एखादा शिपाईही अशा तऱ्हेनें रहात नसेल. देवळांत प्रार्थनेस गेला असतां त्याच्याकरितां लोकांनीं मुद्दाम तयार केलेल्या आसनावर न बसतां लोकांचे गर्दींत मिसळून नुसत्या फर्शीवर गुढघे टेंकून त्यानें ईश्वराची प्रार्थना करावी. अंगांत नेहमींप्रमाणें एक लांबलचक झगा व डोक्यास कसली तरी एक टोपी घालावी. हें सर्व पाहून तर पालेर्मो येथील लोकांस अतीशय कौतुक वाटे व त्याजबद्दल अत्यंत प्रेम उत्पन्न होई.

# भाग १३ वा.

## नेपल्सवरील स्वारी.

अथि भीरु साहसे श्रीःप्रति वसति ॥

मृच्छकटिक.

**दोन सैन्यें**—तारीख १७ जुलई रोजीं ग्यारीबाल्डीस अशी खबर लागली कीं, नेपॉलिटन सैन्याचा मिलॅझो या गावीं बराच मोठा जमाव होत आहे. तेव्हां अर्थात्च ग्यारीबाल्डीनें स्वारीची तयारी केली. मिलॅझो येथें जमणाऱ्या सैन्याचें आधिपत्य नेपॉलिटन सरदार जनरल बॉस्को याजकडे होतें. हा सरदार स्वतः शूर असून त्याचें सैन्यही कवाइत शिकलेलें होतें व त्यांनीं चांगल्या मजबूत ठिकाणाचा आश्रय केलेला होता. दुसरेपक्षीं ग्यारीबाल्डीचें सैन्य पहावें तर, त्यांत युरोपांतील अठरापगड जाती भरलेल्या, व लष्करांत नवशिक्या तरुण शिपायांचीच गर्दी विशेष. अशा या दोन विषम स्थितींतील सैन्यांची मिलॅझो या ठिकाणीं लढाई व्हावयाची होती, परंतु ग्यारीबाल्डीची त्यावेळीं सदीच अशी कांहीं विलक्षण होती कीं, तो जें जें करील त्यांत त्याला यशच येत गेलें.

**प्राणसंकट व पराक्रम**—लढाईचें तोंड लागण्यापूर्वी ग्यारीबाल्डीनें बरोबर ५० लोक घेतले, व बॉस्कोचे लष्करचे उजवे बाजूनें हल्ला केला, व शत्रूच्या एका तुकडीची दाणादाण केली. परंतु चुकून याचा असा परिणाम झाला कीं, तो मागें असलेल्या शत्रूच्या तोफेच्या माऱ्यांत

आपोआप आला. दुर्दैवानें ही तोफ फार अंतरावरही नव्हती. थोड्याच वेळांत ग्यारीबाल्डीचा घोडा ज़खमी झाला, व त्याचे पायाखालची रिकिबी तुटून पडली. त्या बरोबर घोडा बेफाम होऊन आवरेनासा झाला. यामुळें त्यास उतरून चालावें लागलें. या गडबडींत त्याचें पिस्तुल खोगिरांत राहून गेल्यामुळें हातांत तरवारी शिवाय दुसरें शस्त्रही राहिलें नाहीं. इतक्यांत शत्रूचे चार शिपाई त्याचे अंगावर धांवून आले, व त्यांनीं त्यास घेरून व हत्यारें उगारून—शरण ये व हत्यार खाली ठेव—असें दरडावून सांगितलें. परंतु ग्यारीबाल्डी मुळींच न डगमगतां उलट त्यांनांच दरडावून ह्मणाला; "खबरदार, मी ग्यारीबाल्डी आहें. तुह्मीच मला शरण आलें पाहिजे." व आतां एका क्षणांत त्या चौघांच्या तरवारीचे वार ग्यारीबाल्डीवर पडणार, इतक्यांत मिझोरी हा धावून आला व शत्रूंनीं दचकून किंचित् तोंडें फिरविलीं. त्या संधींत त्यानें व मिझोरी या दोघांनीं मिळून त्या चौघांस ठार केलें. अशा त्या प्राणसंकटांतून बचावल्याबरोबर ग्यारीबाल्डीनें तोंड फिरवून तोफखान्याचे बाजूनें हल्ला करण्याचा निश्चय केला, व स्वतः तो व दुसरे तीन शूर शिपाई यांनीं तटावरून चढून जाऊन गोलंदाजांवर चाल करून तोफ काबीज केली. अर्थात् तीच तोफ आतां ग्यारीबाल्डीनें उलट शत्रूवर चालू केली. तोफ परत मिळविण्याकारितां नेपॉलिटन सैन्याचा एक सरदार कांहीं लोक घेऊन तोफेवर चालून आला. तेव्हां पुनः एकवेळ ग्यारीबाल्डीचें व शत्रूचें छातीला छाती भिडवून युद्ध झालें. व त्यांतही त्यास यश आलें.

**तहांतील कपट**—अशा रीतीनें कांहीं वेळ लढाई झाल्यावर शत्रूचा मोड झाला, व त्यांस मिलॅझो येथील बाले-किल्ल्यावर आश्रय धरून बसावें लागलें. बॉस्को यानें कुमक मागण्याकरितां नेपल्स येथें माणूस पाठविला, परंतु पुरेशी कुमक न आल्यानें व तह करण्याचा हुकूम मिळाल्यानें बॉस्को यानें तहाचें बोलणें लाविलें. किल्ल्या-वरील सर्व युद्धाची सामुग्री आहे तशी ठेवून फक्त आपापलीं हत्यारें घेऊन बाहेर पडावें अशी तहाची शर्त होती. परंतु शत्रूनें कपट करून कित्येक तोफांच्या कान्यांतून खिळे ठोकून दिले होते; एवढेंच नव्हे, तर भुयारांत दारू भरून लांब अंतरावरून त्यास बत्ती देतां यावी व ग्यारीबाल्डी किल्ल्यावर आल्याबरोबर सुरुंग उडवून द्यावा, अशीही त्यांनीं व्यवस्था केली होती. परंतु सुदैवानें हें कपट उघडकीस आलें व त्यामुळें किल्ला व ग्यारीबाल्डीचे लोक बचावले. नेपॉलिटन सैन्य किल्ला उतरून जाईपर्यंत मिलॅझो येथील लोकांनीं ग्यारीबाल्डीस कांहींच मदत केली नव्हती. परंतु त्याच्या पराक्रमानें परस्पर स्वतंत्रता मिळाल्याबरोबर त्यांनीं ग्यारीबाल्डीचा जयजयकार केला. असो; अशा रीतीनें जय मिळविल्यावर त्या दिवशीं रात्रीं एका देवळाचे आगाशींत पाण्याचा कुजा व एकदोन पाव घेऊन ग्यारीबाल्डीनें भोजन केलें, व उशाला घोड्याचें खोगीर घेऊन त्यानें निवांतपणें झोंप काढली. मिलॅझोच्या पुढें मेसीना या नांवाचें एक शहर असून तेथेंही नेपॉलिटन सैन्याचें एक ठाणें होतें. ग्यारीबाल्डीनें पुढील हल्ला या शहरावर केला. या कामीं त्यास मुळींच अडथळा झाला नाहीं. ग्यारीबाल्डीपुढें कांहीं चालत नाहीं अशी नेपल्सचे राजाची खात्री झालेली

असल्यामुळें क्रेरी नांवाच्या आपल्या सरदारास बहुतेक सैन्यासह मेसीना सोडून परत येण्यास हुकूम त्यानें आगाऊच केला होता. व ग्यारीबाल्डीनें अघाडीस मेडिसा नांवाच्या आपल्या सरदारास पाठविलें होतें, त्याच्याशीं क्रेरी यानें तहाचें बोलणें करून मेसीना व इतर कांहीं ठिकाणें ग्यारीबाल्डीचे स्वाधीन करण्याचें कबूल केलें. अशा रीतीनें मेसीना अपोआप हातीं लागलें. या शहरचे लोकांस ग्यारीबाल्डीचें येणें मनांतून नको होतें असें नाहीं. तथापि १८४८ सालीं तेथील लोकांनीं केलेलें बंड निष्फळ झालें होतें; व नेपल्सच्या राजानें बंडवाल्यांस अतिशय कडक शिक्षा केल्यानें लोकांस जी एकदां दहशत पडली होती ती ते अद्याप विसरले नव्हते. यामुळें ग्यारीबाल्डी आला असें कळतांच लोक आतिशय घाबरून गेले व जो तो आपला जीव घेऊन व होड्यांतून बसून बंदराचे आश्रयानें राहिला होता. परंतु ग्यारीबाल्डीचें ठाणें शहरांत कांहीं दिवस बसल्यानंतर बाहेर गेलेले सर्व लोक परत आले; व त्यांनीं ग्यारीबाल्डीचा जयजयकार करण्यास प्रारंभ केला. त्यांनीं गांवांत तोरणें उभारलीं व आनंदोत्सव केला. इतकेंच नव्हे, तर एके प्रसंगीं ग्यारीबाल्डीच्या गाडीचे घोडे सोडून त्यांनीं त्याचा रथ आपल्या खांद्यानीं ओढीत नेला.

**राजाचा निरोप**—अशा रीतीनें ग्यारीबाल्डीच्या स्वारीचें काम निम्में फत्ते झालें. 'साहसे श्रीःप्रतिवसति' असें जें मृच्छकटिकांतील शर्विलकानें ह्मटलें आहे, त्याची प्रचीति जगाचे इतिहासांत वारंवार आलेलीच आहे. सिसिलीचे स्वारीवर निघते वेळीं ग्यारीबाल्डीबरोबर फक्त एक हजार लोक होते, व एक हजार

जावें अशाबद्दल तेथील लोकांनीं मला आव्हान केलें आहे. इतकेंच नव्हे, तर त्यांचा माझ्या पाठीमागें तगादा सुरू आहे. याहून अधिक अनुकूल प्रसंग येई तों त्यांनीं धीर धरावा अशाविषयीं मीं आपली पराकाष्ठा केली; परंतु सर्व व्यर्थ. या वेळीं मी जर माघार घेईन तर मातृभूमीसंबंधानें माझें कर्तव्य करण्यास मी चुकलों असें होऊन तिच्या स्वातंत्र्याच्या महत्कार्यास धोका येईल. यास्तव महाराजांनीं या क्षणीं एक वेळ आपली आज्ञा अमान्य करण्याची मेहेरबानीनें मला परवानगी द्यावी. जुलमानें गांजलेल्या माझ्याबंधुवर्गाच्या इच्छेमुळें प्राप्त झालेलें कार्य हाता वेगळें झाल्या बरोबर मी आपली तरवार महाराजांचे चरणांवर वाहून पुढें आमरणांत आपल्या आज्ञेचा बंदा गुलाम होऊन राहीन."

आपला,

**ग्यारीबाल्डी.**

**धनी व चाकर**—वरील पत्रव्यवहाराच्या मासल्यावरूनच सर्व स्थिति एकदम लक्षांत येण्यासारखी आहे. ग्यारीबाल्डीच्या मनांतील जागरूक नम्रसेवकभाव व त्याचे कर्तव्याचे मार्गांत प्रतिबंध करणारी राजाज्ञा यांचा विरोध त्यास किती दुःसह झाला असेल याची कल्पना सहज करतां येईल. दुसरे पक्षीं, व्हिक्टर ए-मॅन्युएल राजाच्या मनाची स्थितीहीं विचार करण्यासारखी आहे. एवढा महाप्रतापी व स्वामिभक्त वीर आपल्या प्रजाजनांमध्यें आहे, व त्याचें व आपलें मूळ कार्य एकच आहे, असें असतांही त्याचें व आपलें धोरण सर्वांशीं न जुळल्यामुळें प्रतिक्षणीं विनाकारण विरोध येतो हें पाहून राजासही किती वाईट वाटलें असेल याचीही सहज कल्पना करतां येईल. परंतु राजा व राजभक्त यांचा हा विरोध टळण्या-

सारखा नव्हता. ग्यारीबाल्डीची नजर सर्व इटलीचें स्वातंत्र्य एकदम सिद्ध व्हावें या प्रचंड परंतु दुःसाध्य कल्पनेवर लागलेली असून त्याला कपट, कावा, धोरण किंवा युक्ती, ही बाजू मुळींच दिसत नव्हती. व्हिक्टर ए-मॅन्युएलची गोष्ट उलट होती. इटलीचें स्वातंत्र्य जरी त्यास परत मिळवावयाचें होतें तरी हातचें राज्य गमावण्यास तो तयार नव्हता, व आपलें राज्य कायम ठेवणें हें पुढील सर्व इमारतीचा पाया आहे हें त्यास माहीत होतें. तात्पर्य, एके बाजूस धीर व युक्ति व दुसरे बाजूस निःसीम देशभक्ति व उतावळेपणा अशी स्थिति झाल्यामुळें ग्यारीबाल्डी हा कट्टा स्वामिभक्त सेवक असतांही अखेरपर्यंत एखादा पुंड बंडवाला असावा त्या प्रमाणें त्याचा व राजाचा संबंध इतिहासांत दिसून येत आहे.

**नेपल्सवर स्वारी**—राजास वरील प्रकारचें उत्तर लिहिल्यावर ग्यारीबाल्डीनें नेपल्सवर जाण्याची तयारी केली, व आपलें सैन्य जहाजावर चढविलें. त्या रात्रीं धुकें जिकडे तिकडे पसरलें होतें, व चद्र आभाळांत असूनही अंधःकार पडला होता. परंतु हीच वेळ योग्य असें जाणून ग्यारीबाल्डीनें जहाजें हाकारलीं. ज्या किनाऱ्यावर उतरावयाचें तो किनारा; या सैन्यानें कधीं पूर्वी पाहिलाही नव्हता; तथापि त्याचे त्यांस कांहींच वाटलें नाहीं. किनाऱ्यावर उतरून नेपल्सवर चाल करावयाची व तें घेऊन तेथें व्हिक्टर ए-मॅन्युएलचें निंशाण लावावयाचें या शिवाय दुसरी तिसरी गोष्ट त्यास कांहींच दिसत नव्हती. यामुळें वाटेंत आलेलीं सर्व संकटें सोसून हें सैन्य एके दिवशीं पहांटे चार वाजण्याचे सुमारास इटलीचे दक्षिण किनाऱ्यावर सुखरूपपणें पोहोंचलें. हा सर्व प्रकार अवचितपणें घडून आल्यामुळें त्यांना शत्रूकडून मुळींच प्रतिबंध झाला

लोकांनिशीं सिसिलीवर स्वारी करणारा हा वीर म्हणजे याच्यासारखा वेडापीर जगांत हाच, अशी शहाण्या सुरत्या माणसांनींही त्या वेळीं कुचेष्टा केली होती. परंतु त्याच हजार लोकांनीं पूर्वीं जें केवळ असाध्य वाटत होतें तें आज सर्वथा सिद्ध करून दाखविलें. या अचाट साहसाचे योगानें ग्यारीबाल्डीनें सिसिली बेट जिंकलें एवढेंच नव्हे, तर आतां त्याचे जवळ कमींतकमी पंचवीस हजार सैन्य अपोआप जमलें, व हजारों बंदुकाही जुळल्या. इतकी सिद्धता झाल्यावर नेपल्स शहरावर स्वारी करण्याचे मार्गास ग्यारीबाल्डी हा नेटानें लागला यांत कांहीं आश्चर्य नाहीं. ग्यारीबाल्डी हा नेपल्सवर आल्याशिवाय आतां खास रहात नाहीं असें तेथील राजास वाटलें, तेव्हां त्यानें लढाई करून ग्यारीबाल्डीस मागें हटविण्याचा नाद सोडून दिला; व शेवटचा उपाय ह्मणून व्हिक्टर ए-मॅन्युएल राजाकडे आपला वकील पाठविला. यापूर्वीं कॅव्हूर व व्हिक्टर ए-मॅन्युएल यांनीं ऑस्ट्रिया विरुद्ध लढाई झाली त्या वेळीं आपल्यास येऊन मिळण्यास नेपल्सच्या राजास विनंती केली होती; परंतु इटली स्वतंत्र करावयाची या उदात्त कल्पनेचा त्याला पुरा अर्थही कळत नसल्यामुळें त्यानें व्हिक्टर ए-मॅन्युएल यास मदत करण्याचें नाकारलें होतें. तोच फ्रान्सिस राजा आतां नम्र होऊन शरण आला होता. व ग्यारीबाल्डीपासून कसें तरी माझें रक्षण करा असें ह्मणूं लागला होता. व्हिक्टर ए-मॅन्युएल व कॅव्हूर यांना ग्यारीबाल्डीची नेपल्सवरील स्वारी उघडपणें पसंत करितां येत नव्हती तरी, त्यांना फ्रान्सिसचे वकीलास आह्मांस या बाबतींत फारसें कांहीं करतां येत नाहीं, असा निराशेचा निरोप देणेंच भाग पडलें. तथापि व्हिक्टर ए-मॅन्युएल यानें ग्यारीबाल्डी

याचें मन वळविण्याकरितां ह्मणून त्यास खालील प्रमाणें पत्र लिहिलें:—

परमप्रिय सरदार ग्यारीबाल्डी यांस:—

" आपण स्वारीवर निघालां त्यावेळीं आपल्या कार्यास माझी संमत्ति अगर अनुकूलता नव्हती हें आपणांस माहीत आहेच. आजच्या घटकेची स्थिति पाहिली तर ती फारच बिकट आहे; व आपले मनांत मजविषयीं प्रेमबुद्धि वसत आहे एवढ्याकरितां आपणास आगाऊ इशारत देणें मला भाग आहे. हल्लीं इटलींतील प्रजेमध्येंच परस्पर जी लढाई चालली आहे ती संपविली पाहिजे, व ह्मणून आपण नेपल्सवर जाण्याचा प्रस्तुतचा बेत रहित करावा असें या कामीं माझें मत्र आहे. नेपल्सचे राजानें आपलें सर्व सैन्य सिसिलींतून काढून नेऊन तेथील प्रजेस त्यांना आवडेल त्या रीतीनें पुढील राज्यव्यवस्था ठरवूं देण्याचें कबूल केलेलें आहे. तो तसें करण्याचें जर नाकारील तर सिसिली संबंधानें काय करावयाचें याबद्दलचा सर्व अधिकार मीं आपणाकडे ठेविला आहे. इटलींतील लोकांस सुयश कसें मिळवावयाचें हें माहीत आहे असें आजपर्यंत सर्व युरोप खंडास आपण दाखविलें आहे; परंतु मिळालेल्या सदुपदेशाचा सदुपयोग कसा करावयाचा हेंही त्यांस माहीत आहे, असें आपण आपल्या पुढच्या कृतीनें दाखवूं या."

**ग्यारीबाल्डीचें उत्तर**—या पत्रास ग्यारीबाल्डीनें खालील प्रमाणें उत्तर लिहिलें:—

" महाराज सरकारचे पायांबद्दल मी किती आदरपूर्वक भक्ति हृदयांत बाळगतों हें सरकारास माहीत आहेच. आपली आज्ञा मला शिरसा वंद्य. तथापि, इटलीची स्थिति पहातां या क्षणीं ती मला सर्वथा पाळतां येत नाहीं. नेपल्सवर मीं

जावें अशाबद्दल तेथील लोकांनीं मला आव्हान केलें आहे. इतकेंच नव्हे, तर त्यांचा माझ्या पाठीमागें तगादा सुरू आहे. याहून अधिक अनुकूल प्रसंग येई तों त्यांनीं धीर धरावा अशाविषयीं मीं आपली पराकाष्ठा केली; परंतु सर्व व्यर्थ. या वेळीं मी जर माघार घेईन तर मातृभूमीसंबंधानें माझें कर्तव्य करण्यास मी चुकलों असें होऊन तिच्या स्वातंत्र्याच्या महत्कार्यास धोका येईल. यास्तव महाराजांनीं या क्षणीं एक वेळ आपली आज्ञा अमान्य करण्याची मेहेरबानीनें मला परवानगी द्यावी. जुलमानें गांजलेल्या माझ्याबंधुवर्गाच्या इच्छेमुळें प्राप्त झालेलें कार्य हाता वेगळें झाल्या बरोबर मी आपली तरवार महाराजांचे चरणांवर वाहून पुढें आमरणांत आपल्या आज्ञेचा बंदा गुलाम होऊन राहीन."

आपला,

**ग्यारीबाल्डी.**

**धनी व चाकर**—वरील पत्रव्यवहाराच्या मासल्यावरूनच सर्व स्थिति एकदम लक्षांत येण्यासारखी आहे. ग्यारीबाल्डीच्या मनांतील जागरूक नम्रसेवकभाव व त्याचे कर्तव्याचे मार्गांत प्रतिबंध करणारी राजाज्ञा यांचा विरोध त्यास किती दुःसह झाला असेल याची कल्पना सहज करतां येईल. दुसरे पक्षीं, व्हिक्टर एमॅन्युएल राजाच्या मनाची स्थितीही विचार करण्यासारखी आहे. एवढा महाप्रतापी व स्वामिभक्त वीर आपल्या प्रजाजनांमध्यें आहे, व त्याचें व आपलें मूळ कार्य एकच आहे, असें असतांही त्याचें व आपलें धोरण सर्वांशीं न जुळल्यामुळें प्रतिक्षणीं विनाकारण विरोध येतो हें पाहून राजासही किती वाईट वाटलें असेल याचीही सहज कल्पना करतां येईल. परंतु राजा व राजभक्त यांचा हा विरोध टळण्या-

सारखा नव्हता. ग्यारीबाल्डीची नजर सर्व इटलीचें स्वातंत्र्य एकदम सिद्ध व्हावें या प्रचंड परंतु दुःसाध्य कल्पनेवर लागलेली असून त्याला कपट, कावा, धोरण किंवा युक्ती, ही बाजू मुळींच दिसत नव्हती. व्हिक्टर ए-मॅन्युएलची गोष्ट उलट होती. इटलीचें स्वातंत्र्य जरी त्यास परत मिळवावयाचें होतें तरी हातचें राज्य गमावण्यास तो तयार नव्हता, व आपलें राज्य कायम ठेवणें हें पुढील सर्व इमारतीचा पाया आहे हें त्यास माहीत होतें. तात्पर्य, एके बाजूस धीर व युक्ति व दुसरे बाजूस निःसीम देशभक्ति व उतावेळेपणा अशी स्थिति झाल्यामुळें ग्यारीबाल्डी हा कट्टा स्वामिभक्त सेवक असतांही अखेरपर्यंत एखादा पुंड बंडवाला असावा त्या प्रमाणें त्याचा व राजाचा संबंध इतिहासांत दिसून येत आहे.

**नेपल्सवर स्वारी**—राजास वरील प्रकारचें उत्तर लिहिल्यावर ग्यारीबाल्डीनें नेपल्सवर जाण्याची तयारी केली, व आपलें सैन्य जहाजावर चढविलें. त्या रात्रीं धुकें जिकडे तिकडे पसरलें होतें, व चंद्र आभाळांत असूनही अंधःकार पडला होता. परंतु हीच वेळ योग्य असें जाणून ग्यारीबाल्डीनें जहाजें हाकारलीं. ज्या किनाऱ्यावर उतरावयाचें तो किनारा; या सैन्यानें कधीं पूर्वी पाहिलाही नव्हता; तथापि त्याचे त्यांस कांहींच वाटलें नाहीं. किनाऱ्यावर उतरून नेपल्सवर चाल करावयाची व तें घेऊन तेथें व्हिक्टर ए-मॅन्युएलचें निशाण लावावयाचें या शिवाय दुसरी तिसरी गोष्ट त्यास कांहींच दिसत नव्हती. यामुळें वाटेंत आलेलीं सर्व संकटें सोसून हें सैन्य एके दिवशीं पहांटे चार वाजण्याचे सुमारास इटलीचे दक्षिण किनाऱ्यावर सुखरूपपणें पोहोंचलें. हा सर्व प्रकार अवचितपणें घडून आल्यामुळें त्यांना शत्रूकडून मुळींच प्रतिबंध झाला

नाहीं. किनाऱ्यावर उतरतांच ग्यारीबाल्डीनें आपली जहाजें पेटवून दिलीं, व एकदम रेगियो या नांवाच्या किल्ल्यावर हल्ला केला; व दिवसभर लढाई करून व तो हस्तगत केला. किल्ल्यांतील शिबंदी एका फ्रेंच व्यापारी गलबतावर बसून नेपल्स येथें पळून गेली, व मागें राहिलेल्या त्यांच्या सव्वीस तोफा व इतर लढाईचें पुष्कळ सामान, त्याचप्रमाणें धान्य, सामुग्री, घोडे व खेचरें वगैरे या विजयी सैन्याचे हातीं अनायासानें लागलीं. नंतर लॅटिनो नांवाच्या एका गृहस्थास रेगियो या किल्ल्याचा गव्हर्नर नेमून ग्यारिबाल्डी आपल्या सैन्यासह दुसरे दिवशीं बारा वाजतां पुढील मार्गास लागला. सुमारें दोन दिवसांत त्यानें डोंगराळ प्रदेशांतून जवळ जवळ ऐशीं मैलांचा प्रवास केला. वाटेनें शत्रूच्या सैन्याच्या टोळ्यांशीं त्यास लहान सहान लढाया कराव्या लागल्या, व त्या प्रदेशांतील अत्यंत उष्ण हवेनें त्याचे सैन्यास बराच ताप झाला. परंतु त्या सर्वांस न जुमानतां त्यानें नेपल्सच्या जवळ जवळ मजल मारली; एवढेंच नव्हे, तर मधून मधून कित्येक ठिकाणीं आपले लोक पाठवून लोकांकडून नेपल्सचे राजाविरुद्ध बंडेंही उभारविलीं.

**लोकप्रियता व सत्कार**—परंतु या मोहिमेंत आपल्या शिपायांकडून रयतेस यत्किंचित्‌ही उपद्रव होऊं नये असे ग्यारीबाल्डीनें सक्त हुकूम सोडले होते. फार काय, परंतु मालकाचे परवानगी शिवाय रस्त्याचे बाजूच्या द्राक्षा वेलीच्या ताटव्यांत जाऊन मूठभर द्राक्षें जरी कोणी तोडलीं, तरी त्यास शासन द्यावें असा त्याचा कायदा कडक होता. यामुळें अखेरपर्यंत त्याच्या बाजारबुणग्या पेंढारांत उत्तम प्रतीची शिस्त राहिली होती; व यामुळें आधींच असलेली त्याची लोकप्रियता अधिक

वाढली. कित्येक ठिकाणीं तर त्याचा आदर सत्कार लोकांनीं इतक्या हौसेनें केला कीं, तो कांहीं वर्णन करतां येत नाहीं. ग्यारीबाल्डी हा कोणी देव आहे किंवा देवदूत आहे असें झालें. स्टोको या गांवीं तर स्त्रियांनीं शुद्ध प्रेमळपणानें त्यास एखाद्या भावाप्रमाणें आलिंगून त्याचीं चुंबनेंही घेतलीं. रस्त्यांतून ग्यारीबाल्डीची गाडी जात असतां एखाद्या देशाभिमानी मातेनें आपल्या कडेवरचें बालक उचलून बेलाशक गाडींत टाकून द्यावें. मनांतील हेतु असा कीं, त्या महात्म्यानें त्याला उचलून त्याचें चुंबन घेतलें व त्यास आशीर्वाद दिला ह्मणजे त्याच्या अद्भुत देशभक्तीचा व शौर्याचा कांहीं तरी अंश त्यांजमध्यें उतरेल. या प्रसंगीं अशी मौज झाली होती कीं, युरोपांतील निरानिराळ्या वर्तमानपत्रांचे बातमीदार ग्यारीबाल्डीचे सैन्याबरोबर होते; व त्यांना लढायांचीं चटकदार वर्णनें वर्तमानपत्रास पाठवूं अशी मोठी हौस होती. परंतु जिकडे जावें तिकडे लढाईच्या ऐवजीं ग्यारीबाल्डीच्या स्वागताचाच प्रकार. त्याच्याबरोबर यांचीही चार दिवस पोळी पिकून राहिली होती. जावें तेथें मेजवान्यांचा थाट. असें झाल्यामुळें लढायांच्या वर्णनांच्या ऐवजीं त्यांना मेजवान्यांचींच वर्णनें लिहून पाठवावीं लागलीं, व तीं वाचून ही काय अजब जादू आहे, अशा विचारानें सर्व युरोप खंडांतील लोक आश्चर्यचकित होऊन राहिले होते.

**नेपल्सच्या राजाची तारांबळ**– इकडे ऑलेंटा येथें कर्नल पियर्स नामक ग्यारीबाल्डीच्या एका सरदारानें सरकारी तारआफीस हस्तगत करून घेऊन नेपल्स येथील अधिकाऱ्यांस अशी बातमी कळविली कीं, ग्यारीबाल्डी हा नेपल्सचे अगदीं जवळ येऊन ठेपला आहे. ही बातमी कळ-

तांच सालेर्नो येथील बारा हजार सैन्य, राजानें नेपल्सचे बचावाकरितां एकदम परत बोलाविलें, व अशा फसगमतीनें सालेर्नो हें ग्यारीबाल्डीचे हातीं सहज लागलें. येथून पुढला मुक्काम नेपल्सचा. नेपल्सचे इतके जवळ आल्यावर ग्यारीबाल्डीस फारच उताविळी झाली; व त्यानें आपलें सैन्य मागें ठेवून थोड्या निवडक लोकांनिशीं सालेर्नो येथील स्टेशनावर आगगाडींत बसून नेपल्सची वाट धरली. ग्यारीबाल्डी येत आहे असें कळतांच नेपल्स येथें एकच गर्दी उडून गेली. एकीकडे राजाची पांचावर धारण बसून पुढें काय करावें हें त्यास सुचेना. सरकारी लष्कर व आरमार यांवरील अधिकारीही बिथरल्यासारखे दिसूं लागले, व खालचे प्रतीच्या शिपायांत तर फंदफितूर पुष्कळ वेळ पासून चालू होताच. दुसरीकडे लोक हर्षभरित होऊन गेले होते. आगगाडी येण्याचे सुमारास चोहोंकडे लोकांची गर्दीच गर्दी होऊन गेली होती. व आगगाडीचे रुळावर, रिकाम्या डब्यांवरून जिकडे तिकडे माणसेंच माणसें होऊन गेलीं होतीं. स्टेशनचे आवारांत तर गाड्या, घोडीं, माणसें हीं इतकीं ठेंचून भरलीं होतीं कीं, मुंगी रिघावयाला देखील वाव नव्हता असें म्हटलें तरी चालेल. चित्रविचित्र निशाणें व ग्यारीबाल्डीच्या आवडत्या तांबडया रंगाचे हातरुमाल जिकडे तिकडे फडकत होते; आणि शिंगें व तुताऱ्या यांच्या ललकाऱ्यांनीं कानठाळ्या बसत होत्या. अशा प्रचंड समारंभांत ग्यारीबाल्डीची स्वारी स्टेशनांत येऊन दाखल झाली. ग्यारीबाल्डी स्टेशनांतून बाहेर पडतांच हर्षगजराचा जो एक एकदम कल्होळ उसळला, त्याचेयोगानें किनाऱ्यावर राजा आपल्या बचावासाठीं लष्कर सज्ज करून बसला होता

त्याचे काळजांत एकदम धडकी भरली. त्याचे गोलंदाज हातांत तोंड शिलगावून तटावरील तोफांवर डावा हात ठेवून हुकुमाची वाट पहात होते; व सरबत्तीचा हुकूम झाला असता तर त्या हर्षभरित शहरांत धडाधडा गोळे पडूं लागले असते. परंतु हा सरबत्तीचा हुकूम सोडण्यास राजाची छातीच होईना. कित्येक वेळां तर ग्यारीबाल्डी हा घातुक तोफांचे माऱ्यांतही आला असेल. परंतु तोफेचा एकही आवाज कोणाचे कानीं आला नाहीं. त्या दिवशीं संध्याकाळचे सुमारास तर राजाचे सैन्यानें उघडपणें आपल्या डोक्यावरील टोप्या उडवून दिल्या व 'ग्यारीबाल्डीकी जय' असा गजर करून घरोघर ते लोक निघून गेले.

**लोकांकडून स्वागत**—ग्यारीबाल्डीला अशा प्रकारच्या स्वागताचा मनापासून तिटकारा असल्यामुळें आगगाडींतून उतरतांच तो राजमार्ग सोडून देऊन एका आडरस्त्यानें शहरांत शिरला, व शहरच्या मुख्य सार्वजनिक इमारतींत जाऊन त्यानें आपलें बिऱ्हाड ठेवलें. तेथपासून लोकांच्या झुंडीच्याझुंडी वाड्यापुढें येऊन त्यांनीं 'ग्यारीबाल्डीकी जय' अशा आरोळ्या द्याव्या व ग्यारीबाल्डीनें ग्यालरींत येऊन त्यांचे सलाम घेऊन त्यांना उत्तेजनपर दोन शब्द बोलून आंत जावें असा क्रम चालू झाला तो सर्व दिवसभर सुरू होता. रात्रीं लोकांनीं नानातऱ्हेचे दिवे लावून आपापलीं घरें सुप्रकाशित केलीं व हजारों दिवट्या पेटवून मिरवणुकी काढल्या.

**नेपल्सचे तुरुंग**—संध्याकाळचे सुमारास राजा फ्रॅन्सिस हा आपले लोक बरोबर घेऊन किल्ल्यावरून उतरला, व खालीं मान घालून शहरांतून निघून गेला. हा प्रकार पाहण्यास लोकांची

दुतर्फा गर्दी झाली होती; परंतु मेहेरबानीनें त्याचा कोणत्याही प्रकारें कोणी अवमान वगैरे केला नाहीं. राजा निघून गेल्यावर सर्व सार्वजनिक ठिकाणचीं राजचिन्हें काढून टाकून त्या ठिकाणीं राजा व्हिक्टर ए-मॅन्युएल याचीं निशाणें उभारण्यांत आलीं. दुसरे दिवशीं सकाळीं आसपासच्या खेड्यापाड्यांतून ग्यारीबाल्डीनें आपल्या लोकांच्या कांहीं टोळ्या पाठविल्या व जिकडेतिकडे लोकांचा एकदिल करून व्हिक्टर ए-मॅन्युएलच्या नांवाची द्वाही फिरविली. ग्यारीबाल्डीचें सैन्य किल्ल्यावर चढतांच लोकही किल्ल्यावर मोकळेपणें जाऊं येऊं लागले. यापूर्वी किल्ल्यावर जाणें लोकांस फार धोक्याचें वाटत असे. नेपल्स येथील ज्या तुरुंगाबद्दल युरोपखंडभर जिकडे तिकडे गवगवा झाला होता व ग्लॅडस्टनसारख्या संभावीत मुत्सद्यांनींही ज्यांचे बाबतींत नेपल्सचे राजास लाखोली वाहिली होती ते सर्व बंदिखाने अथवा पृथ्वीवरील सैतानाचे महाल याच किल्ल्यावर होते. या तुरुंगाबद्दल नेपॉलिटन लोकांचे मनांत अत्यंत द्वेष असल्यामुळें किल्ल्यावर चढून जाणाऱ्या प्रत्येक माणसानें त्या तुरुंगाचे भिंतीवर बुटाच्या लाथा माराव्या व थुंकावें, व अशा रीतीनें पूर्वीच्या राजाच्या जुलमी कारकीर्दीबद्दल आपला तिरस्कार दाखवावा, असा प्रकार चालला होता. असो; एकदोन दिवसांत जिकडे तिकडे शांतता झाल्यावर ग्यारीबाल्डीनें निरनिराळ्या खात्यांवर नवीन अधिकारी नेमून शिस्त लावण्यास सुरवात केली.

# भाग १४ वा.

## देशाच्या एकीकरणाचा प्रारंभ.

तप्ते न तप्तमयसा घटनाययोग्यं ॥

विक्रमोर्वशीयं.

**नेपल्सचें राज्य जोडण्याचा निश्चय**—नेपल्स वरील ग्यारीबाल्डीच्या स्वारीची फत्ते झाली हें वर्तमान काऊंट कॅव्हूर यास कळतांच हें नवीन मिळालेलें राज्य पिडमाँडच्या राज्यास सामील करावयाच्या खटपटीस तो एकदम लागला. नेपल्सवर ग्यारीबाल्डीनें स्वारी केली ती धडधडीत राजाज्ञेच्या विरुद्ध केली होती. तथापि, अनधिकारानें केलेल्या परंतु सफळ झालेल्या या कृत्यापासून आपल्या राजकीय धोरणाला जर फायदा मिळत आहे तर तो कां बुडवा? असा कॅव्हूर यानें पोक्त विचार केला. व तो विचार अर्थात् त्या धूर्त मुत्सद्याचे शहाणपणास योग्य असाच होता. ज्या गोष्टीचा आपणपूर्वी एकवेळ निषेध केला तिचाच फिरून अंगिकार कसा करावा अशी शंका त्यास प्रथम उत्पन्न झाली. परंतु सुदैवानें त्याच्या धूर्तपणास यावेळीं चांगली मदत केली. ग्यारीबाल्डीस जय मिळाला व नेपल्स त्याचे हातीं पडलें हें वर्तमान ऐकतांच मॅझिनी नेपल्सकडे जावयास निघाला. व जेथें मॅझिनी जाईल तेथें त्याचे मागोमाग लोकसत्ताक राज्याच्या उच्छृंखळ कल्पना, बंडाळी व बेबंदशाही हीं ठेविलेलींच असा त्यावेळीं सार्वजनिक समज होता. त्याचा फायदा घेऊन कॅव्हूर यानें अशी बतावणी करण्यास प्रारंभ केला कीं, मॅझिनीच्या योगानें सर्व सिसिली बेटाची दुर्दशा होऊन जाईल व अशा तऱ्हेची स्थिति होणें

हें इटलीच्या कार्यास अहितावह आहे; यास्तव पिडमाँडचे राजानें केवळ सार्वजनिक कल्याणाकरितां नेपल्सचें राज्य आपल्या राज्यास जोडणें हाच कायतो वरील संकट निभावण्यास बिनतोड मार्ग आहे. हा बहाणा तर खराच; परंतु ग्यारीबाल्डी व मॅझिनी हे दोन स्वतंत्र विचाराचे व राजसत्तेस न जुमानणारे देशभक्त एक विचाराचे झाले असतां, नेपल्स येथें खरोखरच प्रजासत्ताक राज्य स्थापित होईल व असा एकदां प्रघात पडला ह्मणजे लोकसत्ताक राज्यें स्थापण्याची लोकांची इच्छा अनिवार होऊन आपल्या धोरणास आळा पडेल अशी कॅव्हूर यास मुळींच मनांत भीति वाटत नव्हती असें मात्र नाहीं. तें कसेंही कां असेना, नेपल्सचें राज्य पिडमाँडचे राज्यास जोडण्याचा निश्चय करून त्या बाबतींत कॅव्हूर यानें पार्लमेंटास अनुकूळ असा ठराव करून घेतला. येवढें खरें.

**नेपोलियनची संमति**–व्हिक्टर ए-मॅन्युएल हा कॅव्हूर याचे विचाराबाहेर अर्थात्च नव्हता खरा. तथापि एक अडचण येऊन पडली ती अशी कीं, फ्रान्सचा बादशाह नेपोलियन याचे हातांत इटलींतील घडामोडीचीं सूत्रें अद्यापि होतीं, व पिडमाँडचे राजानें इटलींतील संस्थानें जिंकून आपल्या राज्यास सामील करण्याची ही रीति त्यास पसंत पडेल किंवा नाहीं याबद्दल किंचित् शंका वाटत होती. तथापि कॅव्हूर यानें नेपोलियनचें मन वळवून घेण्याचा प्रयत्न केला व तो सिद्धीसही गेला. नेपोलियननें कॅव्हूरच्या वकिलास असा जबाब दिला कीं, योजिलेलें कृत्य करणें कॅव्हूर यास अत्यावश्यक वाटत असेलच तर तें त्यानें आपल्या जबाबदारीवर खुशाल करावें, मात्र ह्या कामीं ऑस्ट्रियाशीं युद्ध करण्याचा प्रसंग आला तर फ्रान्सकडून पूर्वीप्रमाणें मदत होणार नाहीं

एवढें मात्र लक्षांत ठेवावें. ही पडत्या फळाची आज्ञा मिळतांच कॅव्हूर हा आपल्या तयारीस लागला. त्यानें यूरोपांतील सर्व राष्ट्रांस यादी लिहून कळविलें कीं, आज जर नेपल्स आह्मीं आपल्या राज्यास जोडिलें नाहीं, तर सर्व इटलीचे शांततेस धक्का बसून राजसत्तेस मोठाच अपाय होणार आहे. अशा रीतीनें परराष्ट्रांकडून कदाचित् होणाऱ्या प्रतिबंधाचा आगाऊ बंदोबस्त करून कॅव्हूर यानें नेपल्सवर पाठविण्याकरितां सैन्य सज्ज केलें. व या सैन्याबरोबर राजा व्हिक्टर ए-मॅन्युएल यानें स्वतःच जावें असें ठरलें.

**गुप्त तयारी**—इकडे कॅव्हूर यानें नेपल्स येथें आपल्या गुप्त हेरांकडून फरडिनंड राजाविरुद्ध बंड करण्यास लोकांना चिथविण्याचा क्रम चालविला होता. वरकरणी फरडिनंड राजाशीं सलोख्याचें बोलणेंही सुरू केलें होतें. तसेंच फरडिनंड राजाचे ताब्यांतील मार्चेस या प्रांतांतील कांहीं अर्जदार आपणाकडे आणविण्याची गुप्त खटपट करून कॅव्हूर यानें त्यांस उघडपणें असें आश्वासन दिलें होतें कीं, तुम्हांस योग्य स्वतंत्रता मिळेल, अशी आह्मीं लवकरच व्यवस्था करूं. इतकी सिद्धता आधींच झालेली होती व शिवाय ग्यारीबाल्डीचे सैन्यानें नेपल्स जिंकलें होतें; तेव्हां व्हिक्टर ए-मॅन्युएल यास फक्त नेपल्स येथें जाऊन लोकांचे मुजरे घेऊन आपल्या नांवाची द्वाही फिरवावयाची एवढेंच कायतें करावयाचें उरलें होतें, व तें करण्यास राजा लवकरच निघाला.

**होलटर्नोची लढाई**—मॅझिनी हा व्हिक्टर ए-मॅन्युएलचे पूर्वींच नेपल्समध्यें जाऊन पोहोंचला होता खरा, परंतु त्याचा हेतु साध्य होण्याचा मुळींच रंग नव्हता. मॅझिनी नेपल्समध्यें येईल तर त्यास एकदम कैद करावें असा कॅव्हूर यानें हुकूम

देऊन ठेविला होता. ग्यारीबाल्डीनें मॅझिनीस कैद मात्र केलें नाहीं, परंतु तेथून निघून जाण्याची त्यानें त्यास विनंती केली, ती मॅझिनी यानें नाकारिली, व त्यानें ग्यारीबाल्डी यासच उलट असा निरोप पाठविला कीं, तुह्मीच जर लौकर नेपल्स सोडून रोमकडे जावयास निघणार नाहीं, तर तुमच्या हातची सर्व सत्ता जाऊन शेवटीं पश्चाताप पावावें लागेल. परंतु ग्यारीबाल्डीला इतक्यांतच सिसिली बेट सोडून जाणें अशक्य होतें; कारण फरडिनंड राजाचा युद्ध करण्याचा विचार अद्याप दिसत होता. यास्तव ग्यारीबाल्डीस आपले सैन्याची व्यवस्था करणें जरूर होतें. अदमासाप्रमाणें फरडिनंडचे सैन्याशीं ग्यारीबाल्डीस लढाई द्यावी लागलीच. ता. १ आक्टोबर रोजीं व्होल्टरनो येथें दोन्हीं सैन्यांची लढाई झाली व तींत फरडिनंडचा पराभव होऊन त्यास गेटा येथील किल्ल्याचा अश्रय घेण्यास निघून जाणें भाग पडलें व याउपर ग्यारीबाल्डीस कोणचीच आडकाठी उरली नाहीं.

**राजा व ग्यारीबाल्डी यांची भेट**—व्हिक्टर ए-मॅन्युएल हा स्वतः सैन्यासहवर्तमान नेपल्सकडे येत आहे असें कळतांच ग्यारीबाल्डी राजास सामोरा जाण्याकरितां सैन्य घेऊन निघाला. नेपल्स पिड्मांडचे राज्यास सामील करण्याच्या कॅव्हूर याच्या बेतास आपण आड जावयाचें नाहीं असा ग्यारीबाल्डीचा निश्चय यावेळीं ठरला होता; व त्याप्रमाणें त्यानें मॅझिनीस निक्षून कळविल्यामुळें मॅझिनीस नेपल्स सोडून जाणें भाग पडलें. हा वेळपर्यंत नेपल्स संबंधानें सर्व अधिकार ग्यारीबाल्डीचे हातांत होते, परंतु व्हिक्टर ए-मॅन्युएल आल्यावर ते सर्व अधिकार त्याचे ठिकाणीं समर्पण करून



व्हिक्टर एमॅन्युएल.

आपण बाजूस व्हावें असा ह्या उदार देशभक्तानें निश्चय केला होता. ता. २६ आक्टोबर रोजीं व्हिक्टर ए-मॅन्युएल व ग्यारीबाल्डी यांची मुलाखत झाली. त्यावेळीं उभयतांच्या मनांत परस्पराविषयीं अत्यंत आदर उत्पन्न झालेला होता. आपण आरंभिलेलें कार्य सुरळीतपणें शेवटास गेलें व आपल्या हातून थोडी बहूत राजसेवा घडली, याबद्दल ग्यारीबाल्डीस आनंद वाटला. व दुसरेपक्षीं राजासही, अशा, धीर, वीर, निस्पृह, स्वामिभक्त सेवकाकडून देशकार्यांत सहाय्य मिळालें याबद्दल धन्यता वाटली. या भेटीचा देखावा डोळ्यांनीं पाहिलेल्या लोकांनीं असें लिहून ठेविलें आहे कीं, राजा व ग्यारीबाल्डी हे एकमेकांस आदरपूर्वक भेटतांना दोघांचेही कंठ सद्गदीत झाले होते. असो; भेटीनंतर दोघेही नेपल्सकडे परत फिरले.

**एक उदात्त देखावा**—नेपल्समध्यें प्रवेश केला तो, राजा व ग्यारीबाल्डी यांनीं एकाच गाडींत बसून केला. राजा एका उघड्या गाडींत बसला असून ग्यारीबाल्डी त्याचेच बाजूस डाव्या हाताला बसला होता व समोर सिसिली व नेपल्सचे भावी गव्हरनर बसले होते. ते दिवशीं पाऊस एकसारखा झिमझिम पडत होता; तथापि रस्त्यांतून लोकांची अतोनात गर्दी झालेली होती, व त्यांच्या जयजयकाराच्या ध्वनीनें त्यावेळीं आभाळांत होणारी मेघगर्जनाही मधून मधून क्षणैक लोपून जात असे. जिकडे तिकडे गुड्या, तोरणें, निशाणें, उभारलेलीं होतीं, व ठिकठिकाणीं राजाचे गाडीवर लोक फुलें उधळीत होते. अशा थाटानें व्हिक्टर ए-मॅन्युएल यानें शहरांतील मुख्य देवळांत प्रवेश केला, व तेथें सर्वांनीं मिळून ईश्वरोपासना केली. हा विधि झाल्यावर ग्यारीबाल्डीनें आपले सर्व अधिकार राजाचे स्वाधीन केले. त्यानें

जाहीरनामा काढून आपल्या विश्वासू शिपायांचा आणि सिसिलीं-तील सर्व लोकांचा व देशबांधवांचा नम्रपणें निरोप घेतला; परंतु त्यांस विनंती केली कीं, लढाईचा वक्त पुन्हां लवकर-च येणार व त्यावेळीं फिरून सर्व देशभक्तांशीं खांद्यास खांदा लाऊन लढण्याकरितां मला यावयाचें आहे, यास्तव सर्वांनीं हल्लीं आहे अशीच प्रीति व देशभक्ति जागृत ठेवावी. या सर्व गोष्टींमुळें लोकांची ग्यारीबाल्डीवरील भक्ति अधिकच वाढली. वास्तविक यावेळीं ग्यारीबाल्डीची शक्ति अशी होती कीं, त्यानें नुसता ब्र काढण्याची फुरसत, कीं खुद्द त्याचें पंचवीस तीस हजार सैन्य व नेपल्सचे सर्व लोक त्याच्या हुकुमाप्रमाणें वागण्यास, फार काय पण प्राण देण्यासही तयार होते. व यामुळें त्याचे मनांत यत्किंचित्‌ही जरी अहंभाव किंवा महत्वाकांक्षा यांचा अंकूर उमटला असता, तर त्याचे सर्व मनोरथ पूर्ण होण्यास मुळींच पंचाईत पडली नसती. असें असतांही दुसऱ्याची ठेव निमुटपणें परत करावी त्याप्रमाणें आपले सर्व अधिकार राजाचे चरणांवर अर्पण करून एखाद्या यःकश्चित मनुष्याप्रमाणें फिरून ग्यारीबाल्डी हा प्रजाजनांच्या समाजांत मिसळला. हा त्याचा निस्पृहपणा पाहून त्याचे अंगीं खरोखर कांहीं विशेष दैविक अंश आहे असें लोकांस वाटू लागलें. ग्यारीबाल्डीनें गादीची एवढी मोठी कामगिरी बजाविलेली पाहून आतां याचें कसें उतराई व्हावें, अशी खुद्द राजासही पंचाईत पडली असेल यांत कांहीं शंका नाहीं. त्यानें त्यास सर्वांत श्रेष्ठ अशी लष्करी मानाची पदवी व पांच लाख फ्रँक देऊं केले; परंतु ग्यारीबाल्डीनें आपण यांतील एक पैशासही शिवणार नाहीं व बहुमानाची पदवीही घेणार नाहीं असें राजास स्पष्ट कळविलें. वरील समारंभ झाल्यानंतर लागलीच ग्यारीबाल्डीनें कॅपरा बेटा

वरील आपल्या निवासाश्रमास जाण्याचा निश्चय केला. यावेळीं त्याजपाशीं फक्त पंधरा शिलिंग कायते त्याचे असे होते. यास्तव जाण्यापूर्वीं त्यानें वीस पौंड लोकांपासून उसने घेऊन आपलें खाजगी देणें होतें तें वारलें; व घरून निघाल्यापेक्षां रतीभर अधिकच दरिद्री अशा स्थितींत हा विजयी व शूर देशभक्त आपल्या घरीं परत निघाला. मात्र जाण्यापूर्वीं त्यानें एकवेळ राजाची गांठ घेतली व दोन मागण्या केल्या; पैकीं पहिली अशी होती कीं, राजानें आपणांस रोमवर स्वारी करण्याची परवानगी द्यावी; व दुसरी अशी कीं, आजपर्यंत पगार न घेतां केवळ स्वदेशभक्तीनें प्रेरित होऊन व जिवाला जीव देऊन ज्यांनीं आपल्या हाताखालीं लढाया केल्या त्या शिपायांस व सरदारांस सरकारी सैन्यांत सामील करून त्यांच्या योग्यते-प्रमाणें त्यांस जागा द्याव्या. या दोन्हींही मागण्यांस राजास रुकार देतां आला नाहीं, व त्याचीं कारणेंही विशेष होतीं. परंतु त्याचा विचार पुढें करण्यांत येईल. येथें एवढेंच सांगा-वयाचें कीं, ज्यानें सिसिलीचें सबंद राज्य आपल्या धन्यास मिळवून दिलें, त्यानें वाटखर्चीकरितां लोकांचे पैसे उसनवार काढले व इतमामाशिवाय जसा एकटा तो सिसिलीवर स्वारी करण्याचे पूर्वीं घरांतून बाहेर पडला तसाच स्वारींत यश येऊन सर्व सिसिलीचें राज्य काबीज केल्यावरही एकांतवासां-तील गृहसौख्याचा उपभोग घेण्यास तो एकटाच परत गेला!

# भाग १९ वा.

## शांततेंतील सुखें व उद्योग.

**नवीन देखावा**—ग्यारीबाल्डी कॅप्रेरा बेटास परत येऊन पाहतो तों तेथील देखावा सर्वच बदललेला. घर सोडून जाते-वेळीं जिकडे तिकडे प्रदेश ओसाड होता; परंतु आतां तेथें लागवड झालेली असून लहान लहान बागा व शेतें तयार केलेलीं होतीं. झाडांची लागण ही बरीच झाल्यामुळें जिकडे पहावें तिकडे हिरवळ दृष्टीस पडे. घरीं गेल्याबरोबर तो प्रथम तबेल्यांत गेला व आपल्या आवडत्या घोड्यांचे पायबंद सोडून त्यानें त्यांस यथेच्छ हिंडावयास मोकळीक दिली. नंतर इकडे तिकडे कमीजास्त आहे नाहीं पाहून, व चाकर माणसांच्या व शेजाऱ्यांच्या भेटी घेऊन, पूर्ववत् आपल्या शेतकऱ्याच्या वर्तनक्रमास त्यानें सुरुवात केली. प्रथमतः त्यानें एक चक्की आणविली, शेतकीचीं निरनिराळीं आऊतें जमा केलीं व थोड्याच दिवसांपूर्वी ज्या हौसेनें रणभूमीवर तो युद्ध करीत होता त्याच हौसेनें तो आतां शेतकीचें काम करूं लागला. तीस हजार सैन्य हाताखालीं वागवून व राजाच्या बरोबरीनें रथांत बसून सर्व राष्ट्रांकडून जयजयकार व धन्यवाद ऐकत असतां जी त्याच्या मनाची स्थिति होती, तीच आज मितीस स्वतः हातांत नांगर धरून गड्यामाणसांबरोबर शेतकाम करीत असतांनाही होती.

**निरीच्छता**—त्याचा स्वभाव उद्योगप्रिय असल्यामुळें हळू हळू त्या लहानशा बेटाला गोड रूप येऊं लागलें. तथापि त्याचें रहातें घर अगदीं साधें असून त्यांत ऐषआरामाचे पदार्थ कांहींच

नव्हते. दूरदूरचे लोक त्याला अनेक तऱ्हेचे पदार्थ भेटी दाखल पाठवून देत; व त्यांपैकीं कित्येक तर बरेच मौल्यवानही असत. परंतु अशा भेटी घेणें त्याला मनापासून फारसें आवडत नसे; ह्मणून कित्येक वेळां तो त्या भेटी परत सुद्धां करी. याच सुमारास ऑस्ट्रियांत मोठा दुष्काळ पडला होता, व तेथील लोकांच्या मदतीकरितां त्यानें आपण वर्गणीनें जमविलेले शंभर फ्रँक पाठविले होते; तेव्हां—'मला मौल्यवान नजराणे पाठविण्यापेक्षां दुष्काळ पीडित ऑस्ट्रियन लोकांना जर त्यांचे पैसे करून पाठवाल तर मजवर मोठे उपकार होतील—'असेंही त्यानें कित्येकांस सांगितलें. त्याच्या अशा या सांगण्याचा कित्येकांस राग आला व कित्येकांस आपले हाडवैरी जे ऑस्ट्रियन लोक त्यांना मदत करण्याची ग्यारीबाल्डीस इच्छा व्हावी याचें आश्चर्य वाटलें. परंतु त्या संबंधानें ग्यारीबाल्डी असें ह्मणे कीं, माझें वैर ऑस्ट्रियन लोकांशीं नाहीं, तर त्यांच्या राजाशीं आहे. त्या बिचाऱ्यांनीं काय केलें आहे? त्यांचा राजा ज्या अर्थीं वाईट आहे, त्या अर्थीं ते उलट दयेलाच अधिक पात्र आहेत.

**पाहुणचार**—ग्यारीबाल्डीच्या ह्या एकांतवासांत त्याला भेटण्याकरितां अनेक देशाचे मोठमोठे लोक येत असत. थोरथोर इंग्लिश अमीरउमराव सुंदर व सजविलेल्या छोट्या जहाजांतून बसून कॅप्रेरा येथें येत. तसेंच प्रवासास निघालेले शोधक लोक किंवा हद्दपार झालेले देशभक्त मधून मधून त्याचे दर्शनास येत. त्या सर्वांचें तो मोठ्या प्रेमानें स्वागत करी; परंतु त्याच्या आदरातिथ्याच्या प्रकारांत श्रीमंती मुळींच नसे. व ती येणार तरी कोठून? अशा तऱ्हेचे पाहुणे आले असतां त्यांस घेऊन बागेंत किंवा शेतांत तो काम करण्यास

जाई; व सुखःदुखाच्या गोष्टी बोलत असतां तो जातीनें काम करूं लागला ह्मणजे, तेही आनंदानें अस्तन्या वर सावरून त्याचे बरोबर काम करावयास लागत.

**मुलेंबाळें**—ग्यारिबाल्डीस तीन मुलें होतीं. पैकीं सगळ्यांत वडील मुलगा मेनॉटी हा आपल्या बापाबरोबर स्वारीवर जाण्या इतका मोठा झालेला होता, व एक दोन वेळीं त्यानें आपल्या शूर पित्याच्या कीर्तीस योग्य अशी मर्दुमकीही केली होती. दुसरा मुलगा रिसीऑटी हा इंग्लंडांत लिव्हरपूर येथें स्नेह्यांच्या देखरेखीखालीं विद्याभ्यासाकरितां ठेवलेला होता. ग्यारिबाल्डीची मुलगी थेरेसीटा ही देखणी असून आपल्या बापासारखी उंच व सशक्त असे. हीच कायती ग्यारिबाल्डीचा प्रपंच पाहणारी घरधनीण. थेरेसीटा हिनें आपल्या बापाप्रमाणेंच, पाण्यांत पडून बुडत असलेल्या कित्येक लोकांचे प्राण वांचविले होते. ती चपळ असून आपल्या बापाबरोबरीनें डोंगरांतून भराभर उड्या मारीत जाई. या मुलीवर ग्यारिबाल्डीचें सर्व मुलांपेक्षां विशेष प्रेम होतें. नेपल्सच्या स्वारीहून ग्यारिबाल्डी परत आल्यानंतर थेरेसीटा हिचें कॅनझिओ नांवाच्या एका लष्करी अधिकाऱ्याबरोबर लग्न झालें. या प्रसंगीं व्हिक्टर एमॅन्युएल राजानें नवऱ्यामुलीस आंदणादाखल एक सुंदर हिऱ्यांचा हार बक्षीस दिला. तात्पर्य, ग्यारिबाल्डीचे सर्व आयुष्यक्रमांत शांततेचा व गृहसौख्याचा काळ असा हा गेला. तथापि हें गृहसौख्य असावें तसें नव्हतें. कारण त्याची प्रियपत्नी निवर्तलेली होती, व मुलें किंचित् आडदांड व बिनमुर्वतखोर अशीं निपजलीं. तथापि केवळ बायकांमुलांकडे पाहून सुख पावणाऱ्या असामींपैकीं ग्यारिबाल्डी हा नव्हता. त्याचें खरें सुख स्वदेशसेवेंत होतें व तें त्यास आजन्मपर्यंत भोगावयास यथेच्छ सांपडलें.

**पार्लमेंटांत निवडणूक**—इ. स. १८६० सालीं इटालियन पार्लमेंटाची नवीन निवडणूक झाली; त्यांत ग्यारिबाल्डीस एक मुखत्यार ह्मणून लोकांचेतर्फे निवडून देण्यांत आलें होतें. त्याप्रमाणें ता. १८ एप्रिल रोजीं तो पहिल्यानें सभासद या नात्यानें पार्लमेंट सभेस गेला. पार्लमेंटांत सुद्धां त्याचा पोषाख नेहमींप्रमाणेंच तऱ्हेवाईक होता व त्याजकडे सर्व लोक टकमक टकमक पहात होते. यावेळीं पार्लमेंटपुढें ग्यारीबाल्डीच्या बिनपगारी शिपाइ लोकांसंबंधानें प्रश्न होता. मागील भागांत ग्यारीबाल्डीनें व्हिक्टर ए-मॅन्युअल राजास आपल्या विश्वासू शिपायांबद्दल एक मागणी केल्याचें सांगितलेंच आहे. ही मागणी राजानें मान्य केली नव्हती. एवढेंच नव्हे तर, आपल्या लष्करी अधिकाऱ्यांचें ऐकून ग्यारीबाल्डीचे शिपाइ लोकांचा त्यानें वेळोवेळीं आपमानही केला होता. खुद्द नेपल्स येथें त्याची व ग्यारीबाल्डीची मुलाखत झाल्यानंतर राजानें ग्यारीबाल्डीचे लोकांची परेड पाहून त्यांचा बहुमान करण्याचें कबूल केलें होतें; व त्याप्रमाणें परेडीच्या मैदानावर लोक येऊन दोन तास थांबून राहिले होते, तरी राजा मुळींच आला नाहीं. तो आपल्या आवडत्या रांडेशीं गप्पा गोष्टी करीत बसला होता, त्यांत त्याला, एवढा पराक्रम केलेल्या व एवढें राज्य मिळवून दिलेल्या बिनपगारी शिपायांची आठवण देखील झाली नाहीं. अशी स्थिति असतां ग्यारीबाल्डीच्या विनंतीप्रमाणें त्यांना सरकारी लष्करांत योग्यतेनुरूप जागा देण्याची राजास कोठून आठवण राहणार?

**कॅव्हूरचा मृत्यु**—ग्यारीबाल्डी व त्याचे शिपाइ यांजबद्दल सरकारी लष्करी अधिकाऱ्यांस एक प्रकारचा मत्सर वाटत असल्यामुळें ते त्या संबंधानें कोणचीही गोष्ट निघाली असतां

राजाचें मन दूषित करण्यास सदोदित तयार असत. ही गोष्ट ग्यारीबाल्डीचे मनास नेहमीं लागून राहिलेली असे. यामुळें वर सांगितलेला विषय पार्लमेंटपुढें निघाला तेव्हां उभयपक्षांचीं मनें क्षुब्ध झालेलीं होतीं. बराच वादविवाद होऊन कांऊट क्यॅव्हूर यास वर्मी लागतील असे शब्द ग्यारीबाल्डी भर सभेंत बोलून गेला. परंतु तेथें तेवढ्यावरच संपलें. व पुढें लवकरच ग्यारीबाल्डीच्या सूचनेप्रमाणें देशांतील सैन्याची संख्या वाढविण्याचें पार्लमेंटनें बहुमतानें कबूल केल्यामुळें ग्यारीबाल्डीचा राग बराच निवाला. व्हिक्टर ए-मॅन्युएल राजानें मध्यस्ती करून कॅव्हूर व ग्यारीबाल्डी यांची मुलाखत खाजगी रीतीनें घडवून आणून त्यानें त्यांचें सख्य होण्याचे कामीं खटपट केली; व तीस यश येऊन ग्यारीबाल्डीचे मन कॅव्हूर विषयीं बरेंच निवळलें. परंतु या दोन देशभक्तांच्या दिलजमाईचा फायदा राष्ट्रास फार वेळ मिळाला नाहीं. कारण एक महिन्याचे आंतच कॅव्हूर हा मरण पावला. कॅव्हूर यानें आजपर्यंत केलेली देशसेवा यापुढें होणाऱ्या देशसेवेहून फारच अधिक महत्वाची होती हें खरें; तथापि त्याच्या मृत्यूमुळें इटलीची पुष्कळच हानी झाली यांत कांहीं संशय नाहीं.

**ग्यारीबाल्डीचा सण**—ता. ८ सप्टेंबर रोजीं नेपल्स येथील लोकांनीं ग्यारीबाल्डीचे नांवानें मोठा सण केला. कारण बरोबर एक वर्षापूर्वी याच तारखेस ग्यारीबाल्डीनें विजय संपादन करून नेपल्समध्यें प्रवेश केला होता. त्या दिवसाइतकाच लोकांनीं आजही उत्सव व जयजयकार केला, आणि सर्व नागरिकांनीं मिळून त्याला खालील पत्र पाठविलें. "महाराज प्रतिदिवशीं, फार, काय, पण प्रतिक्षणीं आह्मीं आमच्या पित्याचें, आमच्या ग्यारीबाल्डीचें चिंतन करीत

असतों, व त्यास दुवा देत असतों. आपली मूर्ति आह्मां नागरिकांच्या हृदयमंदिरांत अढळ स्थापित झाली आहे, व जेव्हां जेव्हां आह्मीं ईश्वराची प्रार्थना करितों तेव्हां तेव्हां आपल्या नांवाचा आह्मीं उच्चार करीत असतों. या नगरीचे आपण पिते आहां. आपल्या मणगटाचे जोरावर व स्वहित बाजूस ठेवून, आपण उदारबुद्धीनें आपलें रक्त आमच्या कार्यांत खर्चीं घातलें आहे हें आह्मीं केव्हांही विसरणार नाहीं; व आमचे पुत्र-पौत्रही आपले ऋणी राहतील." इतकें झाल्यानंतर सर्वांनीं 'रोमला चला रोमला चला' असा एकच शब्द केला.

# भाग १६ वा.

## रोमवरील स्वारी.

**रोम व लोकमत**—या वेळीं सर्व इटालीयन लोकांस ध्यानीं मनीं स्वप्नीं रोम शहर दिसत होतें. इटलीचें गतकालचें सर्व वैभव एका रोमच्या नांवांत सांठविलें होतें, यामुळें रोम ही इटलीची फिरून एकवार राजधानी झाल्याशिवाय देश संयुक्त व स्वतंत्र झाला तरी त्यांत कांहीं अर्थ नाहीं असें लोकांच्या मनानें घेतलें होतें. खुद्द ग्यारीबाल्डीचे मनांत रोमविषयीं काय विचार घोळत असत, याचा उल्लेख वर अनेक वेळां आलाच आहे. धूर्त मुत्सद्दी कॅव्हूर व राजा व्हिक्टर ए-मॅन्युएल यांच्याही मनांत रोम काबीज करण्याची उत्सुकता फार होती. परंतु तसें करण्यास एक मोठी अडचण होती ती ही कीं, रोम हें पोपच्या ताब्यांत होतें व त्यास फ्रेंच बादशहाचा आश्रय होता. यामुळें रोमवर स्वारी करावयाची ह्मणजे फ्रान्स बरोबर युद्ध करण्यास तयार होण्यासारखें होतें. या विचारानें वरील मुत्सद्यांचे विचार जागच्या जागींच राहत. परंतु ग्यारीबाल्डीची स्वदेशभक्ति आंधळी होती. त्याला रोमच्या मार्गांतील अडथळे दिसत नव्हते. निदान ते दिसले तरी त्यांस तो जुमानणारा नव्हता. त्याचें धैर्य हें डोंगराच्या पायथ्यावर तुटून पडून आदळणाऱ्या लाटेप्रमाणें होतें. परंतु वरील

विचारी मुत्सद्यांपेक्षां त्याजमध्यें एक गुण विशेष होता. तो हा कीं, त्याजपेक्षां लोकांचें मन त्यास अधिक बरोबर रीतीनें कळत असे. ग्यारीबाल्डीचें पुढारीपण व रोम घेण्याची लोकसमाजाची उत्कट इच्छा, या दोन गोष्टींपुढें मुत्सद्यांच्यानें लवकरच निभाव लागेनासा झाला.

**मुत्सद्दीगिरी**—काय पाहिजे तें ह्मटलें तरी, रोमवर स्वारी करण्याबद्दल कांहीं तरी हालचाल झालीच पाहिजे, नाहीं तर लोक दंगा केल्याशिवाय खास सोडीत नाहींत, असें पाहून कॅव्हूरचे जागीं आलेला मुख्य प्रधान रॅटेझी यानें एक युक्ती काढली. राजा व्हिक्टर ए-मॅन्युएल रोमवर स्वारी करण्यास तयार आहे व त्या कामावर ग्यारीबाल्डीची योजना करावयाची आहे, असा बहाणा करून त्यानें ग्यारीबाल्डीची भेट घेतली. या भेटीमध्यें असें ठरलें कीं ग्यारीबाल्डीनें आपलें वजन खर्च करून रॅटेझीच्या पक्षास मदत करावी व तिचा मोबदला ह्मणून रॅटेझी यानें ग्यारीबाल्डीस रोमवर स्वारी करण्याचे बेतास उलट मदत करावी. अर्थात् रॅटेझीचे पोटांत कपट होतें; परंतु तें ग्यारीबाल्डीस उमजून आलें नाहीं व तो स्वारीचे तयारीस एकदम लागला. याच सुमारास खुद्द व्हिक्टर ए-मॅन्युएल याचें स्वदस्तूरचें पत्र ग्यारीबाल्डीस आलें. त्यांतील आशयही ग्यारीबाल्डीनें रोमवर स्वारी करावी असाच होता असें ह्मणतात. कसेंही असलें तरी एवढी गोष्ट निर्विवाद आहे कीं, आपण स्वारीचें काम हातीं घेतल्यास आपणास राजाकडून व प्रधानाकडून गुप्तरीतीनें कां होईना परंतु मदत खास होणार, अशी ग्यारीबाल्डीची पक्की खात्री होऊन राहिली होती. दिवसेंदिवस घडून येणाऱ्या निरनिराळ्या इतर गोष्टींनींही ग्यारीबाल्डीची ही समजत दृढच होत

चालली. लवकरच ग्यारीबाल्डीस इटलीच्या राजपुत्रांस बरोबर घेऊन पार्लेमों येथें जाणें भाग पडलें. त्यावेळीं तेथील लोकांनीं ग्यारीबाल्डीचा जयजयकार केला. लष्करी अधिकाऱ्यांनीं त्यास मेजवान्या दिल्या. 'नागरिकांनीं दिलेल्या मानपत्रास उत्तर देतांना ग्यारीबाल्डीनें उघड बोलून दाखविलें कीं, रोम व वेनिस हीं दोनहीं शहरें लवकरच इटालीयन लोकांचे ताब्यांत येणार; परंतु तीं हस्तगत झालीं तरच इटाली देश संयुक्त होईल, व हें महत्कृत्य साधण्यास लोकांस बरीच स्वार्थहानि करावी लागेल. हें भाषण सर्व लोकांस पसंत पडलें व ग्यारीबाल्डी हा रोमवर लवकरच चालून जाणार याबद्दल कोणासही शंका उरली नाहीं. सरकारी अधिकाऱ्यांचीही अशी खात्री झाली होती कीं, जरी उघड हुकूम सुटलेले नाहींत तरी ग्यारिबाल्डीनें आरंभिलेल्या कार्यास राजाचें गुप्तपणें अंग खास आहे. व यामुळें ग्यारिबाल्डीस यावेळीं थोडेंसें साहस करणें हें आपलें कर्तव्य आहे असें त्यांस वाटूं लागलें.

**अंतस्थ कारस्थानें**—पार्लमेंट सोडल्यावर ग्यारिबाल्डी थेट रोमच्याच वाटेला लागला. त्याचे भोंवतीं तरूण उत्साही व शूर असे बरेच लढाऊ लोक येऊन जमले. मार्साला येथें तो जातो तोंच त्या गांवचे अधिकारी व इतर सर्व नागरिक रणवाद्यें वाजवीत त्यास सामोरे आले, व मोठ्या थाटानें त्यास गांवांत घेऊन गेले. ही सर्व बातमी हां हां ह्मणतां जिकडे तिकडे पसर... फ्रेंच बादशाह नेपोलीअन यानें ताबडतोब आपला वकील व्हिक्टर ए-मॅनुएलच्या दरबारीं पाठविला, व तुह्मी ग्यारिबाल्डीस कैद करून आणण्याचे हुकूम एकदम सोडा असें त्यानें सक्तीचें बोलणें चालविलें. रॅटेझी याच्या कपटी कारस्थानाचे सिद्धीस ही गोष्ट इष्टच होती; व तो फ्रेंच बादशहाचे ह्मण-

ण्यास एकदम कबूलही झाला. परंतु खुद्द राजाचे मध्यस्तीनें ग्यारिबाल्डीस कैद करण्याचा बेत कांहीं वेळ तहकूब झाला. मात्र त्या शहाण्या राजानें येवढें केलें कीं, गुप्तपणें ग्यारिबाल्डीस एक पत्र लिहून त्यास असें कळविलें कीं पालेर्मो येथें केलेल्या भाषणाप्रमाणें उघड भाषणें करणें चांगलें नाहीं, व पुन्हां तशीं भाषणें कानावर आलीं तर फ्रेंच बादशहाचे आग्रहावरून तुह्मांस कैद करणें भाग पडेल.

**उघड तयारी**—परंतु ग्यारिबाल्डीनें ही सूचना मनावर न घेतल्यासारखेंच केलें. त्यानें लवकरच जाहीरनामा काढून असें प्रसिद्ध केलें कीं, १८४९ सालीं रोम येथें जी राज्य-क्रांति झाली होती त्यावेळीं सर्व नागरिकांच्या मतानें आप-ल्यास जो गव्हरनरचा अधिकार देण्यांत आला होता तो अधिकार बजावण्यास आपण जात आहों, व अशा रीतीनें आपल्या रोमवरील स्वारींत गैरकायदा असें कांहीं नाहीं. ही सबब पोकळ होती हें सांगावयास नकोच. परंतु कांहींही कुरापत काढिली तरी ती चालण्या इतकें लोकमत ग्यारीबाल्डीस यावेळीं अनुकूल झालें होतें येवढें मात्र वरील जाहीरनाम्यावरून स्पष्ट सिद्ध होतें. लोकमत अनुकूल होतें तसेंच अधिकारी वर्गाचें मतही त्यास गुप्तपणें अनुकूळ होतें. परंतु फ्रेंच बादशहाचें जेव्हां फारच टुमणें लागलें तेव्हां राजास ठिकठिकाणच्या लोकांना ग्यारीबाल्डीस मदत न कर-ण्याविषयींचे हुकूम सोडणें भाग पडलें. परंतु ते हुकूम निर्जीव होते हें तेव्हांच दिसून आलें. कॅटेनिया या गांवीं ग्यारीबाल्डी येण्यापूर्वींच वरील प्रकारचा एक हुकूम येऊन पोंचला होता; परंतु तो बाजूस ठेवून लोकांनीं ग्यारीबाल्डी येतांच बाहू पसरून त्याचें आगतस्वागत केलें. त्यांनीं त्यास उघड

मानपत्रही दिलें व ज्या कार्यास ग्यारीबाल्डी हा निघाला होता, तें लवकरच सफळ होवो अशी त्यामध्यें आशा व्यक्त केली होती. याठिकाणीं सरकारी लष्करांतील कित्येक शिपाईही आपापल्या जागांचे राजीनामे देऊन ग्यारीबाल्डीच्या स्वयंसेवकांत येऊन मिसळले. या सुमारास त्याचे जवळ कामापुरतें सैन्य जमा झालें होतें. कॅटेनिया येथून पुढें जाण्यास सामुद्रधुनी उतरावी लागते, परंतु ग्यारीबाल्डीस इटालियन आरमाराची मदत मिळणें शक्य नव्हतें. तेव्हां त्यानें एक अजब युक्ति लढविली. एके दिवशीं एका लहानशा जहाजांत बसून त्याच बंदरांत नांगरेलेल्या फ्रेंच व इटालियन जहाजांवर ग्यारीबाल्डीनें अवचित हल्ला केला. त्या जहाजांच्या कप्तानांस कैद केलें व त्यांत त्यांनीं आपलें सैन्य भरलें. ही गोष्ट संध्याकाळीं घडून आली व लगेच मध्यरात्रीं त्यानें जहाजें हाकारलीं आणि सकाळपर्यंत प्रवास करून तो मोलटो येथें किनाऱ्यास लागला. दुसरे दिवशीं त्यानें एक जाहीरनामा काढून लोकांस असें फर्माविलें कीं, राजाज्ञा नेहमीं मला शिरसावंद्य आहे, परंतु राजाच्या मंत्रिमंडळास मात्र मीं मुळींच जुमानणार नाहीं. हें मंत्रिमंडळ स्वदेशभक्तिपराङ्मुख झालेलें आहे, व फ्रेंचबादशाचें दासानुदास बनलेलें आहे. यास्तव मंत्रिमंडळाचें कांहींही न ऐकतां रोमवरील स्वारीस सर्वांनीं मदत करावी.

**ॲसप्रोमाँटीची लढाई**-परंतु इकडे हेंच मंत्रिमंडळ आपल्यास पकडण्याकरितां कारस्थानचें जाळें विणीत बसलेलें असून लवकरच आपल्यास त्यांत अडकून पडावयाचें आहे हें ग्यारीबाल्डीच्या स्वप्नींही आलें नसेल. त्याचें पाऊल जसजसें पुढें पडत चाललें, तसतसें

फ्रेंचबादशहाचें टुमणें अधिकच लागूं लागलें व शेवटीं ग्यारीबाल्डीस प्रतिबंध करण्याकरितां सैन्य पाठविणें हें कांहीं केल्या टळत नाहीं असें पाहून व्हिक्टर ए-मॅन्युएल यानें हुकूम सोडले. या सैन्याची व ग्यारीबाल्डीचे सैन्याची ॲस प्रोमॉंटी याठिकाणीं गांठ पडली. ग्यारीबाल्डीचे सैन्यास चारही बाजूंनीं वेढा पडला होता. राजाचे सैन्यास चुकवून जातां आलें तर जावें, पण लढाई करूं नये असें ग्यारिबाल्डीनें मनानें ठरविलें होतें. पण त्याचा हुकूम अमान्य करून त्याचे सैन्यांतील तरुण शिपायांनीं गोळीबारास सुरुवातही केली. हें पाहून तो दोनही सैन्यांचे मध्यें झाला. त्याचे दोहोंबाजूस असणारे शिपायांस जखमा लागल्या; व उभयपक्षांकडून परस्परावर गोळ्यांचा पाऊस पडत होता. अशा स्थितींत ग्यारीबाल्डी हा आपल्या घोड्यावर ताठ उभा राहून हात वर करून गोळीबार बंद करा, बंद करा, असें ओरडून सांगूं लागला. त्याप्रमाणें गोळीबार लवकरच बंद झाला, परतु तेवढ्या अवधींत त्याला स्वतःला दोन तीन गोळ्या लागल्या. तथापि तो तसाच कांहीं वेळ उभा राहून डोक्यावरील टोपी हातांत घेऊन व ती फिरवून " गोळीबार बंद करा " असें ओरडून सैन्यास सांगत होता. कांहीं वेळानें त्याच्या लोकांनीं त्यास उचलून एका झाडाखालीं नेऊन बसविलें. लवकरच सरकारी सैन्याचा मुख्य अधिकारी त्याला येऊन भेटला व राजाकडून आलेला हुकूम त्यानें ग्यारीबाल्डीस फर्माविला. या हुकुमाप्रमाणें त्याच्या सर्व सैन्याचीं हत्यारें काढून घेण्यांत येऊन त्यांना घरोघर जाण्याची आज्ञा मिळाली. खुद्द ग्यारीबाल्डीस कॅप्रेरा बेटांत नेऊन सोडण्याचा हुकूम झाला होता त्याप्रमाणें संध्याकाळच्या थंडवेळीं एक डोली करून वर गार गवत

व झाडपाला बांधून तींत ग्यारीबाल्डीस निजविलें व त्याचेच लोकांनीं ती डोली सिला नांवाच्या बंदरापर्यंत मोठ्या प्रेमानें आपल्या खांद्यावरून नेली. तेथें त्यांनीं त्यास जहाजांत घातलें. जहाज चालू झालें तेव्हां ग्यारीबाल्डीच्यानें राहवेना. अंग ठणकत होतें तरी तशा स्थितींत तो ताडकन उभा राहिला, व मोठ्यानें ओरडून ह्मणाला "चला चला रोमला जाऊं चला." परंतु इतके शब्द बोलल्याबरोबर त्यास झीट येऊन तो खालीं पडला.

**जखमी वीर**—ग्यारीबाल्डी जखमी झाल्याची बातमी तेव्हांच सर्व युरोपभर पसरून जिकडे तिकडे हाहाःकार उडाला व जिकडे तिकडे सभा भरून दुखःप्रदर्शक ठरावही पास झाले. इंग्लंडमध्यें तर १००० पौंड वर्गणी एकदम जमा झाली, व लोकांनीं सुप्रसिद्ध डाक्तर पारट्रिज यास ग्यारीबाल्डीला औषधोपचार करण्याकरितां पाठविलें. ग्यारीबाल्डीचें जहाज यॅरिगनॅन्ते येथील बंदरांत पोंचल्यावर जो देखावा दिसला तो तर हृदयद्रावकच होता. कोणी त्याकरतां फळफळावळ, कोणी फुलें, कोणी कांहीं, कोणी कांहीं असें आणिलें होतें. बायकामुलें तर त्याजभोंवतीं जमून त्याच्या वस्त्राच्या टोकांचीं चुबनें घेऊं लागलीं. तेव्हां त्याला व लोकांना दोघांनांही रडूं आलें. मग त्यांचें समाधान करण्याकरितां ग्यारीबाल्डी मग धीर देऊन त्यांस ह्मणाला "प्रिय मित्रांनों धीर धरा. असें रडतां कां? अद्यापि ग्यारीबाल्डी जिवंत आहे ना? झालें तर मग?" थोड्यांच दिवसांत इटली, फ्रान्स व इंग्लंड येथून ग्यारीबाल्डीला औषधोपचार करण्याकरितां आलेले डाक्तरलोक एकत्र जमले. व त्यां सर्वांनीं मिळून आपली शिकस्त केली तरी बरेच दिवसपर्यंत त्याच्या जखमा भरून निघाल्या नाहींत, किंवा

त्यांचें दुःखही राहिलें नाहीं. त्याच्या तबियतीच्या खबरा दररोज जिकडे तिकडे तारेनें कळविण्यांत येत, व तो चांगला बरा होईपर्यंत सर्व युरोपखंडभर एक प्रकारची उदासिनता व अस्वस्थता येऊन पसरली होती. त्याच्या दुखण्याइतका दुसऱ्या कोणाच्याही दुखण्याबद्दल लोकांत गवगवा झाला नसेल.

**लोकांची कळकळ**–प्रधान रॅटेझी यास तर या प्रकरणास आपण कोठून हात घातला असें झालें. ॲसप्रोमॉंटीच्या लढाईनंतर इटालीयन पार्लमेंटाची जी पहिली सभा भरली तिजमध्यें फारच मोठा कडाक्याचा वाद झाला. ग्यारीबाल्डीस यःकश्चित् गुन्हेगाराप्रमाणें वागविण्यांत आलें, त्याची अनास्था झाली, वगैरे दोषारोप करून प्रजापक्षीय सभासदांनीं मंत्रिमंडळावर खूपच तडाखा उडविला. परंतु सरकारी अधिकाऱ्यांकडून जरी त्याची कितीही अनास्था झाली तरी लोकांनीं त्याजबद्दल जी कळकळ दाखविली तिच्या योगानें ती सर्व भरून निघाली असेल यांत शंका नाहीं. त्याच्या उशापायथ्याशीं बसून त्याची शुश्रूषा करण्यास मिळावी अशाबद्दल शेंकडों स्त्रियांचे श्रम फुकट गेले असतील. कोण ती गर्दी! एका गरीब भोळ्या इंग्रज बाईनें असें ऐकलें होतें कीं, इंग्लिश मनुष्याचा शब्द ऐकल्या पासून ग्यारीबाल्डीस बरें वाटतें. तेव्हां आपला शब्द ग्यारीबाल्डीस ऐकवावा या हेतूनें ती आपला कामधंदा सोडून बरोबर आपल्या मुलीला घेऊन कित्येक कोसांवरून ग्यारीबाल्डी होता तेथें आली होती. कित्येक खासगी डाक्तर आपापले धंदे टाकून ग्यारीबाल्डीला औषध देण्यास सांपडावें ह्मणून आले होते. या व इतर लोकांची मिळून इतकी विलक्षण गर्दी झाली होती

कीं, त्याच्या डाक्तरांस हजारों निरानिराळ्या सबबी सांगून लोकास माघारी लावून देतां देतां पुरे वाट झाली. ॲसप्रोमाँटीच्या लढाई-नंतर पहिले कांहीं दिवस ग्यारीबाल्डी हा बंडखोर या नात्यानें तुरुंगांत असल्यासारखा होता. परंतु लवकरच व्हिक्टर ए-मॅन्युअल यानें त्यास व त्याजबरोबरच्या बहुतेक लोकांस माफी दिली तेव्हां लोक आपापल्या घरीं गेले. ग्यारीबाल्डी हाही स्वेछेनें स्पेझिया येथें व तेथून पुढें पिझा येथें गेला. याठिकाणीं त्याचे जखमेंतील गोळी काढण्यांत आली, व तेथून तो बरा होण्याचे मार्गास लागला. पिझा येथील लोकांनीं या आनंददायक गोष्टीचे स्मरणार्थ एक बैठा मनोरा बांधविला, व त्यावर खालील अक्षरें खोदविलीं. " ॲसप्रोमाँटी येथील लढाईत जखमी झालेला गॅरिबाल्डी येथें येऊन बरा झाला. " दुसरे दिवशीं सकाळीं पिझा येथील गव्हर्नरानें हत्यारबंद लोकांकडून तो मनोरा पाडविला, पण लागलाच लोकांनीं फिरून दुसरा उभारला. मात्र त्याजवरून ॲसप्रोमाँटी हे उद्वेगजनक शब्द वगळले होते, व पुढें गव्हर्नरानेंही त्याजविरुद्ध कांहीं उचल केली नाहीं. त्यादिवशीं रात्रौ पिझा येथील नाटकगृहांत एक प्रयोग व्हावयाचा होता; परंतु जाहिरातींतीत प्रयोग करण्याचे ऐवजीं प्रेक्षकजनांचे इच्छेनें सर्वांनीं ग्यारिबाल्डीचें स्तोत्रच वरचेवर ह्मणून प्रयोगाची सर्व वेळ घालविली. पायांतील गोळी निघाल्यामुळें ग्यारिबाल्डी बरा होण्याचे पंथास लागला होता. व त्यास पाहण्याला येणाऱ्या लोकांकडून त्याला त्रास होऊं नये ह्मणून त्याच्या निजावयाच्या खोलीच्या दाराला एक भोंक पाडून ठेविलें होतें, व पिंजऱ्याचे फटींतून ज्या प्रमाणें सिंहास पाहतात, त्याप्रमाणें या नरसिंहास पाहून लोकांनीं परस्पर निघून जावें

अशी व्यवस्था करण्यांत आली होती. तथापि लोकांची गर्दी इतकी कांहीं विलक्षण होती कीं, नुसत्या गलबल्यानेंच त्याचें दुखणें उलटेल अशी भीति वाटूं लागली. यामुळें डाक्तरांच्या सल्ल्यानें त्यानें आपल्या कॅप्रेरा बेटास परत जाण्याचें ठरविलें. तो जाण्याचे वेळीं लोकांनीं मोठी रोषनाई केली व त्याला पोंचविण्यास बायामुलेंसुद्धां समुद्रांत आंतपर्यंत गेलीं होतीं.

**प्रधानाचा राजीनामा**–इटालियन प्रधान रॅटेझी याचे कपटामुळें ग्यारीबाल्डीचा रोमवर जाण्याचा बेत फसला ही गोष्ट खरी; तथापि या कपटाचा परिणाम खुद्द रॅटेझीसही भोगावा लागला. प्रधानमंडळाचें वर्तन ग्यारीबाल्डीशीं लबाडीचें होतें, असें जो तो उघड बोलूं लागला व यामुळें लवकरच रॅटेझीसहवर्तमान प्रधान मंडळास राजीनामा द्यावा लागला. पुढील वर्षी रशियानें पोलंडची बरीच दुर्दशा केली, यामुळें पोलंडबद्दल चहूंकडे सहानुभूति उत्पन्न झाली होती. याहीवेळीं ग्यारीबाल्डीचे मनांत एकवेळीं आलें होतें कीं, आपण पोलंडांत जावें व तेथील लोकांस बंड करण्यास मदत करावी; परंतु कांहीं कारणामुळें तो त्याचा बेत मनचा मनांतच राहिला.

कीं, त्याच्या डाक्तरांस हजारों निरानिराळ्या सबबी सांगून लोकास माघारी लावून देतां देतां पुरे वाट झाली. अॅसप्रोमाँटीच्या लढाई-नंतर पहिले कांहीं दिवस ग्यारीबाल्डी हा बंडखोर या नात्यानें तुरुंगांत असल्यासारखा होता. परंतु लवकरच व्हिक्टर ए-मॅन्युअल यानें त्यास व त्याजबरोबरच्या बहुतेक लोकांस माफी दिली तेव्हां लोक आपापल्या घरीं गेले. ग्यारीबाल्डी हाही स्वेच्छेनें स्पेझिया येथें व तेथून पुढें पिझा येथें गेला. याठिकाणीं त्याचे जखमेंतील गोळी काढण्यांत आली, व तेथून तो बरा होण्याचे मार्गास लागला. पिझा येथील लोकांनीं या आनंददायक गोष्टीचे स्मरणार्थ एक बैठा मनोरा बांधविला, व त्यावर खालील अक्षरें खोदविलीं. " अॅसप्रोमाँटी येथील लढाईंत जखमी झालेला गॅरिबाल्डी येथें येऊन बरा झाला. " दुसरे दिवशीं सकाळीं पिझा येथील गव्हर्नरानें हत्यारबंद लोकांकडून तो मनोरा पाडविला, पण लागलाच लोकांनीं फिरून दुसरा उभारला. मात्र त्याजवरून अॅसप्रोमॉटी हे उद्वेगजनक शब्द वगळले होते, व पुढें गव्हर्नरानेंही त्याजविरुद्ध कांहीं उचल केली नाहीं. त्यादिवशीं रात्रौ पिझा येथील नाटकगृहांत एक प्रयोग व्हावयाचा होता; परंतु जाहिरातींतील प्रयोग करण्याचे ऐवजीं प्रेक्षकजनांचे इच्छेनें सर्वांनीं ग्यारिबाल्डीचें स्तोत्रच वरचेवर ह्मणून प्रयोगाची सर्व वेळ घालविली. पायांतील गोळी निघाल्यामुळें ग्यारिबाल्डी बरा होण्याचे पंथास लागला होता. व त्यास पाहण्याला येणाऱ्या लोकांकडून त्याला त्रास होऊं नये ह्मणून त्याच्या निजावयाच्या खोलीच्या दाराला एक भोंक पाडून ठेविलें होतें, व पिंजऱ्याचे फटींतून ज्या प्रमाणें सिंहास पाहतात, त्याप्रमाणें या नरसिंहास पाहून लोकांनीं परस्पर निघून जावें

अशी व्यवस्था करण्यांत आली होती. तथापि लोकांची गर्दी इतकी कांहीं विलक्षण होती कीं, नुसत्या गलबल्यानेंच त्याचें दुखणें उलटेल अशी भीति वाटूं लागली. यामुळें डाक्तरांच्या सल्ल्यानें त्यानें आपल्या कॅप्रेरा बेटास परत जाण्याचें ठरविलें. तो जाण्याचे वेळीं लोकांनीं मोठी रोषनाई केली व त्याला पोंचविण्यास बायामुलेंसुद्धां समुद्रांत आंतपर्यंत गेलीं होतीं.

**प्रधानाचा राजीनामा**—इटालियन प्रधान रॅटेझी याचे कपटामुळें ग्यारीबाल्डीचा रोमवर जाण्याचा बेत फसला ही गोष्ट खरी; तथापि या कपटाचा परिणाम खुद्द रॅटेझीसही भोगावा लागला. प्रधानमंडळाचें वर्तन ग्यारीबाल्डीशीं लबाडीचें होतें, असें जो तो उघड बोलूं लागला व यामुळें लवकरच रॅटेझीसहवर्तमान प्रधान मंडळास राजीनामा द्यावा लागला. पुढील वर्षी रशियानें पोलंडची बरीच दुर्दशा केली, यामुळें पोलंडबद्दल चहूंकडे सहानुभूति उत्पन्न झाली होती. याहीवेळीं ग्यारीबाल्डीचे मनांत एकवेळीं आलें होतें कीं, आपण पोलंडांत जावें व तेथील लोकांस बंड करण्यास मदत करावी; परंतु कांहीं कारणामुळें तो त्याचा बेत मनचा मनांतच राहिला.

# भाग १७ वा.

## इंग्लंडची सफर.

"To be the guest of England after having been the liberator of Italy—is beautiful and grand."
*Victor Hugo.*

**ग्यारीबाल्डी व इंग्लिशलोक**-ग्यारीबाल्डीला इंग्लिशलोक फार आवडत असें मागें अनेक वेळां दर्शविण्यांत आलेंच आहे. त्यांची स्वातंत्र्यप्रियता, त्यांचा उद्योग, त्यांची सुव्यवस्थित राज्यपद्धति इत्यादि गोष्टीमुळें सर्व युरोपखंडांत अधिक सुधारलेले लोक कोण तर इंग्लिश असें त्याचें मत झालें होतें, व तें तो बोलूनही दाखवीत असे * यामुळें ह्मणा किंवा इतर कारणांमुळें ह्मणा, इंग्लंडच्या लोकांसही ग्यारीबाल्डी विशेष आवडत असे. इंग्लंडच्या अशिक्षित लोकांस त्याच्या पराक्रमांचें मोठें कौतुक वाटे; व नेपल्समधील

---

* What is there perfect in this world? The English nation is by no means exempt from imperfections, yet the English are the only people who can be compared with the ancient Romans. They have laid the foundations of a new ideal of humanity, erect, inflexible, majestic, free, obeying no masters but the laws which they themselves control. England has become a sanctuary, an inviolable refuge for the fugitive and unfortunate of other nations.

अनन्वित जुलूम त्यानें मोडला यामुळें, सुशिक्षित लोकांचें-ही प्रेम त्याजवर बसलें होतें. कधीं काळीं पोप महाराजांचें बंड जर कोणी मोडील तर तो ग्यारीबाल्डीच मोडील असेंही त्यांस वाटूं लागलें होतें. याशिवाय वेळोवेळीं त्यानें इंग्लिश लोकांशीं आपला स्नेहभाव अनेक मार्गांनीं सुव्यक्त केलेला होता. इ. स. १८५७-६० या तीन वर्षांत तर ग्यारीबाल्डीचे सिसिलींतील पराक्रम घडून येण्यापूर्वीं देखील त्याच्या अद्भुत कृत्यांची नाटकेंही इंग्लिश रंगभूमीवर होत असत.

**सफरीचा हेतु**—कॅप्रेरा बेटांत निवांतपणें कांहीं दिवस गेल्यावर ग्यारीबाल्डीनें एकवेळ इंग्लंडची सफर करून यावें अशी त्याच्या मित्रांनीं गोष्ट काढली. या मित्रांचा हेतू, कदाचित् इंग्लंडला गेल्यानें त्याचा परदेशांत जयजयकार व्हावा, व अॅस्प्रोमाँटी येथें घडून आलेल्या गोष्टीचा जगास विसर पडावा असा असेल, नाहीं असें नाहीं; व विशेषत: आपल्या स्नेह्यांच्या आग्रहानेंच त्यानें इंग्लंडची सफर करण्याचा निश्चय केला. तथापि त्याच्या स्वत:च्या मनांतील अंतस्थ हेतु असा होता कीं इंग्लंडांतील मुत्सद्यांच्या भेटी घेऊन स्वदेशकार्यास कांहीं मदत झाली तर पाहावी.

**राजकीय कारणें**—ज्याची कीर्ति आपण आजपर्यंत कानांनीं ऐकत होतों तो पराक्रमी वीर व स्वतंत्रतेचा मित्र जनरल ग्यारीबाल्डी हा डोळ्यांनीं पाहावयास सांपडेल अशा बुद्धीनें इंग्लंडांतील प्रत्येक मनुष्याच्या मनांत, ग्यारीबाल्डी हा इंग्लंडास येणार याबद्दल, फार आनंद झाला. परंतु राजकीय दृष्टीनें पाहतां त्याचा आदरसत्कार करण्यास एक दोन प्रतिकूळ गोष्टी होत्या. ग्यारीबाल्डी

हा लोकपक्षाचा कट्टा अभिमानी; तेव्हां त्याचा जयजयकार झाला असतां आधींच उन्मत्त असलेल्या लोकपक्षाचे डोक्यांत वारें शिरून बड्या लोकांविरुद्ध बंडाळी होईल अशी कांहींस भीति वाटत होती. कांहींचें ह्मणणें असें होतें कीं, ग्यारीबाल्डी कसाही असला तरी त्यानें आपल्या राजाचा हुकूम तोडला होता, अर्थात् तो बंडखोर ठरला होता. व हल्लीं जरी त्यास क्षमा करण्यांत आली होती, तरी त्याचा उघडपणें सत्कार करणें हें एकंदरीनें बेकायदेशीर-पणास उत्तेजन देण्यासारखें होय. सर्वांत मोठी नड होती ती अशी कीं, ग्यारीबाल्डी हा रोमवर स्वारी करण्यास निघाल्या-मुळें फ्रान्सचा बादशहा नेपोलियन याचा तो शत्रु बनला होता; व प्रस्तुत प्रसंगीं फ्रान्सचें मन दुखविण्यास इंग्लंडास सोय नव्हती. या व अशा अनेक कारणांमुळें ग्यारीबाल्डीनें इंग्लंडास यावें अशाबद्दल इंग्लंडच्या प्रधानमंडळाकडून मन मोकळें करून संमति मिळेना. तथापि कांहीं असलें तरी ग्यारीबा-ल्डीस आणावयाचाच असा त्याच्या इंग्लिश मित्रमंडळीनें निश्चय केला. मात्र ही बातमी इटालियन सरकारापासून अगदीं गुप्त ठेवण्यांत आली होती.

**प्रवासांत सन्मान**—मार्च महिन्यांत एके दिवशीं सकाळीं ग्यारीबाल्डी हा गुप्तपणें उठून माल्टा येथें निघून गेला व तेथें रिपन नांवाच्या इंग्लिश आगबोटीवर चढला. इंग्लंडचे किनाऱ्यास लागण्याचे आदले दिवशीं आगबोटीवरील सर्व लोकांनीं मिळून या लोकोत्तर पाहुण्यास बडी मेजवानी दिली; व इंग्लंडच्या नांवानें सर्वांनीं पेले झोंकून जयजयकार केला. साउथॅमटन येथें आगबोट धक्क्याला लागतांच, प्रथमतः इंग्लंडांतील रहिवासी

इटालियन लोकांचे प्रतिनिधींनीं त्यास सामोरे करून देण्याचें सन्मान केला, व नंतर साउथॅमटनचा लॉर्ड मेयरहीस इंग्लंडाहून त्यानेंही त्याचें स्वागत केलें. दुसरे दिवशीं सग्लडस्टनसाहेबांची ल्डीनें ठिकठिकाणाहून आलेल्या लोकनियुक्त प्रतिहीरपत्र प्रसिद्ध घेतली. संध्याकाळीं साउथॅमटन टाऊनहालांत त्यास गर मानिले. देण्यांत आली व त्या दिवशीं लोकांनीं जिकडे तिकडे ७ जय- केली होती. यानंतर लॉर्ड हेनिसन, मि० सीली वगैरे खाश्द्वीस गृहस्थांच्या भेटी परत भेटी वगैरे झाल्या, व ग्यारीबाल्डी लंडनला जाण्यास निघाला. स्टेशनावर त्यास आवडत्या ह्मणजे- तांबड्या रंगाचा पोषाख केलेल्या स्त्रीपुरुषांची गर्दी झाली होती. रेलवे कंपनीनें त्याजकरितां एक स्वतंत्र सुंदर डबा दिला होता व त्यावर तोरणें लावलीं होतीं. लंडनला पोंचण्यापूर्वी वाटेंतील स्टेशनांवरून ठिकठिकाणचे लॉर्ड मेयर येऊन त्याचा आदर सत्कार करून गेले. जेथें जेथें गाडी उभी राहण्याची होती, तेथें तेथें हजारों लोक सांपडेल त्या उंच ठिकाणावर दिपमाळी सारखे ओथंबले होते. मुख्य स्टेशनाला गाडी पोंचण्याचे सुमारास शेंकडों सभांचे प्रतिनिधी प्लॅटफॉर्मवर तयार होतेच, व गाडीखालीं पाय ठेवल्यापासून स्वागतपर मानपत्रांस व हारतुऱ्यांच्या गर्दीस जी सुरुवात झाली ती तो मकाणास जाऊन पोंचेपर्यंत पुरली होती. तात्पर्य, ग्यारी- बाल्डीनें खुद्द इंग्लंडला स्वातंत्र्याची जोड मिळवून दिली असती तरी यापेक्षां त्याचा अधिक आदरसत्कार होणें शक्य नव्हतें. व त्या दिवशीं इटली स्वतंत्र होण्यास इंग्लंडची मनांतून सोळा आणे अनुकूलता आहे ही गोष्ट सर्व युरोपास कळून आली.

हा लोकपक्षाच कांच्या भेटी–दुसरे दिवशीं ग्यारीबाल्डीनें
झाला असतां प्रधान लॉर्ड पामरस्टन, लॉर्ड रसेल व
डोक्यांत वारें रदारांच्या भेटी घेतल्या. लंडनच्या नाग-
अशी कांहींस त्याला देण्यांत आलें. बिलोरी राजवाड्यामध्यें
असें होतें त्यास एक तरवार नजर केली. त्यानें पाहण्यासारखे
आपल्य वे देखावे पाहिले. व अशा रीतीनें १९ दिवस
ठरल या गडबडींत व मानसन्माच्या गर्दींत गेले. इंग्लंडांतील व स्काटलंडांतील सर्व मुख्य शहरांतून त्याला आमत्रंणें आलीं होतीं, व उत्तरेकडे प्रवास करण्याचे ग्यारीबाल्डीचे दिवस वगैरे ठरून गेले होते. परंतु इतक्यांत एकदम बातमी पसरली कीं, डाक्तर लोकांच्या सल्ल्यानें ग्यारीबाल्डीस इंग्लंडांतून लवकरच परत जावें लागणार आहे. डाक्तरांचा सल्ला हें अर्थात्च ढोंग होतें. खरें कारण असें होतें कीं, फ्रान्सच्या बादशहास इंग्लंडनें आपल्या शत्रूचा आदरसत्कार केल्याबद्दल अत्यंत संताप आला होता.* व तो शमविण्यास इंग्लिशप्रधान-

---

* आपल्यामुळें इंग्लिश मुत्सद्यांस विनाकारण त्रास होऊं नये अशी ग्यारीबाल्डीची इच्छा होती.

"Dear friends, I desire no political demonstrations. Above all not to excite any agitation." व नंतर

"I withdrew when I thought proper to do so without instigation."

असें ग्यारीबाल्डीनें टयुरिनच्या एका वर्तमानपत्रास लिहिलें होतें. यावरून निदान तो परत फिरला तो तरी– डाक्तरांच्या सल्यामुळें परत फिरला असें ठरतें. अंतस्थ कारणें कोणतींही असलीं तरी तीं त्याच्या कानावर आली नसावीं.

मंडळानें ग्यारीबाल्डीची लवकर उचलबांगडी करून देण्याचें कबूल केलें होतें. यामुळें लवकरच ग्यारीबाल्डीस इंग्लंडाहून परत फिरावें लागलें. निघण्याचे पूर्वी त्याची व ग्लाडस्टनसाहेबांची मुलाखत झाली, व शेवटीं निघतांना त्यानें एक जाहीरपत्र प्रसिद्ध करून त्याचे द्वारें सर्व इंग्लिश लोकांचे फार फार आभार मानिले. इंग्लंडला गेल्यानें, ह्मणजे तेथील लोकांनीं त्याचा जयजयकार केल्यानें, ग्यारीबाल्डीच्या स्नेह्यांचा हेतु बराच सिद्धीस गेला. त्याची सर्व युरोपखंडांत पूर्वींहून अधिकच मान्यता झाली. परंतु खुद्द ग्यारीबाल्डीचा अंतस्थ हेतु फारसा सफळ झाला नाहीं. इंग्लिश लोकांची एकंदरीनें इटलीशीं असलेली सहानुभूति दृढ झाली हें खरें, तथापि इंग्लिश मुत्सद्यांनीं त्यास पुढें मदत करण्याचें कांहींच स्पष्ट आश्वासन दिलें नाहीं.

**लंडनचें मानपत्र**—ग्यारीबाल्डीचे संबंधानें इंग्लंडांतील लोकांचें काय मत होतें हें लंडनच्या लोकांनीं त्यास लंडन शहरच्या नागरिकत्वाचे हक्क समर्पण करितांना सभेंत जें मानपत्र दिलें, त्यावरून कळून येणार आहे. हें मानपत्र सबंध इंग्रजींत खालीं दिलें आहे. या मानपत्राची भाषा अत्यंत शुद्ध, गोड व चटकदार असून तें किती कळकळीच्या अंतःकरणानें लिहिलें असावें हें त्यावरून दिसून येईलः—

" Illustrious Sir,—The City of London invites you to-day to accept the highest honour and award at her disposal, placing your distinguished name upon the list of worthies inscribed upon the roll of honorary citizenship. It becomes my duty accordingly, to address to you in her name a few words, however inadequate, of thanks, congratulation, and hearty welcome. We are well aware that

no one shrinks more sensitively than yourself from the voice of eulogy; and yet, living as you do to please not yourself alone, you will feel that there are occasions—and this would appear to be one of them —when, for the sake of others, truth, though flattering, should be listened to. Bear with me, then, while I attempt to give feeble expression to the feelings of unbounded admiration and affection entertained towards you by the citizens of London. I am not called to dilate upon the marvellous incidents of your eventful career, rivalling in interest the wildest romance, because the resolution of this honourable Court, devised so as to secure a perfect unanimity of welcome, directs my remarks rather to your character than to the political events of your life. History, it has been said, usually reproduces herself at intervals more or less frequent, but we turn her pages in vain to meet with the prototype of Giuseppe Garibaldi: 'none but himself can be his parallel.' We find, Sir no counterpart to your career, even among the fabled legends of the early periods of that city with which your name is henceforth imperishably associated; when Romans, in the interest of their conntry,

> 'Spared neither lands nor gold,
> Nor son, nor wife, nor limb, nor life,
> In those brave times of old'

In your person that primitive spirit of self-sacrifice is reproduced in combination with characteristics and qualifications hitherto deemed incompatible. The glories of an accomplished general, associated with the instinct and daring of the old sea-kings; valour which liberated kingdoms and placed them at your feet, combined with the stern incorruptibility of a

रा. क्र ......... गो. वि .........
वि. ......... कै. .........



Dentatus and the severe simplicity of a Cincinnatus a heart in which the boldness of a Leonidas, dwells compatibily with the tenderness of a woman and the truthfulness of a child; the whole strangely tempered and elevated by an earnest craving for the reign of peace, brotherhood, and freedom-manifesting faith in the world's future, in humanity, and in God. Twice, ere mature manhood, you had risked your own life to rescue a fellow-creature from drowning. Then, like our own Florence Nightingale, you devoted yourself to the suffering and the dying at a cholera hospital at Marseilles. Proceeding to South America, you are subject to the infliction of torture to the utmost point of human endurance, to compel (hopeless task)the betrayal of a friend; and with generosity almost superhuman, you release with his life, liberty, and property intact, the monster who had so tortured you, when he falls into your hands. What shall I say of the magnanimity which distributed the spoils of war and of prizemoney on the ocean to the most needy of your companions, and stripped from your own back even the last remaining shirt to shelter a comrade ? Restored to Italy and to the work to which your life is devoted, victory places at your disposal the revenues of two kingdoms and spoils which might have graced an oriental triumph ; but you reserve not to yourself sufficient to convey you to your seagirt rock of Caprera, and grandest of all when striken down in the name of your country, wounded in the house of your friends', suffering and helpless during thirty weary days and sleepless nights, no taunt or reproach escape your lips. ...

... ... ... We have no selfish interest to pro-

mote in relation to this your visit. The era of revolutions is, to us, closed. ... ... ... You wil go back to that beautiful but long misgoverned country, to tell of a sight you have witnessed—unique of its kind in Europe—of a million of men contributing to a triumph to the uncrowned champion of liberty without the presence of a single soldier; and you can acquaint those who rule that the securest throne rests solely upon the affections of a free people, and that the power to 'terminate the era of revolutions', is in the keeping of rulers, and at their own disposal. And now, Sir, permit me the privilege of offering you the right hand of fellowship as a citizen of London, requesting your acceptance, in the name of the Corporation, of this souvenir of your visit to their city. We regret exceedingly, in common with our fellow-countrymen that having been too demonstrative in your affection, having loved not wisely but too well, your health renders it expedient that your visit should speedily terminate. Let us hope, in the language of Lord Palmerston, that 'the early termination of your visit and your foregoing the honours awaiting you in every town in this country, however, disappointing to those who admire, may have the effect of preserving to your country a life so valuable." In the name of his lordship in the chair, of his brethren the aldermen, and of every member of this Court, I express a fervent hope that British skill, and the invigorating air of our northern climate, may contribute strength and soundness to your enfeebled limb; and may the unbought spontaneous love and welcome of a free people impart fresh nerve to your arm, and brace your patriotic heart for any work for Italy or for the world which Providence may yet have in store for you."

## भाग १८ वा.

## आस्ट्रियाशीं तिसरी लढाई.

पंके निमग्ने करिणि भेको भवति मूर्धगः ॥

**स्वस्थतेचे दिवस**—ता. १९ जून १८६४ रोजीं ग्यारीबाल्डी आपल्या मुलांसह व स्नेह्यांसह कॅप्रेरा बेटास विश्रांति घेण्यास परत आला. परंतु प्रथम कांहीं दिवस त्याची प्रकृति दुरुस्त न होतां खालावतच चालली. कालांतरानें तो बरा झाला. कॅप्रेरा बेटाची शुद्ध हवा, तेथील शांततेचे उद्योग, प्रेमळ स्नेही व गोड मुलें यांजकडून होणारी शुश्रूषा, व सर्वांत मुख्य ह्मटलें ह्मणजे मनाची स्वस्थता, यांचे योगानें त्याचे प्रकृतीस हळूहळू गुण पडत चालला. तो बरा होतो न होतो तोंच त्याची स्वस्थता भंग पावण्याचा एक प्रसंग आला होता, परंतु त्याचे स्नेह्यांनीं त्यास हालचाल न करूं दिल्यानें तो टळला, व त्याचा ग्यारीबाल्डीवर फारसा अनिष्ट परिणाम झाला नाहीं. हा प्रकार ह्मणजे ऑस्ट्रिया व हंगेरी या दोन राष्ट्रांतील लढाई हा होय. या सुमारास या दोन राष्ट्रां-तील वैमनस्य कळसास जाऊन पोंचलें होतें. हंगेरीचे लोक स्वतंत्रता मिळविण्याकरितां लढण्यास तयार झाले होते. ऑस्ट्रियाचा जो कोणी शत्रू तो ग्यारीबाल्डीस मित्रासारखा वाटत असे, व हंगेरीयन लोक तर स्वतंत्रतेच्या पवित्र कार्याकरितां लढण्यास प्रवृत्त झाले होते एवढें ग्यारीबाल्डीस त्यांचे कुमकेस जाण्यास पुरें होतें. व त्याप्रमाणें ऑस्ट्रिया विरुद्ध लढण्यास

जाण्याचा त्यानें निश्चयही केला होता. परंतु राजा व्हिक्टर ए-मॅन्युएल यास ही बातमी लागताच त्यानें ग्यारीबाल्डीकडे मुद्दाम आपला माणूस पाठवून त्या वेळीं लढाईस जाणें सर्वथा अनिष्ट होतें अशी त्याची खात्री करून दिल्यानें तो जाण्याचा राहिला. असो, इकडे त्याचा शेतकीचा उद्योग सतत चालू होताच व त्याचे योगानें वर्ष अखेरीचे पूर्वीच ग्यारीबाल्डीचे अंगीं पूर्वीची ताकद आली.

**महत्वाचें स्थित्यंतर**—येथपर्यंत वर्णिलेला ग्यारीबाल्डीच्या चरित्राचा भाग हाच विशेष महत्वाचा होय. यापुढें ग्यारीबाल्डी एक दोन प्रसंगीं सैन्याचें आधिपत्य स्वीकारून रणांगणांत गेला होता; व नेहमींप्रमाणें शूरत्वानें व जिवाची आशा न धरतां तो लढला व त्याला यशही आलें, नाहीं असें नाहीं. परंतु आजपर्यंतच्या इटालीच्या स्थितींत व या पुढील स्थितींत मुख्य फरक पडला तो असा कीं, पूर्वी जिकडे तिकडे सामसूम असून योजलेल्या स्वदेशकार्यास उपयोगी पडणाऱ्या प्रत्येक साहसी कृत्याची उठावणी ग्यारीबाल्डीस आपल्या शिरावर जबाबदारी घेऊन किंबहुना शीर देण्यास तयार होऊन करावी लागे. परंतु आजपर्यंत त्यानें अश्रांत श्रम घेऊन केलेल्या मेहनतीमुळें खरें देशकार्य कोणतें व्हावयास पाहिजे याबद्दल इटलींतील राजाच्या, मंत्रीमंडळाच्या व प्रजाजनांच्या—सर्वांच्याच मनांत चांगला प्रकाश पडला होता, व त्या कार्याची बऱ्याच अंशानें सिद्धीही झाली होती. ऑस्ट्रियाचे जुलुमापासून इटली सोडवून संयुक्त व स्वतंत्र केला पाहिजे, अशा विचाराचें राजकीय धोरण इटलीच्या दरबाराचें ठरून गेलें होतें. व जरी ग्यारीबाल्डीप्रमाणें माथें फिरवून आगींत उडी घालण्याचें धैर्य व्हिक्टर ए-मॅन्युएल यास नव्हतें तरी

वरील हेतु साधण्यास कोणतीही सोयीची संधि मिळाली असतां ती दवडावयाची नाहीं व ती साधतांना जरूर तर थोडीबहुत झीजही सोसावयाची इतका निश्चय राजाचा होऊन राहिला होता. शिवाय आजपर्यंत ग्यारीबाल्डीनें केलेल्या स्वार्थत्यागानें, त्याचे सुयशानें व निःस्सीम भक्तीनें संतुष्ट होऊनच कीं काय, इटलीच्या नशिबावरील अधिष्टात्री व सर्व जगांतील घडामोडींचे नियमन करणारी देवता संतुष्ट होऊन तिनें इटलीच्या स्वातंत्र्यास अनुकूल अशा अनेक गोष्टी यूरोपखंडांत घडवून आणण्याचें योजिलें. यामुळें ग्यारीबाल्डीस यापुढें जातीनें फारशी खटपट करण्याचें कारण पडलें नाहीं. प्रसंगीचा किंवा निर्वाणीचा मित्र अशा तऱ्हेनें ग्यारीबाल्डीचें इटलीच्या दरबाराशीं नातें जडलेलें असल्यामुळें केवळ प्रसंग पडल्याखेरीज तो राजकीय गोष्टींत मन घालीत नसे; व इटलीच्या नशिबानें मनावर घेतल्यामुळें राजा किंवा ग्यारीबाल्डी यांच्या उद्योगाशिवाय परस्परच काम भागूं लागलें. आणि नशीब अनुकूल झाल्यावर त्याच्या कर्तबगारीपुढें एकट्या मानवी प्राण्याची कर्तबगारी ती केवढी ?

**आस्ट्रियांशीं कुरापत**—ग्यारीबाल्डी इंग्लंडाहून परत कॅप्रेरा बेटास आल्यावर थोड्याच दिवसांनीं खुद्द इटलीस आस्ट्रियाशीं वादाचा एक प्रश्न उपस्थित झाला. मागें १८६० सालीं आस्ट्रियाशीं फ्रान्सच्या दुराग्रहावरून तहनामा करून इटलीनें लॅांबर्डी प्रांत घेतला होता व त्याऐवजीं व्हेनेशिया प्रांत आस्ट्रियास देऊन टाकला होता, व आपली जन्मभूमी आपल्या देशाच्या हाडवैऱ्यांस विकल्याबद्दल ग्यारीबाल्डीचा काऊंट कॅव्हूर याजवर अतिशय कोप झाला होता, ही गोष्ट मागें एका भागांत नमूद झालेलीच आहे. या बाबतींत ग्यारीबाल्डीसच राग आला होता असें नव्हे, तर सर्व लोकांनाही वर सांगितलेली देवघेव

पसंत नव्हती. यामुळें १८६० सालीं झालेली चूक दुरुस्त करण्याच्या संधीकरितां इटली टपून बसला होता. ती संधि १८६६ सालीं आस्ट्रिया व प्रशिया यांच्यामध्यें उपस्थित झालेल्या लढाईनें आयतीच मिळाली. आज कित्येक दिवस आस्ट्रियाचें तेज कमी कमी होत चाललें होतें, व जर्मनीमध्यें वर्चस्व राखण्याचे बाबतींत प्रशियासारख्या तरुण व होतकरू राष्ट्राशीं हट्टाला पडल्यामुळें आस्ट्रिया मोठ्या संकटांत सांपडला होता. असें पाहून, व्हेनेशिया सोडवून घेण्याचा इटलीनें विचार केला व प्रशियाशीं आंतून सख्य केलें. १८६६ त इकडे आस्ट्रिया व प्रशियाचें युद्ध सुरू होतांच इटलीनेंही आपला हात साधून घेतला, व लढाई सुरू केली.

**लढाईस आमंत्रण**--लढाई सुरू करण्याचेपूर्वीं व्हिक्टर ए-मॅन्युएल यानें ग्यारीबाल्डीस आदरानें पाचारण केलें व त्यास आपल्या स्वयंसेवकांचीं २० पलटणें एक वर्ष लढण्याच्या कबूलीनें उभारण्यास सांगितलें. राजाला अडविण्यास ही संधि चांगली आहे, स्वयंसेवकांस पुढें सैन्यांत सामील करण्याचें वचन यावेळीं तरी आधीं राजापासून घे मग सैन्य उभारण्यास लाग, असा त्याच्या स्नेह्यांनीं त्यास बुद्धिवाद बराच केला; परंतु स्वयंसेवकांवर जरी त्याची ममता होती तरी त्यांचेंपेक्षां स्वदेशावर त्याची ममता अधिक होती. आस्ट्रियाशीं लढण्याची सोन्यासारखी संधि आली असतां अटींचें बोलणें लावून वेळ फुकट घालविण्याची कल्पना ग्यारीबाल्डीसारख्या शीघ्र कृतीच्या माणसास कशी रुचणार? त्यानें आपल्यावर विश्वास ठेवल्याबद्दल राजाचे मनःपूर्वक आभार मानले व सैन्य

जमविण्याचे तयारीस तो एकदम लागला. ही तयारी कसली? लढाईला निघावयाचेंच एवढी गोष्ट त्यानें जाहीर करण्याचा अवकाश, त्याचे भक्त भरा भरा देशाच्या चारही कोपऱ्यांतून धांवून आले, व हां हां ह्मणतां हजारो फौज तयार झाली. ऑस्ट्रियावर जाणाऱ्या सैन्याचें आधिपत्य जनरल लामार्मोरा याजकडे सोंपविण्यांत आलें होतें. तथापि लोकांचे विशेष विनंतीवरून सरकारांतून ग्यारीबाल्डीकडे स्वतंत्र अधिकार सोंपविण्यांत आलेला होता व त्याची योजना टायरोल प्रांतावर स्वारी करण्याकडे झाली होती. लामार्मोरा हा ग्यारीबाल्डी व त्याचे स्वयंसेवक यांचा मनांतून द्वेष करीत असे व त्यांना चांगलीं हत्यारें पात्यारें व पोषाख वगैरे देण्याचे कामीं त्यानें फार अडथळे घेतले. तथापि या कामीं ग्यारीबाल्डीनें आपलें ह्मणणें खरें केलें. व त्याचे लोकप्रियतेमुळें त्याला या वेळीं नाखुष करण्याची कोणाचीही सोय नव्हती.

**युद्धाची सुरवात**—ता० १९ जून १८६६ रोजीं इटलीनें लढाई सुरू केली. आस्ट्रियाशीं लढाई सुरू करावयाची ती हंगेरीचे बाजूस करावी असें ग्यारीबाल्डीचे मनांत फार होतें, व लढाई सुरू होण्याचे सुमारास प्रशियाचा मुख्य प्रधान काउंट बिसमार्क यानेंही इटलीनें स्वारी करणें ती याच दिशेनें करावी असा निरोप पाठविला होता. परंतु लामार्मोरा याच्या हुकुमावरून व राजासही तो पसंत पडल्यावरून त्यास टायरोल प्रांताकडे स्वारी करणें भाग पडलें, व तिकडे आपलें सैन्य घेऊन ग्यारीबाल्डी निघाला. यावेळीं ग्यारीबाल्डीचे सैन्यांत वाटेल त्या राष्ट्राचे लोक होते. इंग्लिश लोक तर सर्वांत अधिक होते. हे सर्वही स्वयंसेवक फार लोकप्रिय झाले होते. या सैन्याची खूण ह्मणजे जो तांबडा सदरा

तो सर्व सैन्यास पुरे इतका तयार करण्याकरितां मिलन शहरच्या सर्व बायकांनीं बोटें झिजेपर्यंत शिवणकाम केलें असें एकानें वर्णन केलेलें आहे. जे तरुण मनुष्य ग्यारीबाल्डीस जाऊन न मिळतां घरीं राहिले त्यांस या बायकांनीं 'बाहुल्या' नजर पाठवून त्यांची कुचेष्टा केली. फार काय? पण मेरिएटि ग्युलिएनिया नावांची एक १७ वर्षांची मुलगी ऍंटोनिओ डेलफिओरे या नांवानें व शिपायाचा पोषाख घालून ग्यारी-बाल्डीचे सैन्यास जाऊन मिळाली.

**पहिली लढाई**—ग्यारीबाल्डीचे सैन्याचा पहिला महत्वाचा मुक्काम कोमो या बंदरावर झाला. या ठिकाणीं त्याचें सैन्य बंदरांत उतरत असतां तेथील लोकांनीं त्यांजवर गुलाबाचीं फुलें उधळिलीं व दीपोत्साह केला. येथून पुढें निघाल्यावर शिखरावरून ढांसळलेल्या व पर्वताचे पृष्टभागावरून लोटांगणें खात येणाऱ्या बर्फाचे शिळेला जसे बर्फाचे तुकडे मिळत जाऊन जाऊन शेवटीं त्या शिळेचा आकार प्रचंड बनतो त्याचप्रमाणें ग्यारीबाल्डीचे सैन्याची स्थिति झाली. आपल्या सैन्यांत कोणाही बदमाषास थारा मिळूं नये या हेतूनें ग्यारी-बाल्डीनें सुमारें ३००० लोक परत पाठविले. परंतु लवकरच त्याचे स्वयंसेवकांची संख्या १८ हजार झाली. ऑस्ट्रियन सैन्य व ग्यारीबाल्डीचें सैन्य यांची या स्वारींतील पहिली लढाई झाली तींत ग्यारीबाल्डीनें ऑस्ट्रियन सैन्यास मागें हटवून आसपासचा डोंगराळ प्रदेश हस्तगत केला. नंतर रॉकाडो आफनो या बळकट पाहाडी किल्ल्यावर त्याचे शिपायांनीं निकरानें हल्ला करून तो सर केला. या हल्ल्यांत ग्यारीबाल्डी-चे बरेच लोक पडले व खूद त्याचे पायास गोळी लागून जखम झाली यामुळें यापुढें त्याला गाडींत बसूनच रणांगणांतून

फिरावें लागलें. रॉकोडीआफनाचा किल्ला हस्तगत झाल्यामुळें ग्यारीबाल्डीस आसपासच्या सर्व मुलुखांतून शत्रूचा निःपात झाला असें वाटलें. परंतु एकेदिवशीं स्टोरो या नांवाच्या गांवीं दिवसाचीं टेहेळणी करून संध्याकाळीं मुक्कामास परत येऊन पाहातो तों ऑस्ट्रियन सैन्य गांवांत शिरलेलें होतें, व ग्यारीबाल्डी येतांच दबा धरून बसलेल्या त्या सैन्यानें बंदुकांचा एकदम मारा केला. या प्रसंगीं ग्यारीबाल्डीच्या आसपास कित्येक गोळया येऊन पडल्या. परंतु तो मात्र मोठ्या शर्थीनें बचावला. असो. शत्रूचें सैन्य थोडकेंच असल्यामुळें त्यास हुसकून लावण्यास फारसा प्रयास पडला नाहीं. परंतु नजीक असलेला अँपोला किल्ला सर न करितां तसाच सोडून दिल्यामुळें शत्रूस दबा धरून बसण्यास सांपडतें असें अनुमान दिसून आल्यावरून ग्यारीबाल्डीनें किल्ल्याकडे मोर्चा वळविला. या किल्लयांतील अधिकाऱ्यांस निदान सहा दिवस तरी किल्ला लढवावा असा हुकूम होता. ग्यारीबाल्डीनें तोफांचा भडिभार करून एका दिवसांत २ हजार गोळे किल्ल्यांत टाकले, तेव्हां किल्ल्यावरील शिबंदीचे लोक दारू पिऊन उन्मत्त झाले होते त्यांनीं टेबलावरील शुभ्र चादर काठीस बांधून आपण शरण आलों अशा अर्थाचें हें पांढरें निशाण तटावर उभारलें तेव्हां किल्लेदाराचा नाइलाज झाला. या किल्यावर १३० कैदी व कांहीं तोफखान्याचें सामान ग्यारीबाल्डीच्या हातीं लागलें. हें घेऊन व आसपासच्या मुलुखांतून घोडे पकडून आणून त्यानें एक तात्पूरत्या घोडेस्वारांच्या तोफखान्याची तुकडी सजविली.

**लढाईचा शेवट**–यानंतर बिझेका ह्या ठिकाणीं लढाई झाली, तींत ग्यारीबाल्डीचे लोकांनीं फारच शोर्य दाखविलें. ही लढाई बारा तास पर्यंत एक सारखी चालू होती. व जय

मिळण्यास ग्यारीबाल्डीला जवळ जवळ एक हजार सैन्य खर्ची घालावें लागलें. याच लढाईंत त्याचे दोनही मुलगे व एकुलता एक जांवई आपापलीं पथकें घेऊन लढत होते, व जांवयास तर भारी जखमही झाली. या लढाईचे योगानें आसपासचा मोठा प्रांत सर्व ग्यारीबाल्डीचे हातीं येण्यासारखा होता; परंतु कर्मधर्मसंयोगानें याच सुमारास आस्ट्रिया व इटली यांचे मुख्य सैन्यांतील लढाई संपून तहही करण्यांत आला होता; व त्या तहानुरूप आल्पस पर्वताचे पायथ्याशीं लढाई थांबविण्याचा ग्यारीबाल्डीस हुकूम येऊन पोंचला. त्यामुळें त्यास ऐन रंगाला आलेलें लढाईचें काम मध्येंच सोडून द्यावें लागलें. वास्तविक पाहतां लढाई बंद करणें हेंच इटलीस श्रेयस्कर होतें. एके बाजूस इटलीस जय मिळत चालला होता हें खरें, तथापि एकंदरीनें व्हिक्टर ए-मॅन्युएलच्या सैन्याचा कमकुवतपणा व्यक्त होत चालला होता. समुद्रावर आरमाराच्या लढाईंत तर इटालीचा मोडच झाला होता असें ह्मणण्यास हरकत नाहीं. परंतु असें असूनही लढाईचें एक प्रमुख कारण नाहींसें झालें होतें. सॅडोवा येथील लढाईंत प्रशियाचे सैन्यानें आस्ट्रियन सैन्याचा पुरा पराभव केल्यामुळें आस्ट्रियास दुसरीकडे इटली बरोबर लढाई चालू ठेवण्यास उत्साह नाहींसा झाला. व ऑस्ट्रियन बादशाहानें फ्रेंच बादशाहा नेपोलियन याचे मध्यस्तीनें वादाचें मूळ जो व्हेनेशिया प्रांत तो इटलीस देण्याचें कबूल केलें. व मग अर्थात् लढाई बंद पडली. व्हेनिस परत मिळालें तरी एकंदरीनें तहाच्या अटी ग्यारीबाल्डीस फारशा पसंत नव्हत्या. तथापि आपल्या सैन्यास एकदम रजा देऊन व पार्लमेंटांत जाऊन तहाच्या

अटीवरील वादविवादांत भाषणही न करितां तो कॅप्रेरा बेटास परत आला. झालेल्या लढाईत एकंदरीनें इटलीला फारसें भूषण आलें असें त्यास वाटत नव्हतें. यामुळें तो मनांतून बराच खिन्न व उदासवाणा झाला होता.

## भाग १९ वा.

## रोमवर अखेरचा धाडसी प्रयत्न.

" यत्ने कृते यदि न सिध्यति कोऽत्र दोषः " ॥

**मानसिक अस्वस्थता.**—ग्यारीबाल्डीस तह न आवडण्याचें मुख्य कारण असें होतें कीं, त्या तहान्वयें रोम येथील पोपची सत्ता आहे तशीच अबाधित ठेवण्याबद्दल इटलीच्या राजानें फ्रान्सच्या बादशहाशीं करार करून अपणास बांधून घेतलें होतें. व रोम काबीज करून पोपच्या भव्य राजवाड्यांत व्हिक्टर ए मॅन्युएलचें दरबार स्थापित करावयाचें, ही कल्पना तर ग्यारीबाल्डीचे डोक्यांत एकसारखी भरून राहिली होती. शांतपणानें विचार करून पाहतां अशा तहानंतर रोम काबीज करण्याची उचल करणें हें लोकनियुक्त पार्लमेंट व खुद्द राजा यांचा हुकूम जाणून बुजून तोडण्यासारखें होतें; किंबहुना फ्रान्स देशाशीं लढाई उपस्थित करून इटलीस धोक्यांत घालण्यासारखें होतें. परंतु आमच्या चरित्रनायकाच्या मनाची घटना अशीच कांहीं चमत्कारिक होती कीं, त्याच्या निःसीम स्वदेशभक्तीनें बहुधा सर्व विचारशक्ती ग्रासून टाकिली होती. व धाडसी मनःप्रवृत्तीला जें ह्मणून श्रेयस्कर दिसेल तें एकदम कोणाची भीड मुरवत न धरतां किंबहुना बलाबलाचा विवेकही न करितां घडवून आणण्याचा प्रयत्न करणें हाच कायतो मुत्सद्दीपणा असें त्यास वाटे. अशी स्थिति असल्यामुळें ग्यारीबाल्डीस कॅप्रेरा येथें लवकरच चैन पडेनासें झालें.

**पुन्हा उचल**–१८६७ सालीं एके दिवशीं अवचित उठून ग्यारीबाल्डी फ्लॉरेन्स येथें येऊन उतरला. यावेळीं पार्लमेंटचे सभासद निवडण्याची धामधूम चालू होती. त्याजबरोबर रोमवर स्वारी करावी असें ह्मणणाऱ्यांची खटपटही जोरांत सुरू होती. चार निरनिराळ्या ठिकाणच्या लोकांकडून ग्यारीबाल्डीची पार्लमेंटांत निवडणूक झाली. लवकरच फ्लॉरेन्स येथें रोमवर स्वारी करावयाची तयारी करण्याकरितां एक सभा स्थापन होऊन तिनें ग्यारीबाल्डीस रोम येथील प्रजासत्ताक संस्थानाचा सेनापति असें नांव दिलें. व्हिला कॅरोली या नांवाच्या गांवीं त्यानें फारच आवेशयुक्त असें भाषण केलें. रोम हें सापाचें बीळ आहे, तें फोडून आंतील विषारीघाण धुवून टाकून इटलीवरील हा मोठा डाग काढला पाहिजे, पोप-व उपाध्याय वर्ग हे जरीमरीच्या कृमी सारखे घातक आहेत, वगैरे विलक्षण विशेषणें देऊन त्यानें सर्व लोक चिथाऊन सोडले. दुसरे दिवशीं त्याचा मोर्चा एकदम रोमकडे वळला. व नेहमींप्रमाणें त्याच्याबरोबर भराभर सैन्य जमूं लागलें.

**पुन्हां कैद**–ही हकीकत प्रधानमंडळास कळतांच बरीच चळवळ उडाली. फिरून एकवार ग्यारीबाल्डीस कैद केल्या शिवाय चालावयाचें नाहीं असा निश्चय करून मुख्य प्रधान रॅटेझी यानें एकदम गुप्त हुकूम सोडले. हुकुमाची बजावणी मोठ्या चमत्कारिक रीतीनें घडून आली! ग्यारीबाल्डीस कैद करण्याचे आदले रात्रीं त्यास सिनॅलंगा या गांवाच्या म्युनिसिपालिटीनें मेजवानी दिली, व ही मेजवानी चाललेली असतां तेथें हजर असणाऱ्या अधिकाऱ्यांचे खिशांतच रॅटेझीचा गुप्त हुकूम होता. तथापि सर्व मेजवानी यथास्थित झाली व ग्यारीबाल्डी घरीं जाऊन खुशाल निजला. परंतु पहाटेस चार वाजण्याचे

सुमाराम एकदम गडबड झाली व सरकारी अधिकारी घरात शिरून त्यांनीं ग्यारीबाल्डीस बिछान्यांतच कैद केलें. त्याला नीट कपडेही घालूं न देतां त्यांनीं थेट आगगाडींत नेऊन त्यांस बसविलें. ही बातमी फ्लॉरेन्समध्यें कळतांच जिकडे तिकडे गडबड उडाली. वाटेंत ग्यारीबाल्डीनें शिपायांस न कळतां पेनसिलीनें एक चिट्ठी खरडून ती गुप्तपणें लोकांचे अंगावर टाकून दिली. या चिट्ठींत असा मजकूर होता.:—"रोमन लोकांस पोपनें गुलाम करून सोडलें आहे, व स्वातंत्र्य प्राप्तीकरितां गुलामांना बंड करण्याचा हक्क निसर्गसिद्ध आहे. अशा रीतीनें रोमन लोक बंड करतील तर इटालीयन लोकांस त्यांना मदत करणें जरूर आहे. मग एक सोडून पन्नास ग्यारीबाल्डी तुरुंगांत पडले तरी फिकीर नाहीं." ही चिट्ठी वर्तमानपत्रकारांचे हातीं येतांच त्यांनीं ती जिकडे तिकडे प्रसिद्ध केली. अर्थात् रॅटेझी विरुद्ध फार गवगवा झाला, व लोकांचे तडाख्यांतून वांचण्यास त्याला बऱ्याच युक्त्या योजाव्या लागल्या. आगगाडीचा प्रवास संपल्यावर ग्यारीबाल्डीस अलेसँड्रिया येथील किल्ल्यावर नेलें व तेथून आरमारच्या अधिकाऱ्यांच्या देखरेखीखालीं सरकारी जहाजांतूनच त्याला कॅप्रेरा येथें नेऊन सोडून देण्यांत आलें. ग्यारीबाल्डी हें एक अशा रीतीनें मोठें अवजड प्रकरण होऊन बसलें होतें. त्याला धरावा तरी पंचाईत, मोकळा सोडावा तरी पंचाईत. मनांतून त्यावर सर्वांचें प्रेम; परंतु तें बाहेरून दाखवून सोय नाहीं. तेव्हां सर्वांत उत्तम युक्ती ह्मटली ह्मणजे मोकळा सुटलेला हत्ती जसा न मारतां न दुखवितां युक्तीनें चुचकारून ठाणावर नेऊन सोडतात, किंवा सरकसमधील वाघ जसा कसा तरी एकदाचा पिंजऱ्याचे दारांतून आंत गेला ह्मणजे मोकळा सोडून देतात, तसेंच ग्यारीबाल्डी

जनावर झाला ह्मणजे त्याला निरुपाय ह्मणून कैद करून मात्र कॅप्रेरा बेटांत नेऊन सोडून देण्यांत येत असे.

**इतर लोकांचे प्रयत्न**–कॅप्रेराबेटाचे सभोंवती चार सरकारी गलबतें पाहऱ्याकरितां ठेऊन दिलीं होतीं. तथापि तितक्यामधूनही ग्यारिबाल्डी आपल्या स्नेह्यांस व स्वयंसेवकांस उत्तेजनपर व आश्वासनपर निरोप पाठवीत असे, व केवळ एक देह अटकेंत सांपडला येवढ्याकरितां आपलें थोर कार्य तुह्मीं सोडून देण्याइतके निरुत्साही होणार कीं काय असें तो त्यांस विचारी. ग्यारिबाल्डी इकडे अटकेंत असतां त्याच्या सोबत्यांनीं अनेक तऱ्हांनीं पोपच्या राज्यास धोका आणण्याची खटपट चालू ठेविली होती. कैरोली नांवाच्या दोघा शूर व साहसी बंधूंनीं केलेलें धाडसी कृत्य तर इतिहासांत नावाजण्यासारखें होतें. त्यांनीं टायबर नदीवर बोटींतून गुप्तपणें हत्यारें नेऊन तीं रोमच्या लोकांस पोंचविण्याचा प्रयत्न थोड्या लोकांनिशीं केला. ते किनाऱ्यावर तर उतरलेच, परंतु रोमन लोकांची त्यांस कुमक न झाल्यामुळें पोपच्या शिपायांनीं त्या बंधूंपैकीं एकास किनाऱ्यावरील द्राक्षवेलींच्या बनांतच ठार केलें, व दुसऱ्यास पोपच्या भयंकर तुरुंगांत नेऊन टाकलें. हें कैरोली कुटुंबच्या कुटुंबच अतिशय शूर ह्मणून प्रख्यात आहे. या दोन बंधूंचा धाकटा भाऊ [illegible]डेटो यानें १८७८ सालीं आपला जीव धोक्यांत घालून हंबर्ट राजाचा जीव मारेकऱ्यांचे हातून वांचविला होता. व पुढें तो राजकारणांत प्रधानकीचें काम करून विशेष प्रख्यातीस आला. असो; याचसुमारास पोपच्या शिपायांची एक बराकची बराक कांहीं अनार्किस्ट ह्मणजे विध्वंसवादी लोकांनीं डायनामाइटनें उडवून दिली व त्या अपघातांत पन्नास लोक मरण पावले.

इकडे १२ हजार रोमन लोकांनीं पोपास अर्ज करून व्हि[illegible] ए-मॅन्युएलचें सैन्य रोममध्यें आणवावें ह्मणून विनंति [illegible]. या सर्व गोष्टींमुळें पोप बराच भ्याला व फ्रान्सच्या सैन्याची मदत स्वसंरक्षणार्थ घेण्याचा त्यानें विचार केला.

**बंदीवासांतून सुटका**—हें सर्व चाललें असतां कॅप्रेरा बेटांतून आपली सुटका कशी करावी या विचारांत ग्यारीबाल्डीचें मन गढून गेलें होतें. भोंवतीचे पहारेकरी बहुधा सावध असत. एके दिवशीं आपल्या मुलीला घेऊन होडींत बसून तो नित्य क्रमापेक्षां जरा लांब जात आहे असें पाहतांच सरकारी जहाजांतील लोकांनीं त्या दिशेकडे बार काढले. तेव्हां अद्यापि पहारा सक्त आहे असें तो उमजला. परंतु सुटका करून घेण्याचा त्याचा प्रयत्न शिथिल न होतां, फक्त युक्ति योजावयाची ती फार कुशल योजिली पाहिजे एवढें मात्र तो वरील गोष्टीवरून शिकला. त्या दिवसापासून त्यानें आजारीपणाच्या बहाण्यास सुरवात केली तो घरच्या माणसांच्या सुद्धां भेटी घेईनासा झाला. आक्टोबरचे १४ वे तारखेस संध्याकाळीं दाट धुकें पडलें, व रात्रही फारच काळोखी पडेल असा अदमास पाहून एक दोन विश्वासू नोकर बरोबर घेऊन खासगी होडींत बसून तो स्टॅगनेरेलोच्या बंदराकडे निघाला. या बंदरांत दुसरी एक होडी आगाऊच तयार करून ठेवलेली होती. यास्तव बरोबरच्या नौकरांस निरोप देऊन तो एकटाच हातांत वल्हें घे[illegible]ा होडीवर चढला व भरसमुद्रांत निघाला. त्या दिवशीं समुद्र थोडासा उचंबळलेला होता. परंतु मोठ्या धैर्यानें व कुशलतेनें तो मॉंटिआचे भूशिराजवळ ला—मॅडेलेना नांवाच्या बेटास सुरक्षित जाऊन पोंचला. तेथें दुसरे दिवशीं मिसेस कॉलिन्स नांवाच्या बाईच्या घरीं छपून राहिला;

व रात्र पडतांच एक तट्टू मिळवून सहा तासांची मजल मारून सार्डिनिया येथें गेला; व किनाऱ्यावरील झाडींत फिरून एक दिवसभर लपून राहिल्यावर दुसरें एक तट्टू घेऊन दाढी व आंगावरील तांबडा डगला काढून टाकून पोर्टोप्रूडेंझा येथें आपला जांवई कँझिओ यास जाऊन मिळाला. मग दोघेही एक होडी काढून इटलीच्या किनाऱ्याकडे निघाले. रात्रीची वेळ व त्यांतून वारा जोराचा सुटलेला असल्यामुळें होडी बोरूच्या एका ताटव्याला अडकली. तेव्हां तींतून उतरून व दलदलींतून कशी तरी वाट काढून कित्येक तासपर्यंत मजल मारल्यावर त्यांस एक खेडें लागलें. मग तेथून एक गाडी घेऊन ते लेगहॉर्न येथें गेले. येथें मात्र त्यांचा त्रास संपला. लेगहार्नहून फ्लॉरेन्सपर्यंत जाण्यास त्यांस कांहींच पंचाईत पडली नाहीं.

**ग्यारीबाल्डी प्रगट होतो.**-सर्व लोक ग्यारीबाल्डी कॅप्रेरा बेटांत नजरकैदेंत आहे असें मानीत असतां, इकडे एके दिवशीं ग्यारीबाल्डी हा फ्लॉरेन्सच्या राजरस्त्याच्या चौकांतील एका घरांत प्रगट झाला व आपल्या गच्चीवरून, खालीं जमणाऱ्या हजारों लोकांस उद्देशून भाषणें करूं लागला. ही बातमी इटलीभर हां हां ह्मणतां एकदम पसरली. प्रधान मंडळी आपापल्या ठिकाणीं गपचिप बसली. फिरून यावेळीं त्यास पकडण्याचा हुकूम द्यावा तर लोक खास बंड करितात अशी त्यांची खात्री होऊन चुकली होती. यास्तव त्यांनीं गप्प बसण्याच्याच युक्तीचा अंगिकार केला; आणि ग्यारीबाल्डी आहे, व रोम व फ्रान्सचें सैन्य आहे, तेव्हां ते परस्पर वाटेल तें करोत, आपण स्वस्थ रहावें असें त्यांनीं ठरविलें.

**पोपाची तारांबळ.**--इकडे ग्यारिबाल्डीनें पोपविरुद्ध मनसोक्त भाषणें करून, आपलें बाजारबुणग्याच्या योग्यतेचें सैन्य व जें काय मिळालें तें लढाऊ सामान घेऊन तो फ्लॉरेन्स सोडून निघाला. त्याचे ७ हजार सैन्यास ना पोषाख ना कांहीं, ज्याला हातीं जे लागतील ते कपडे त्यानें अंगावर घातलेले; अधिकारी कोण हें ओळखण्याकरितां त्यांजजवळ झाडांच्या डाहाळ्या तोडून दिलेल्या, मागाहून आसपासच्या खेड्यांतील गाढवें व खेंचरें दोऱ्यांचे लगाम लावलेलीं चाललेलींच आहेत—अशा थाटानें हें सैन्य रोमवर स्वारी करण्यास निघालें. कांहीं मुक्काम गेल्यावर ग्यारिबाल्डीनें या सैन्याच्या दोन टोळ्या केल्या. पैकीं एक हमरस्त्यानें चालली व दुसरी डोंगरी वाटेनें गेली. मॉंटी रोटोंडो या गांवाजवळ रोमला दोहोंबाजूनें जाऊन पोंचणारे दोन रस्ते फुटतात, त्या ठिकाणीं पोंचल्यावर एका टोळीनें पूर्वेकडील दरवाज्यास आग लावून देऊन आगींतून आंत प्रवेश केला, व रात्रभर लढून तें शहर घेतलें. दुसरे दिवशीं सकाळीं ग्यारिबाल्डीही तेथें येऊन पोंचला. ही लढाई सुरवातीपासून सुमारें २७ तास चालू होती व इजमध्यें पोपच्या पक्षाचे लोक भारी निकरानें लढले. कित्येक धर्माधिकाऱ्यांनीं आपलें धर्मपुस्तक बायबल टाकून देऊन ग्यारिबाल्डीरूप सैतानाचा शहरांत प्रवेश होऊं नये ह्मणून हातांत शस्त्र धरलें होतें. पण शेवटीं ग्यारिबाल्डीचाच विजय झाला. शहर हस्तगत झाल्यावर त्याचे लोकांनीं रोमनक्याथोलिक देवळें, मूर्ति वगैरेंचा फार उच्छेद केला. धर्माधिकारी यांच्या विरुद्ध ग्यारिबाल्डी हा कितीही असला तरी अशा प्रकारचा उच्छेद करणें हें त्यास मुळींच पसंत नव्हतें, व आपली नापसंति

दर्शवावी व जरब बसावी ह्मणोन त्यानें अत्याचारी व दुष्ट अशा सात उच्छेदकांस चवाठ्यावर गोळ्या घालून मारविलें. यानंतर तीन दिवसांनीं ग्यारीबाल्डीजवळ १९ हजारांवर सैन्य जुळलें व शस्त्र सामुग्रीही बरीच जमली; तेव्हां त्यानें पुढें चाल केली, व रोमपासून ४½ मैलाजवळ तो जाऊन पोंचला. तो येतांच पोपच्या सैन्याच्या अघाडीचे लोक मागें परतले व त्यांनीं वाटेंतले पूल सुरूंग लावून उडवून दिले. रोमशहरामध्यें खुद्द पोपाची फारच धांदल उडून गेली. त्यानें आपल्या तुरुंगाचे दरवाजे उघडून अल्पस्वल्प संशयावरून शेंकडों लोक आंत कोंबले, व आमच्या रक्षणास कसेंही करून धावून या, नाहीं तर सैतानाच्या हातीं पोपची गादी खास जाणार, असा तातडीचा निरोप फ्रेंच सैन्यास पाठविला.

**युरोपांत हाःहाःकार**—ही बातमी युरोपांत पसरतांच रोमच्या पक्षाभिमानी लोकांत एकच हाःहाःकार उडाला. व्हिक्टर-ए-मॅन्युएल यानें असें प्रसिद्ध केलें कीं, इटलीचें धोरण सर्व युरोपखंडास विदित आहेच, व ग्यारीबाल्डी हा केवळ आपल्या जबाबदारीवर पुंडावा करीत असून त्यास संस्थानचें अंग नाहीं. या गोष्टीची खात्री करण्याकरितां ह्मणून त्यानें सिअलिडनी नामक सेनापतीचे हाताखालीं सैन्य देऊन पाठविलें. मात्र ग्यारीबाल्डीवर चालून जावें असा त्यास हुकूम नसून फक्त ग्यारीबाल्डी, फ्रेंच व पोपिश सैन्य, यांचे युद्धप्रसंगांत इटलीचें नुकसान होऊं देऊं नये असा मोघम व धरसोडीचा हुकूम त्यास दिला होता.

**रोमवर हल्ला.**—फ्रेंच सैन्याची कुमक येण्यास एक दिवस अवकाश लागतांच रोममधील प्रमुख लोकांनीं व धर्माधिकाऱ्यांनीं रोम सोडून जाण्याचा निश्चय केला,

व त्याप्रमाणें भराभर आपआपलें सामान सुमान घेऊन सिव्हिटा व्हेकिया नांवाच्या मजबूद ठिकाणीं जाण्यास ते निघाले. परंतु पूल पडल्यानें ग्यारीबाल्डीस पुढील ४॥ मैलांची मजल करण्यास बराच वेळ लागला. पोपाविरुद्ध असलेल्या रोमनगरवासीयांस ग्यारीबाल्डी आतां येणार, घटकेनें येणार, व व्हॅटिकन येथील पोपच्या बादशाही गादीवर आरुढ होणार, असें वाटत होतें. ह्मणून तो येण्यास विलंब लागलेला पाहून त्यांना काळजी वाटूं लागली. हा विलंब लागण्यास पूल पडला हें तर एक कारण होतेंच; परंतु ग्यारीबाल्डीचा विचार रोम शहर फितुरी करून सर करण्याचा होता असेंही ह्मणतात. रोमचा गव्हर्नर चार हजार पौंड घेऊन शहरचा किल्ला ग्यारीबाल्डीचे स्वाधीन करण्यास तयार झालेला होता, व ही रक्कम इंग्लिश मित्रांच्या मदतीनें उभारली गेली होती. पण ज्या दिवशीं हा फितूर सिद्ध व्हावयाचा, त्याच दिवशीं सकाळीं गव्हर्नरास कामावरून काढण्यांत आलें; यामुळें ह्मणा, अगर इतर कारणांमुळें ह्मणा, रोम ग्यारीबाल्डीच्या हातीं येण्यास अदमासापेक्षां दोन दिवस उशीर झाला; व तेवढ्या अवधींत पोपिश व फ्रेंच सैन्य त्याजवर चालून आलें. यामुळें त्यास मागें वळून मॉंटीरोटोंडोचा आश्रय घ्यावा लागला. कदाचित धीर धरून ह्यानें शत्रूंस तोंड दिलें असतें तर फायदा झालाही असता; परंतु मागून इटालियन सैन्य व पुढून फ्रेंच सैन्य अशा कचाट्यांत सांपडल्यानें व प्रतिक्षणीं फ्रान्सांतून निघालेलें एक प्रचंड सैन्य येऊन पोंचणार अशी आवाई उठल्यानें, त्याचे लोकांचा धीर किंचित दबला, व रोमवर चालून जाऊन लढाईस तोंडें देण्याचा बेत बदलून त्यानें मागचा रस्ता धरला.

**मेंटानाची लढाई.**—परंतु तोंड वळतांच, वळसा घालून आलेल्या शत्रूचे सैन्याची व त्याची मेंटाना गांवाजवळ गांठ पडली. प्रथम, चालून आलेल्या पोपच्या सैन्यास तर त्यानें मागें हटविलेंच; परंतु त्यांचे मदतीस फ्रेंच सैन्य टेकड्यामागें दडून बसलें होतें व तें पुढें आल्यामुळें त्यांचे कांहीं चालेना. फ्रेंच सैन्यावरही ग्यारीबाल्डी चार पांच वेळां तुटून पडला, व त्याचे स्वयंसेवक अगदीं हातघाईवर येऊन मोठ्या निकरानें लढले. परंतु शेवटीं त्यांस मागें हटावें लागलें. त्यानें कोरेझीचे घाटांत आपले लोक एकत्र केले व त्यांस जिकडे वाट फुटेल तिकडे जाण्याविषयीं मोठ्या कष्टानें सांगितलें. जखमी झालेल्या लोकांची नीट व्यवस्था करून, रात्रीं रोमचे दिवे व शत्रूचे सैन्यानें पेटवलेल्या आगट्या दुरून दिसत होत्या तिकडे दुःखयुक्त अंतःकरणानें एकवार नजर फेंकून तो निघाला. फ्लारेन्सला जाण्याकरितां त्यानें स्पेशल ट्रेन काढली.

**फिरून कैद**—ट्रेन फिजलाईन स्टेशनावर येतांच इटालीयन पोलीसची एक तुकडी स्टेशनांत शिरून तिनें आगगाडी थांबवून धरण्याचा हुकूम दिला. पोलिसांचा पुढारी लेफ्टेनंट कर्नल कॅमोझी हा ग्यारिबाल्डीच्या डब्यापाशीं गेला व आपली मला एकांतीं भेट घ्यावयाची आहे असें ह्मणाला. व ‘ कशाकरितां ’ असें ह्मणून ग्यारिबाल्डीनें आपला कान पुढें केला असतां, त्यानें हळूच उत्तर केलें:—“ आपणांस कैद करण्याकरितां. ” ग्यारीबाल्डी रागावून ह्मणाला:—“मला कैद करण्याचा तुह्मांला कांहीं अधिकार नाहीं, मीं पार्लमेंटचा सभासद असून अमेरिकन नागरिकप्रजेचे मला हक्क आहेत. शिवाय मीं कोणताही गुन्हा केलेला नसून

रोमनरिपब्लिकचा सेनापति या नात्यानें माझ्या अधिकारांत मीं लढाई केली, व इटलीच्या सरहद्दीवर येतांच मीं हत्यार खालीं ठेविलें आहे. तात्पर्य मला बलात्कारानें जागेवरून ओढून काढल्याशिवाय मीं तुमचा कैदी होणार नाहीं." परंतु कॅमोझी हा हुकुमाचा बंदा. त्या जवळ ही कायदेशीर तक्रार काय चालणार? तथापि त्यानें इटलीच्या प्रधानास तार करून पुढें काय करूं ह्मणून विचारलें. त्या तारेचा "कैद करा" असा जबाब आला. तेव्हां निरुपाय होऊन ग्यारीबाल्डीस कैद करणें त्यास भाग पडलें. हें पाहतांच ग्यारीबाल्डीचे सोबती आगगाडीचे डब्यांत होते त्यांनीं आपलीं हत्यारें सरसावलीं, व लवकरच खूनही पडते. परंतु ग्यारीबाल्डीनें त्यांस हत्यार खालीं ठेवण्यास सांगितलें व आपण कॅमोझीचे स्वाधीन झाला. शिपायांनीं त्यास नेऊन आगाऊ तयार ठेवलेल्या गाडींत घातलें, व अशा रीतीनें पुन्हां एकवार रोम हस्तगत करण्याचा त्याचा धाडसी प्रयत्न व्यर्थ गेला.

**रोम आपोआप स्वाधीन होतें**--वॅरिगनो या ठिकाणीं ग्यारिबाल्डीस कांहीं दिवस अटकेंत ठेविल्यावर राजानें त्यास कॅप्रेरा येथें परत जाण्याची परवानगी दिली. वास्तविक पाहतां यावेळीं रोम काबीज करण्याचा त्याचा बेत फसला हें इटलीच्या हितास एकंदरीनें पाहतां पथ्यकरच होतें. कारण फ्रान्स बरोबर युद्ध करणें एकट्या इटलीस शक्य नव्हतें. ही गोष्ट खुद्द ग्यारीबाल्डी यासही विचारांतीं कळली असती, व त्याच्याहून कमी तापट व गरम अशा देशभक्तांस झालें हें बरेंच झालें असें पुढें लवकरच घडून आलेल्या हकीकतीवरून वाटलें. कारण दैव

अनुकूल असलें ह्मणजे तें इष्टार्थ अगदीं अकल्पित रीतीनें घडवून आणतें. ज्या रोमकरितां ग्यारीबाल्डी साऱ्या जन्मभर तळमळ करीत होता व ज्याचे पायीं आपला प्राण अनेक वेळां धोक्यांत घालून शेंकडों देशभक्तांचें रक्त रणांगणीं वाहविण्यास तो कारणीभूत झाला, तेंच रोम पुढें लवकरच दोघांचें भांडण व तिसऱ्याचा लाभ या ह्मणीप्रमाणें कांहीं एक प्रयास न करितां व्हिक्टर-ए-मॅन्युएलच्या स्वाधीन झालें.

# भाग २० वा.

## ग्यारीबाल्डीची फ्रान्सला मदत.

परोपकाराय सतां विभूतयः ॥

**फ्रान्समधील कामगिरी**--इ० स० १८७० सालीं फ्रान्स व जर्मनी यांजमध्यें कांहीं क्षुल्लक कारणावरून एकदम जंगी लढाई सुरू झाली. ती चारच महिने चालली. पण सेडन येथील प्रचंड युद्धामध्यें फ्रेंच बादशहा तिसरा नेपोलिअन याचा पूर्ण पराभव होऊन जर्मन सैन्य पारिसवर चाल करून निघालें. पारिस येथें प्रजासत्ताक राज्य स्थापित होऊन लोकांनीं नेपोलियन यास पदच्युत केलें, व पारिसला लढविण्याचा विचार करून एम. गॅंबेटा वगैरे फ्रेंच वीरांनीं व मुत्सद्यांनीं बरेच दिवस भगीरथ प्रयत्न केले. या सर्व प्रसंगाची हकीकत अत्यंत मनोवेधक आहे. पण ती येथें देतां येत नाहीं. ग्यारीबाल्डीचे संबंधानें सांगावयाचें तें एवढेंच कीं, फ्रेंच देशभक्तांची विपन्न स्थिति पाहून त्याचे मनांत त्यांजविषयीं सहानुभूति उत्पन्न झाली, व नेपोलियन बादशाह जरी इटलीचा हितशत्रु होता तरी फ्रेंच प्रजासत्ताकराज्यानें आपलें वैर संपादण्यासारखें कांहीं केलेलें नाहीं, व स्वतंत्रतेच्या पवित्र कार्याकरितां झगडणाऱ्या कोणाही मानवी प्राण्यास मदत करणें हें आपलें कर्तव्य आहे, अशी प्रेरणा त्याचे मनांत होऊन त्यानें एक दिवस उठून फ्रेंच प्रेसिडेंटास पत्र लिहून फ्रान्सच्या वतीनें लढावयास आपण तयार आहों असें कळविलें. परंतु त्याचें उत्तर येण्याचे पूर्वींच तो मार्सेलिस येथें

जाऊन उतरला. पारिसमध्यें नवीन स्थापित झालेल्या अधिकारी वर्गास मनांतून ग्यारीबाल्डी हा नको होता. परंतु कांहीं अगदीं एककल्ली प्रजापक्षीय लोकांस तो प्रिय होता यामुळें, व तो पुढें येऊन दत्त ह्मणून उभा राहिल्यावर त्याचा अव्हेर करणें उचित नव्हतें यामुळें, प्रेसिडेंट एम. गँबेटा यानें त्याचे स्वाधीन दोन तीनशें स्वयंसेवक करून त्यास एक क्षुल्लक कामगिरी सांगितली. याचा त्यास व त्याचे पक्षपाती लोकांस फार राग आला; तेव्हां गँबेटा यानें भिऊन 'ग्रँड पेट्रिओटे' नांवाच्या स्वयं सेवकाचा त्यास अधिपती करून स्ट्रेसबर्ग व पारिस याचे दरम्यानच्या मुलखांत जर्मन सैन्याशीं लढाई करण्याचा त्यास अधिकार दिला. त्याचे हाताखालीं १२।१३ हजार सैन्य तयार झालें. परंतु नेहमींप्रमाणें या सैन्यासही पोषाख किंवा हत्यारेंपात्यारें यांची सामुग्री बेताचीच मिळाल्यामुळें प्रथम बरेच दिवस त्याचे हातून ह्मणण्यासारखें कांहीं झालें नाहीं. परंतु लवकरच त्याचा मुलगा रिसिऑटी यानें जर्मन सैन्याच्या एका तुकडीवर छापा घालून यश संपादन केलें. व खुद्द ग्यारीबाल्डीनेंही डिजॉन नांवाच्या ठिकाणीं सुमारें १९ हजार जर्मन सैन्याचा पराभव केला. फ्रेंच व जर्मन यांच्या लढाईंत फक्त एकच जर्मन निशाण काबीज करण्यांत आलें तेंही ग्यारिबाल्डीचेच सैन्यानें केलें असें ह्मणतात. तथापि एकंदरीनें त्यानें केलेल्या कार्यभागाचें फ्रेंच सेनापतींनीं कौतुक न करितां उलट आपल्या रिपोर्टांतून त्यास दोषच दिलेला आहे. जेथें मनास मन मिळत नाहीं तेथें निस्पृहतेनें जरी कार्य केलेलें असलें तरी त्याचें चीज होत नाहीं. परंतु हें आगाऊच कळण्यास लागणारी व्यवहारचतुरता ग्यारीबाल्डीचे आंगीं नव्हती. असो. तथापि नाईस, डिजॉन व पारिस या तीन शहरच्या

लोकांनीं त्याची खरी परीक्षा करून व त्याजबद्दल कृतज्ञता-बुद्धि वागवून त्यास आपल्या वतीनें पार्लमेंटाचा सभासद निवडून दिलें. तसेंच बोर्डो येथील प्रधान मंडळानें त्यास खालील पत्र पाठविलें: "प्रिय सेनापति ग्यारिबाल्डी यांस— आपण व्होसजेस प्रांतांतील सेनेचे अधिकाराचा राजीनामा पाठविला तो पोंचला. व तो मंजूर करण्यापूर्वी सरकारास जो खेद व आपल्या कामगिरीबद्दल जी कृतज्ञताबुद्धि वाटत आहे ती व्यक्त करणें हें आमचें कर्तव्यकर्म आहे. आपण फ्रेंच प्रजेच्या खांद्यास खांदा लावून या देशाकरितां व प्रजेच्या हिताकरितां जे पराक्रम केले ते फ्रान्स विसरणार नाहीं." कांहीं दिवसांनीं पार्लमेंट भरलें तेव्हां एम. लॅकरॉय या मुत्सद्यानें असें बोलून दाखविलें कीं, रणांगणा-वरच ग्यारिबाल्डीला फ्रेंच प्रजाजनांचे हक्क मिळून चुकले आहेत; आह्मीं नवीन काय देणार? व्हिक्टर-ह्यू-गो तर याही पलीकडे गेला. तो ह्मणाला, "सभासदहो फ्रान्सवर आलेल्या बिकट प्रसंगांत यूरोपांतील कोणीही राजा किंवा कोणतेंही संस्थान आमच्या मदतीला आलें नाहीं. फक्त एकाच मनुष्याला आह्मांविषयीं खरें प्रेम वाटलें. पण हा एकटा मनुष्यच एका राजाइतका अगर संस्थानाइतका शक्तिमान होता. व फ्रान्सच्या वतीनें लढून ज्याचा एकवारही जर्मन सैन्याचे हातून पराभव झाला नाहीं असाही तोच एक वीर होता!!" हा वीर ह्मणजे ग्यारिबाल्डी होय हें निराळें सांगावयास नकोच.

## भाग २१ वा.

### अखेरचे दिवस.

देह त्यागितां कीर्ति मागें उरावी ।
मना सज्जना हेचि क्रीया धरावी ॥

रामदास.

**ग्यारिबाल्डीची रोमकडून निवडणूक**--व्हॉसजेस प्रांतांत ग्यारीबाल्डीनें केलेले पराक्रम हेच त्याच्या जन्मांतील शेवटचे होत. या नंतर त्यानें हातांत शस्त्र धरिलें नाहीं. तें धरण्याचें कारणच मुळीं उरलें नव्हतें. ज्याकरितां त्याचा सर्व खटाटोप होता तें रोम शहर या पूर्वीच इटलीचे राजाचे आपोआप स्वाधीन झालें होतें. व रोम हातीं आल्यानें सर्व इटली देश संयुक्त व स्वदेशीय राजछत्राखालीं स्वतंत्र झाला होता. अर्थात् या पलीकडे ग्यारीबाल्डीचें इतिकर्तव्य जगांत कोणतेंच नव्हतें, तें साध्य झाल्यानंतरही व्हॉसजेस प्रांतांतल्या लढाईप्रमाणें लोकांच्या भांडणांत पडून खऱ्याची कड धरून कां होईना, पण हवी ह्मणून लढाईची कामगिरी उकरून काढावयाची. परंतु हें करण्यास यापुढें ग्यारीबाल्डीचे मनांत धमक उरली असली तरी अंगांत शक्ती उरली नव्हती. यामुळें यापुढें त्याचे हातून झालेलीं देशकृत्यें सात्विक अशींच होतीं, व अशा आयुष्यक्रमांत मरेपर्यंत त्याचीं सुमारें दहा वर्षें गेलीं इ० स० १८७४ सालीं अनेक शहरांनीं त्यास आपला प्रतिनिधि ह्मणून पार्लमेंटांत निवडून दिलें, त्यांपैकीं रोम हें एक होतें. रोमचा प्रतिनिधि ह्मणून पार्लमेंटांत जाण्यास त्याला फार हौस वाटली. तो येणार अशी बातमी पसरतांच

रोमचे नजीक सिव्हिटा व्हेकिया नांवाच्या बंदरांत त्याला सामोरे जाण्याकरितां लोकांची खूप गर्दी जमली. व रोमला येऊन पोंचेपर्यंत त्याच्या भोंवतालची गर्दी ह्मणून कमी झालीच नाहीं. घोड्यावरील लोक आगगाडीच्या बाजूनें चालले होते व कांहीं कांहीं खप्पी तर आगगाडीवर चढून दिव्याच्या झरोक्यांतून त्याच्या टोपीचा एखादा कोंपरा दिसला तरी तेवढा पाहून धन्य मानून घेत होते. रोममध्यें पोंचल्या-वर लोकांनीं जेव्हां त्यास डोळे भरून पाहिलें तेव्हां त्यांचें समाधान झालें. परंतु त्याची वार्धक्यामुळें झालेली दुर्दशा पाहून कोणाच्याही डोळ्यांतून पाणी आल्याखेरीज राहिलें नाहीं. संधिवातानें त्याचें शरीर ठिकठिकाणीं दुखत होतें; त्याचीं बोटें ताठलीं होतीं; चेहऱ्यावर सुरकुत्या पडल्या होत्या; दाढींत पांढऱ्या काळ्या केसांची सरमिसळ होऊन गेली होती; व एखाद्या आजारी मनुष्याप्रमाणें एका खाकेंत कुबडी धरून व एक हात आपला मुलगा मेनोट्टी याचे खांद्यावर ठेऊन तो चालत असे. तथापि, आंगावरील नेहमींचा तो तांबडा सदरा व काळा लांब झगा कायमच होता; पूर्वीचें तें लोकांच्या ओळखीचें स्मितहास्य ओंठावर अद्यापि तसेंच खेळत होतें, व आहार नियमित व जठराग्नि प्रदीप्त असल्यामुळें त्याचे शिंपाप्रमाणें पांढरे शुभ्र दांत ओंठांतून झळकत. लोकांनीं त्यास कॉस्टँझी नांवाच्या सरदारगृहापर्यंत आणून पोंच-विलें. नेहमींच्या क्रमाप्रमाणें गच्चीवर उभें राहून लोकांना उद्देशून ह्यानें भाषण करावें असा लोकांचा फार आग्रह पडला. परंतु भाषण करण्याची त्याचे अंगांत शक्ति उरली नव्हती. तेव्हां “ मी भाषण करूं ह्मणतां काय? ठीक आहे. तुह्मांला भेटल्यानें मला परमावधीचा आनंद झाला

आहे. तर आतां घरोघर जा कसे, व पूर्वीच्या प्रख्यात रोमन लोकांच्या वंशजांस सर्वांशीं साजेल अशा रीतीनें वागा" एवढेच चटकदार चार शब्द बोलून त्यानें त्यांस निरोप दिला.

**रोममधील सुखाचे दिवस**--रोममध्यें त्याचे कांहीं दिवस सुखाचे गेले. त्याचे स्नेही प्रधान मंडळांत होते ते त्यास समाधानांत ठेवण्याचा प्रयत्न करीत व खुद्द राजाही त्याची वरचेवर गांठ घेत असे. व राजाला पाहतांच ग्यारिबाल्डीच्या मनांत, जन्मभर अंगांत खिळलेल्या स्वामिभक्तीचा उमाळा येत असे. ज्या दिवशीं नवीन पार्लमेंट उघडलें तो दिवस रोममध्यें मोठ्या उत्सवाचा होता. सभा भरल्यावर कांहीं वेळानें ग्यारिबाल्डीनें सभागृहांत प्रवेश केला. उजवे हाताकडे राजपक्षीय व डाव्या हाताकडे प्रजापक्षीय अशी सभासद मंडळी दुतर्फा थाटून बसली होती. ग्यारिबाल्डीनें प्रवेश करितांच प्रथम प्रजापक्षीय मंडळीनें त्यास खडीताजीम दिली व टाळ्यांचा एकच गजर केला. राजपक्षीय मंडळीला अशी भीति वाटत होती कीं, ग्यारिबाल्डी हा शिरस्त्याप्रमाणें कदाचित् शपथ घेण्याचेंच नाकारील. परंतु जेव्हां त्यानें शपथ घेतली व इटलीचे कायदे व इटालीचा राजा याजबद्दल आदरभाव प्रगट केला, तेव्हां राजपक्षीय मंडळीचे आढ्यतेची आढी मोडून तेही उठून उभे राहिले, व सर्व सभागृहानें एकदिलानें व एक आवाजानें टाळ्या वाजवून त्याच्या नांवाचा जयघोष केला. रोममध्यें ग्यारिबाल्डीचा मुक्काम पडला होता तेवढ्या अवधींत त्याची करमणूक होण्यास बरींच कामें निघालीं. त्यांतील मुख्य ह्मटलें ह्मणजे टायबर नदीचा कालवा हें होय. हा कालवा सुएझचे कालव्याचे धरतीवर योजिला असून त्यास खर्च सुमारें ८ लक्ष रुपये व्हावयाचा होता. या कामास खुद्द

राजा व्हिक्टर-ए-मॅन्युएल, ग्यारिबाल्डी व राजघराण्यांतील एक श्रीमान् पेढीवाला अशा त्रिवर्गाची एक कमिटी नेमिली होती. व केवळ ग्यारिबाल्डीस ती गोष्ट प्रिय आहे एवढ्याचकरितां पार्लमेंट सभेनें पुरेसे पैसे मिळतील तेव्हां कालव्याचें काम हातीं घ्यावें असा ठराव पास करून ठेविला होता. या कामांत त्याचें मनही बरेंच गढून गेलें होतें. प्रतिदिवशीं इंजिनिअर लोक बरोबर घेऊन तो टायबर नदीच्या किनाऱ्याची पाहणी करण्यास जात असे; व राज्यकारभारांत त्याचें मन फारसें शिरूं नये या हेतूनें प्रधान मंडळी त्यास होईल त्या रीतीनें या रिकामटेकडया कामीं प्रोत्साहन देत असे. कालव्या शिवाय इतर कामेंही त्यास हळू हळू सुचविण्यांत आलीं. रोमच्या आसपासच्या दलदलींतून पाणी काढून द्यावयाचें होतें. टायबर नदीला पूर येऊन आसपासचे मुलुखाची नासाडी होत असे, याकरितां एके ठिकाणीं बांध घालणें अवश्य होतें, नदीचें पात्रही कोठें कोठें वळणें देऊन फिरवावयास पाहिजे होतें, व पूर्वीं ज्यूलियस सीझर यानें रोम शहराकरितां जेथें बंदर बांधण्याचें योजिलें होतें त्याच जागीं बंदर बांधण्याचें काम सुरू करावयाचें होतें. व हीं सर्व कामें सकृद्दर्शनीं रोमच्या हिताचीं व भावी वैभवास कारणीभूत होण्यासारखीं असल्यामुळें रोमच्या या भक्ताचें मन त्यांत अर्थातच गढून गेलें. परंतु हीं सर्व कामें कालावधीचीं व पैशाचीं असल्यामुळें त्यांचा नाद त्यास लवकरच सोडावा लागला. पुढें रोमची हवाच मानवेना म्हणून त्यास कॅप्रेरा येथें परत यावें लागलें. यानंतरही एकदोन वेळां तो आपलें बेट सोडून इटालीस गेला होता. परंतु या खेपा केवळ विशेष निमित्तानें असल्यामुळें तो फिरून लागलाच परतून घरीं येत असे.

**राजाचा मृत्यु**—यापुढें त्याच्या आयुष्यक्रमांत ह्मणण्यासारख्या फारशा गोष्टी घडून आल्या नाहींत. १८७८ सालीं राजा व्हिक्टर ए-मॅन्युएल मरण पावला. एक छत्राखालीं सर्व इटली देश आणून राजाचें ऐश्वर्य वाढविण्याकरितां ग्यारीबाल्डीनें बहुश: सगळें आयुष्यभर कष्ट केले, व त्याच्या मरणाचें वर्तमान ऐकून ग्यारीबाल्डीस अत्यंत दु:ख झालें असेल यांत कांहींएक आश्चर्य नाहीं. व्हिक्टर ए-मॅन्युएलवर त्याची अतीशय भक्ति होती. व पुढें जरी एकादे वेळीं एकंदरीनें राजकीय अमलाविरुद्ध कडकपणानें तो उद्गार काढीत असे, तरी पण त्याची स्वामिभक्ति कधींही ढळली नाहीं. मॅझिनीचे लेख वाचून ग्यारीबाल्डीच्या मनाचा कल बरेच वेळां प्रजासत्ताकराज्य स्थापित करण्याकडे वळला होता. व फ्रान्स व जर्मनी यांचे लढाईंत फ्रान्सला जी त्यानें मदत केली ती केवळ प्रजासत्ताक संस्थानाला ह्मणून केली हें खरें आहे. तरी पण तो मॅझिनी इतका राजाधिकाराचा द्वेष्टा कधींच नव्हता. इटली स्वतंत्र करावयाचा तो प्रथम राजछत्राखालीं आणून करावयाचा हें त्याचें मत नेहमीं कायम होतें हें मागें सांगण्यांत आलेंच आहे. येवढेंच नव्हे; तर सिसिली जिंकून राजाचे स्वाधीन केली व रोम हस्तगत झाल्यावर तेथें पार्लमेंटाची स्थापना झाली, या दोनही प्रसंगीं ग्यारीबाल्डी हा लोकांस खुद्द राजापेक्षां शतपट अधिक प्रिय होता, व त्यानें आपली नुसती संमति दाखविली असती तरी देखील राजसत्तेला धक्का बसून प्रजासत्ता प्रचलित होण्याचा संभव होता. परंतु केवळ त्याचे स्वामिभक्तीमुळें हे प्रसंग टळले, व इटली संयुक्त व स्वतंत्र होण्याचें काम सुकर झालें.

**ग्यारीबाल्डीचा मृत्यु**.–इ. स. १८८२ चे एप्रिल महिन्यांत ग्यारीबाल्डी हा इटली सोडून घरीं परत आला तो फिरून इटलीस गेला नाहीं. वार्धक्याचा अंमल त्याचे शरीरावर होऊन अखेरीस ता. २ जून १८८२ रोजीं त्याला सुखानें मृत्यु आला. त्या दिवशीं सर्व युरोपखंडांतील तारायंत्रावर बहुधा एकच विषय खेळत होता व तो ग्यारीबाल्डीचा मृत्यु हा होय. ज्यानें जिवंतपणीं आपल्या पराक्रमानें जग हालविलें त्याच्या मृत्यूनेंही जग हलावें हें योग्यच आहे.

## भाग २२ वा.

—:o:—

## खाजगी गोष्टी व स्वभाववर्णन.

ग्यारीबाल्डीसारखे केवळ परोपकारास वाहिलेले पुरुष जे जगांत होऊन जातात, त्यांचें "खाजगत" असें फारच थोडें असतें. त्यांनीं आपलें तन मन परकार्याकडे जन्मभर गुंतविलेलें असल्यामुळें त्यांच्या खाजगी चरित्रांत बहुधा अशी एकहि गोष्ट नसते कीं, जिचा संबंध समाजाकडे किंवा देशाकडे लावतां येणार नाहीं. ह्मणून अशा परोपकारी गृहस्थांचा स्वभाव, गृहस्थिति, स्नेहसंबंध, इत्यादि अनेक गोष्टींपासून लोकांस हितबोध होण्याचा बराच संभव असतो; व थोर लोक कसे राहतात, कसे बोलतात, हें समजण्याची लोकांस जी एक प्रकारची उत्कंठा असते तिचेंही कारण हेंच होय. यास्तव ग्यारीबाल्डीविषयीं कांहीं व्यक्ति विषयक गोष्टीं या भागांत सांगण्याचें योजिलें आहे.

**प्रपंच.**—ग्यारीबाल्डी हा जन्मला, तेव्हां साधारणतः दरिद्रावस्थेंत जन्मला असें म्हणण्यास हरकत नाहीं, व हें त्याचें जन्मसिद्ध दारिद्र्य बहुधा त्याला जन्मभर टिकलें. नाहीं म्हणावयास जगांतील त्याचें इतिकर्तव्य बहुधा संपल्यावर व तो जरेनें विकल होऊन संसारांतील सारें स्वारस्य नाहींसें झाल्यावर त्याला व्हिक्टर–ए–एमॅन्युल राजानें एक मोठी देणगी व कायमचें पेनशन दिलें; व त्या पैशाचा उपयोग आपल्या मुलाबाळांना सुखी करण्याकडे झालेला पाहून

त्याला आयुष्याचे शेवटीं शेवटीं बरें वाटलें असेल, नाहीं असें नाहीं. परंतु द्रव्यभोगेच्छा त्याला जन्मांत कधींहि शिवली नसतां, व त्यांतूनहि जीवयात्रेच्या अखेरच्या मुक्कामास जाण्याच्या पंथास असतांना मिळालेल्या संपत्तीपासून होणारें केवळ द्रव्यमूलक असें जें सुख तें ग्यारीबाल्डीस कितपत झालें असेल याची शंकाच आहे. परंतु संपत्तीनें सुखी किंवा दारिद्र्यानें दुःखी करावें असा त्याच्या मनाचा पिंडच नव्हता; व त्याचे आयुष्यांतील सर्व वृत्तांतावरून हीच गोष्ट दिसून येते. आपल्या आयुष्यांत ग्यारीबाल्डीनें जे जे अधिकार बजावले त्यांमध्यें द्रव्यदृष्टीचा दुसरा एखादा माणूस त्याचे जागीं असता तर त्यानें अपार संपत्ति मिळविली असती. परंतु ग्यारीबाल्डी मात्र अखेरपर्यंत कोरडाच्या कोरडा राहिला हें त्याच्या कर्तृत्वहीनतेचें लक्षण नसून निस्पृहता व निरभिलाषिता याचेंच दर्शक होय. दक्षिण अमेरिकेंत व खुद्द स्वदेशांतही त्यानें मोठमोठीं कामें केलीं, व एक वेळीं तर सिसिली बेटाचा गव्हर्नर असून त्यानें आपले हातानें सिसिलीच्या राजैश्वर्याचा मुकुट व्हिक्टर-ए-मॅन्युएल याचे डोक्यावर घातला. परंतु अशा प्रसंगीं त्याचे खिशांत स्वतःचे असे चार पैसेही नव्हते, व वाटखर्चीं भागविण्यास लागणारे चार दोन रुपये त्यास लोकांकडून उसने काढावे लागले, ही गोष्ट ध्यान्यांत आणली असतां मनुष्याचा निस्पृहपणा कोठवर जाऊं शकतो व स्वार्थशून्यता या ईश्वरी सद्गुणांशाच्या दृष्टीनें नराचा नारायण कसा होऊं शकतो हें कळून येणार आहे.

द्रव्यलोभ हाच सर्वांत अति कठीण असतो. तो ज्यानें जिंकला त्यानें निस्पृहपणाचा मुख्य पायाच रचिला असें ह्मणण्यास हरकत नाहीं. परंतु ग्यारिबाल्डीचा निस्पृहपणा

द्रव्याचेहि पलिकडे गेला होता. ज्या वयांत त्यानें देशकार्यार्थ जीवित घालविण्याचा निश्चय करून मॅझिनीचें शिष्यत्व पत्करिलें व फाशीच्या शिक्षेचें सुदर्शनचक्र डोक्यावर फिरतें घेऊन स्वदेश सोडून पृथ्वीचे पाठीवर वाटेल तिकडे जाण्यास तो प्रवृत्त झाला, त्या वयांत जगांतील बहुतेक लोक कोणत्या तरी आपमतलबाच्या व्यवसायांत गुंतलेले असतात हें लक्षांत घेतलें असतां वरील गोष्टींतील मर्म कळून येणार आहे. साधारण मनुष्यांची गोष्ट अशी असते कीं, तरुणपणचें रक्त अंगांत खेळूं लागतांच आपल्यास धनदारापुत्र हीं कशीं मिळतील याबद्दलच्या त्यांच्या विवंचनेस सुरुवात होऊन, एकंदरीनें संसारयात्रा शांततेची, सुखासमाधानाची, एश्वैर्याची व बहुमानाची कशी होईल, हेच काय ते विचार त्यांच्या डोक्यांत घोळत असतात. त्यांची इतिकर्तव्यता खालील श्लोकांत बहुधा सांठविलेली असते:—

यदि रामा यदिच रमा यदितनयो विनयधीगुणोपेतः
तनये तनयोत्पत्तिः सुरवर नगरे किमाधिक्यम्।

अशा माणसांचा स्वर्ग व मोक्षही पृथ्वीवरच असतो. परंतु तो केवळ ऐहिक सुख व ऐश्वर्य भरपूर मिळाल्यानेंच मिळणारा असतो. परंतु ग्यारीबाल्डीची गोष्ट अगदींच वेगळी होती. त्याचा स्वर्ग व मोक्ष दोन्हीचाही समावेश नुसत्या देशकार्यांतच होत असे. स्वदेश हेंच कायतें आपलें धन-दारा पुत्र, ही उदात्त कल्पना त्याचे हृदयांत ऐन तरुणपणीं पक्की बाणून गेल्यानें त्याला इतर ऐहिक उपाधींचा पाशच उरला नाहीं; व यामुळें त्यानें जे जे उद्योग केले त्या सर्वांचें पर्यवसान स्वदेशहितबुद्धिमध्यें असून त्यांत स्वार्थसाधकतेचा मुळींच संबंध नव्हता. ग्यारीबाल्डीनें पुढें एक सोडून दोन लग्नेंहि केलीं, त्यास मुलें

व नातवंडेंहि झालीं, व दिसण्यांत इतर लोकांप्रमाणें त्याचेही अखेरचे दिवस सभोंवती बायकांमुळें जमवून गृहस्थाश्रमी माणसाप्रमाणें प्रपंच करण्यांत गेले हें खरें. तथापि त्याचा प्रपंच व इतरांचा प्रपंच यांमध्यें एकच मोठा भेद होता. पण तोच अतिशय महत्वाचा होता. तो हा कीं, इतरांचें मन प्रपंच उपाधींत गुरफटलेलें असतें व त्यामुळें मनुष्यमात्राचें खरें हित व जीवितकर्तव्य साधण्यास त्यांना व्यत्यय येतो. परंतु ग्यारीबाल्डीनें ऐन तरुणपणीं जो कर्तव्यमार्ग आंखून ठेविला होता, तो सोडून बाहेर एक रतीभर सुद्धां प्रपंचउपाधीनें त्यास कधींही ओढून नेलें नाहीं. भगवद्गीतेमध्यें कर्म करावयाचें तें करून अलिप्त राहण्याचा जो सात्विक मार्ग सांगितलेला आहे, त्याचेंच ग्यारीबाल्डीचें चरित्र हें एक उत्तम उदाहरण आहे. ग्यारीबाल्डीनें पहिलें लग्न केलें तें कोणत्या स्थितींत केलें हें मागें एका ठिकाणीं सांगण्यांत आलेंच आहे. व लग्न केल्यापासून तो पत्निवियोगापर्यंत त्याचा व्यवसाय कोणत्या प्रकारचा चालला होता याचेंही वर्णन मागें आलेंच आहे. यावरून ग्यारीबाल्डीचे अंगीं विषयलोलुपता होती किंवा काय, व वैवाहिक स्थितींतील सुख भोगण्याकरितां तो निस्पृहपणा व परार्थहितसाधकता यांचे मार्गापासून यत्किंचित् तरी ढळला होता कीं काय हें दिसून येईल. ग्यारीबाल्डीचे अंगीं मानुषता सहज असे. सुख दुःखाचे भाव नव्हते असें नाहीं. म्हणजे उदाहरणार्थ, कोठें कामगिरी करून तो थकून परत घरीं आला असतां त्याचे प्रिय पत्नीनें प्रफुल्ल चित्तानें व हास्यवदन करून जर त्याचें प्रेमपूर्वक स्वागत केलें तर त्यापासून त्याला अनिर्वाच्य सुख होत नसेल असें नाहीं. किंवा त्याचीं मुलेंबाळें खेळत खेळत येऊन अंगावर पडलीं असतां

अंकाश्रयप्रणयिनः तनयान् वहन्तो
धन्यास्तदंगरजसा मलिनी भवन्ति॥

या कालिदासाच्या मार्मिक वर्णनाप्रमाणें ग्यारीबाल्डीसहि धन्यता वाटत नसेल असेंहि नाहीं. परंतु **संसारसुख भोगण्याची पात्रता व सामर्थ्य अंगीं असणें निराळें, व संसारसुख हेंच जीविताचें सार असें मानून आपल्या सर्व व्यवसायांचा ओघ तिकडे वळणें हें निराळें.** असो, ग्यारिबाल्डीच्या पहिल्या लग्नाची हकिगत मागें एक ठिकाणीं आलीच आहे. त्याची पहिली बायको निवर्तल्यावर पुष्कळ वर्षेंपर्यंत त्यानें दुसरें लग्न केलें नाहीं. त्याचें दुसरें लग्न १८५९ सालीं झालें. परंतु हें लग्न त्यानें प्रपंचसुखाकरितां केलेलें नसून केवळ त्याच्या भोळेपणाचा फायदा घेऊन एका मतलबी स्त्रीनें त्यास या विवाहास प्रवृत्त केलें. त्याची हकीगत अशी कीं, १८५९ सालीं ऑस्ट्रिया व इटली यांची लढाई जुंपली, त्यावेळीं आल्प्स पर्वताच्या पायथ्याशीं असणाऱ्या एका सरोवराचे आसपासच्या प्रदेशांत ग्यारिबाल्डी हा फौजेचा तळ देऊन राहिला असतां मारक्विस रेमॉंडी या नांवाच्या एका सरदाराच्या तरुण मुलीची प्रीति ग्यारिबाल्डीवर बसली. खुद्द सरदाराचीही इच्छा ग्यारिबाल्डीसारखा जांवई आपणास मिळावा अशी होती. असें असतां एके दिवशीं ही तरुण मुलगी ग्यारिबाल्डीच्या छावणींत अकस्मात प्रगट झाली, व शत्रूंकडील कांहीं पत्रें आपण वाटेंत पकडून आणिलीं आहेत असें तिनें ग्यारिबाल्डीस कळविलें. हीं पत्रें ग्यारिबाल्डीनें घेतलीं व तिचे त्यानें फारफार आभार मानिले. दुसरे दिवशीं मारक्विस रेमॉंडी हा स्वतः ग्यारीबाल्डीचे छावणींत आला व माझ्या मुलीची तुमच्याशीं

विवाह लावण्याची फार इच्छा आहे असें त्यानें ग्यारीबाल्डीस कळविलें. हें ऐकून ग्यारीबाल्डीस अत्यंत आश्चर्य वाटलें व तो एकदम ह्मणाला:–“ छे: तुह्मी भलतेंच कांहीं तरी बोलतां, माझ्या पहिल्या बायकोच्या मरणाच्या दु:खानें माझें काळीज करपून गेलेलें आहे व आमरणांत मी अविवाहित राहण्याचा निश्चय केलेला आहे. व सरदार साहेब दुसरें तुह्मी असें पहा कीं, तुमच्या कन्येनें मला फार तर एक वेळ पाहिलें असेल, असें असतां मजविषयीं तिच्या मनांत इतकें प्रेम उत्पन्न व्हावें हें संभवतें तरी कसें ?” हें आपणांस नडविणारें उत्तर ऐकून मारकिस रेमँडी हा निरुत्तर झाला. परंतु ग्यारीबाल्डीच्या भोळ्या अंत:करण्याची कळ कोठें दाबली असतां त्याचें हृदय खुलें होईल हें त्या सरदारास पूर्णपणें माहीत होतें, यामुळें तो लागलीच ह्मणाला “ साहेब, माझ्या मुलीचें प्रेम व्यक्तिविषयक आहे असें समजूं नका. तर ‘ तें इटलीचें स्वातंत्र्य ’ या मोहक कल्पनेवर जडलेलें आहे व त्या कल्पनेचा आपण केवळ साक्षात अवतार अहां, या कारणाकरितांच तिला आपणाशीं विवाह लावावयाचा आहे. ” या भाषणाचा त्या सरदाराच्या अटकळी प्रमाणेंच परिणाम झाला. ‘ इटलीचें स्वातंत्र्य ’ या जादूनें भारलेल्या शब्दांचा उच्चार होतांच ग्यारिबाल्डीचें करारी मन तेव्हांच विरघळलें. स्वदेशाभिमान बाळगणारा कोणताहि मनुष्य त्याला देवदूताप्रमाणें प्रिय वाटत असे; व त्यांतूनहि स्त्रिजातीमध्यें त्याचा इतका संचार झालेला पाहून तो त्या सरदाराचे ह्मणण्यास एकदम कबूल झाला. असो. अशा रीतीनें केवळ एका शब्दाचे उच्चारानें हें लग्न जुळलें. रीतीप्रमाणें सर्व मंडळी लग्नाकरितां देवळांत जाऊन आली व इतक्यांत त्या तरुण स्त्रीचें कपट

ग्यारिबाल्डीस कळून आलें. शत्रूकडील ह्मणून पकडून आणलेलीं पत्रें बनावट असून या सगळ्या व्यवहाराच्या मुळांत स्वार्थाशिवाय दुसरें कांहींही नाहीं असें ग्यारिबाल्डीचे लक्षांत येतांच त्यानें तिचें मुखावलोकनही करावयाचें नाहीं अशी शपथ वाहिली. यावरून ग्यारिबाल्डीनें जें दुसरें लग्न केलें तें कोणच्या हेतूनें केलें, ह्मणजे त्यास संसारसुखेच्छा कितपत होती, हें तेव्हांच दिसून येणार आहे. या स्त्रीस काडी मोडून दिल्यावर ग्यारीबाल्डीचें तिसरें लग्न झालें. परंतु ही काडी मोडून देण्याचे पूर्वींच तिसऱ्या पत्नीपासून ग्यारीब्राल्डीस एक दोन मुलेंही झालीं होतीं. ही तिसरी बायको फ्रान्सेस्का या नांवाची सुशील व प्रेमळ अशी एक दाई होती. ग्यारीब्राल्डी काप्रेरा येथें आजारी असतां तिनें अत्यंत प्रेमानें त्याची सुश्रूषा केली व त्यामुळें त्या उभयतांचें प्रेम जडलें. यावेळीं ग्यारीबाल्डीचे बहुतेक उद्योग शेवटास जाऊन तो कॅप्रेरा येथें स्वस्थ राहिलेला होता व यावेळीं त्याचें वयही बरेंच झालेलें होतें. तो अशक्त व किंचित् पंगू झालेला होता व फ्रान्सेस्का ही त्यास सर्व तऱ्हेनें आधार देऊन व त्याची काळजी घेऊन व्यवस्था ठेवीत असे. अशा स्थितींत पहिल्या बायकोच्या मरणानंतर कित्येक वर्षांनीं त्याच्या वठलेल्या प्रेमांकुरास नवीन पालवी फुटली तर त्यांत विशेष आश्चर्य मानण्यासारखें कांहीं नाहीं. वास्तविक पाहिलें असतां मारक्विस रेमॉंडी याच्या मुलीशीं लागलेल्या परंतु क्षणमात्र टिकलेल्या वैवाहिक स्थितीची ग्यारीबाल्डीवर फ्रान्सिस्का याचे मार्गांत आडकाठी होती. परंतु ही आडकाठी त्यांचे प्रेमाचे आड येणें अशक्य होतें. तथापि ग्यारीबाल्डीनें दुसरा विवाह रद्द करण्याची खटपट आपल्या-

कडून केली नव्हती असें नाहीं. हा विवाह रद्द व्हावा व फ्रान्सिस्का हिच्या मुलांस कायदेशीर संततीचे अधिकार मिळावे अशाबद्दल राजा व्हिक्टर-ए-मॅन्युएल यास त्यानें वेळोवेळीं प्रार्थना केली होती. परंतु ती बरेच दिवस सफळ झाली नव्हती. ती शेवटीं ग्यारीबाल्डीचे अगदीं म्हातारपणीं सफळ झाली. १८८० सालीं म्हणजे ग्यारीबाल्डीचे मरणाचे आधीं दोन वर्षें रोम येथील अपील कोर्टानें त्याचे दुसरे लग्नाची काडी मोडून दिली, व नंतर त्याचा व फ्रान्सेस्का हिचा सशास्त्र विवाह लागला. या प्रसंगीं त्याचीं सर्व मुलेंबाळें, जांवई व स्नेही मंडळी हजर असून खुद्द राजा व राणी यांजकडूनही या वृद्ध जोडप्यास अभिनंदनपर अशी तार आली होती. अशा रीतीनें आमच्या चरित्र नायकाच्या ७३ वे वर्षी झालेल्या लग्नसमारंभाची हकीगत ऐकून वाचकांस सकृद्दर्शनीं आश्चर्य वाटण्यासारखें आहे. परंतु हा विवाह म्हणजे केवळ कोरडा शास्त्रीय विधीच होता व वृद्धपणीं मनास समाधान यावें एवढ्याकरितांच तो झालेला होता हें उघड आहे.

पहिल्या पत्नीपासून ग्यारिबाल्डीला दोन मुलगे व एक मुलगी अशीं आपत्यें झालीं होतीं. हे दोघेही मुलगे व जांवई शिपाईगिरीचा धंदा करूं लागले व ग्यारिबाल्डी प्रमाणेंच त्यांनींही यथाशक्ति पराक्रम केले. सरकारदरबारांत व खुद्द राजापाशीं आपलें वजन आहे यामुळें भिडभाड खर्चून मुलांस व जांवयास मोठमोठ्या नोकऱ्या देववाव्या असें त्याच्या स्वप्नींही कधीं आलें नाहीं, व आपणांप्रमाणें आपल्या मुलांनींही स्वतंत्रताप्रिय रहावें अशी त्याची मनापासून इच्छा होती.

जगामध्यें दोन तऱ्हेचे लोक असतात. पैकीं कांहीं लोकांच्या मोठेपणास नुसतें बुद्धिवैभव हें कारणीभूत होतें, व कांहींचा मोठेपणा त्यांचे कृत्यांवर अवलंबून असतो. ग्यारिबाल्डी हा दुसऱ्या वर्गांतील महात्मा होय. मॅझीनीची निशाणी जशी लेखणी ही होती, तशी ग्यारिबाल्डीची निशाणी तलवार ही होय. तथापि ग्यारिबाल्डीचे अंगीं बुद्धिवैभव कमी होतें असें नाहीं, व त्याचा पहिल्यापासून विद्येकडे विशेष कल असता किंवा त्याची परिस्थिति खरोखर होती त्याहून जर वेगळी असती तर तो विद्वत्तेचे बाजूनें प्रख्यातीस आला नसता असें ह्मणणें कठीण आहे. त्याचें शिक्षण किती चुटपुटें होतें व शाळेचा संस्कार त्याला केवळ नांवाचाच होता, असें असतांही त्याचें भाषण व लेखन हें एखाद्या विद्वानास साजेल असेंच होतें. ग्यारीबाल्डी हा भाषापंडित नव्हता, तरी त्यास तीन चार भाषा बोलतां येत असत. ह्मणजे इटालीयन भाषेच्या सर्व पोटभाषा तो अस्खलीत बोलत असे; व स्पानीश, इंग्लिश, पोली, फ्रेंच याही फार न अडतां त्यास बोलतां येत असत. परंतु या निरानिराळ्या भाषा शिकण्याचें त्याचें कारण केवळ विद्येची लालसा हें नसून त्याहून अधिक स्तुत्य व उदात्त असें होतें. पृथ्वीवरील सर्व माणसें हीं वास्तविक सख्खीं भावंडें होत, असें असतां केवळ भाषेच्या विविधत्वामुळें त्यांचे व्यवहारास व प्रेमवर्धनास व्यत्यय येतो, व ज्या मनुष्यास जितक्या अधिक भाषा बोलतां येतील त्यास आपले भावंडांचे मनोभाव जाणण्यास व आपले मनोभाव त्यांस कळविण्यास तितकें सोपें जातें व अशा रीतीनें जगांतील प्रेम वृद्धिंगत होतें. वास्तविक एकच भाषा बोलणाऱ्या लोकांमध्यें परस्पर किती प्रेम असतें याचा आपणा सर्वांस अनुभव असल्यामुळें भाषा-

ज्ञानानें प्रेमवृद्धी करण्याची ग्यारिबाल्डीची ही कल्पना आप सर्वांस सारखीच पसंत पडेल असें नाहीं. तथापि ग्यारिबाल्डी संबंधानें कोणतीही गोष्ट घेतली असतां तिजमध्यें त्याच्या विश्वव्यापी प्रेमाचें प्रतिबिंब दिसतें एवढाच या ठिकाणीं सांगावयाचा मुद्दा आहे. सर्व मानवी प्राण्यांची एक भाषा करतां येईल असा त्याचा दृढ भरवंसा होता.

असो; शाळेंतील त्याचें शिक्षण पुरेंही झालें नव्हतें असें असतां त्यास पांचचार भाषा येत होत्या एवढेंच नव्हे; तर तो आपल्यापरीनें ग्रंथकारही बनला होता. त्यानें लिहिलेल्या दोनतीन कादंबऱ्या उपलब्ध आहेत. या कादंबऱ्यांत त्याची कल्पनाशक्ति जबर असल्याचें दिसून येतें. ही कल्पनाशक्ति त्यास उपजत होतीच परंतु त्यांतूनही दक्षिणअमेरिकेंत रानावनांत राहून व अनेक तऱ्हेचे चमत्कारिक अनुभव घेऊन त्या कल्पनाशक्तीस वैचित्र्य व परिपक्वता आली असल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं. ग्यारीबाल्डीचे कादंबऱ्यांत जरी त्याच्या विचित्र कल्पनाशक्तीचा प्रभाव दिसून येतो, तथापि त्यांतील कथानकें, पात्रें, प्रसंग व तत्वबोध हीं सर्व त्याच्या स्वदेशप्रीतीचे रंगानें रंगविलीं गेलीं होतीं. त्यानें आपल्या कल्पनाशक्तीचा उपयोग राजाराणीच्या अद्भुत गोष्टी सांगण्याकडे केला नाहीं, तर ज्या वाचल्यापासून वाचकांचे अंगीं स्वदेशाभिमान थोडासा तरी जागृत होईल अशाच कादंबऱ्या त्यानें लिहिल्या. या पुस्तकाशिवाय ऐतिहासिकदृष्ट्या उपयुक्त असें एक पुस्तक त्यानें लिहिलें आहे, व हें त्याचें आत्मचरित्र होय. या आत्मचरित्रांत त्यानें आपले अनुभव, आपलीं कृत्यें, आपलीं मतें, यांचें टिप्पण केलेलें आहे. हें

टिप्पण पहिल्यापासून अखेरपर्यंत संगतवार किंवा शिस्तवार आहे असें नाहीं. तथापि त्याची भाषा चटकदार व जोरदार असल्यामुळें सदर्हू पुस्तक बरेंच मनोरंजक झालेलें आहे. परंतु त्यास जें एक विशेष महत्व आहे त्याचें कारण असें कीं, ग्यारीबाल्डी हा सत्यप्रिय व स्पष्टवक्ता असल्यामुळें त्यानें आत्मचरित्रांत लिहिलेल्या गोष्टींबद्दल कोणास यत्किंचित्‌ही शंका येत नाहीं, व अशा रीतीनें नेहमीं आत्मचरित्रें वाचण्यांत जो एक प्रकारचा आनंद असतो तो येथें दुणावतो. ग्यारीबाल्डीचीं भाषणें, त्यानें लिहिलेलीं पत्रें व त्यानें काढलेले जाहीरनामे यांमधूनही त्याच्या स्वभावाची व अंतःकरणाची खूण ठिकठिकाणीं पटते. या सर्वांमध्यें भाषावैभव दाखविण्याचा प्रयत्न मुळीं नसून त्यांची सर्व गोडी, निस्पृहता, उदात्त विचार, स्पष्ट वक्तेपणा व किंबहूना धाडस यांतच असून वाचणारास ते लेख नसून त्या ठिकाणीं चालता बोलता माणूसच उभा आहे कीं काय असें वाटतें.

ग्यारिबाल्डी हा कोणी मोठा तत्वशोधक नव्हता हें सांगावयास नकोच. तथापि त्याचे ग्रंथांत, पत्रांत व भाषणांत निरनिराळ्या विषयांवर जे विचार नमूद झालेले आहेत त्यांवरून त्याचे विषयीचीं चांगलीच कल्पना करितां येते. उदाहरणार्थ, धर्म हा विषय घेतला तर असें दिसून येतें कीं, तो जरी पोपचा कट्टा वैरी होता, तरी ईश्वरावर त्याचा पूर्ण भरंवसा असून त्याचें मन श्रद्धाळू होतें. मात्र ईश्वर व मनुष्य यांची ओळख करून देण्यास व मध्यस्ती करण्यास कोणी तिऱ्हाईत असणें अवश्यच आहे असें त्यास वाटत नव्हतें. ज्यानें त्यानें आपआपल्या बुद्धिसामर्थ्यानुरूप चिंतन,

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय
वा. क. 3 नों. दि.



मनन व भक्ति केली असतां त्यास अवश्य तितकें ईश्वरज्ञान व शक्य तितकी ईश्वरप्राप्ति खास होईल, मग हें भटांचें बंड मध्यें उगीच कशाला असें तो ह्मणे. भटांनीं व धर्मगरूंनीं धर्माचें उदात्त स्वरूप लोपवून त्यास वाणसौद्याऱ्या जिनसाची योग्यता आणून ठेविली आहे असा त्याचा आक्षेप असे, व तो त्या कालमानानें पाहतां बरोबर होता. स्त्रियां-संबंधींही त्याचे विचार फार थोर होते. लग्न हा एक अतिशय पवित्र असा संस्कार आहे व तो संस्कार ज्यास झाला आहे त्यानें आपल्या धर्मपत्नीचें व अपत्यांचें प्रेमयुक्त अंतःकरणानें पालनपोषण करणें हें कर्तव्य आहे असें तो ह्मणे. राष्ट्रांतील स्त्रिया सुशिक्षित असल्या तर त्यांच्या मुलांचे हातून काय वाटेल तें देशकार्य करवून घेतां येईल असेंही तो वारंवार ह्मणे. व लढाईच्या कामांतून जेव्हां त्यास फुरसत सांपडे तेव्हां तो स्त्रियांस सुशिक्षण देऊन त्यांचा दर्जा वाढविण्याचे उद्योगाकडे ती घालवी. त्यानें कित्येक ठिकाणीं मुलींच्या शाळा काढल्या होत्या, व कोठें मजूरदारांच्या बायकांस पीठ दळण्याच्या चक्क्या विकत घेऊन देऊन, तर कोठें इतर कांहीं करून गरिब स्त्रियांस सुखी करण्याचा तो प्रयत्न करित असे. ग्यारिबाल्डीच्या सर्व जन्मांत त्यास शास्ता असा कोणीही नव्हता ह्मटला तरी चालेल. तथापि त्यानें आपली नीति अखेरपर्यंत निर्मळ ठेविली होती. व त्याचे हाताखालीं वागणारें सैन्य नेहमीं बिन् पगारी स्वछंदी असे व लष्करी कायद्याचा कडक अमलही त्यांजवर नसे, तथापि हाताखालच्या शिपाईप्यादयाकडून स्त्री जातीचा अपमान झालेला त्यानें कधींही सहन केला नाहीं. या व इतर कारणां-करितां इटालीयन स्त्रियांची ग्यारिबाल्डीवर नेहमीं भक्ति असे.

# शुद्धिपत्र.


| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ५ | १३ | परिस्थिती. | परिस्थिति. |
| ६ | १६ | कनिष्ट. | कनिष्ठ. |
| ११ | २३ | पराकाष्टेचा. | पराकाष्ठेचा. |
| १३ | २२ | पुष्टी. | पुष्टि. |
| १४ | १८ | तुछ. | तुच्छ. |
| १७ | १ | अंतरदृष्टि. | अंतर्दृष्टि. |
| १८ | ३ | प्रजापीडनसंतापान्. | प्रजापीडनसंतापात्. |
| १८ | ४ | न दग्ध्वा विनिवर्तते. | अदग्ध्वा न निवर्तते. |
| १९ | १७ | कृमी. | कृमि. |
| २३ | २० | प्रतिनिधी. | प्रतिनिधि. |
| ६६ | ९ | माहिती. | माहीत. |
| ७० | ११ | व्हेसुव्हीयुस. | व्हेसुव्हियस, |
| १०० | २६ | दुट्टप्पी. | दुटप्पी. |
| १०६ | ४ | बरोबरीचे | बरोबरचे |
| ११६ | ३ | तोयं । | तोयं |
| ,, | ,, | तपसो योग्य. | तपसोयोग्य. |
| ,, | ४ | मूलंवा. । | मूलंबा. |
| ,, | ,, | पराधीन मिहवः | पराधीनमिहवः |
| ११७ | १९ | वसतीस्थान. | वसतिस्थान. |
| १३१ | १५ | स्क्रिमियन. | क्रिमियन. |
| १४८ | ४ | मुद्राराक्षस. | मालतीमाधव. |
| १५८ | ३ | प्रति वसति. | प्रतिवसति. |
| १६३ | ५ | संमत्ति. | संमति. |
| १६५ | ३ | युक्ती. | युक्ति. |
| १७१ | ३ | तसे न. | तसेन. |
| ,, | ,, | तसमयसाघटनाययोग्यं. | तसमयसा घटनाय [योग्यं. |
| १८० | १ | सुखः दुखाच्या | सुखदुःखाच्या. |
| १८७ | १ | मध्यस्तीनें. | मध्यस्थीनें. |
| २१३ | १४ | चिथाऊन. | चिथावून. |
| २२० | २५ | ताडें. | तोंड. |

**सूचना**,—ज्या ज्या ठिकाणीं ‘पिडमाँड’ असा शब्द असेल तो ‘पिड्माँड’ असा वाचावा.

# स्वस्तपणाची कमालच.

:0:

आह्मीं पुष्कळ लिहून स्तुती करण्यापेक्षां एकवेळ आपली खात्री करून घ्या.



पूर्वीं जीं घड्याळें आह्मीं रु. ६ व रु. १० स विकीत होतों तीं अति उत्तम व टिकाऊ असल्याकारणानें खप पुष्कळ होऊन लोकमान्य झालीं आहेत. तीं सर्वांना घेतां यावीं ह्मणून त्याच घड्याळांच्या किंमती कमी केल्या आहेत. रासकोप साईज वॉच फुलज्युएलस किं. रु. ९ ग्या. वर्षें ८ सिलेंडर वॉच किं. रु. ५ ग्या. व. ४ शिवाय सोबत कांच, कमान व पेटी.

एन्. बी. रानडे नासिक सिटी,
वाचमेकर, सलर व कमिशन एजंट.

गोपीनाथ कृष्णाजी क्षत्रिय कृत.



अचूक गुणकारीं औषधें.

पुणें येथील सन १८८८ सालांतील देशी कलाकौशल्याचे जंगी प्रदर्शनांत औषधांच्या योग्यतेबद्दल व गुणाबद्दल सर्टिफिटें मिळालीं आहेत.

**ज्वरांकुश** [तापावर रामबाण] तीन दिवसांत हटकून हींव ताप व पाळीचे ताप जातात. पैसे परत करण्याऱ्या पैजेच्या हिंवतापाचें औषधापेक्षां हें किती गुणकारी आहे ह्याची अनुभवाअंतीं खात्री होईलच. किं. रु. १ ट. व बं. खर्च -।॥◞, **जुलाब, पोटदुखी व पटकी बंद करण्याचें वस्ताद औषध**—प्रत्येक कुटुंबानें अवश्य संग्रहीं ठेवावें. किं. रु. -।॥- ट व बं. खर्च -।≈, **शक्तीवरील गोळया**—नं. १ बलवर्धक, शक्तिवर्धक इत्यादि विशेष माहिती पत्र पाठविल्यास मिळेल. किं. १०० गो. रु. ३ बं. ख. -।◞, **कपाळशुळ व अर्धशिशीवर**—पांच मिनिटांत गुण. किं. रु. १॥ बं. ख. -।≈, **शक्तीवरील गोळ्या**—नंबर २ सुस्तीवर, पानथर, मुलांचे डब्यावर व अफूचे व्यसनावर वस्ताद. किं. रु. १ ट.व बं. ख ।◞, **केंस काळेभोर करण्याचा कलप.**—किं. रु. १।ट. व बं.ख. ·॥◞, **रक्तपितीवर रामबाण.**—किं. रु. ६ ट. व बं. ख. ·।॥◞, **खोकल्यावर गोळया.**—किं. ·।॥· ट. व बं. ख. ।-, **गजकर्ण व खरजेवर मलम.**—किं. ।≈ ट. व बं. ख. तीन डब्यापर्यंत -।◞, **नेत्रसंजविनी थेंब.**—किं रु. १ ट. व बं. ख. ·।≈, **मुळव्याधीवर चूर्ण अथवा मलम**—किं. रु. १ ट. व बं. ख. -।◞, **पुपर्म्यावर वस्ताद**—ह्या औषधानें बारांपेक्षांही कमी तासांत खात्रीनें गुण पडतो. किं. १ रु. व. बं. ख. -॥◞, **वायुनाशकतेल**—किं. -।- ट व बं. ख. -।≈, **खोकल्यावर सरबत.** (दम्यावर फारच गुणकारी) किं. रु १ ट. व बं ख. -।≈, **मेदोवृद्धीवर औषध** (वायुनें व इतर कारणानें स्थूल झालेलें शरीर पूर्वस्थितीवर येतें) किं. रु. २॥ ट. व- ख. -।॥◞, औषधाचा क्याटलॉग मुफत.

**वैद्य गोपीनाथ कृष्णाजी क्षत्रिय,**

१ सदाशिवजीची गल्ली, गिरगांव पोष्ट आफिसाचे समोरचे गल्लींत मुंबई.

# श्रीमंत गायकवाड सरकार यांच्या उदार आश्रयाखालीं प्रसिद्ध झालेलीं पुस्तकें.

श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड सरकार यांनीं अनेक विद्वान ग्रंथकारांस मोठमोठालीं बक्षिसें देऊन, **राष्ट्रकथामाला, महाराष्ट्रग्रंथमाला, विविध ग्रंथमाला, ज्ञान मंजुषा, क्रीडामाला**, अशा वेगवेगळ्या सदरा खालीं अनेक ग्रंथ प्रसिद्ध केले आहेत. ते अत्यंत उपयोगी असून महत्वाचे आहेत. सदर ग्रंथांचा लाभ कांहीं सवलतीनें आमच्या वर्गणीदारांस देतां यावा ह्मणून आह्मी श्रीमंतांकडे विनंती केली होती. त्या आमच्या विनंतीस मान देवून सदर ग्रंथांची सोल एजन्सी त्यांनीं आह्माकडे सोंपली आहे. करितां त्याचा लाभ आमच्या वर्गणीदारांनीं वेळींच घेण्यास आळस करूं नये. श्रीमंत गायकवाड सरकारांनीं प्रसिद्ध केलेल्या ग्रंथांची यादी या खालीं दिली आहे. या यादींतील कोणताही ग्रंथ ता २८ फेबरुआरीच्या आंत मागविल्यास आमच्या वर्गणीदारास रुपयास दोन आणेप्रमाणें कमिशन कापून मिळेल. इतरांस पुस्तकाची भर किंमत पडेल. सदर मुदतीनंतर मात्र ही सवलत मिळावयाची नाहीं. करितां ज्यांस हा लाभ घेणें असेल त्यांनीं सदर मुदतीचे आंत गणी करावी.

---

## राष्ट्रकथामाला.

१ **इराण**—हा ग्रंथ रा. सा. शंकर विष्णु पुराणिक बी. ए. यांनीं " पर्सिया " नांवाच्या इंग्रजी ग्रंथाच्या आधारें लिहिला आहे. यांत इराणांतील राजपुरुषांचा इतिहास, मुसलमान लोकांच्या स्वाऱ्या व त्यांचा विजय, आणि इराणचा प्राचीन इतिहास व अर्वाचीन इतिहासासंबंधीं महत्वाच्या गोष्टींचें वर्णन आहे. किं. रु. १॥ आणि ट. ह. ३ आणे.

२ **तुर्कस्थान**—हा ग्रंथ रा. सा. रावजी भवानराव पावगी बी. ए. यांनीं लिहिला असून त्यांत तुर्कस्थानांतील ठळक ठळक गोष्टींविषयीं सगतवार हकिकत, तुर्क लोकांची मूलपीठिका, त्यांतील भेद, ओस्माली लोकांनीं केलेली राज्यस्थापना, राज्याचा उत्कर्ष व अपकर्ष, राज्यव्यवस्था, रशियाचे अभ्युदयाचा वृत्तांत, वगैरे गोष्टींची माहिती आहे किंमत रु. १॥। व ट. ह ३ आणे

३ **कार्थेज**—हा ग्रंथ रा. रा. नागेश आबाजी काथवटे बी ए. यानीं लिहिला आहे. यांत कार्थेजचा उत्कर्ष, डायोनिसिअसशीं शेवटचें युद्ध, राज्यव्यवस्था व धर्म, व्यापार व जमाबंदी, कार्थेज आणि रोम, वगैरे विषयांची ऐतिहासिक माहिती दिली आहे. रु. १॥। व ट. ह, ३ आणे.

४ **फ्रान्स**—हा ग्रंथ रा. रा. कृष्णाजी अर्जुन केळुसकर यांनीं लिहिला आहे. यांत फ्रान्सचा प्राचीन इतिहास, फ्रेंच भाषेची रचना, प्रख्यात राजांचे इतिहास, युद्धें, प्रसिद्ध पुरुषांचीं चरित्रें, सद्य-कालीन संस्थांचा संक्षिप्त वृत्तांत वगैरे विषयांची। माहिती आहे. किंमत रु. १॥। व. ट. ह. ३ आणे.

५ **स्पानिश मूर लोक**-हा ग्रंथ रा० सा० रामकृष्ण सखाराम आठवले, एम्. ए., प्रोफेसर इंदुर कॉलेज, यांनीं इंग्रजी ग्रंथांच्या आधारें लिहिला आहे. यांत धर्मक्रांति व तिचे परिणाम, मूर लोकांच्या कारकीर्दीतील मख्य मुख्य गोष्टी. वीर लोकांचे पराक्रम, गाथ लोकांच्या कारकीर्दीची अखेर, बर्बर लोकांचें प्राबल्य, स्पेन देशाविषयीं ऐतिहासिक गोष्टी वगैरे विषय आहेत. किं० रु० १॥। व ट. ह. ३ आणे.

६ **जर्मनी**-हा ग्रंथ रा० रा० सदाशिवराव बेलवलकर बी. ए. यांनीं दि स्टोरी ऑफ नेशन्स् या मालेपैकीं "जर्मनी" ग्रंथाच्या आधारें लिहिला आहे. यांत महापराक्रमी योद्धा हर्मन याचा साग्र इतिहास, हूण, गाथ, वगैरे लोकांच्या जर्मनीवर स्वाऱ्या व प्राचीन वीरांचीं युद्धें, धर्मसंबंधी दुफळी, जर्मनींतील राजांचा इतिहास, वगैरे माहिती दिली आहे. किंमत रु. १॥। व ट. ह. ३ आणे.

**७ आशीरिया**—हा ग्रंथ रा. रा. सीताराम रामचंद्र गायकवाड यांनीं इंग्रजी ग्रंथांचे आधारें लिहिला आहे. यांत आर्य लोक कोण, त्यांचा मूळ देश कोणता, मूर्तिपूजा कोणापासून निघाली, वगैरे गोष्टींची माहिती असून प्राचीन काळच्या धर्मकल्पना व आचार, विचार, बायबल, अशीरिया देशावर झालेल्या राजघराण्यांतील पुरुषांचे इतिहास—वगैरे विषयांची माहिती दिली आहे. किंमत रु. १॥। व ट. ह. ३ आणे.

**८ रोम**—हा ग्रंथ रा० सा० विनायक कोंडदेव ओक यांनीं अनेक इंग्रजी ग्रंथांच्या आधारें लिहिला आहे. यांत रोमशहराविषयीं दंतकथा, रोमनराजांची कारकीर्द, कार्थेज, प्युनिक युद्धें, रोमन लोकांचा इतिहास, धर्म, रीतीभाती आणि त्यांची विद्या वगैरे प्रकरणें आहेत. किं. रु १॥। व ट. ह. ३ आणे.

**सूचना.**–'राष्ट्र कथामाला' या सदरापैकीं दुसरा ग्रंथ 'इजिप्त' हा गुजराथी भाषेंत प्रसिद्ध झाला असल्यामुळें त्याची जाहिरात वरील यादींत दिली नाहीं. त्याची किंमतही १॥। रुपये आहे. हे सर्व ग्रंथ डेमी अष्टपत्री ह्मणजे ग्रंथमालेच्या साच्यांत असून गलज जाड कागदावर छपलेले आहेत, व बांधणीं जाड पुठ्याची सुबक व मजबूत अशी केलली आहे.

---

## महाराष्ट्रग्रंथमाला.

**१ राजधर्म**—हा ग्रंथ रा. सा. गोविंद सखाराम सरदेसाई बी. ए. यांनीं माकिआव्हेलि यांच्या "प्रिन्स" नांवाच्या इंग्रजी पुस्तकाच्या आधारें लिहिला आहे. त्यांत राजाचे अंगीं कोणते गुण असावे, नवीन राज्य कसें जिंकावें, त्याचें संरक्षण कसें करावें, व ह्या सर्व कृत्यांत सहाय्यभूत कोणतीं साधनें आहेत, वगैरे गोष्टी सोदाहरण दिल्या आहेत. पुस्तकाची भाषा सरळ असून विषय महत्वाचा आहे. किंमत ८ आणे व ट. खर्च २ आणे.

**२ विचार रत्नाकार**—हा ग्रंथ, कै. वासुदेव नरहर उपाध्ये शास्त्री यांनीं, प्रसिद्ध पाश्चिमात्य निबंधकार लार्ड बेकन यांच्या निरनिराळ्या ग्रंथांच्या आधारें व प्राचीन आर्य नीतिग्रंथ, चरक, वाग्भट, इत्यादि वैद्यक ग्रंथांच्या, तसेंच भारत भागवतादि पुराणें, सुभाषित संग्रह व भगवद्गीता इत्यादि धर्म ग्रंथांच्या आधारें लिहिला आहे. पुस्तकांतील विषय फारच उपयुक्त, बोधप्रद व ज्ञानदायक असून ते विचार शक्तीस जागृत ठेवणारे आहेत. किंमत रु.२ आणि ट.ह.५ आणे.

**३ इंग्लंड देशाचा विस्तार**—हा ग्रंथ रा. सा. गोविंद सखाराम सर देसाई बी. ए. यांनीं प्रो० जॉन राबर्ट सीली, यांच्या ‘ एक्स पान्शन आफ इंग्लंड ’ नांवाच्या पुस्तकाच्या आधारें लिहिला असून त्यांत इंग्लंडांतील अठराव्या शतकांतील देशस्थिति, इंग्लिश साम्राज्य, प्राचीन वसाहतीची स्थिति, अमेरिकेचा युरोपावर परिणाम, व्यापार व युद्ध, राष्ट्रविस्ताराची स्थित्यंतरें, इतिहास राजनीति, अंतर्बाह्य संकटें वगैरे विषयांचें यथास्थित वर्णन दिलें आहे. ग्रंथ मोठा असून ऐतिहासिक माहितीनें ओतप्रोत भरला आहे. किंमत रु. २ व ट. ह. ५ आणे.

**४ मार्कस आरेलियस बादशहाचीं बोधवचनें**.–हा ग्रंथ मि० सिमियन बेंजामिन, यांनीं “ मेडिटेशन्स ऑफ मार्कस ऑरेलियस ” नांवाच्या पुस्तकाच्या आधारें लिहिला आहे. यांत तत्वज्ञान व बोधवचनें यांचा भरणा पुष्कळ असून त्यापासून मनुष्यास ज्ञान, सदाचरण व सद्विचार प्राप्त होतील अशा प्रकारें पुस्तकांतील विषययोजना आहे. किंमत रु. १॥। व ट. खर्च ३ आणे

**५ प्राच्य व पाश्चात्य देशांतील ग्रामसंस्था**–हा ग्रंथ रा. सा. महादेव राजाराम बोडस एम्. ए., एल्.एल्. बी. यांनीं सर हेनरी मेन यांच्या ‘ व्हिलेज कम्यूनिटिझ ’ ग्रंथाच्या आधारें लिहिला आहे. पुस्तक अत्यंत महत्वाचें असून त्यांत प्राच्य व पाश्चिमात्य देशांतील ग्राममंडळें, व्यवहारशास्त्र, कायद्याची माहिती, आचार व रूढि, ग्रामव्यवस्था, सरकार व पड जमिनी हिंदु व

इंग्रजी स्वामित्वाचे प्रकार, वगैरे गोष्टी आहेत. किंमत रु. १॥ आणि टपाल खर्च ३ आणे

६ **रोम व कार्थेज**-हा ग्रंथ रा. रा. गणेश अनंत लेले बी. ए. यांनीं " बास्वर्थ स्मिथ कृत प्युनिक लढायांचा इतिहास " या ग्रंथाधारें लिहिला आहे. यांत रोम व कार्थेज या संस्थानांमध्यें जीं महा युद्धें झालीं, त्यांचें वीररस भरित ऐतिहासिक वर्णन आहे; शिवाय त्या वेळेची राज्यपद्धति, लोकांच्या रीतिभाती, गुणदोष, स्वदेशभक्ति, पराक्रमी पुरुषांचें विलक्षण युद्धकौशल्य, वगैरे विषयांचा समावेश आहे. प्राचीनकाळीं युरोपांत ग्रीक हें राष्ट्र फारच बलाढ्य व सर्व गोष्टींत पुढें सरसावलेलें होतें. व त्याच्याशीं टक्कर देण्यास रोमची जय्यत तयारी होती, त्या संबंधाचा इतिहास दिलेला आहे. किंमत रु. २॥ आणि ट. ह. ६ आणे

७ **गृहिणीशंकानिरसन गृहशास्त्र**-हा ग्रंथ रा. रा. केशव बाळकृष्ण परांजपे बी. ए. यांनीं "हाउस वाईफस् रिझन व्हाय; डोमेस्टिक सायन्स" या ग्रंथाच्या आधारें लिहिला आहे. या पुस्तकांत बहुतेक व्यावहारिक गोष्टींचें शास्त्रीयरीत्या विवेचन केलें आहे. तसेंच पुष्कळ चमत्कारिक गोष्टींच्या शंका सकारण व सोदाहरण नीट समजावून सांगितल्या आहेत. शिवाय इतर पुष्कळ उपयोगी विषयांचा समावेश यांत केला आहे. हें पुस्तक प्रत्येक जिज्ञासु कुटुंबियाच्या संग्रहास पात्र आहे. किंमत रु. १॥ ट.ह. ३ आणे आहे.

८ **घर आणि त्याच्या भोंवतालची जागा**—हा ग्रंथ कै. रा. रा. भानु केशव गांगनाईक यांनीं " दि हाऊस ॲन्ड इटस सराउन्डिंग " नांवाच्या ग्रंथाधारें लिहिला आहे. यांत आरोग्य संरक्षणाचा ज्या गोष्टींशी निकट संबंध आहे त्याचा विशेष विचार केला आहे. शिवाय राहण्याचें घर कसें असावें, व त्यासंबंधांत काय काय तजाविजी केल्या पाहिजेत, वगैरे गोष्टींचें स्पष्टीकरण यथाशक्ति केलें आहे. किंमत १४ आणे, व ट. खर्च २ आणे.

२ **गुन्हा व त्याचीं कारणें**—हा ग्रंथ रा० सा० रामचंद्र हरि गोखले बी. ए, एलएल. बी. वरिष्ठ अदालतीचे वकील बडोदें यांनीं, विलियम डि० मारिसन यांच्या "क्राइम अॅन्ड इटस कॉझिस्" नांवाच्या ग्रंथाच्या आधारें लिहिला असून त्यांत गुन्ह्यासबंधानें संकलित माहिती, हवामान आणि गुन्हे, निराश्रितपणा व गुन्हे, वय व स्त्रीपुरुष जाति यांचा गुन्ह्यांशीं संबंध, गुन्ह्याच्या शिक्षेविषयीं, वगैरे पुष्कळ विषयांचें सोपपत्तिक विवेचन केलें आहे. कायदे जाणणाऱ्या व त्याची माहिती मिळविणाऱ्या गृहस्थांच्या संग्रहास तर तें योग्य आहे पण प्रत्येकास त्यापासून कायद्याचें ज्ञान होईल, अशाप्रकारें त्याची रचना आहे. किंमत रु० १ आणि टपाल खर्च ३ आणे.

---

# विविधग्रंथमाला.

| | किंमत रु. | टपाल आणे. |
|---|---|---|
| १ **आथेन्सचें साम्राज्य** ... ... ... ... .. | १॥ | ३ |
| २ **ग्रीसचा इतिहास**-( ले. साजो कृष्ण धोंड ). | १॥= | ३ |
| ३ **बोधवचनें**-सेनेका आणि एपिक्टेटन यांची... ... ( ले. कृष्णाजी अर्जून केळूसकर ). ... .. | २। | ५ |
| ४ **उपनिषदें**-भाग २ रा ( ले. कृ. अ के ) ... .. | २। | ४ |
| ५ **नीतिवाक्यामृत**-( ले. ना. धों खांडकर ). ... | -॥= | २ |
| ६ **आदिराज चरित्र**-(ले. वा. शा. इस्लाम.). ... | -।- | ०॥- |
| ७ **हरि विक्रमचरित्र**-( ले. वा. न. उपाध्ये ). | २॥ | ५ |
| ८ **आहारमीमांसा**-( ले. डा. गं. बा. परांजपे ). | २। | ५ |
| ९ **काव्यकल्पलता**-( ले. वामनशास्त्री इस्लाम. ) | २॥ | ३ |
| १० **दत्तकचंद्रिका**-( ले. कृष्णशास्त्री सु ) ... | १ | २ |
| १ **पाश्चिमात्य पाकशास्त्र**-( यांत पाश्चिमात्य पाकनिष्पतीचे वेगवेगळे प्रकार सचित्र दिले आहेत डा. स मे. कीर्तिकर यांनीं पाकशास्त्र व शरीरशास्त्रासंबंधीं १२३ पानांचा उपोद्घात जोडला आहे. ले. भा. के. गांगनाईक). | ४॥ | ६ |

| | | किंमत | टपाल |
|---|---|---|---|
| | | रु. आ. | आणे. |
| २ | सूपशास्त्र-अं. १ भा. १ (मद्रासी चालीचे पदार्थ). | २॥ | ४ |
| ३ | ,, अं १ भा २ ( मद्रासी, इंग्रजी, मुसलमानी ) | २ | ३ |
| ४ | ,, अं २ ( तजावरी चालीचे पदार्थ ) ... | १। | २ |
| ५ | ,, अं. ३ भा. १ ( मुसलमानी ,, ,, ) ... | २॥ | ४ |
| ६ | ,, अं. ३ भा. २ ( ,, ,, ... ) ... | २ | ३ |
| ७ | ,, अं. ४ ( फारशी चालीचे पदार्थ ) ... | १॥। | ३ |

## ज्ञानमंजुषा.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | न्यायशास्त्र-( ले. मोरो केशव दामले एम्. ए. ) | १। | २ |
| २ | सृष्टिशास्त्र-( पूर्वार्ध भाग १ ला. ) ... ... | १॥ | २ |
| ३ | सृष्टिशास्त्र-( उत्तरार्ध भाग १ ला ) ... ... | २॥ | ४ |
| ४ | सृष्टिशास्त्र ( ,, भाग २ रा ) ... ... | २॥ | ३ |
| ५ | गॅनोकृत पदार्थविज्ञानशास्त्राचीं मूलतत्वें-( ले. बाळाजी प्रभाकर मोडक ).... ... | २ | ३ |
| ६ | व्यापारी भूगोल-( हिंदुस्थानांतील एकदर व्यापाराची साग्र माहिती. धनुर्धारीकृत ). ... | ३ | ४ |

## क्रीडामाला.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | क्रोके-कमानचेंडूचा खेळ. ... ... ... | -।- | १ |
| २ | क्रिकेट-चेंडूदांडूचा खेळ. ... ... ... | ‍०= | ०॥- |
| ३ | गॉल्फ-कुबडीचेंडू अथवा डांगचेंडू ... ... | ०≡ | ०॥ |
| ४ | बिलियर्डस्-चेंडूरंगगोट्यांचा खेळ. ... ... | -॥।- | २ |
| ५ | बिझिक-पत्यांचा खेळ. ... ... ... | ०≡ | ०॥- |
| ६ | रिव्हर्सि-मुद्रापरिवर्तन अथवा उलटापालटीचा खेळ. ... ... ... ... | ०= | ०॥- |
| ७ | मार्गन्स अंधक. ... ... ... ... | ०॥- | ०॥- |
| ८ | उताणा रुपाया-( पिच्च् अण्ड टॉस् ) ... | ०॥।- | ०॥ |
| ९ | संकेत-( व्हिस्ट ) ... ... ... ... | -।- | ०॥- |

# ...ाना पावगीकृत ग्रंथमाला.

रा. सा. नारायणराव भवानराव पावगी यांनीं आपल्या मराठी भाषेची चालविलेली सेवा सर्वांस माहीत आहेच. त्यांचे ग्रंथ किती महत्वाचे आहेत हें वेगळें सांगण्याची जरूर नाहीं. आमच्या वर्गणीदारांस त्यांच्या ग्रंथांचा लाभ कांहीं सवलतीनें म्हणजे वरील ग्रंथांप्रमाणेंच रुपयास दोन आणे प्रमाणें कमिशन कापून देण्याची व्यवस्था आम्ही केली आहे. त्यांच्या ग्रंथांची यादी या खालीं दिली आहे.

# भारतीय साम्राज्य.

## पूर्वार्ध.

**१ आर्यदेश व तत्संबंधी वृत्तान्त. भाग पहिला**—यांत देशस्थिति व वर्णन २ उभ्दिज संपत्ति; व मुख्य उत्पन्न होणारे पदार्थ. ३ उद्भिज संपत्ति व शाकपुष्फपल वैचित्र्य. ४ कृषिकर्म आणि तत्संबंधीं खतें, राब व साधनें. ५ कृषिकर्म आणि तत्संबंधी जनावरें व जमिनीचा मगदूर. ६ प्राणिजाती संपत्ति. ७ खनिजसंपत्ति. ८ वातावरणमीमांसा. ९ भरतखंड भूरचना.

**२ आर्यलोक व त्यांचें बुद्धिवैभव**—यांत आर्यांचें मूलनिवासस्थान, आर्यांची सामाजिक रचना आणि धर्मसंस्था, आर्यभाषा. वेद व वेदांगें, महाकाव्यें गद्यपद्यादि भाषाशास्त्र, इत्यादि विषय आहेत.

**३ आर्येतिहास व भुगोल.**—यांत इतिहास आणि भुगोलासारख्या ग्रंथाची न्यूनता व त्याचीं कारणें, वेदकालीन इतिहास, हिंदुस्थानांतील प्राचीन नृपावलि, दक्षिण हिंदुस्थान अथवा दाक्षिणापंथांतील नृपावलि. प्राचीन आर्यभूगोल इत्यादि विषय आहेत.

**४ आर्यशास्त्र व कला.**—यांत धर्मशास्त्र, वेदान्तशास्त्र, ज्योतिःशास्त्र, भूमितिशास्त्र, अंकगणीत व बीजगणीत. वैद्यशास्त्र. नीतिशास्त्र आर्यकला. गायनकला. अर्थशास्त्र. शिल्पकला. पटनिर्माणविद्या व रागकौशल्य. वास्तुविद्या व यंत्रकला. लेखनकला. इत्यादि विषय आहेत.

**५ आर्यशासनपद्धति व संस्था.**-यांत आर्यांची राज्यव्यवस्था. आर्यांची शासनपद्धति. आर्यांचें स्थानिक स्वराज्य. हे विषय आहेत.

**६ आर्यगृहस्थिति, नीति, शौर्य व उन्नति.**—आर्यगृहस्थिति, आर्यनीति व प्रकृतिसौजन्य. आर्यसाहस आणि शौर्य. आर्यव्यापार व उन्नति. इत्यादि विषय आहेत.

**प्रत्येक ग्रंथाची किंमत** ॥।= **व टपाल खर्च प्रत्येकी** ८-।।.

# भारतीय साम्राज्य.

## उत्तरार्ध

**७ भरतखंडांतील मुख्य धर्म.**—यांत हिंदुधर्म, झरथुष्ट्रधर्म ( पारशीधर्म ) बौद्धधर्म, ख्रिस्तीधर्म, इस्लामधर्म. इतर धर्म व पंथ. इयादि विषय **किं.** ॥।= **ट,** ८-॥,

**८ भरतखंडांतील जातिवैचित्र्य.**—यांत आर्य जाति. अनार्य जाति. इतर जाति. जातिविभाग. भिन्न भिन्न जातींतील श्रमविभाग आणि जीवनसाधन, भिन्न भिन्न जातींची विद्याभिरुचि इत्यादि विषय आहेत. **किं. १ रु. ट.** ८-॥

**९ भरतखंडांतील नानाविध भाषा.**—यांत आर्यभाषांविषयीं सामान्य विवेचन. आर्यभाषेची जन्मभूमि व तेथूनच तिच्या शाखांचा अन्यत्र विस्तार. अति प्राचीन काळीं संस्कृत ही व्यावहारिक भाषा होती, असें मानण्यास कारणें, संस्कृत भाषेचें स्थित्यन्तर व तिचा अपभ्रंश. प्राकृत आणि इतर व्यावहारिक भाषांविषयीं सामान्य विचार. अनार्य भाषांविषयीं सामान्य निरूपण. इत्यादि विषय आहेत. **किं. १। ट.** ८-॥

**१० संस्कृत भाषेचा इतिहास**—यांत संस्कृत भाषेचें श्रेष्ठत्व आणि पौराणत्व. वैदिकग्रंथाधारें त्याचें उत्पत्तिस्थान, त्याचा महिमा व काळ, याविषयांचा सामान्य विचार. ऋग्वेद. यजुर्वेद. सामवेद.

अथर्ववेद. वेदांगें वेदकालीन आचारविचार, सामाजिक स्थिति, विद्याभिवृद्धि, आणि मानसिक उन्नत्ति. लौकिकग्रंथसंपत्ति-काव्यें, नाटकें, काल्पतकथा, व कादंबरी. शास्त्रविषयक ग्रंथभांडार-व्याकरणशास्त्र-(अलंकार, इ.) धर्मशास्त्र- स्मृति, इ.) वेदान्तशास्त्र-( षड्दर्शनें, इ. ) इतर शास्त्रें व कला ( ज्योतिष, शिल्प, इ. ) किं. २॥ ट. ख ८-॥.

**११ प्राकृत भाषेचा इतिहास.** यांत—१ पूर्वपीठिका, व प्राकृत आणि मराठी भाषेचा मूलवृत्तांत, २ त्यांची उपपत्ति, ३ त्यांचा काल. ४ त्यांची रचना. ५ अपभ्रष्ट शब्द व त्यांचे नियम. ६ मराठी भाषेची बाल्यावस्था. ७ तिची यवावस्था. ८ तिची प्रौढावस्था. ९ प्राकृत व मराठी भाषेच्या संबंधानें पौरस्त्य व पाश्चात्य प्रयत्न. १० मराठी भाषेच्या संबंधानें आमचें शैथिल्य, व त्याचा दुष्ट परिणाम. ११ मराठी भाषोन्नत्यर्थ उचितोपाय १२ मराठी भाषेचा धार्मिक, नैतिक व राजकीय परिणाम इत्यादि विषयांचें साग्र वर्णन केलें आहे हें पुस्तक छापत आहे. लवकरच तयार होईल. किं २॥ रु ट. ८-॥

## भाषाशास्त्र.

१ भाषाशास्त्राचें सामान्य विवेचन व एकंदर भाषांचें दिग्दर्शन २ भाषेची उपपात्त व ध्वनी, शब्द, आणि श्रवणविचार. ३ भाषेचें. उद्गमस्थान ४ भाषेंतील शब्दांची व्युत्पात्ति, त्यांचा इतिहास, त्यांचें स्थलांतर व रूपांतर, आणि आर्यनामधेयाचा चलनी शिक्का. ५ भाषा शास्त्रच्या संबंधानें आमच्या आर्य पूर्वजांचें प्राक्कालीन परिश्रम, व पौरस्त्य प्रयत्न ६ वर्णविचार, ७ लिपिनिरूपण. भाषाविषयक पाश्चात्य प्रयत्न. ९ व्युत्पात्ति व अव्युत्पात्तिवाद १० शब्दापभ्रंशाचा त्रोटक विचार. हें पुस्तक छापत आहे लवकरच तयार होईल. किं २॥रु ट ८-॥

**दामोदर सावळाराम आणि मंडळी.—बडोदें.**

---

परमेश्वराजवळ प्रार्थना करीत बसले होते. टस्कनी या संस्थानांत दुसरा लियोपोल्ड या नांवाचा राजा होता त्यानें आपल्या आजानें घालून दिलेल्या सर्व शिस्तींचा उच्छेद करून इटलींतील इतर संस्थानांच्या जुलमी राजांचें अनुकरण करण्यास प्रारंभ केला होता. पार्मा येथें तर मूर्तिमंत ऑस्ट्रियाचा जुलमी अंमल चालू होताच. मॉडिनाची झाली तरी तीच गोष्ट, व त्या दोन्हीही संस्थानांमध्यें लोक अगदीं चेपून गेले होते. अशा स्थितीमुळें जरी इटलीमध्यें निरनिराळीं दहा संस्थानें होतीं तथापि त्या लोकांचे मनांत सर्व साधारण असा एकच हेतु उद्भवून प्रबळ झाला होता. तो हेतु ह्मटला ह्मणजे परकीय राजे जे ऑस्ट्रियन त्यांजविषयींचा द्वेषभाव हा होय. स्वदेशी राज्यें असून देखील इतका जुलूम होतो याचें सर्व कारण ऑस्ट्रिया असें लोकांच्या मनानें पक्कें घेतलें होतें. इ. स. १८१९ सालीं व्हीयना येथील तहाचे योगानें इटलीमध्यें सर्व प्रकारचे बखेडे मोडून लोकांना करड्या अंमलाखालीं ठेवावयाचे, व नेपोलियन बोनापार्टाच्या थोड्याच दिवसांच्या परंतु उदार राज्यामुळें इटॅलियन लोकांचे मनांत स्वतंत्रता, निदान सुराज्य, याचें जें बीज पेरलें गेलें होतें, तें कडक अंमलानें सफई करपवून टाकावयाचें, हीं दोन कामें युरोपियन राष्ट्रांचे बहुमतानें ऑस्ट्रियाकडे सोंपविण्यांत आलीं होतीं, व तेव्हांपासून ऑस्ट्रियाचा उन्मत्तपणा बेसुमार वाढला होता. थोड्याच काळांत ऑस्ट्रियानें इतकी अप्रीति मिळविली कीं, सर्व इटॅलियन लोकांचे मतानें ऑस्ट्रियन लोकांचा द्वेष करणें हा एक मोठा गूण असें वाटूं लागलें होतें. इ. स. १८३० मध्यें फ्रान्स देशांत राज्यक्रांति घडून आली व ती सफळ झाली. तिचें योगानें व्हियेन्ना येथील तह निदान आस्ट्रिया पुरता

तरी रद्द झाल्यासारखा झाला होता; व फार पुरातन काळा-पासून फ्रान्सचा इटलीशीं जो कांहींसा वरिष्ठपणाचा संबंध चालत आला होता तो पुन्हां स्थापित झाला. यामुळें ऑस्ट्रि-याचे पाश आपोआपच किंचित् ढिले पडूं लागले होते. इटली स्वतंत्र होण्याचे कामीं फ्रान्सकडून मदत झाली असतीच असें नाहीं. उलट एक दोन प्रसंगीं त्या कार्यास फ्रान्सकडून थोडाबहूत अडथळाच झाला होता. परंतु फ्रान्स देशाचा इटली-मध्यें फिरून शिरकाव झाल्यामुळें ऑस्ट्रियास एका प्रकारचा प्रतिस्पर्धी किंवा शत्रु उत्पन्न झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. व आपमतलबी लुई नेपोलियन बादशहानें तर ऑस्ट्रिया व जर्मनी यांच्या द्वेषानें इटलींतील संस्थानिकांस मदत कर-ण्याची लालूचही पुढें एक दोन वेळ दाखविली. अशा रीतीनें १८४८ चे पूर्वीं व त्यानंतरही फ्रान्सचा इटलीमध्यें हात शिरकल्यामुळें एका बाजूनें नुकसान झालें; परंतु दुसऱ्या बाजूनें नफा झाला. दुसरी एक गोष्ट अशी घडून आली कीं, कर्मधर्म-संयोगानें इटलीच्या स्वतंत्रतेचा मुख्य शत्रु जी पोपची गादी तेथूनच या सुमारास इटली स्वतंत्र करण्याविषयीं ज्या लोकांचे प्रयत्न चालले होते त्यांस आशा उत्पन्न झाली. तो प्रकार असा झाला कीं, ग्रेगरी पोप १८४६ च्या जून महिन्यांत निर्वतला. हा पोप इतर पुष्कळ पोपांप्रमाणें जुलमी असून रोम संस्थानां-तील प्रजेस अधिक हक्क देण्याचे विरुद्ध होता. परंतु त्याचे मागून नववा पायस नांवाचा पोप लोकांनीं निवडला. त्याची लोकांस हक्क देण्याची प्रवृत्ति तो गादीवर येतांच दिसून आली. पायस हा चांगल्या बुद्धीचा परंतु भित्रा व कमकुवत असा पोप होता. गादीवर बसल्यानंतर त्यानें पहिलें काम हें केलें कीं, जे राजकीय कैदी तुरुंगांत पडले होते त्यांस सोडून दिलें,

व तसेंच हद्दपार केलेल्या लोकांस परत येण्याची परवानगी दिली. राज्यकाभाराचे बाबतींतही कांहीं सुधारणा त्यानें केल्या व इटली-देश संयुक्त व स्वतंत्र करण्याचे कामीं त्यानें आपल्या भाषणांत अनुकूल मतें प्रदर्शित केलीं. खुद्द पोप, कधीं नव्हे तो आपले बाजूस वळला या विचारानें लोकांचे मनांत सदाशेचा पूर आला, व पायस पोप एकदम अतिशय लोकप्रिय झाला. लोकांनीं त्याचें अभिनंदन करण्याकरितां जिकडे तिकडे दीपोत्साह केले व त्याच्या नांवाचे पोवाडे करून लोक रस्तोरस्तीं गाऊं लागले. ही बातमी ऑस्ट्रियन बादशाहास लागतांच त्यास फार भय उत्पन्न झालें, व त्यानें आपलें सैन्य १८४७ चे उन्हाळ्यांत जनरल रॅडेट्स्की नांवाच्या सरदाराच्या हाताखालीं देऊन पोपच्या राज्यांत छावणी देऊन राहण्यास पाठविलें. या कृत्यानें पोपच्या पवित्र अधिकाराचा उघडपणें उपमर्द केल्यासारखें झालें, व त्याबद्दल पोपासच काय पण सर्व इटॅलियन लोक व निरानिराळ्या संस्थानांचे राजे यांनांही फार राग आला. व त्यांनीं एक कौन्सिल भरवून ऑस्ट्रियन बादशहानें जर आपलें सैन्य परत घेतलें नाहीं तर एकदम लढाई सुरू करावी असें ठरविलें. या ठरावाप्रमाणें लढाईची तयारी होतांच ऑस्ट्रियानें आपलें सैन्य परत घेतलें.

**ग्यारीबाल्डी अमेरिका सोडतो.**—वरील पैकीं बऱ्याच गोष्टी ग्यारीबाल्डी हा मॉंटीव्हीडो येथें असतांच त्यास कळल्या. त्या ऐकतांच इटलीचा ऊर्जित काळ आला या सुखदायक विचारानें त्याचें मन हर्षभरीत झालें. पोप पायस, हा इटली स्वतंत्र करण्याचे कामीं अनुकूळ झाला आहे असें ऐकतांच त्याचे मनांत तोंपर्यंत पोप, उपाध्यायवर्ग व त्यांचे राज्य याबद्दल अत्यंत द्वेष व

तिट्कारा होता, तरी तो सर्व विसरून जाऊन त्यानें पोपास आवेशयुक्त असें एक पत्र लिहिलें. त्यांमध्यें पायसची पुष्कळ स्तुति केलेली असून आपण इटली स्वतंत्र करण्याचे कामीं मदत करण्यास एका पायावर तयार आहों व पोप महाराजांनीं या अल्प स्वल्प मदतीचा अंगिकार केला असतां आपणावर मोठा अनुग्रह केल्यासारखें होईल, असें मोठ्या आदरानें व गौरवानें त्यानें लिहिलें होतें. परंतु या पत्राचा त्यास पोपकडून मुळींच जबाब मिळाला नाहीं. पुष्कळ दिवस वाट पाहिली तथापि कांहींच उत्तर येत नाहीं, याचें ग्यारीबाल्डीस फार वाईट वाटलें, परंतु तो बिलकुल निराश झाला नाहीं. कारण प्रत्यही इटलींत निरानिराळ्या अनुकूल गोष्टी घडून येत होत्या, त्यांची माहिती ग्यारीबाल्डीस टपालांतून मिळूं लागली. हिकडे मॉंटीव्हीडो संबंधीचें कामही फारसें उरलें नव्हतें. यामुळें आपण इटलीस परत जावें अशी ग्यारीबाल्डीस उत्सुकता उत्पन्न झाली. त्यानें अमेरिकेंतील सर्व इटलीयन लोकांस एक विनंतिपत्र काढलें, व इटलीच्या प्रवासास लागणारा खर्च भागविण्याकरितां वर्गणी मिळविण्यास सुरवात केली. हिकडे मॅझिनीकडून त्यास सविस्तर पत्रही आलें. त्यांत आनंददायक अशी खबर लिहिलेली असून मॅझिनीनें ग्यारीबाल्डीस इटलींत परत बोलाविलें होतें. यामुळें प्रवासाची तयारी जारीनें करण्यास त्याला दुप्पट उमेद आली. परंतु पुरेशी वर्गणी जमेना, व ग्यारीबाल्डी आणि त्यांचे स्नेही हे स्वतः जवळ जवळ कफल्लक! मॉंटीव्हीडोवर ग्यारीबाल्डीचे पुष्कळ उपकार झालेले असल्यामुळें येथील लोकांनीं तरी त्यास मदत करावयाची; परंतु तो जाणार व त्याच्या नांवामुळें व पराक्रमामुळें आपणांस आज-

पर्यंत मिळत असलेला फायदा या पुढें बंद होणार या विचारानें, त्यांनीं ग्यारीबाल्डीस कृतज्ञपणानें मदत करावयाची तें एकाच बाजूस राहून परत जाण्यास जितके ह्मणून अडथळे त्यांस आणितां आले तितके त्यांनीं आणिले. परंतु ग्यारीबाल्डीचा उद्योग त्याचे उत्साहाइतकाच प्रबळ असल्यामुळें त्यांचे हेतु सिद्धीस गेले नाहींत. ज्या जहाजावरून ग्यारीबाल्डी व त्याचे सोबती इटलीस परत जाणार होते, त्याचा मालक त्यांचेपासून अगदीं आयत्या वेळीं आव्वाचेंसव्वा भाडें मागूं लागला. यामुळें त्यांस आपले अंगांतील कपड्याखेरीज बाकी सर्व चीजवस्त, वस्त्रप्रावर्ण विकून पैसे करावे लागले. परंतु त्यांनीं तितकेंही केलें. इतका त्यांचा निर्धार पाहिल्यावर सरते-शेवटीं एका जिनोई व्यापाऱ्यानें त्यांस एक मोठी रक्कम बक्षीस दिली, व मॉंटिव्हीडो येथील लोकांनीं त्यांस दोन तोफा व कांहीं बंदुका बक्षीस दिल्या. व ग्यारीबाल्डी शेवटीं एकदाचा आपल्या सोबत्यांसह १८४८ चे मार्चचे २७ वे तारखेस अमेरिका सोडून निघाला.

**स्वदेशाची आठवण**—ग्यारीबाल्डीनें अमेरिकेंत जीं १४ वर्षे घालविलीं, व तेवढ्या अवधींत जीं निरनिराळीं साहसाचीं, पराक्रमाचीं व परोपकाराचीं कृत्यें केलीं, त्यांवरून त्याच्या अंतः-करणाचें चांगलें परीक्षण होतें. स्वदेश सोडून चवदा वर्षे झालीं व मध्यंतरी त्याच्या जीवितक्रमांत पुष्कळच फरक पडला; त्याचप्रमाणें अगदीं स्वदेशकार्याप्रमाणें मन लावून व जीवावर उदार होऊन दक्षिण अमेरिकेंतील लोकसत्ताक राज्यांस त्यानें मदत केली. तथापि इतक्या अवधींत त्याचा एकही दिवस असा गेला नाहीं, कीं ज्या दिवशीं त्याला आपल्या प्रिय इटली देशाची आठवण झाली नाहीं! किंवा त्यानें असें एकही

महत्वाचें काम केलें नाहीं, कीं ज्यापासून स्वदेशकार्यास पुढें मागें केव्हां तरी त्याचा अप्रत्यक्ष फायदा होण्यासारखा नव्हता. आकाशांत उडणाऱ्या पक्ष्यांची ज्याप्रमाणें आपल्या घरट्यावर सदोदित दृष्टि असते, त्याप्रमाणें हद्दपारीच्या ह्या चवदा वर्षांत त्याची अंतरदृष्टि आपल्या जन्मभूमीवर एकसारखी लागून राहिलेली होती. अमेरिकेवर त्याचें कमी प्रेम होतें असें नाहीं. एवढेंच नव्हे, तर अमेरिका सोडतांना त्याचे मनास अतिशय वाईट वाटलें. यासंबंधानें त्यानें आपल्या आत्मचरित्रांत खालीलप्रमाणें उल्लेख केलेला आहे. "आह्मी स्वदेशीं जाण्यास निघणार खरे, परंतु ज्या लोकांच्या सुखदु:खाचे आह्मीं इतके दिवस सहभागी झालों होतों व ज्यांनीं आमचा उत्तम तऱ्हेचा पाहुणचार केला होता, अशा लोकांस त्यांची कामगिरी पुरी होण्याचे पूर्वीच सोडून जावें लागतें हा विचार दु:सह आहे." परंतु किती झालें तरी स्वदेश तो स्वदेश! चवदा वर्षांचे वनवासांत ग्यारीबाल्डीनें आपणांकडून होईल तितका परोपकार केला होता. परंतु ज्या कार्यामुळें हा वनवास त्याला प्राप्त झाला होता त्याचे सफलतेस पुन्हां एकवार अनुकूल स्थिति प्राप्त झाल्यावर स्वदेशाकडे परत धांव मारल्यावांचून ग्यारीबाल्डीस कसें राहवलें असतें बरें?

**ग्यारीबाल्डी व मॅझिनी**–परस्परांचा १४ वर्षें वियोग झाला होता तरी ग्यारिबाल्डी व मॅझिनी यांच्या एक[illegible] जडलेल्या कोंवळ्या मैत्रीस भंग पडला नाहीं. ते मधूनमधून एकमेकांस पत्रें पाठवून कुशल वृत्त व देशवृत्तांत कळवीत असत. ग्यारिबाल्डीचे पराक्रम ऐकून मॅझिनीस फार हर्ष वाटे. त्यांचें सुंदर व चटकदार वर्णन करून

तो तें लंडन येथें प्रसिद्ध होणाऱ्या वर्तमानपत्राचे द्वारें इटलींतील आपल्या देशबांधवांस वाचावयास पाठवी. यामुळें ग्यारिबाल्डी हा जो इटली सोडून जातांना अप्रसिद्ध होता, तो १८४८ त परत येण्याचे वेळीं इतका लोकप्रिय व प्रसिद्ध झाला होता कीं, त्याचे वाटेकडे इटलींतील देश-भक्तांचे डोळे लागून राहिले होते. इकडे ग्यारिबाल्डीनें युरुग्वे व मॉंटीव्हीडोस मदत करण्याचें कामीं आपलेंही एक काम साधून घेतलें होतें. तें असें कीं, अमेरिकेंत गेलेल्या इटालीयन लोकांस त्यानें युद्धकला शिकवून तरबेज व शूर केलें होतें, व पुढें इटलीमध्यें स्वयंसेवक शिपाई आयत्या वेळीं जमवून लढाया करण्याची जी अपूर्व पद्धत ती त्यानें अमलांत आणिली. त्याचें मूळबीज अमेरिकेंतच प्रथम पेरलें गेलें होतें. अमेरिकेमध्यें शेंकडों इटालीयन स्वयंसेवक स्वतंत्रेचे कार्यांत मरण पावले होते. व अशा उदार सोबत्यांनीं ज्या भूमीमध्यें समाधि घेतल्या होत्या, ती मागें सोडून जातांना ग्यारिबाल्डीस अर्थात्च रडूं आलें.

**आनंदाची भेट**–तीन महिने प्रवास केल्यावर ग्यारी-बाल्डीचें जहाज नाईसचे किनाऱ्याजवळ आलें. आपली जन्मभूमी १४ वर्षांनंतर फिरून दृष्टीस पडल्यामुळें त्याचा हर्ष हृदयांत मावेना. परंतु अद्याप पूर्वींची फांशीची शिक्षा, सुदर्शन चक्राप्रमाणें त्याचे डोक्यावर फिरत होतीच! यामुळें ग्यारिबाल्डीनें एकदम किनाऱ्यावर उतरूं नये अशाबद्दल त्याच्या सोबत्यांनीं त्याला फार आग्रहानें व विनंतीपूर्वक सांगून पाहिलें, परंतु तो तें मुळींच मनास आणीना. दूर समुद्रावर असतांच त्यानें आपल्या जहाजावरील मॉंटीव्हीडोचें निशाण काढून टाकून इटलीचें तीनरंगी निशाण फडफडत लाविलें होतें.

आणि आतां नाईस शहरही डोळ्यापुढें मूर्तिमंत आलें, मग ग्यारीबाल्डीस दम कसचा निघतो? त्यानें सगळ्यांचें ह्मणणें बाजूस ठेवून किनाऱ्यावर एकदम उतरण्याचा निश्चय केला. इकडे ग्यारिबाल्डी आला ही बातमी हां हां ह्मणतां सर्व गांवभर पसरली, व थोडक्याच वेळांत निम्मा अधिक गांव किनाऱ्यावर येऊन थडकला. उभयपक्षींही आनंदाचें भरतें आलेलें असल्यामुळें त्यावेळचीं त्यांचीं प्रेमालिंगनें, त्यांचे आनंदाश्रु व किनाऱ्यावरून जहाजावर व जहाजावरून किनाऱ्यावर येण्याजाण्याची गडबड या सर्वांचें वर्णन कोण करूं शकेल? चवदा वर्षें मातृभूमीचा वियोग झाल्यामुळें ग्यारिबाल्डी व त्याचे सोबती यांनां किनाऱ्यावर केव्हां एकदांचा पाय ठेवूं असें झालें होतें. तूं आधीं कां मी आधीं, अशी जणूं काय त्यांच्यामध्यें शर्यत लागल्यामुळें जहाजावरील लोक भराभर उड्या घेऊं लागले. ग्यारिबाल्डी इटलीकरितां लढण्याचे हेतूनें अमेरिकेहून आला आहे असें कळतांच तेथल्या तेथेंच कित्येक लोक फुकट शिपाईगिरी करण्यास तयार झाले, व त्यांनीं ग्यारिबाल्डीचे सैन्यांत आपलीं नांवें नोंदून घेतलीं. गांवांतील इतर लोकांबरोबर ग्यारिबाल्डीची आई, त्याची बायको ॲनिटा व मुलें व स्नेही हे सर्व अर्थात् किनाऱ्यावर आले होते. (ग्यारिबाल्डीनें ॲनिटास आपण निघण्याच्या पूर्वीं कांहीं दिवस चांगलीशी सोबत पाहून पुढें पाठवून दिलें होतें.) परदेशाहून जहाज आलें असल्यामुळें क्वारंटाईन वगैरेचे नियमांमुळें जहाजावरील लोक उतरण्यास वेळ लागला असता, परंतु ते सर्व नियम नाईस येथील लोकांचेच हातीं असल्यामुळें तो सर्व त्रास टळला. किनाऱ्यावर उतरतांच ग्यारिबाल्डीनें आपल्या आईस

प्रेमानें कडकडून मिठी मारली व आपल्या मुलांचें चुंबन घेतलें. व परस्पर सुखदु:खाच्या गोष्टी सांगत व मंडळींना भेटी देत देत आपल्या सोबत्यांसह तो घरीं जाऊन पोंचला. परंतु तो घरीं फार दिवस राहिला नाहीं. कारण सरहद्दीवर लढाई आगाऊच जुंपलेली होती, व ग्यारीबाल्डी लढण्यास परत आला होता; तेव्हां त्यास स्वस्थ कसें बसवेल? इटलीस येतांच ग्यारीबाल्डीनें एकदम जिनोआस निघून जावें असें ठरलें होतें. त्या प्रमाणें तो लागलाच निघून गेला. जिनोआ येथें लोक त्याची वाट पाहत बसलेच होते, व त्यांनीं त्याला नेण्याकरितां मुद्दाम एक जहाजही पाठवून दिलें होतें. ग्यारीबाल्डी जिनोआ येथें पोंचतांच नाईसप्रमाणें तेथेंही लोकांनीं जिकडे तिकडे आनंदोत्सव केला.

**प्रथमचीं किरकोळ बंडें**—या वेळेस सर्व इटलीमध्यें मोठीच धामधूम माजून राहिली होती. १८४८ हें साल यूरोपच्या इतिहासांत अत्यंत स्मरणीय अशांपैकीं एक होऊन गेलें. यावर्षीं सर्व यूरोपखंडांत किंबहुना सर्व पृथ्वीचे पाठीवर बंडें व राज्यक्रांत्या यांचें वादळ उठलें होतें. त्यांमध्यें विशेषत: फ्रान्स देशांत भयंकर बंड होऊन फ्रेंच लोकांनीं लुईफिलिप बादशहास पदच्युत करून पुन: एकवार लोकसत्ताक राज्य स्थापिलें. इतर देशांतही बंडें झालीं. परंतु त्या सर्वांत फ्रान्समधील बंडाचा व इटलीचा सर्वांत अधिक निकट संबंध होता. खुद्द इटलींत या सालीं जितकी बंडाळी झाली तितकी मात्र यूरोपांत इतर कोठेंही माजली नसेल. व एकंदरीनें इटलीचें त्यापासून जितकें नुकसान झालें तितकें दुसऱ्या एकाद्या राष्ट्राचें क्वचित्‌च झालें असेल ! इटलींतील बंडांस १८४७ चे अखेरीसच सुरवात झाली होती. कारण त्या वेळीं पार्मा

येथील डचेस मेरी लुई ही मरण पावल्यामुळें तें संस्थान कोणाचे ताब्यांत द्यावयाचें याबद्दल पुष्कळ वाटाघाट चालली होती. व्हायेन्नाच्या तहाप्रमाणें पाहिलें असतां पार्मा हें संस्थान तेथील डयूकचे ताब्यांत जावयाचें हातें; परंतु ही व्यवस्था अमलांत आली असतां पार्मा येथील लोकांचे फार नुकसान होत होतें, यामुळें तेथें बरीच गडबड झाली. मिलर्न, लेगहॉर्न, मेसिना, पालर्मो, वगैर ठिकाणींही बंडें झालीं. ही बातमी नेपल्स येथें जाऊन पोहोंचतांच फर्डीनंड राजाकडून अधिक हक्क संपादण्याकरितां लोकांनीं फिरून एकवार डोकें वर उचललें. फर्डिनंड हा जात्या भित्रा असल्यामुळें त्यानें लोकांच्या मागण्या एकदम कबूल केल्या; व प्रधान लोक निवडावयाचे ते लोकांस जबाबदार असावे, मुद्रणस्वातंत्र्य पूर्णपणें असावें, अपराध्यांची चौकशी ज्यूरी म्हणजे पंचाईत मार्फत व्हावी, व कायमचें पार्लमेंट ( लोकसभा ) स्थापून तिजमध्यें लोकनियुक्त प्रतिनिधि असावे, इत्यादि अटींचा तह फर्डीनंड व त्याची प्रजा यांजमध्यें झाला.

**पिड्मांट पुढाकार घेतें**—अशा रीतीनें स्थानिक हेतूकरितां स्थानिकच बंडें इटलीभर झाल्यासारखीं प्रथम दिसलीं. परंतु वास्तविक हीं बंडें म्हणजे सर्व इटली संयुक्त व स्वतंत्र होण्याकरितां जें युद्ध पुढें लवकरच व्हावयाचें होतें, त्याचें तोंड लागण्याच्या वेळच्या या चकमकीच होत्या असें ह्मटलें असतां हरकत नाहीं. इटलींतील सर्व संस्थानांत हें पिड्मांट हेंच प्रमुख असून पूर्वीपासून सर्वांपेक्षां अधिक उदार तत्त्वांवर तें आपला राज्यकाभार करीत होतें. त्यानेंही यावेळीं पुढारपण घेऊन या पुढें चार्लस आलबर्ट राजा हा स्वतंत्र (पायास ) या नात्यानें राज्य करणार अशी द्वाही फिरविली. त्याचे

पाठोपाठ टस्कनीनेंही तोच कित्ता वळविला. पोप पीओनोनो यानेंही आपल्या धर्माधिकाऱ्यांची सभा भरवून आपल्या राज्यांतील प्रजेस कितपत राजकीय सत्ता देणें प्रशस्त होईल याची वाटाघाट चालविली. प्रत्यही नवीन नवीन बंड होऊं लागलें, व ड्यूक, राजे वगैरे लोक लढाई करण्याचे भानगडींत न पडतां आपले अधिकारांचे भराभर राजिनामेच देऊं लागले. याच सुमारास फ्रान्समधील राज्यक्रांति घडून आली, व नवीन स्थापलेल्या लोकसत्तात्मक राज्याच्या अध्यक्षानें जिकडे तिकडे आपल्या वकीलांमार्फत असें फर्माविलें कीं, व्हीयेना येथील तहानें ठरविलेल्या इटलीच्या स्थलसीमा कायम राखणें जरी प्राप्त आहे, तरी कोणच्याही स्वतंत्र संस्थानावर कोणी परकी राजा स्वारी करील तर फ्रान्सचें लोकसत्तात्मक राज्य त्या संस्थानाचा पक्ष घेऊन लढण्यास उभें राहील. या ग्वाहीमुळें तर इटलींतील लोकांस बंडें करण्यास अधिकच उमेद आली. इतकें झाल्यावर ऑस्ट्रियास लढाई करणें प्राप्त आहे असें वाटूं लागलें. ही संधि साधून पिड्मॉंटचे चार्लस आल्बर्ट राजानें ऑस्ट्रियाविरुद्ध लढाई करण्यास कंबर बांधली. यावेळीं त्यानें कांकू केलें असतें तर त्याला मुकाट्यानें राज्य सोडून जाणेंच भाग होतें. आस्ट्रिया व इटली ह्यांच्या लढाईचें तोंड उत्तरेकडील लॉंबर्ड व व्हेनीस या प्रांतांत लागलें होतें, व तेथील लोकांस मदत करण्याचा इतरांनीं निश्चय केला. पिड्मॉंट येथील सैन्य घेऊन चार्लस आल्बर्ट हा स्वतः मोहिमेस निघाला, व वाटेंत लोकांनीं ठिकठिकाणीं इटलीचा राजा या नांवानें त्याचा जयजयकार केला. परंतु त्याचे हातून ह्मणण्यासारखा कांहीं कार्यभाग झाला नाहीं. त्याचे सैन्यास प्रथम एक दोन जय मिळाले खरे; परंतु आस्ट्रि-

याचा सरदार मार्शल रॅडेटस्की हा जलदी करून मागें फिरला व ऑस्ट्रियाचे इतर सरदारांस जाऊन मिळाला. अशा रीतीनें चार्लस आलबर्ट राजाचा आळस व कांहींशी इतर संस्थानिकांनीं दाखविलेली मत्सरबुद्धि यांमुळें या मोहिमेंतून फारसें कांहीं निष्पन्न झालें नाहीं. शिवाय अगदीं आयत्या वेळेस पोपनें ऑस्ट्रियाचे विरुद्ध लढण्याचें नाकारिलें. यामुळें इटलीचे कार्यास थोडासा अडथळा आला.

**ग्यारीबाल्डी व चार्लस आलबर्ट यांची भेट**— चार्लस आलबर्ट हा रोव्हरबेला येथें तळ देऊन राहिला असतां ग्यारीबाल्डी हा त्यास भेटण्याकारितां गेला. चवदा वर्षांपूर्वी या चार्लस आलबर्ट राजानेंच ग्यारीबाल्डीस फांशीची शिक्षा ठरविली होती. परंतु आज उभयताही एकाच काय. गुंतले असल्यामुळें त्या गोष्टीचें वैषम्य नाहींसें झालें असेल असें निदान ग्यारीबाल्डीस तरी वाटलें; व बाकी कांहीं असलें तरी राजानें त्याची फांशीची शिक्षा अमलांत आणण्याचा हुकूम केला नाहीं हेंही खरें. चार्लस आलबर्टनें ग्यारीबाल्डीस भेटण्याची परवानगी दिली येवढेंच नव्हे, तर त्याचे हातांत हात घालून दक्षिण अमेरिकेंत नांव मिळविल्याबद्दल त्याचें अभिनंदनही केलें. ग्यारीबाल्डीनेंही "त्यांत कांहीं विशेष नाहीं, मीं माझें कर्तव्य केलें आणि हल्लीं मात्र मोठ्या प्रेमानें इटलीकारितां आपल्या सैन्यांतील एक शिपाई होऊन लढावें अशा इच्छेनें आलों आहे" अशी नम्रपूर्व विनंति केली. परंतु चार्लस आलबर्टनें "मला या बाबतींत प्रधान लोकांस विचारलें पाहिजे, तूर्त तुह्मांस एकदम कांहींच उत्तर देतां येत नाहीं, तुह्मी टयूरीन येथें जा ह्मणजे तुह्मांस कामगिरी सांगतील" असा जबाब दिला. परंतु ग्यारीबाल्डी

हा नुकताच ट्यूरीन येथून आला असून तेथील अधिकाऱ्यां-नीं " राजाकडे जा, ह्मणजे कामगिरी मिळेल " असें सांगि-तलें होतें. तात्पर्य, इकडून तिकडे व तिकडून इकडे असे हेलपाटे घालण्यास लावल्यानें ग्यारीबाल्डीस फार वाईट वाटलें. तो केवळ स्वदेशाकरितां लढावें या हेतूनें इटलीस आला होता असें असून व तिकडे असतां मुख्य सरदाराचीं कामेंही त्यानें केलीं असून, हल्लीं त्यास राजानें आपल्या लष्करांत नुसती शिपाईगिरीची कामगिरीही सांगूं नये याहून अधिक नवल तें कोणतें ? परंतु यापुढें ग्यारीबाल्डीचे राजानें व प्रधान मंडळानें जे जे अपराध केले त्यांचे मानानें पाहतां हे कांहींच नव्हते.

**ग्यारीबाल्डी व मॅझिनी**- ग्यारिबाल्डीस मनांतून अतिशय वाईट वाटलें, पण करतो काय ? झालेल्या गोष्टीचा विषाद न मानतां तो–मिलन येथील लोकांनीं अद्याप आप-णाकडून लढाई चालविली होती–त्यांस मदत करण्यास निघून गेला. त्या ठिकाणीं मॅझिनीचे लोक पूर्वींच येऊन बसले होते व त्यांनीं बंडवाल्यांस उत्तेजन देण्याचें व मदत करण्याचें काम चालविलें होतें. राजानें आपल्या सैन्यांत कामगिरी सांगितली नाहीं, यामुळें ग्यारिबाल्डीचें विशेष नुकसान न होतां राजाचेंच एक प्रकारें नुकसान झालें. कारण, तो राजपक्षास येऊन आयताच मिळत होता तो मॅझिनीसारख्या बंडखोरांचे हातांत अचूक जाऊन पडला. ग्यारिबाल्डी मिलन येथें जातांच त्यास तेथील अधिकाऱ्यांकडून लष्कर उभारण्याची परवानगी मिळाली व थोड्याच काळांत त्यानें ३०,००० स्वयंसेवक जमविले. पुढें लवकरच ऑस्ट्रियन सैन्यानें मिलन शहरास वेढा दिला व ग्यारिबॉल्डीस शहर लढविण्याचे कामीं आपले लोक घेऊन येण्यास पाचारण झालें. परंतु चार्लस आलबर्ट

हाही त्या सुमारास मिलन येथें आला व त्यानें कोणाचा सल्ला न घेतां ऑस्ट्रियन लोकांशीं एकदम तहाचें बोलणें लाविलें, व या तहाचे योगानें मिलन ऑस्ट्रियाचे ताब्यांत गेलें. ही गोष्ट ग्यारिबॉल्डीस अर्थात्च आवडली नाहीं. लढाईचें तोंड लागलें असतां विनाकारण आपल्या अनहिताचा तह करावयाचा व तरवारी म्यानांत फुकट घालून ठेवाव्याच्या यापेक्षां अधिक शरमेची गोष्ट कोणतीच नाहीं व आपण तरी होतां होईतोंपर्यंत हार जाणार, नाहीं, मेरपर्यंत लढूं, असा ग्यारिबाल्डी व त्याचे कांहीं सोबती यांनीं निश्चय केला. मॅझिनीलाही चार्लस आलबर्ट राजाचें करणें पसंत नव्हतें. त्यानेंही त्यास कांहीं थोडे लोक व द्रव्य देण्याचें कबूल केलें. परंतु राजानें तह कबूल केलेला असल्यामुळें ग्यारिबाल्डीनें लढाई चालविणें म्हणजे ऑस्ट्रिया व चार्लस ऑलबर्ट या उभयतांच्याही विरुद्ध बंडखोरपणा करण्यासारखें होतें. तथापि ग्यारिबाल्डीनें तें कांहीं एक मनामध्यें न आणतां तो आपल्या बरोबरीचें सैन्य घेऊन ऑस्ट्रिया विरुद्ध लढाई करण्यास निघाला. त्यानें एक विनंतीपत्र प्रसिद्ध करून त्यामध्यें लोकांस असें जाहीर केलें कीं, चार्लस आलबर्ट राजा हा इटली देशाचा पक्का वैरी असल्यामुळें त्यानें असा भित्रेपणाचा तह करून हातचें मिलन घालविलें; व जो कोणी इटलींतील आस्ट्रियन लोक हद्दपार होईपर्यंत लढाई थांबवा असें म्हणेल, तो आपला शत्रू असें समजून आपण त्याचें पारिपत्य करूं.

**ऑस्ट्रियाशीं एकट्या ग्यारीबाल्डीचें युद्ध**--ग्यारीबाल्डी आपलें सैन्य घेऊन आल्पस पर्वताचे पायथ्यास गेला. तेथून त्यानें आस्ट्रियन लोकांबरोबर लढाई चालविली. लॅगोमॅग्युअर नांवाच्या सरोवरावर ऑस्ट्रियाचीं दोन जहाजें असतां त्यानें त्यांवर

आपले १५०० लोक चढऊन तो लुईनो येथें गेला. यानंतर लवकरच ग्यारीबाल्डीची व आस्ट्रियाचे सैन्याचे एका तुकडीची चकमक उडाली. त्यांतही त्यास यश आलें. परंतु सुमारें अर्ध्या तासांत ऑस्ट्रियन लोक फिरून जमाव करून परत आले. या वेळेस ग्यारीबाल्डीस ताप आला होता तरी तो तसाच घोड्यावर स्वार झाला. ऑस्ट्रियन लोक आले ते कांहींएक कळूं न देतां एकदम ग्यारीबाल्डीचे सैन्यांत घुसले. संध्याकाळची वेळ झाली होती व ग्यारी-बाल्डीचे लोक रात्रीची विश्रांति घेण्याकरतां व्यवस्था करूं लागले होते. अशा वेळीं शत्रूनें गांठल्यामुळें त्यांची थोडी गांदल झाली, परंतु ग्यारीबाल्डी हातांत तरवार घेऊन सर्वांचे पुढें झाला व त्यानें आपल्या लोकांस उत्तेजन देऊन शत्रूस मागें हटविलें. परंतु पुढें फारसा निभाव लागणार नाहीं असा विचार करून ग्यारीबाल्डी रातोरात ती जागा सोडून परत फिरला. त्यानें आरोना येथें आपले सर्व लोक एकत्र केले व या पुढें लढाई चालविणें शक्य नाहीं असें ठरवून त्यांस घरोघर जाण्यास परवानगी दिली व आपण स्वतः एकटाच स्वित्सर्लंडकडे जावयास निघाला. वाटेंत कदाचित् कोणी ओळखील ह्मणून त्यानें, एक शेतकरी कुणब्याचा पोषाख अंगावर घातला व त्या प्रदेशांतील एक वाटाड्या बरोबर घेतला. अंगांत ताप होताच तरी ग्यारीबाल्डी मजल दर मजल करून स्वित्सर्लंडांत पोंचला. स्वित्सर्लंडांत जाण्याचें कारण असें होतें कीं, ग्यारीबॉल्डीनें तहाचे विरुद्ध वर्तन केल्यामुळें चार्लस आल्बर्ट राजानें त्यास पिड्मॉंट प्रदेशांत परत येण्याची कांहीं दिवस मनाई केली होती. असो; स्वित्सर्लंडांत कांहीं दिवस राहून तापांतून बरा

झाल्यावर ग्यारीबाल्डी नाईस येथें गेला व तेथें आपल्या आईस व बायका मुलांस भेटून तो जिनोआ येथें गेला. जिनोआ येथें तो असतां चार्लस आलबर्ट राजानें ग्यारीबाल्डीस निरोप पाठवून पिड्मॉंट येथें परत बोलाविलें व आपले सेन्यामध्यें बहुमानाची जागा देण्याचें वचन दिलें. ग्यारीबाल्डीनें अमेरिकेंत व इटलीमध्यें केलेले पराक्रम पाहून व त्याची निस्पृहता जाणून, हा मनुष्य केवळ बंडवाला नसून इटलीचा खरोखर हितकर्ता आहे अशी त्याची आतां खातरी झाली होती. परंतु ग्यारीबाल्डी हा अशा कोरड्या बहुमानाचा थोडाच भुकेला होता ! त्यानें तो बहुमान तर नाकारलाच; परंतु चार्लस आलबर्ट राजास त्यानें उलट असें सांगून पाठविलें कीं व्हेनिस शहर ऑस्ट्रियाशीं मोठ्या शौर्यानें लढत आहे त्या. मदत करण्यास मी जाणार. व खरोखरच त्यानें २५० लोक जमविले व जिनोआहून व्हेनिसकडे जाण्यास निघाला; परंतु वाटेंतच त्यास रोमकडील खबर कळली व त्यामुळें त्यानें व्हेनिसला जाण्याचा आपला बेत बदलला.

**रोममधील बंडाची हकीकत**—आतां इकडे रोममध्यें अशी हकीकत घडून आली होती कीं, पोप पिओनोनो यानें जरी लोकपक्षाकडे आपला कल प्रथम दाखविला होता, तरी ऑस्ट्रियाशीं प्रत्यक्ष लढाई सुरू झाल्यावर त्याच्या कमकुवत व चंचल मनाला धीर धरवेना; व त्यानें इतर संस्थानिकांस मदत करण्याचें आयत्या वेळीं नाकारिलें. पुढें युद्धामध्यें चार्लस आलबर्ट राजाचे सैन्याचा पराभव झाल्यामुळें तर पिओनोनोचा विचार अर्थात्‌च कायम झाला. परंतु रोम येथील लोकांस त्याचें करणें मुळींच पसंत नव्हतें. यामुळें रोमच्या राजसभेंत बरेच तंटे बखेडे

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय ठाणे.
वा. क्र. ... ३ ... नों दि ... ३ ...
वि. ... चरित्र ... क्र. ... ...

IRBK-0100003

IRBK-0100003